ISSN 0973- 8452

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर पौष-फाल्गुन 1931
जाने-मार्च 2010 / खंड 33 अंक 4




जागतिक वित्तीय अरिष्ट : सैध्दांतिक आणि व्यावहारिक दृष्टिकोन

ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींचा शेतीविषयक अभ्यास

आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतीविषयक समस्या

तेहत्तिसावे वार्षिक अधिवेशन : अहवाल

97-7

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये ।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः ।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

जानेवारी - मार्च 2010/खंड 33, अंक 4

www.marthpari.org

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

प्रमुख संपादक
जगन्नाथ शामराव पाटील

सहायक संपादक
संतोषकुमार बबनराव यादव

सल्लागार मंडळ
(2009-12)
लालासाहेब घाटगे
मोहन चौधरी
शिवाजी अंभोरे
संतोष कदम

संपादकीय पत्रव्यवहार
जगन्नाथ शामराव पाटील
शांती प्लाझा, बी- 9,
880/881, शनिवार पेठ.
सातारा. 415 002
मो.9423261796
फोन:(02162)233152

। अ नु क्र म णि का ।

जागतिक वित्तीय अरिष्ट : सैद्धांतिक आणि व्यावहारिक दृष्टिकोन
विनायक श्रीधर देशपांडे . . . . . 304

ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींचा शेतीविषयक अभ्यास
जयवंत इंगळे . . . . . 338

आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतीविषयक समस्या
प्रशांत हरमकर, मीरा आळशी . . . . . 374

तेहत्तिसावे वार्षिक अधिवेशन :अहवाल
दि. व्यं. जहागिरदार, एम्. एन्. शिंदे, के. जी. पठाण, अनिल सुर्यवंशी,जगन्नाथ शामराव पाटील . . . . . 385

चौत्तिसावे वार्षिक अधिवेशन : विषयांची रूपरेषा
ज्ञानोबा मोरे, बबन खामकर, एम्. यू. मुलाणी . . . . . 407

मराठी अर्थशास्त्र परिषद

कार्यकारी मंडळ(2009-10)

**अध्यक्ष**

विनायक श्रीधर देशपांडे (नागपूर)

**कार्याध्यक्ष**

दिलीप खंडेराव पाटील (सांगली)

**कार्यवाह-खजिनदार**

अनिल बाबुराव सूर्यवंशी (बार्शी)

**प्रमुख संपादक अर्थसंवाद**

जगन्नाथ शामराव पाटील (सातारा)

**विश्वस्त**

संतोष दास्ताने

के.जी.पठाण

चारूदत्त गोखले

**सदस्य**

1) हिरालाल चव्हाण(जळगाव)
2) प्रशांत काटोले (अमरावती)
3) अविनाश निकम (शहादा)
4) रामकृष्ण टाले (नागपूर)
5) विकास सुकाळे (नांदेड)
6) ज्ञानोबा मोरे (उस्मानाबाद)
7) तानाजी गिते (पुणे)
8) बाळासो पाटील (सांगली)
9) बबनराव खामकर (सिंधुदुर्ग)
10) मुक्ता जहागिरदार (अमरावती)
11) बाळासाहेब माने (सांगली)
12) महंमदरफीक मुलाणी (बारामती)

**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार :**

1) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली

2) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

(टीप : म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.)

## कार्यालयीन पत्रव्यवहार

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)

अनिल बाबुराव सूर्यवंशी

कार्यवाह - खजिनदार - मराठी अर्थशास्त्र परिषद,

"गोदाई" शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर,

बार्शी 413 411. जि.सोलापूर

दूरध्वनी (02184) 224294 मो.9011339906

## परिषदेचे प्रमुख कार्यालय :

मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा / सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन.रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कँपस प्लॉट क्र.6 एफ. ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सहकारी वसाहत इमारत क्र. 323 समोर, बांद्रे (पूर्व) मुंबई 400051

**वर्गणी :**

**अ) परिषदेचे सदस्य :**

| | |
|---|---|
| आजीव सदस्य (एकरकमी) | : रू. 2000 |
| साधारण सदस्य | : रू.300 (वार्षिक) |

**आ) संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार**

| | |
|---|---|
| शैक्षणिक संस्था | : रू.250 (वार्षिक) |
| व्यावसायिक संस्था | : रू.600 (त्रैवार्षिक) |
| ग्रंथालये | : रू.1000(पंचवार्षिक) |

**इ) वर्षगणना** 1 एप्रिल ते 31 मार्च

*** संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.**

*** कृपया आजीव सदस्य वर्गणी डिमांड ड्राफ्टनेच मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने कार्यवाहांकडे पाठवावी.**

* अर्थसंवादची वर्गणी डिमांड ड्राफ्टनेच मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने प्रमुख संपादकांकडे पाठवावी.

# जागतिक वित्तीय अरिष्ट : सैद्धांतिक आणि व्यावहारिक दृष्टिकोन

**विनायक श्रीधर देशपांडे,**
प्राध्यापक व विभाग प्रमुख,
व्यवसाय व्यवस्थापन विभाग,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, बारामती जि. पुणे येथे संपन्न झालेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ३३ व्या वार्षिक अधिवेशनात दि. १३ जानेवारी २०१० रोजी केलेले अध्यक्षीय भाषण.

परिषदेच्या या तेहतिसाव्या वार्षिक अधिवेशनाच्या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षा सौ. सुनंदा पवार (विश्वस्त, ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती), अधिवेशनाचे उद्घाटक मा. डॉ. अरूण अडसुळ, प्रभारी कुलगुरू पुणे विद्यापीठ, पुणे, प्रमुख पाहुणे श्री. प्रतापराव पवार, अध्यक्ष सकाळ वृत्तपत्र समूह, प्रमुख अतिथी, प्राचार्य नंदकुमार निकम, अधिष्ठाता मानस नीती व समाज विज्ञान शाखा पुणे विद्यापीठ, पुणे, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे गत वर्षाचे अध्यक्ष डॉ. व्ही. बी. भिसे, परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. दिलीप पाटील, कार्यवाह डॉ. अनिल सूर्यवंशी, अर्थसंवादचे संपादक डॉ. जगन्नाथ पाटील, परिषदेचे कार्यकारिणी सदस्य, शारदाबाई पवार महिला महाविद्यालयाचे प्राचार्य आणि स्थानिक कार्याध्यक्ष डॉ. एम. एस. शेजूळ, स्थानिक कार्यवाह डॉ. एम. यू. मुलाणी, कार्यकारिणी सदस्य, उपस्थित मान्यवर प्रतिनिधी, या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, पत्रकार आणि उपस्थित बंधु भगिनींनो...

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या तेहतिसाव्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी माझी निवड करून माझा आपण जो सन्मान केला, त्याबद्दल सर्वप्रथम मी सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करतो. अर्थशास्त्राच्या प्रश्नांची सैद्धांतिक आणि व्यावहारिक दृष्टिकोनावर चर्चा घडवून आणणे व त्याद्वारे मराठीतून अर्थशास्त्रीय विषयक अभ्यासपूर्ण साहित्यनिर्मिती करणे आणि

जनसामान्यांचे प्रबोधन करणे या प्रमुख उद्देशाने मराठी अर्थशास्त्र परिषदेची स्थापना करण्यात आली. गत काही दशकांत अनेक अडचणींना तोंड देत परिषदेने अत्यंत सक्षमपणे आपल्या ध्येय धोरणांनुसार वाटचाल केली आहे. वार्षिक अधिवेशनांचे आयोजन आणि परिषदेचे मुखपत्र असलेले अर्थसंवाद या त्रैमासिकाचे प्रकाशन हे उपक्रम परिषदेने सातत्याने सुरू ठेवून फार मोलाची कामगिरी बजावली आहे. याचा आम्हा सर्वांनाच सार्थ अभिमान वाटतो.

परिषदेच्या विकासात आजतागायत अनेक व्यक्तींनी आपले मौलिक योगदान दिले आहे. त्या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे आद्य कर्तव्य समजतो. दिवंगत प्राध्यापक नी. वी. सोवनी आणि प्रा. रवींद्र सबनीस, प्राध्यापक रवींद्र जोशी यांचा या संदर्भात आवर्जून उल्लेख करायला हवा. या शिवाय माझे वडील प्राध्यापक श्री. आ. देशपांडे यांनी १९७९ सालापासून मला परिषदेच्या कार्यात सहभागी होण्यास प्रोत्साहन दिले. आज या अधिवेशनाच्या निमित्ताने ते उपस्थित आहेत ही अत्यंत आनंदाची बाब आहे. परिषदेच्या जडणघडणीत मोलाची भूमिका वठविणारे अनेक ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आज या भव्य सोहळ्यात अगत्याने आले आहेत ही नक्कीच आनंदाची बाब आहे. कार्यवाह-खजिनदार, कार्याध्यक्ष आणि अध्यक्ष या तिन्ही पदांची जबाबदारी अत्यंत सक्षमपणे पार पाडणारे प्राध्यापक व्यं.सु. पाटणकर, माजी अध्यक्ष आणि गत वर्षीपर्यंत कार्याध्यक्ष पद सांभाळून परिषदेला नवी दिशा देण्याचे अथक प्रयत्न करणारे आदरणीय प्राध्यापक ज. फा. पाटील आणि परिषदेत आवर्जून उपस्थित असलेले सर्व भूतपूर्व अध्यक्ष, विश्वस्त, काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित न होऊ शकलेले इतर सर्व माजी अध्यक्ष, अर्थसंवादच्या संपादक पदाची धुरा ज्यांनी वाहिली ते प्राध्यापक आनंद नाडकर्णी, प्राध्यापक भ. ग. बापट या सर्वांना मी अभिवादन करतो. परिषदेचा गगनावरी गेलेला हा इवलास वेलू असाच बहरत राहावा अशी मनोकामना या प्रसंगी व्यक्त करतो.

महाराष्ट्राच्या इतिहासात बारामतीचे स्थान महत्त्वाचे आहे. कवीवर्य मोरोपंत, श्री. नानासाहेब जगताप (ढाकळकर), शाहू महाराजांचे विश्वासू अनुयायी कलेचे आश्रयदाते श्री. बाबुजी नाईक आणि आधुनिक काळातील माननीय कृषीमंत्री शरद पवार यांच्या अथक प्रयत्नाने बारामतीचा परिसर आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात समृद्ध झाला आहे. महाराष्ट्रातील नावाजलेल्या या ऐतिहासिक बारामती शहरात मराठी अर्थशास्त्राचे तेहतिसावे अधिवेशन संपन्न होत आहे याचा मला सार्थ अभिमान वाटतो.

वार्षिक अधिवेशनात अध्यक्षांनी ताज्या, आर्थिक घडामोडींवर भाष्य करावे अशी प्रथा परिषदेने जोपासली आहे. या अध्यक्षीय भाषणात गत वर्षातील 'जागतिक स्तरावरील आर्थिक आणि वित्तीय अरिष्ट' या विषयावर मी आज भाष्य करणार आहे. या अरिष्टामुळे संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेला झळ पोहचल्याने जागतिक अर्थव्यवस्थेचे स्वरूप, उद्दिष्ट व रचनेची पुनर्रचना करण्याची (Overhaul) गरज सर्व अर्थतज्ज्ञांना जाणवू लागली आहे. जागतिकीकरणाच्या या

युगात कोणत्याही देशाला स्वतंत्रपणे आपली अर्थनीती ठरविणे आणि राबविणे शक्य होत नाही. त्यामुळेच जागतिक मंदीने विकसित आणि अविकसित अशा सर्वच देशांना बेरोजगारी, दारिद्रय आणि वाढते कर्ज या प्रश्नांनी प्रभावित केले आहे. जागतिक मंदीचा प्रश्न सोडविणे जगाच्या सकल मागणी दराच्या बदलावर अवलंबून आहे.

आतापावेतो झालेल्या जागतिक आर्थिक पुनरूत्थानाच्या आकाराबाबत एक मत नाही. पुनरूत्थान L आकारचे, U, V कि W या स्वरूपाची चर्चा आर्थिक विचारवंत सातत्याने करीत आहेत. शासनाने मदतीचा हात काढून घेतल्यास पुनरूत्थानाची गती मंदावण्याची शक्यता नाकारता येणार नाही. दुबईतील ताज्या आर्थिक घडमोडींनी जागतिक वित्तीय मंदी ही अद्याप संपली नाही याची एक प्रकारे आठवणच करून दिली आहे. वित्तीय क्षेत्राची पुनर्रचना करणाऱ्या योजनाकारांना राज्य आणि बाजार, राष्ट्रीय अग्रक्रम आणि जागतिक समन्वय यात योग्य संतुलन प्रस्थापित करावे लागेल.

अमेरिकेतील वित्तीय अरिष्टाचे रूपांतर जागतिक स्तरावर, वास्तविक अर्थव्यवस्थेच्या अरिष्टामध्ये झाले. या अरिष्टाच्या विळख्यातून जगातील कोणत्याच देशाची सुटका होऊ शकलेली नाही. जागतिक अर्थव्यवस्था 2010 मध्ये जवळपास 1 टक्क्यापेक्षा अधिक दराने आकुंचित झाली. या आकुंचनाची सुरूवात झपाट्याने होत असून 9 टक्क्यापेक्षा अधिक दराने या वर्षात अर्थव्यवस्थेची घसरण होईल असे भाकीत वर्तविण्यात येत आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये पुनर्शोध घेत राहण्याची अगाध क्षमता आहे असा दावा केला जातो. परंतु हे अरिष्ट भांडवली व्यवस्थेमुळे आले की या व्यवस्थेतील अनुषंगिक दोषांमुळे आले, याबाबत विविध मतप्रवाह आहेत. भांडवली व्यवस्थेलाच पर्याय शोधावा की यातील दोष दूर करण्यासाठी उपाययोजना अमलात आणाव्या याबाबत संदिग्धता आढळते. 1930 च्या जागतिक मंदीशी तुलना करताना असे मानण्यात येते की, आधुनिक भांडवशाहीमध्ये स्थिरीकरणाची यंत्रणा अधिक योग्यरित्या उभारता येऊ शकते, परंतु अशी यंत्रणा मात्र त्या काळात अस्तित्वात नव्हती. सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार चक्रीय बदलांना स्थिरस्थावर करण्यास उपयुक्त ठरू शकतो. सकल देशीय उत्पादनाच्या तुलनेत आता या क्षेत्राचा एकंदर विकास मोठ्या प्रमाणावर झाला आहे. त्यामुळे कदाचीत जगातील विविध राष्ट्रांनी राजकोषीय प्रोत्साहनपर सहाय्य कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबविण्यास सुरूवात केली आहे (fiscal stimulas packages). 2008 या वर्षाचे नोबेल पारितोषिक विजेते पॉल क्रुगमन यांनी आताच्या मंदीची तुलना 1930 च्या जागतिक मंदीशी करून त्याहीपेक्षा भयावह स्थिती असल्याचे नमूद केले आहे. अमेरिकेतच ही स्थिती निर्माण झाली असे नव्हे तर इतर राष्ट्रांमध्ये देखील निर्माण क्षेत्राची कामगिरी उत्साहवर्धक राहिली नाही.

सध्याची मंदी किंवा सौम्य मंदी म्हणजे निव्वळ भांडवलशाली अर्थ व्यवस्थेतील अरिष्ट नसून भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे अरिष्ट आहे. दशकापूर्वी पूर्व आशियाई राष्ट्रातील अरिष्ट किंवा

जपान मधील अरिष्ट, व्यवस्थेतील अरिष्ट होते. 1930 नंतरचे आलेले आताचे अरिष्ट म्हणजे व्यवस्थेचे अरिष्ट आहे असे मानण्यात येते. सद्यस्थितीत जलद गतीने विकास होत असलेला किंवा अरिष्टापासून पूर्णपणे मुक्त राहिलेला एकही देश नसल्याने अरिष्टग्रस्त देशांची स्थिती अधिकच चिंताजनक झालेली आहे. वित्तिय अरिष्टाची कारणेही भिन्न असल्याचे अनुभवास येत आहे. चुकीचे पत धोरण, आर्थिक घडामोडींचे चुकीचे आकलन, भविष्याबद्दलचा चुकीचा अंदाज, राज्यसंस्थेचे निर्हस्तक्षेपाचे धोरण, निर्यातीत झालेली लक्षणीय घट अशी अनेक कारणे या अरिष्टामागे आहेत असे अभ्यासक मानतात.

**पशुतुल्य भावना (Animal Spirits)**

तर्कसंगत आर्थिक प्रेरणेमुळे जसे आर्थिक व्यवहार घडतात तसेच आर्थिक व्यवहार हे पशुतुल्य मन:स्थितीमुळे किंवा भावनांमुळे देखील चालतात. लोकांना आर्थिकेतर प्रेरणा असतात आणि आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी अशी प्रेरणा नेहमी तर्कसंगतच राहील असे नाही. अर्थव्यवस्थेतील बदलांचे एक महत्त्वपूर्ण कारण म्हणजे 'पशुतुल्य मन:स्थिती' होय. अनैच्छिक बेकारीसाठी देखील हा घटक कारणीभूत असतो असे केन्स यांचे प्रतिपादन होते.

अभिमत अर्थशास्त्रातील ॲडम स्मिथ यांची अदृश्य हाताची संकल्पना जशी महत्त्वपूर्ण ठरली तशीच केन्स यांची पशुतुल्य मन:स्थितीची (Animal Spirits) संकल्पना उपयुक्त ठरू शकेल. भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील अस्थिरतेची स्थिती या संकल्पनेच्या माध्यमाने स्पष्ट करता येईल. केन्स यांच्या या मांडणीमुळे शासनाच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित झाले. अर्थव्यवस्थेत शासनाची भूमिका ही पालकांसारखी असते. वर वर बघता मुले आज्ञाधारक राहतील. परंतु ती वयात आले की बंडखोर होऊ शकतात. म्हणूनच मुलांचे संगोपन योग्यरित्या व्हावे या दृष्टीने हुकुमशाही आणि अनुज्ञा (permissiveness) यातील मध्यम मार्ग शोधून काढावा लागतो. अति लाडाने मुलांमधील पशुतुल्य मन:स्थिती जागृत होऊ नये म्हणून मुलांच्या वर्तनावर पालकांना काही मर्यादा घालाव्या लागतात. त्यासाठी नियम करून त्यांच्या पालनाचा आग्रह धरला जातो. परंतु या मर्यादा मुलांच्या स्वतंत्रपणे शिकण्याच्या आणि सर्जनशीलतेच्या आड येता कामा नयेत. सुखी आणि आनंदी कुटुंबाच्या निर्मितीसाठी मुलांना स्वातंत्र्य देऊन त्यांच्यात पशुतुल्य मन:स्थिती निर्माण होऊ न देणे हे पालकांचे कर्तव्य असते. शासनाने पालकांप्रमाणे व्यवहार करावा असे केन्सने सुचविले आहे.

केन्सने प्रतिपादित केलेल्या शासनाच्या भूमिकेशी सुखी/आनंदी कुटुंबाची संकल्पना तंतोतंत जुळते. शासनाचा हस्तक्षेप कमीत कमी असल्यास भांडवलशाही समाज सर्जनशील राहू शकेल, या सर्जनशीलतेला बाधा येऊ नये म्हणून शासनाचा हस्तक्षेप कमीत कमी असावा. परंतु सर्व आर्थिक व्यवहार संपूर्णपणे व्यवस्थेवर सोडून दिल्यास भांडवलशाही अर्थव्यवस्थेत गोंधळाची किंवा दिशाहीनतेची स्थिती निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे रोजगारविरहित स्थिती निर्माण होऊन अती उपभोगामुळे बचतीचे प्रमाण घसरायला लागेल. घरांच्या किंमती, शेअर्सच्या

किंवा स्कंधांच्या किंमती गडगडायला लागतील. व्यक्ती आणि संस्थांच्या नव निर्मितीला / सर्जनशीलतेला कधीच लगाम लावू नये असे भांडवलशाहीत मानले गेले. मात्र त्याचबरोबर पशुतुल्य मन:स्थिती निर्माण होऊ नये म्हणून पर्यायी उपाय देखील अवलंबिणे अनिवार्य ठरते हे मान्य करण्यात आले.

अॅडम स्मिथच्या सिद्धांतनानुसार लोक नेहमीच तर्कसंगतपणे विचार करतात आणि आपले आर्थिक हित साध्य करण्याच्या प्रयत्नात असतात. प्रत्यक्षात मात्र आर्थिकेतर घटक देखील निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शक ठरतात असे दिसते. हे घटक कितपत अविवेकी किंवा दिशाभूल करणारे असू शकतात याबाबतची मांडणी अॅडम स्मिथच्या सिद्धांतात आढळत नाही. थोडक्यात मानवाची पशुतुल्य मन:स्थिती त्यांच्या सिद्धांतात दुर्लक्षित राहिली. याउलट केन्सने संपूर्ण रोजगारापासून निर्गमन होणाऱ्या अर्थव्यवस्थेचे स्पष्टीकरण देतांना पशुतुल्य मन:स्थितीचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. 'पशुतुल्य मन:स्थितीला' अर्थशास्त्रात थोडा वेगळा अर्थ प्राप्त झाला आहे. आता एक आर्थिक संज्ञा म्हणून ही संकल्पना प्रचलित झाली आहे. अर्थव्यवस्थेतील चंचलता आणि विसंगती याचा संदर्भ पशुतुल्य मन:स्थितीशी आहे. अनिश्चितता किंवा संदिग्धता याच्याशी असणारा आपला चमत्कारिक संबंध पशुतुल्य मन:स्थिती द्वारे दर्शविता येईल. कधी आपण दुर्बल होतो, कधी कधी भीतीवर मात करून आपली निर्णय क्षमता वाढते, तर कधी ताजेतवाने होऊन आपला उत्साह वाढतो. त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेत देखील बदल घडत असतात. सामाजिक रचना, एकमेकांवरील विश्वास, प्रयत्नांसाठी आवश्यक इच्छाशक्ती आणि स्वार्थाचा त्याग करण्याची तयारी यात स्थिरता, सातत्य आणि नियमितपणा असतोच असे नाही.

वैचारिक दृष्टिकोनात बदल झाल्याने आणि तो बदल प्रमाणित आर्थिक विचारांशी सुसंगत नसल्याने आर्थिक अरिष्ट (जसे सध्याचे वित्तीय आणि गृहनिर्माण) निर्माण होऊ शकते. आपल्या स्वत:च्या क्षमतांबद्दलची संदिग्धता, बाह्य आकर्षणे, हेवा/मत्सर, संताप आणि मोहजाल आणि विशेषत: अर्थव्यवस्थेतील घडामोडींच्या आणि यशापयशाबद्दलच्या खऱ्या खोट्या बातम्या, समाजाच्या बदलत्या आर्थिक गरजा व त्यातून निर्माण होणारी वस्तुंची सढळ निर्मिती किंवा अपूरा पुरवठा यामुळे अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होतो असे दिसते. या अमूर्त बाबींचा परिणाम घरांच्या आणि इतर संपत्तीच्या किंमतीवर होतो.

**आत्मविश्वास (Confidence)**

राज्य व्यवस्थेने अर्थव्यवस्थेत धोरणे, कार्यक्रम व योजना या माध्यमातून योग्य तो हस्तक्षेप करून जनतेचा गमावलेला विश्वास पुन्हा मिळवावा असे अर्थतज्ज्ञ नेहमीच सुचवित असतात. फ्रँकलिन रूझवेल्ट यांनी महामंदीचे विश्लेषण करतांना असे म्हटले की, 'आपल्याला एकाच गोष्टी बाबत भीती बाळगायला हवी आणि ती गोष्ट म्हणजे भीतीच होय.' व्यवसायातील घसरण शेवटी आत्मविश्वास गमावल्यानेच होते, हे स्पष्टच आहे. 'आत्मविश्वास अरिष्टाला' 'पत अरिष्ट' देखील म्हणतात. पत म्हणजे विश्वास ठेवणे. तर्कसंगत संकल्पनेच्या

पलीकडे जाऊन विश्वास या संकल्पनेचा विचार करावा लागतो. दुसऱ्यावर चटकन विश्वास ठेवणारा, उपलब्ध अशा महत्त्वाच्या माहितीकडे अनेकदा दुर्लक्ष करतो किंवा त्या माहितीला फारशी किंमत/ महत्त्व देत नाही. तर कधी कधी तर्कसंगत दृष्टिकोनातून उपलब्ध माहितीचा विचार जरी केला असला तरी ती व्यक्ती आपल्या विश्वासाच्या आधारेच निर्णय घेतांना दिसते. परिस्थिती चांगली असली तर लोक चटकन विश्वास ठेवतात, उत्स्फूर्तपणे निर्णय घेतात. ते यशस्वी होतील असे त्यांना वाटते. त्यामुळे आर्थिक धोरणे, योजना व चालू घडामोडींबद्दल संशय न घेता आर्थिक व्यवहार करतात, आणि त्याचमुळे संपत्तीचे मूल्य वाढू लागते. जोपर्यंत लोक एकमेकांवर विश्वास ठेवत असतात तोपर्यंत प्रश्नच नसतो. परंतु जेंव्हा अर्थव्यवस्थेवरील आणि स्वत:च्या निर्णयांच्या अचूकतेबद्दलचा आत्मविश्वास जेंव्हा डळमळतो तेंव्हा आधी घेतलेल्या निर्णयांतील पोकळपणा लक्षात येऊ लागतो.

निर्णय प्रक्रियेच्या तर्कसंगत दृष्टिकोनापलीकडची आत्मविश्वास ही संज्ञा आहे. लोकांची वर्तणूक मुळात तर्कसंगत राहीलच असे नाही. त्यामुळे विश्वासाची भूमिका महत्त्वपूर्ण राहील, असे समष्टी अर्थशास्त्रात मानले जाते.

**योग–वियोग परिकल्पना**

ऑगस्ट 2007 मध्ये जागतिक आर्थिक अरिष्टाची सुरूवात अमेरिकेतील निकृष्ट दर्जाच्या तारण बाजारामुळे (Sub-prime mortgage market) झाली. याचीच लागण इतर प्रतिभूतींच्या बाजाराला लागली. अमेरिका आणि इतर राष्ट्रांमध्ये याचा प्रादुर्भाव झाल्याने काही महिन्यातच वित्तीय क्षेत्रातील घसरण वेगाने होऊ लागली. परिणामी सर्वच औद्योगिक राष्ट्रांमध्ये दिवाळखोरीमुळे आर्थिक मंदी स्पष्टपणे जाणवू लागली. अरिष्ट उद्‌भवल्यानंतर एक वर्षाहुन अधिक काळ लोटल्यानंतर असे वाटू लागले की उदयास येत असलेल्या आशियाई देशातील विशेषत: चीन आणि भारतातील अर्थव्यवस्था तुलनात्मक दृष्ट्या अरिष्टापासून निव्वळ दूर आहेत असे नाही तर जागतिक घसरण थोपविण्यात ही राष्ट्रे मोलाची भूमिका वठवू शकतात. इतकेच नव्हे तर वैश्विक स्तरावर पुनरूत्थानासाठी वाट मोकळी करून देण्यास देखील हे देश हातभार लावू शकतात. परंतु सप्टेंबर 2008 पासून प्रगत आणि उदयोन्मुख अर्थव्यवस्थेतील बाजाराच्या घसरणांमुळे वियोग परिकल्पनेला (decoupling hypothesis) तडा गेल्याने घसरलेल्या अर्थव्यवस्था सावरण्याची कुठलीही चिन्हे दिसेनाशी झाली.

वियोग परिकल्पनेच्या (Decoupling hypothesis) पार्श्वभूमीवर राष्ट्रांचे परस्पर अवलंबित्व समष्टि आर्थिक चलांवर परिणाम करतात अथवा नाही याचे अनुभवनिष्ठ मापन करणे आवश्यक आहे. प्राप्त झालेली आकडेवारी असे दर्शविते की, अमेरिकेच्या औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक तसेच युरोपियन संघाचा औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक भारताच्या समष्टि आर्थिक चलांवर परिणाम करतो. बाह्य घटकासंबंधीच्या गट चाचणी वियोग परिकल्पनेला सद्य:परिस्थितीत फेटाळणे/नाकारणे योग्य होईल असे दर्शविते. प्रेरणा

प्रतिसाद फल देखील भारताच्या समष्टि आर्थिक चलांवर इतर राष्ट्रांचा होणारा परिणाम दर्शविते.

**प्रेरणा प्रतिसाद फलाच्या आधारे काही निरीक्षणे**

अमेरिकेच्या औद्योगिक उत्पादन निर्देशांकास प्रेरणा मिळाल्यास युरोपियन संघाच्या औद्योगिक उत्पादनात वाढ होते. याचाच अर्थ अमेरिकेत अस्थिरता निर्माण झाल्यास त्याचा परिणाम लगेचच इतर राष्ट्रावर होतो. तसेच युरोपियन संघातील राष्ट्रांमध्ये अशी अस्थिरता निर्माण झाल्यास उलटा परिणाम म्हणजेच संक्रमण युरोपियन संघाकडून अमेरिकेकडे व्हावयास लागते. याचाच अर्थ या दोन्ही राष्ट्रांमध्ये आर्थिक एकात्मीकरण (Economic Integration) बऱ्या प्रमाणात आहे.

अमेरिकेच्या समष्टी चलांना प्रेरणा मिळाल्यास भारताकडे त्याचे संक्रमण (transmission) होते. काही कालावधीनंतर भारतात त्याचा परिणाम दिसावयास लागतो. अमेरिकेच्या औद्योगिक उत्पादनाच्या निर्देशांकात वाढ झाल्यास भारताच्या औद्योगिक उत्पादनाच्या निर्देशांकात, घाऊक किंमत निर्देशांकात आणि पैशाच्या पुरवठ्यात (M3) वाढ होते. संघीय (federal) धोरणातील बदलांचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर काही कालावधीनंतर होतो असे यातुन अभिप्रेत होते. यामुळे वियोग (Decoupling) गृहितकृत्यु सिद्ध होत नाही.

युरोपियन संघाच्या समष्टी चलांचा परिणाम देखील भारतीय चलांवर होतो. परंतु येथे होणारा प्रभाव जरा वेगळ्या स्वरूपाचा आहे. युरोपियन संघाचा औद्योगिक उत्पादन निर्देशांक वाढल्यास भारताचा पैशाचा पुरवठा आणि घाऊक किंमत निर्देशांक घसरतो. अशी विपरीत वर्तणूक भारत आणि युरोपियन संघाच्या व्यापाराच्या स्वरूपावरून स्पष्ट करता येईल. युरोपियन संघाच्या औद्योगिक उत्पादन निर्देशांकाच्या वाढीमुळे युरोपियन संघाचा पैशाचा पुरवठा वाढू शकतो. यामुळे युरोचा विनिमय दर घसरून भारताच्या आयाती महाग होऊ शकतात आणि भारतातील निर्यातीची मागणी घसरू शकेल. त्यामुळे भारतीय पैसा पुरवठा आणि घाउक किंमत निर्देशांक घसरू शकतो. भारताच्या औद्योगिक उत्पादन निर्देशांक, घाऊक किंमत निर्देशांक यांचा प्रतिसाद युरोपियन संघाच्या औद्योगिक उत्पादन निर्देशांकाच्या संबंधी वियोग गृहितकृत्य येथे देखील लागू होत नसल्याचे दिसते.

**भारतीय अर्थव्यवस्था आणि अरिष्टे**

भारतीय अर्थव्यवस्था जागतिक आर्थिक मंदीमुळे प्रभावित झाली आहे. यात शंका नाही. परंतु जागतिक अरिष्ट उद्‌भवण्यापूर्वी पासूनच भारतीय अर्थव्यवस्थेचे सामर्थ्य कमी होण्याची चिन्हे उघड उघड दिसत होती. 2007-2008 च्या पहिल्या भागातच भारताच्या सकल देशीय उत्पादनात घट होण्यास सुरूवात झाली. हा काळ अमेरिकेच्या वित्तीय गोंधळापूर्वीचा आणि विकसित देशात निर्माण झालेल्या मंदीच्या प्रवृत्तीच्या जवळपास सहा महिने पूर्वीचा होता. या सर्व विकसित देशांमध्ये मंदीची प्रवृत्ती ऑगस्ट-सप्टेंबर 2008 च्या सुमारास तीव्र व्हावयास लागली. 2007-08 मध्ये उद्योगांमधील घसरण सकल देशीय उत्पादनाच्या घसरणीपेक्षा अधिक उल्लेखनीय

आणि स्पष्ट होती. उद्योग क्षेत्राचा वृद्धी दर आधीच्या वर्षापेक्षा 3.2 टक्क्याने घसरला तर सकल देशीय उत्पादनाचा वृद्धी दर 0.5 टक्क्याने कमी झाला. नमूद करण्यासारखी बाब म्हणजे कृषी क्षेत्राची कामगिरी उत्तमरीत्या असून देखील आर्थिक मंदीची स्थिती निर्माण झाली. 2006-07 साली 3.8 टक्के असलेला कृषी क्षेत्राचा वृद्धी दर 2007-08 साली 5.1 टक्के झाला. याउलट निर्माणी आणि सेवा क्षेत्राच्या वृद्धी दरात 2006-07 च्या तुलनेत 2007-08 साली घसरण झाली. 2006-07 च्या सुमारास 10.6 टक्के आणि 11.2 टक्के असलेला निर्माणी आणि सेवा क्षेत्राचा वृद्धी दर 2007-08 मध्ये 7.5 टक्के आणि 11.1 टक्के एवढा कमी झाला. कृषी क्षेत्राचे उत्पादन हे प्रामुख्याने पुरवठ्यानुसार निर्धारित होत असून उद्योग आणि सेवा क्षेत्राचे उत्पादन मागणीने प्रेरित होते.

अर्थव्यवस्थेतील वृद्धीचे अवत्वरण (deceleration) बाजारात कार्यरत असलेल्या मागणीच्या घटकांमुळे होत असल्याचे स्पष्टच आहे. गैरकृषी उत्पादनाच्या बाजारात हा घटक अधिक प्रभावशाली होता. 2007-08 साली मात्र कृषी उत्पन्नाच्या वाढीमुळे होणारा परिणाम धनात्मक स्वरूपाचा होता. परंतु भरघोस पीक येऊन देखील एकूण वृद्धी दरावरील परिणाम पुरेसा राहिला नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे औद्योगिक क्षेत्राच्या अवत्वरणामुळे एकंदर वृद्धी दर टिकविता आला नाही. मागणीच्या बदलांचे विश्लेषण करताना परंपरेनुसार मागणीचे विभाजन स्वायत्त मागणी आणि प्रेरित मागणी या दोन भागात करण्यात येते. स्वायत मागणीचा संबंध चालू उत्पादन स्तराशी किंवा उत्पन्नाशी नसतो. गुंतवणूक, शासकीय खर्च आणि निर्यात हे घटक स्वायत्त स्वरूपाचे मानण्यात येतात. परंतु आयात आणि घरकुलांचे उपभोग यांना अंतर्जात (endogenous) घटक समजण्यात येते.

भारतीय अर्थव्यवस्थेचे अवत्वरण प्रामुख्याने भांडवल निर्मितीत झालेल्या घसरणीमुळे झाले. खाजगी क्षेत्रातील भांडवल निर्मितीतील घट 1990 च्या मध्यकाळात आणि नंतर 2001-02 पर्यंत सातत्याने झाली. 2002-03 मध्ये मात्र गुंतवणुकीमध्ये पुनश्च वाढ झाली. देशातील वृद्धी दराला चालना देण्यात खाजगी गुंतवणूकदारांनी महत्त्वाची भूमिका वठविली. परंतु 2006-07 पासून एकूण गुंतवणूकीतील घसरण प्रामुख्याने जाणवू लागली. खाजगी गुंतवणुकी 2005-06 पासूनच लक्षणीयरित्या कमी व्हावयास लागल्या. अरिष्टपूर्व काळात निर्यातीचा दर देखील मंदावण्यास सुरूवात झाली. केंद्रीय सांख्यिकीय संघटनेच्या माहितीनुसार 2007-08 मध्ये निर्यात वृद्धी दर 7.5 टक्के पर्यंत वेगाने खाली आला. या पूर्वीच्या वर्षात हा दर 18.9 टक्के होता. याचाच अर्थ जागतिक अरिष्टाची स्थिती येण्यापूर्वीच एकूण सकल उत्पादन आणि औद्योगिक उत्पादनात घट भारतात अनुभवास येत होती.

भारतात उत्पन्नाचे वितरण अत्यंत विषम स्वरूपाचे झाल्याने निम्न उत्पन्न असलेल्या लोकांच्या घरगुती उपभोगाच्या खर्चावर आळा बसला. असंघटित क्षेत्रातील उत्पन्न आणि नव्याने उदयास येणाऱ्या उद्योगांच्या उत्पन्नातील तफावत सातत्याने वाढत गेली. उपभोग्य वस्तूंच्या किंमतीत

वाढ झाल्याने ग्रामीण आणि शहरी कष्टकऱ्यांच्या क्रयशक्तीत घट झाल्याने बिगर कृषी वस्तूंच्या उपभोगावर त्याचा परिणाम झाला. भारतीय अर्थव्यवस्थेची जोडणी इतर प्रगत राष्ट्रांतील अर्थव्यवस्थांशी काही प्रमाणात का होईना झाल्याने त्या राष्ट्रांमध्ये निर्माण झालेल्या वित्तीय प्रवाह या मार्गाने भारतावर देखील झाला. याचाच अर्थ वियोग परिकल्पना पूर्णपणे लागू झाली नाही.

**भारतातील सद्य: स्थिती**

भारताचा 2008-09 मधील 6.7 टक्के असलेला वृद्धी दर फसवा आहे. यातील बराचसा भाग म्हणजे सांख्यिकीय मृगजळ असल्यासारखे आहे. यातील 1.8 टक्के हिस्सा सामाजिक आणि वैयक्तिक सेवांचा आहे. या क्षेत्राची वाढ 7 टक्क्याने झाली. सहाव्या वेतन आयोगा अंतर्गत नागरी नोकर वर्गाला देण्यात आलेले वेतन, पेन्शन आणि थकबाकी याचे देखील प्रतिबिंब वाढत्या वृद्धी दरात उमटले आहे. 2008-09 च्या अंदाजात तुलनात्मकता आणावयाची असल्यास सहाव्या वेतन आयोगाचे वाढते वेतन वाजा केले असता 2007-08 मधील टक्याची वृद्धी दर 6.7 टक्के खऱ्या अर्थाने येत नसून प्रत्यक्षात हा दर 4.8 टक्के येतो. 2008-09 या वर्षातील दुसऱ्या भागाचा वृद्धी दर म्हणजे सहावा वेतन आयोग लागू करण्यात आल्यानंतर सकल देशीय उत्पादन वाढीचा दर फक्त 2.2% होता. या वर्षातील परिस्थिती तर अधिकच गंभीर आहे. उद्योगाचा वृद्धी दर मे पर्यंत शून्य होता आणि दुष्काळी परिस्थितीमुळे कृषी क्षेत्राची घसरण सुरू झाली.

राजकोषीय प्रोत्साहनपर सहाय्य (Fiscal Stimulus) शासनाने ऑक्टोबर 2008 नंतर आर्थिक अरिष्टाशी सामना करण्यासाठी घोषित केले. तत्पूर्वी शासनाने काही धोरणात्मक उपाययोजना केल्या होत्या. शेतकऱ्यांची कर्ज माफी, सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार थकीत रकमेचा काही हिस्सा सुपूर्द करणे इ. या उपाययोजनांमुळे 2008-09 या वर्षात सकल मागणी वृद्धी दर 3 ते 3.5 टक्क्यापर्यंत प्राप्त करण्यास मदत झाली. निर्यात घसरत असतांना देखील 2009-10 च्या पहिल्या भागात 7 टक्के वृद्धी दर प्राप्त करता आला. उत्तेजनात्मक पॅकेजमुळे आर्थिक अरिष्टाचा आघात कमी करण्यास मदत तर झालीच शिवाय वृद्धी दर देखील जवळपास टिकविता आला. परंतु इतर राष्ट्रांची परिस्थिती बघता एप्रिल 2010 पर्यंत तरी निर्यात पूर्ववत होण्याची चिन्हे दिसत नाहीत

प्रोत्साहनपर सहाय्य कार्यक्रमामुळे मात्र शासनाला राजकोषीय किंमत बरीच मोजावी लागेल. 2008-09 पर्यंत राजकोषीय तूट सकल देशीय उत्पादनाच्या 3 टक्के आणण्याचे स्वप्न या पॅकेजमुळे पूर्ण होऊ शकले नाही. 2008-09 साली राजकोषीय तूट सकल देशीय उत्पादनाच्या 6 टक्के आणि 2009-10 साली 6.8 टक्क्यापर्यंत पोहचेल असे भाकीत वर्तविण्यात येत आहे.

देशाचा आर्थिक विकास उद्योग आणि सेवा क्षेत्रापर्यंतच मर्यादित राहिला. कृषी उत्पादनाच्या वाढीवर इतर काही घटकांमुळे मर्यादा आली. अन्नधान्याच्या पुरवठ्यात वाढ न झाल्याने किंमती भरमसाठ वाढल्या. प्रोत्साहनात्मक सहाय्यामुळे अन्नधान्याच्या किमती आणि इतर वस्तू यांच्या

किंमतीमध्ये तफावत निर्माण झाली. या पॅकेजमुळे अन्नधान्याच्या किंमतीत वाढ झाली असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

**रोजगार विरहित वृद्धी ते रोजगार गमावणारी वृद्धी (Jobless to Jobloses)**

भारताच्या औद्योगिक आणि सेवा क्षेत्रांमध्ये बेरोजगाराची समस्या ही गंभीर होत असल्याचे दिसते. सुरूवातीला रोजगार विरहित वृद्धी बाबत बोलण्यात येत असे. परंतु आताची समस्या म्हणजे घसरता वृद्धी दर आणि त्याचबरोबर प्राप्त झालेला रोजगार जाणे अशा स्वरुपाची झाली आहे. बेरोजगाराबाबत विश्वसनीय आकडेवारी उपलब्ध नाही. परंतु शासनाने या संदर्भात प्रयत्न केला. शासनाच्या विनंतीनुसार श्रमिक केंद्राने (Labour Bureau) आठ क्षेत्रांची नमूना पाहणी केली. 10 किंवा त्याहून अधिक श्रमिक असलेले एकक 11 राज्ये आणि (युनियन टेरिटेरिज) संघराज्य मधून निवडण्यात आले.

एकूण 2581 एकक हा नमूना आकार होता. यातील 1168 वस्त्र निर्माण उद्योगातील, धातू आणि धातूंशी संबंधित वस्तू उद्योगातील 752, माहिती तंत्रज्ञान आणि BPO उद्योगातील 242, स्वयंचलित वाहन उद्योग 132, रत्ने आणि दागिने 104, वाहतूक उद्योग 103, खाणकाम 19 आणि घर बांधणी उद्योग 61 या प्रमाणे उद्योगांची निवड करण्यात आली.

या नमुना पाहणीत असे निदर्शनास आले की सर्वच क्षेत्रांमधील एकूण रोजगार सप्टेंबर 2008 ते डिसेंबर 2008 या दरम्यान पाच लक्षाने कमी झाला. सप्टेंबर 2008 मध्ये 16.2 दशलक्ष असलेला रोजगार डिसेंबर 2008 मध्ये 15.7 दशलक्ष झाला. सर्वेक्षणानुसार संदर्भ वर्षात प्रत्येक महिन्याला रोजगारात घसरण झाली.

**मुक्त बाजार आणि अरिष्ट**

वित्तीय बाजाराच्या संदर्भात विनियमन नसल्यास भांडवलशाही अर्थव्यवस्थेत मंदी सारख्या समस्या उद्‌भवू शकतात याची जाणीव केन्स यांना होती. वेगळ्या स्वरूपाची भांडवलशाही अर्थव्यवस्था केन्सला अपेक्षित होती. यात 'गुंतवणूकीचे सामाजिकीकरण' आणि 'भाटकजीवी' (Rentier) यांना व्यवस्थेतून बाहेर ठेवण्याची यंत्रणा केन्सने सुचविली होती. मुक्त बाजार व्यवस्थेत किंवा अनियंत्रित भांडवलशाहीत मत्ता (assets) बाजारात वहन खर्च (carrying cost) नगण्य असल्यामुळे सट्टेबाजांचे / सटोडियांचे वर्चस्व असते. सट्टेबाज हे मत्ता किंवा संपत्तीची खरेदी त्यातून लाभ प्राप्ती करण्याचे दृष्टिकोन करीत नाही तर अधिकची किंमत प्राप्त झाल्यास विकण्याचे दृष्टीने करतात. विशिष्ट मत्तेच्या किंवा संपत्तीच्या माध्यमाने उत्पन्न प्राप्त करण्याचे हेतूने हे लोक संपत्ती बाळगत नाहीत. सट्टेबाजांचा उद्देशच मुळात खरेदी आणि विक्रीतील किंमतीच्या तफावतीमधून उत्पन्न प्राप्तीचा असतो. केन्सच्या अनुसार यामुळे अस्थिरता तर निर्माण होतेच, शिवाय निर्णायक सामाजिक घटक (जसा रोजगार) सट्टेबाजांच्या लहरीनुसार निर्धारित होतो.

याउलट, पैसावादी अर्थशास्त्रज्ञ किंमतीचे स्थिरीकरण सट्ट्यामुळे होते असे मानत होते. त्यांच्यानुसार संपत्तीच्या अपेक्षित किंमती या मूलभूत तत्त्वांवरच आधारित असतात. अपेक्षित किंमतीच्या

तुलनेत चालू किंमतीमध्ये तफावत असल्यास सट्टेबाजांची वर्तणूक अशा तफावतींचे निराकरण करते. त्यामुळे किंमती स्थिर व्हावयास लागतात. परंतु मूलभूत तत्त्वांनुसर अंतिम किंमतीचे निर्धारण होईलच असे नाही. त्यामुळे अनिश्चिततेचा प्रतिबंधक उपाय म्हणून मूलभूत तत्त्वे देखील अप्रासंगिक ठरु लागतील.

**सट्टेबाजीबद्दल केन्सचा युक्तीवाद**

सट्टेबाजीच्या माध्यमाने अत्यानंदाची अवस्था निर्माण करण्याचा आभास चढाओढीच्या माध्यमाने करण्यात येतो. केन्सने यालाच सट्ट्यासाठी उत्तेजित करण्याची प्रक्रिया म्हटले आहे. संपत्तीच्या किंमतीतील सुरूवातीची वाढ पुढे भावी काळात किंमती अधिक वाढतील अशी आशा पल्लवित करते. यामुळे संपत्तीधारक अधिक मत्तेची / संपत्तीची मागणी करू लागतात आणि याचा परिणाम प्रत्यक्षात संपत्तीच्या किंमत वाढीत होतो. या प्रक्रियेमुळे अटकळीचा (Speculative) बुडबुडा (Bubble) निर्माण होतो. संपत्तीची / मत्तेची अधिकची मागणी निव्वळ अपेक्षित किंमत वाढीवर अवलंबून नसते तर संपत्ती बाळगल्यास त्याच्याशी संबंधित असलेल्या जोखिमेच्या मूल्यमापनावर देखील निर्भर राहते. परंतु अत्यानंदाच्या अवस्थेमुळे संपत्तीधारक संपत्तीच्या किंमती सातत्याने वाढणार अशी अपेक्षा बाळगतात. भांडवल प्राप्तीत वाढ होण्याच्या अपेक्षेमुळे बुडबुड्याची परिस्थिती निर्माण होते. अशा फुगवट्यामुळे वाढणाऱ्या संपत्तीच्या किंमतींचा परिणाम वास्तविक अर्थव्यवस्थेवर होतो. संपत्तीच्या वाढणाऱ्या किंमतीमुळे संपत्तीधारक समृद्ध होतो. यामुळे त्याच्या उपभोगावरील खर्चात वाढ होते. वित्तीय संपत्तीच्या बाबतीत पैशाची उभारणी करणे सहज शक्य होते. यामुळे गुंतवणूकीच्या खर्चात देखील वाढ होते. निर्माणी योग्य संपत्तीच्या बाबतीत जसे घर, उत्पादन खर्चाच्या तुलनेत संपत्तीच्या किंमती वाढल्यास नवनिर्मित संपत्तीची मागणी जोमाने वाढते आणि त्याचा परिणाम उत्पादन वाढीवर होतो. याचाच अर्थ संपत्तीच्या किंमतीचा बुडबुडा निर्माण झाल्यास सकल मागणीत वाढ होते आणि उत्पादन /रोजगार वाढायला लागतात.

परंतु, समजा काही कारणाने संपत्तीच्या किंमतीत घट व्हावयास सुरूवात झाली तर सट्टेबाज आपल्या जवळच्या संपत्तीला लगेच दूर करतात. आर्थिक एजंट्स दिवाळखोर होऊ लागतात आणि कर्ज फेड करण्यास ते असमर्थ होतात याचाच परिणाम बँकांच्या दिवाळखोरीवर देखील होतो. स्थावर संपत्ती बाळगण्याच्या ऐवजी लोक अधिकाधिक रोख रक्कम जवळ ठेवण्याचा प्रयत्न करतात.

**वित्तीय किंमती आणि निगम गुंतवणूकी– अस्थिरता**

शेअर्सच्या किंमतीमध्ये ज्या प्रमाणात चंचलता आढळते त्या प्रमाणात इतर कुठल्याही वस्तूंत इतकी चंचलता नसावी. वित्तीय बाजार जेंव्हा पासून अस्तित्वात आले तेंव्हापासूनच ही चंचलता देखील आली. असे असून देखील गुंतवणूकीबाबतचा निर्णय घेताना या किंमतीचा विचार प्रामुख्याने करण्यात येतो. अर्थव्यवस्थेचा वित्तीय किंमती हा एक मुलभूत घटक आहे. एकूण

राष्ट्रीय उत्पादनाच्या तुलनेत निगम गुंतवणूकी या अधिक चंचल असतात. आर्थिक चढ उताराला कारणीभूत घटक म्हणजे निगम गुंतवणूकी असतात.

1920 आणि 1929 या दरम्यान अमेरिकेच्या शेअर / रोखे किंवा स्कंध बाजाराचे मूल्य पाच पटीने वाढले. 1929 आणि 1932 या दरम्यान घट झाली. 1954 आणि 1973 या काळात शेअर बाजाराच्या वास्तविक मूल्यात दुपटीने वाढ झाली. 1973 आणि 1974 मध्ये वास्तविक मूल्यात अर्ध्यापेक्षा अधिक घट झाली. 1982 आणि 2000 या काळात झालेली मूल्य वाढ आठ पटीहून अधिक होती. 2000 आणि 2008 मध्ये मूल्य घट अध्यापेक्षा अधिक झाली.

या घटनांचे भाकीत कसे करावे ही निव्वळ एक समस्या नसून या पेक्षा देखील खोलवर समस्या म्हणजे घटना घडल्यानंतर घटना का घडली याबाबतचे तर्कसंगत स्पष्टीकरण मिळण्याबाबत येणारी अडचण होय. आर्थिक चढ उताराच्या संदर्भात एकंदरीत स्कंध बाजाराच्या किंमतीतील बदलांचे खात्रीलायक स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न अर्थशास्त्रज्ञांनी केली. परंतू ते यात यशस्वी होऊ शकले नाहीत. व्याज दरातील बदल, लाभांश किंवा प्राप्तीतील बदल या व अशा घटकांच्या आधारे स्पष्टीकरण अर्थशास्त्रांतर्फे आले नाही. प्रत्येक स्टॉक मार्केटच्या घसरणीनंतर लोकांचा आत्मविश्वास परत यावा म्हणून अधिकारी मंडळी 'अर्थव्यवस्थेची मूलतत्त्वे अभेद्य आहेत' असे विधान सातत्याने करीत असतात. (The fundamentals of the economy remain strong) अधिकारी मंडळी अर्थव्यवस्थेची मूलतत्त्वे अभेद्य आहेत असा दावा करण्याची संधी घेतात कारण स्टॉक मार्केटमध्ये होणारी घसरण नेहमीच्या आर्थिक घटकांच्या माध्यमाने स्पष्टच करता येत नाही. व्यावहारिकदृष्ट्या बघितल्यास आर्थिक मूलतत्त्वे स्थिर असून देखील रोखे बाजारात बदल हे नेहमी होतच असतात.

### ग्रँजरची कार्यकारण भाव चांचणी

भारताच्या स्कंध बाजाराचा संबंध समष्टी आर्थिक चलांशी आढळतो का? हे जाणून घेण्यासाठी कार्यकारणभाव चांचणी लावण्यात आली. याकरिता अल्प मुदतीचा व्याज दर (call rate) (बाजार निर्धारित हा दर भारताच्या समष्टि आर्थिक चलांसाठी प्रतिपत्री (proxy) म्हणून उपयोगात आणण्यात आला.) द्विमार्गी कार्यकारण भाव तपासण्यात आला आणि प्राप्त परिणाम दोन चलांमध्ये कार्यकारण भाव नसल्याचे दर्शवितात. याचा अर्थ स्कंध बाजाराचे व्यवहार समष्टि आर्थिक चलांच्या व्यतिरिक्त इतर घटकांचे अधिक प्रभावी होतात.

### अनिर्बंधित व्यवस्थेतील समीकरण

i) $$x_1 = \sum_{i=1}^{p} \alpha_i x_1 (t-i) + \sum_{j=1}^{q} \beta_j x_2 (t-j) + u_t$$

प्रमाद बेरीज वर्ग$_{अ}$ =28496

निर्बंधित व्यवस्थेतील समीकरण

ii) $$x_1 = \sum_{i=1}^{p} \alpha_i x_1 (t-i) + \vartheta_t$$

प्रमाद बेरीज वर्ग$_{नि}$ = 2918.3

कार्यकारण भाव तपासण्यासाठी उपयोगात

आणलेली वॉल्ड चांचणी सांख्यिकी

$$Fc = \frac{\text{प्रबेव}_{\text{अ}} - \text{प्रबेव}_{\text{नि}} / q}{\text{प्रबेव}_{\text{नि}} / (n-p-q)}$$

Fc = 0.94626

p = 4   q = 4

n = 165

F चे निर्णायक मूल्य

13.46 at 1%, 5.63 at 5%

3.76 at 10%

मुंबई स्कंध बाजार ($X_2$) अल्प मुदतीच्या व्याज दरातील बदलास ($X_1$) कारणीभूत नाही.

अनिर्बंधित व्यवस्थेतील समीकरण

$$x_2 = \sum_{i=1}^{p} \alpha_i\, x_2\,(t-i) + \sum_{j=1}^{q} \beta_j\, x_1\,(t-j) + u_t$$

प्रमाद बेरीज वर्ग$_{\text{अ}}$ = 8822672

निर्बंधित व्यवस्थेतील समीकरण

$$x_2 = \sum_{i=1}^{p} \alpha_i\, x_2\,(t-i) + \vartheta_t$$

प्रमाद बेरीज वर्ग$_{\text{नि}}$ =9561749

Fc = 3.287

अल्प मुदतीच्या व्याज दराचा परिणाम स्कंध बाजारावर ($X_2$) होत नाही.

## सट्टेबाजारातील साथीचा रोग आणि विश्वास गुणक

बाजार उच्च पातळीवर असल्यास साहजिकच गुंतवणूकदार झटपट श्रीमंत होण्यासाठी प्रयत्नशील असतात. त्यांना बाजाराची घसरण झाल्यास मूल्य सुरक्षित करावयाचे असते. बाजाराच्या वर्तणूकीला हा मानसशास्त्रीय प्रतिसाद असतो. रोख्यांच्या किंमती वाढल्यास लोकांचा कल रोखे खरेदी करण्याकडे होतो. किंमती घटल्यास विक्रीची प्रवृत्ती निर्माण होते. या घटनेला किंमत ते किंमत प्रतिपोषण (feed back) असे म्हणतात. काही काळासाठी चक्रीय सातत्य निर्माण होऊन दुष्टचक्र विकसित होण्याची शक्यता निर्माण होते. परिणामत: किंमतीतील बदल वरच्या स्तराकडे झाल्यास निर्माण झालेला फुगा हा फुटणारच. कारण किंमती वाढणार ही अपेक्षाच फक्त किंमत वाढीचा आधार असल्याने नेहमीसाठी किंमतीत वाढ होऊच शकणार नाही. संपत्तीच्या किंमतीचा फुगवटा निर्माण करण्यास फक्त किंमत ते किंमत प्रतिपोषणच कारण राहील असे नव्हे तर किंमतीमध्ये देखील इतर प्रकारचे प्रतिपोषण असतात. संपत्ती किंमतीतील फुगवटा आणि वास्तविक अर्थव्यवस्था यात देखील प्रतिपोषण (feed back) राहील. अशा अधिकच्या प्रतिपोषणामुळे व्यापार चक्राचा काळ वाढीस लागतो आणि किंमत ते किंमत परिणामाचा विस्तार होतो. फक्त उत्सुकतेपोटी सट्टेबाजीमुळे संपत्तीच्या किंमतीत होणारे बदल कदाचित विचारात घेण्यात आले नसावे. परंतु ते अप्रासंगिक (Irrelevant) नाहीत. सट्टेबाजीचा परिणाम वास्तविक अर्थव्यवस्थेवर होतो. यामुळे जे लोक शेअर्स खरेदी-विक्रीचे व्यवहार करतात त्यांच्यावरच याचा परिणाम होतो असे नव्हे तर जे शेअर मार्केटमध्ये कधी येत नाहीत त्यांच्यावर देखील प्रभाव पडतो.

संपत्ती बाजाराकडून वास्तविक

अर्थव्यवस्थेकडे होणाऱ्या प्रतिपोषणाचे तीन विविध प्रकारचें स्त्रोत आहेत. भाग भांडवलाच्या किंमती किंवा घरांच्या किंमती वाढल्यास बचत करण्याकडे लोकांचा कल नसतो. ते खर्च देखील जास्त करतात. कारण त्यांना समृद्ध झाल्यासारखे वाटते. चालू बचतीचाच एक हिस्सा म्हणून देखील लोक रोखे बाजारापासून झालेला लाभ आणि घरांच्या वाढत्या किंमती लक्षात घेऊ लागतात. संपत्तीच्या किंमतीचा उपभोगावर परिणाम झाल्यास त्याला उपभोगावरील संपत्ती परिणाम (wealth effect on consumption) असे म्हणतात.

गुंतवणूकीच्या निर्धारणात संपत्तीच्या मूल्याची (Asset values) भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते. रोखे बाजाराची घसरण झाली की कंपन्या नवीन संयंत्र आणि साधनसामग्रीवरील खर्च कमी करतात. एकल–कुटुंबासाठी (single-family) असलेल्या घरांच्या किंमती कमी झाल्या की घर बांधणी करणाऱ्या कंपन्या नवीन घरे बांधण्याची आपली योजना सोडून देतात.

**आर्थिक व्यवस्था मंदीकडे आगेकूच कशी करते?**

अमेरिकेच्या इतिहासात दोनदा मंदीची भयावह परिस्थिती निर्माण झाली. 1890 ची मंदी आणि दुसरी 1930 ची जागतिक मंदी. या मंदीचे अनुभव सध्याच्या मंदीचे विश्लेषण करण्यास उपयुक्त ठरू शकतील का? याचा थोडक्यात आढावा घेऊ या

1890 च्या पूर्व मंदी वर्षांमध्ये घाऊक किंमतीत मोठ्या प्रमाणावर घसरण झाली. किंमतीची घसरण लक्षात आल्याबरोबर नियोक्त्यांनी (Employer) वेतनामध्ये घट आणणे कसे आवश्यक आहे हे पटविण्यास सुरूवात केली. कामगारांनी तीव्रपणे वेतन कमी करण्यास विरोध करणे सुरू केले. यात मुद्रा मूल्य भ्रांति (Money Illusion) परावर्तित झाली. वेतन कपात करण्याऐवजी कामगारांनी आपली उद्योग बंद करण्यास संमती दिली. घटलेल्या वेतन दरावर काम करण्याऐवजी काम नसलेले बरे अशी भूमिका कामगार वर्ग घेऊ लागला. नाममात्र वेतन कपातीच्या (Nominal wage cut) ऐवजी बेरोजगार राहणे लोकांनी पसंत केले. अमेरिकेत 1893 सालची वित्तीय भीती (financial panic) मंदीला कारणीभूत ठरली. बँकांवरील विश्वासाला तडा गेल्यामुळे 'बँकेवर होणारी ठेवीदारांची गर्दी' (run on the banks) होऊन बँकेतून पैसा काढण्याकरिता लोक मोठ्या प्रमाणावर यावयास लागले आणि बँकांजवळ लोकांच्या पैशाची मागणी पूर्ण करण्यास पुरेसा पैशाचा साठा नव्हता. बँका पैशासाठी मेटाकुटीला आल्या आणि व्यावसायिकांना देण्यात आलेल्या कर्जाची मागणी करू लागल्या. अल्पकालीन व्याज दरात वाढ होऊन व्यवसाय बंद पडू लागले. अमेरिकेत तेंव्हा केंद्रीय बँक नसल्याने अंतिम धनको (lender of last resort) या यंत्रणेचा वापर करता आला नाही.

बँकांवर होणारी ठेवीदारांची गर्दी म्हणजे आर्थिक मंदीचे पूर्व चिन्ह होते असे मानण्यात येऊ लागले. त्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. न्युयॉर्क टाईम्सचे लेखक आणि वित्तीय संपादक अल्फ्रेड नोयस (Alfred Noyes) यांनी

ही भीतीची परिस्थिती निर्माण होण्यास 'सहज प्रवृत्ती'(instinct) कारणीभूत होती असे नमूद केले. अमेरिकेच्या शासनकर्त्यांनी १८९० चा चांदी खरेदी कायदा (Silver Purchase Act of 1890) बँकेच्या गोंधळाला कारणीभूत होता असा युक्तीवाद केला. या कायद्यानुसार शासनाचा वैध चलन पैसा वाढवितांना सोने तसेच चांदी या धातूंचा आधार असावा अशी योजना होती. शासनाजवळील सोन्याचा साठा घसरल्याने लोकांचा विश्वास ढळला आणि त्यांच्या चुकीच्या कल्पनांमुळे सर्वत्र अविश्वासाचे वातावरण पसरल्याने बँकांपुढे लांब रांगा लागल्या. Monetary History of United States in 1963 या मिल्टन फ्रिडमन आणि अॅना श्वार्टझ यांनी लिहिलेल्या ग्रंथात मंदीचे कारण बँकिंग क्षेत्रातील गोंधळ हे नमूद केले आहे. 1890 मध्ये अमेरिकेतील सामाजिक वातावरण देखील बिघडले, श्रमिक आणि व्यवस्थापक यांच्यातील मतभेद पराकोटीला गेले. या मंदीच्या काळात आर्थिकेतर घटक देखील महत्त्वपूर्ण ठरतात असे निदर्शनास आले.

**अतितप्त अर्थव्यवस्था आणि मंदी**

एका विशिष्ट मर्यादेपलीकडे विश्वासाचे वातावरण निर्माण झाल्यास आर्थिक घडामोडीबाबतची साशंकता दूर होते आणि आर्थिक समृद्धीकडे राष्ट्राची वाटचाल होणार अशा गोष्टींवर लोकांचा विश्वास दृढ व्हावयास लागतो. या काळात ग्राहक निष्काळजीपणाने खर्च करतात. इतरांचे अनुकरण करीत लोक पैसा खर्च करू लागतात. भ्रष्टाचार देखील याच काळात फोफावतो. या काळात मुद्रास्फितीची स्थिती तर निर्माण होतेच, परंतु त्याव्यतिरिक्त इतर घटक देखील अर्थव्यवस्थेला चालना देतात. 1920 चा काळ म्हणजे वादळी काळ मानण्यात येतो. या काळात समृद्धी, मौजेचे वातावरण, सामाजिक कार्यक्षमता आणि भरीव आर्थिक वृद्धी अनुभवास आली. वैश्विक स्तरावर रोख्याच्या किंमतीत नेत्रदीपक तेजी आली होती. वाढीस लागलेला रोखे बाजार 1929 साली कोसळला. यानंतर जग 1930 मध्ये मंदीच्या कचाट्यात अडकले. अर्थव्यवस्थेतील विश्वासात झालेले मूलभूत बदल, मुद्रा मूल्य भ्रांती, आर्थिक प्रामाणिकपणाच्या संदर्भात आकलन शक्ती मध्ये झालेले बदल हे दोन्ही मंदीची वैशिष्ट्ये होते. या घटकांचे मापन करणे अवघड होते.

या दोन युग प्रवर्तक घटना इतिहासातील फार पूर्वीच्या घटना आहेत असे कदाचित वाटेल. अशा घटनांनी पुनरावृत्ती टाळण्यासाठी आपल्या आर्थिक संस्थांनी बरीच प्रगती केली आहे असे देखील मानल्या जाऊ लागेल. दोन्ही मंदीच्या दरम्यान बँकेत होणारी गर्दी (Run on the Banks) हा घटक समान होता. दुसऱ्या मंदीनंतर केंद्रीय बँकिंग सिद्धांताचा आमूलाग्र विकास झाला. अमेरिकेच्या केंद्रीय बँकेने, संघीय निधी पद्धतीने (federal reserve system) नवी व्यवस्था प्रस्थापित केली. त्यातूनच समावेशक ठेवी विमा (Comprehensive Deposit Insurance) पद्धत अस्तित्वात आली. याउलट, निकृष्ट दर्जाच्या तारण बाजार अरिष्टाने (sub prime crisis) आधुनिक ठेवी विम्याच्या मर्यादा दर्शविल्या. अमेरिकेत 1990 च्या सुरूवातीनंतर काल्पनिक

बँकिंग क्षेत्र वाढण्यास सुरूवात झाली. ठेवी विम्यापासून हे क्षेत्र असुरक्षित होते. दुय्यम महत्त्वाचे कर्जदार म्हणून हे क्षेत्र उदयास आले. वित्तीय संस्था एकामागोमाग एक कोसळू लागल्या. 'बँकेत होणाऱ्या गर्दी' सारखीच परिस्थिती 2007 मध्ये निर्माण झाली. ठेवी विमेकार (Deposit Insurer) किंवा केंद्रीय बँकांसारख्या आर्थिक संस्था यांच्या वाढत्या गुंतागुंतीच्या वित्तीय व्यवस्थेमुळे अर्थव्यवस्थेला टिकाव धरणे अवघड झाले. मानवी स्वभाव हा घटक या सर्वच भूतकालीन घटनांचे मूळ कारण होते. हा प्रवाह प्रभावी असून आजतागायत कायम आहे. लोक प्रामाणिकपणाबद्दल आजही चिंताग्रस्त आहेत. भ्रष्टाचाराचा.मोह आजही सहज परिणाम करतो. इतरांचे दुष्कृत्य उघडकीस आले तर विशिष्ट कृत्यापासून लोक परावृत्त होतात, मुद्रास्फितीबाबत आजही ते गोंधळलेल्या स्थितीत आहेत. आर्थिक कारणमीमांसेपेक्षा पोकळ गोष्टींमुळे त्यांचे विचार आजही अधिक प्रभावी होतात. या सर्व बाबींचा विचार केल्यास जगात आलेल्या मंदीची परिस्थिती ही पूर्वीची होती आणि आज ती अस्तित्वात नाही असे म्हणता येत नाही.

### अरिष्ट–अमेरिकेच्या वर्चस्वाला धोका पोचविला का ?

सध्याच्या वित्त अरिष्टामुळे अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवर टीकेची झोड उठली आहे. ही परिस्थिती पूर्ववत होण्यासाठी काही वर्षे लागतील असे लोक मानू लागले आहेत. काही भाष्यकारांच्या मते, जागतिक अर्थव्यवस्थेवरील अमेरिकेचे वर्चस्व कमी होऊ लागल्याची ही नांदी आहे. निआल फर्ग्युसन यांच्या मते, अमेरिकेतील वित्तीय क्षेत्र या मंदीमुळे कदाचित कमकुवत होईल, मात्र जागतिक अर्थव्यवस्थेवरील अमेरिकेचे वर्चस्व हे पुढे देखील कायम राहील. काही अभ्यासकांच्या मते अमेरिकेची पिछेहाट होणार असून त्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

* अमेरिकेला सर्वसामान्य स्थितीत परतण्यास अनेक वर्षे लागतील आणि या दरम्यान चीनसारखा प्रतिस्पर्धी जागतिक अर्थव्यवस्थेत प्रबळ स्पर्धक म्हणून पुढे येईल.

* अमेरिकेच्या कर्जाची पातळी वाढत असल्याने ती अत्यंत स्फोटक झाली आहे. अमेरिकेच्या प्रगतीवर त्याचे दूरगामी परिणाम होणार आहेत.

* नजीकच्या काळात अमेरिकेचा डॉलर राखीव चलन म्हणून आपला दर्जा गमावून बसेल.

* अमेरिकेच्या वित्तीय व्यवस्थेचा जागतिक अर्थव्यवस्थेवरील प्रभाव कमी होत जाईल.

आंतरराष्ट्रीय नाणे बाजाराने (IMF) असे भाकीत केले आहे की 2009 मध्ये अमेरिकेची अर्थव्यवस्था २.९ टक्क्याने आकुंचित होईल. तर 2010 मध्ये देखील अमेरिकेच्या पुनरुत्थानाची प्रक्रिया अत्यंत मंद गतीने होईल. अमेरिका 0.8 टक्क्याने विकसित होईल असा एक अंदाज व्यक्त करण्यात येतो. चीनला यामुळे फायदा होईल असे देखील काही लोकांना वाटते. परंतु फर्ग्युसन यांच्यानुसार अमेरिकेचा वृद्धी दर मोठ्या प्रमाणावर घटण्याची शक्यता आहे. 2007 च्या तुलनेत ही घट 4.6 टक्क्याने होईल. परंतु चीनचा वृद्धी दर देखील अमेरिकेतील मंदीमुळे खालावेल.

अमेरिकेच्या इतर प्रतिस्पर्धीयांवर देखील या मंदीचा परिणाम झाला आहे. या वर्षात युरोपियन युनियनचा वृद्धी दर प्रती वर्षी 3.2 टक्क्याने व जपानचा 5.8 टक्क्याने तर रशियाचा 6.5 टक्क्याने घटण्याची शक्यता आहे. जागतिक अर्थव्यवस्थेचा केंद्र बिंदू अमेरिका आहे, हे या अरिष्टाने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. अमेरिकेतील मंदी आणि वित्तीय क्षेत्रातील उलथापालथ यामुळे इतर देशांच्या अर्थव्यवस्थांवर परिणाम झाला आहे. अमेरिकेच्या निर्यातीत घट झाली असून अमेरिकेतून इतर राष्ट्रांना होणारा भांडवल प्रवाह देखील कमी झाला आहे. त्यामुळे अमेरिकेतील अरिष्टाचे रुपांतर वैश्विक अरिष्टामध्ये झाले आहे. इतर अर्थव्यवस्थांना यामुळे पोचलेली झळ अमेरिकेतील अर्थव्यवस्थेवरील परिणामापेक्षा अधिक गंभीर स्वरूपाची आहे.

अर्थव्यवस्थेच्या पुनरुत्थानासाठी अमेरिकेनेअवलंबिलेल्या राजकोषीय उत्तेजनामुळे (fiscal stimulus) सार्वजनिक कर्जाचा बोजा वाढणार आहे असा देखील एक अंदाज आहे. 2009 मध्ये सकल देशीय उत्पादनाच्या संघीय तूटीचे प्रमाण (federal deficit) 12 टक्क्याहून अधिक होण्याचा देखील अंदाज आहे. संघीय तूट 2009 साली सकल देशीय उत्पादनाच्या 89 टक्के असून 2019 पर्यंत यात वाढ होऊन ही तूट 101 टक्क्यापर्यंत जाईल. आशावादी गृहितानुसार (optimistic assumption) देखील अमेरिकेचा वृद्धी दर 2011 च्या दरम्यान 4 टक्के राहील असा एक अंदाज व्यक्त करण्यात येतो.

भारताचे केंद्र आणि राज्याचे सकल देशीय उत्पादनाशी कर्जाचे असलेले प्रमाण गेल्या मार्च मध्ये 73 टक्के होते. एकत्रितकृत राजकोषीय तूट 2009-10 मध्ये सकल देशीय उत्पादनाच्या जवळपास 12 टक्के राहील असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. भारताचा वृद्धी दर 8 टक्के राहील असे गृहीत धरल्यास राजकोषीय समस्या स्वयंपूर्ण सुधारणा घडवून आणू शकेल. अमेरिकेत मात्र वृद्धी दर निम्न स्तरावर असल्याने हे कदाचित शक्य होणार नाही. अमेरिका आणि भारत या दोन अर्थव्यवस्थांच्या परिस्थितीत मात्र भिन्नता आहे. अमेरिका हे राष्ट्र गुंतवणूकदारांना अजून देखील सुरक्षित आश्रयस्थान वाटते. परंतु भारतीय अर्थव्यवस्थेच्या बाबतीत गुंतवणूकदार साशंक आहेत. महत्त्वाचा भाग म्हणजे डॉलर हे राखीव चलन असल्याने प्रतिस्पर्धी डॉलरमध्ये गुंतविण्यास उत्सुक आहेत. त्यामुळे अमेरिका या राष्ट्राची कर्जाची उचल करण्याची क्षमता प्रचंड आहे. अमेरिकेची अर्थव्यवस्था इतर अर्थव्यवस्थांना नुकसान पोहचू शकण्याच्या परिस्थितीत असल्याने जागतिक अर्थव्यवस्थेतील अमेरिकेचे स्थान अढळ असल्याने डॉलर या चलनाचे वर्चस्व कायम राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. अमेरिकेची बँकिंग व्यवस्था भावी काळात प्रबळ राहील अथवा नाही याबाबत मात्र प्रश्नचिन्ह कायम आहे. जागतिक अर्थव्यवस्थेवरील अमेरिकेच्या वर्चस्वाला मात्र धोका असल्याचे सध्या तरी जाणवत नाही.

**मंदीचा अंत झाला का ?**

अमेरिकेची अर्थव्यवस्था यापुढे अधिक आकुंचित होणार नाही असे आता वाटू लागले आहे. या चालू वर्षातील तिसऱ्या भागात सकल

देशीय उत्पादनाचा वृद्धी दर 2 ते 3 टक्के राहील असे भाकीत वर्तविण्यात येत आहे. हे भाकीत खरे ठरल्यास सध्याच्या मंदीचा काळ हा एकूण 19 महिन्यांचा राहील. जागतिक मंदीनंतर प्रथमच इतका काळ लांबलेली ही पहिलीच मंदी असेल. 1970 च्या पूर्वी आणि 1980 च्या सुरूवातीच्या मंदीपेक्षा ही मंदी 2 ते 3 महिन्यांच्या कालावधीने लांबली आहे. मात्र 20 व्या शतकातील ही सर्वात दीर्घकालीन मंदी राहील. वास्तविक संपत्तीचा फुगा फुटल्यामुळे वित्तीय क्षेत्र घसरण्यास सुरूवात झाल्याने वैश्विक स्तरावर मंदीची परिस्थिती निर्माण झाली. अमेरिकेची अर्थव्यवस्था नाजूक झाली आणि रोजगार बाजाराची स्थिती अत्यंत भयावह झाली. दोन वर्षापेक्षा कमी कालावधीत अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेने 70 लाख (Million) रोजगार गमावला. या वर्षातील पहिल्या टप्प्यात 6.5 टक्क्याने घसरलेला वृद्धी दर दुसऱ्या टप्प्यात 1 टक्क्याने घसरला. निर्माणी क्षेत्राचा निर्देशांक वाढीस लागला आणि माल साठ्यात घट (Inventories) झाली. मात्र त्या नंतरच्या काळात गृह निर्माण बाजाराचे चित्र आशावादी होऊ लागले. अस्तित्वात असलेल्या घरांची विक्री सातत्याने वाढू लागली. काही महिन्यांपूर्वी जागतिक मंदी सारख्या असलेल्या परिस्थितीत बदल जलद गतीने कसा घडला? शासकीय हस्तक्षेप हे एकच कारण यामागे दिसते. शासनाच्या उत्तेजन आवेष्टनामुळेच (stimulus package) वर्षाच्या दुसऱ्या भागात सकल देशीय उत्पादन 2 टक्क्याने वाढण्यास मदत झाली. मंदीच्या कचाट्यातून अर्थव्यवस्थेची सुटका शासनाच्या मध्यस्थीमुळे होऊ शकली यात दुमत नाही. शासनाने जाहीर केलेले 787 बिलियन डॉलर्स पूर्णपणे अजून देखील खर्च झालेले नाहीत. जूनच्या सुमारास उत्तेजनात्मक पैसा 100 बिलियन डॉलर्स पर्यंतच खर्च झाला आहे. उरलेला पैसा खर्च केल्यास गमावलेला रोजगार पुन्हा प्राप्त करता येऊ शकेल.

अर्थव्यवस्थेला पूर्ववत आणण्याच्या दृष्टीने अमेरिकेने अवलंबिलेल्या विविध मार्गांपैकी उत्तेजनात्मक खर्च (Stimulus spending) ही एक प्रभावी उपाय योजना होती. शासनाचा हस्तक्षेप बँकांना जामीन (bali out) देण्याच्या संदर्भात देखील अत्यंत उपयुक्त ठरला. निगम क्षेत्राचा आवश्यक कर्जाची गरज भागविणे बँकांना यामुळे शक्य आहे. विश्वास संपादन करण्यात वित्तीय क्षेत्र यशस्वी झाले असे देखील म्हणणे वावगे ठरू नये. वित्तीय संस्थांसाठी आणि व्यवसायासाठी कर्जाऊ कार्यक्रमाच्या (borrowing programme) माध्यमाने मोठ्या प्रमाणात रक्कम उपलब्ध झाली.

अर्थव्यवस्थांचे पुनरुत्थान इतर राष्ट्रांमध्ये याच पद्धतीने झाले. नुकताच सादर करण्यात आलेला (OECD) आर्थिक सहकार आणि विकासासाठी संघटना अहवाल असे दाखवून देतो की, इटली, फ्रान्स, कॅनडा, जर्मनी, युनायटेड किंगडम आणि अमेरिका या राष्ट्रांमध्ये अर्थव्यवस्था पुनरुज्जीवित होण्याची निश्चित चिन्हे दिसू लागली आहेत. आशियातील राष्ट्रे देखील आर्थिक मंदीतून बाहेर येऊ लागली आहेत. जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणात आर्थिक वृद्धी दर साध्य करण्यास यामुळे मदत होऊ शकेल. काही तज्ज्ञांच्या मते मात्र आर्थिक पुनरुत्थानाचे हे यश अल्पकालीन

असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्याची मंदी 'V' आकारासारखी नसून 'W' या अक्षराच्या आकारासारखी आहे असा देखील एक मतप्रवाह आहे. याचाच अर्थ सध्याच्या अपेक्षित पुनरूत्थानानंतर लगेचच पुन्हा मंदीच्या परिस्थितीशी सामना करावा लागेल. मात्र ध्यानात ठेवण्यासारखी बाब म्हणजे इतकी उलथापालथ होऊन देखील आर्थिक वातावरणाशी समरस होण्याची प्रचंड क्षमता अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेत आहे. ज्या उद्योगांची पिछेहाट मंदीच्या काळात झाली ते उद्योग सावरण्याची ताकद अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेत आहे किंवा काही उद्योग बंद करण्यात देखील अमेरिकेची स्वीकृती राहू शकेल.

कुठल्याही अर्थव्यवस्थेला सावरण्यासाठी हा घटक महत्त्वपूर्ण भूमिका बजावित असतो हे नाकारता येणार नाही. असे असून देखील स्थिर स्थावर होत असलेल्या आर्थिक परिस्थिती रोजगाराची स्थिती मात्र अत्यंत बिकट झाली आहे. जुलै महिन्यातील रोजगार अहवालानुसार प्रत्येक तीन बेरोजगारांच्या मागे एक बेरोजगार सहा महिन्यापेक्षा अधिक काळ कामापासून वंचित होता. सध्या बेरोजगाराची आकडेवारी इतक्या जास्त प्रमाणात पहिल्यांदाच (1948 नंतर) दिसते. गेल्या डिसेंबरपासून साधारणपणे 15 महिने बेरोजगार असणाऱ्या व्यक्तींची संख्या 74 टक्क्याने वाढली आहे. रोजगाराची स्थिती बघितल्यास अमेरिकेतील मंदी खरोखर संपुष्टात आली आहे का? याबाबत शंका निर्माण होते. या मंदीच्या काळातील रोजगाराची परिस्थिती अतिशय गंभीर आहे. मागील दोन मंदीच्या काळात इतकी दयनीय अवस्था झाली नव्हती हे देखील ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ओबामा या समस्येकडे नक्कीच डोळेझाक करणार नाहीत. त्यामुळे रोजगार निर्मितीसाठी देखील विशेष उत्तेजनात्मक निधीचा पुरवठा अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला करण्यात येईल, अशी आशा करू या.

**वित्तीय अरिष्टामुळे उत्पन्नातील विषमता वाढीस लागण्याची शक्यता**

जगातील बहुतांश प्रदेशातील उत्पन्न विषमता सध्याच्या वित्तीय अरिष्टामुळे अधिक वाढणे अपरिहार्य आहे. वित्तीय आणि आर्थिक अरिष्टाची सर्वात अधिक किंमत अशा लोकांना मोजावी लागणार आहे की ज्यांनी वृद्धीचा फायदा कधी उपभोगलाच नाही. काही प्रमाणात असलेली उत्पन्न विषमता ही परिश्रमाचा मोबदला देण्यास, विशेष कौशल्याची कदर करण्यास नवीन उपक्रमांना प्रोत्साहन देण्यास उपयुक्त ठरु शकेल. परंतु उत्पन्नातील विषमता मोठ्या प्रमाणावर असल्यास अर्थव्यवस्थेला क्षती पोहचू शकेल. समाज रचनेला आणि आर्थिक कार्यक्षमतेला देखील अशी असमानता घातक ठरु शकेल. सध्याच्या जागतिक आर्थिक मंदीचा परिणाम निम्न-उत्पन्न असलेल्या गटावर प्रमाणाबाहेर होत असल्याचे दिसते. उत्पन्नाची विषमता वाढीला लागली असतांनाच आर्थिक मंदीची स्थिती निर्माण झाली.

असंतुलित विकास आणि असंतुलित वृद्धी प्रतिमान हा देखील एक महत्त्वपूर्ण घटक अरिष्टाच्या संदर्भात लक्षात घ्यावयास हवा. 2008 चा जागतिक बँकेचा, 'वित्तीय जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील उत्पन्न विषमता' अहवाल असे दर्शवितो

की, वित्तीय क्षेत्रातील चंचलता श्रमिक बाजारासाठी वाईट आहे. श्रमिक बाजारात यामुळे बरीच उलथापालथ होते. निम्न उत्पन्न आणि आर्थिक चंचलतेमुळे सहज परिणाम होणाऱ्या गटांवर मर्यादेबाहेर परिणाम होतो. मंदीच्या स्थितीत घसरत्या वृद्धी दरामुळे कामगारांना मिळणाऱ्या मोबदल्यात मोठ्या प्रमाणात घट झाली. वाढत्या अन्नधान्याच्या किंमतीमुळे गरीब घरकुलांच्या क्रयशक्तीत देखील घट झाली. या अहवालाने कार्यकारी मंडळाच्या (Executives) वाढत्या पगाराकडे लक्ष वेधले आहे. उत्पन्न विषमतेसाठी हा एक मुख्य घटक मानता येईल. सहा निवडक देशांच्या 15 मोठ्या कंपन्यांच्या प्रमुख कार्यकारी अधिकाऱ्यांच्या मिळकतीची आकडेवारी असे दर्शविते की, सरासरीने या अधिकाऱ्यांचे उत्पन्न कर्मचाऱ्यांच्या सरासरी उत्पन्नाच्या 71 ते 183 पटीने जास्त आहे. अमेरिकेत 15 मोठ्या कंपन्यांच्या प्रमुख कार्यकारी अधिकाऱ्यांचे उत्पन्न कर्मचाऱ्यांच्या सरसरी उत्पन्नापेक्षा 520 पटीने अधिक आहे. 2003 च्या तुलनेत यात 360 पटीने वाढ झाल्याचे देखील निदर्शनास येते.

**वैश्विक समष्टी आर्थिक सहकार**

2008 च्या महामंदीनंतर आर्थिक वृद्धीची पुनर्रचना करण्यासाठी व आवश्यक असलेला समष्टी आर्थिक समन्वय साध्य करण्यासाठी जागतिक पातळीवर धोरणांची पुनर्रचना करण्याचे फारसे प्रयत्न झालेले नाहीत. बेरोजगारीच्या भीतीने ग्राहक आपल्या खर्चावर नियंत्रण आणण्याच्या प्रयत्नात आहेत. सप्टेंबर 2008 मध्ये अनुभवास आलेल्या लेहमन ब्रदर्सच्या वित्तीय धसक्यापेक्षा रोजगार, उत्पादन आणि व्यापार प्रवाहावर झालेले परिणाम अधिक गंभीर स्वरूपाचे असले तरीही जागतिक स्तरावर देशादेशांमधील आर्थिक सहकार वाढल्यास वस्तूंच्या मागणीतील घसरण थांबून निर्णायक गरजांसाठी गुंतवणूकीत वाढ करता येऊ शकेल. स्थायी स्वरूपाची ऊर्जा, सुरक्षित पाणी आणि अन्न उत्पादनात वाढ या घटकांकडे तरी लक्ष पुरविता येऊ शकेल. शेअर बाजार आणि घरांच्या किंमतीत झालेल्या घसरणीमुळे अमेरिका, युरोप आणि आशियातील राष्ट्रांनी मूल्यात लक्षणीय घट होण्याचा अनुभव घेतला आहे. या घटनेचा जागतिक स्तरावरील झालेल्या परिणामाबाबत अधिकृत आकडेवारी उपलब्ध नसली तरी अमेरिकेतील उच्च पातळीवर असलेल्या संपत्तीत 15 ट्रिलियन डॉलरची, तर युरोप आणि आशिया देशात 10 ट्रिलियन डॉलरची घसरण झाली असावी असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सर्व मिळून संपत्तीतील मूल्यात घट जवळपास 25 ट्रिलियन डॉलर इतकी येते. ही घसरण जगाच्या वार्षिक उत्पन्नाच्या तुलनेत 60 टक्के होते. अमेरिकन अर्थव्यवस्थेच्या संपत्तीच्या वाट्यात 100 टक्क्याने घट झाली तर युरोप आणि आशियातील संपत्तीच्या वाट्यात वार्षिक 70 टक्क्याची घट झाल्याचा अंदाज आहे. साधारणपणे असे गृहीत धरण्यात येते की प्रत्येक 1 डॉलरच्या घरगुती संपत्तीत झालेल्या घटी सोबत घरगुती उपभोगात 0.05 डॉलरची घसरण होते. अमेरिकेच्या घरगुती खर्चाला बसलेला ऋणात्मक स्वरुपाचा धक्का राष्ट्रीय उत्पन्नाच्या 5 टक्के येतो. युरोप आणि आशियातील राष्ट्रांमध्ये घरगुती खर्चाची घट 3.5 टक्के इतकी

येते. या कमी होणाऱ्या घरगुती खर्चाचे आकारमान इतके मोठे आहे की याचा परिणाम जागतिक बेरोजगारीत वाढ होण्यावर झाला. बेरोजगारात संपत्तीची पुनर्बांधणी करण्याचे दृष्टीने घरकुलांची बचत वाढेल. कदाचित हळूहळू उपभोगावरील खर्च देखील वाढायला लागेल. परंतु झपाट्याने वाढणाऱ्या बरोजगारीला यामुळे कदाचित आळा बसू शकणार नाही. सामर्थ्यशाली (Potential output) उत्पादनाच्या तुलनेत प्रत्यक्षात वाढणाऱ्या उत्पादनाचे प्रमाण कमीच राहील.

जागतिक पातळीवर यामुळे इतर प्रकारच्या खर्चाला चालना देण्याची गरज निर्माण झाली आहे. जागतिक अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी आणि भावी काळातील गरजांची पूर्ती करण्यासाठी आधारभूत संरचनेच्या प्रकल्पांवरील खर्च वाढविणे हा एक प्रभावी मार्ग होऊ शकेल. यात रस्ते, रेल्वे, बंदरे (Ports), चिरस्थायी ऊर्जा, आरोग्याच्या सोयी, प्रदूषण नियंत्रण आणि स्वच्छ पाणी यांचा समावेश करता येईल. जगाच्या पातळीवरील गरीबातल्या गरीब प्रदेशांमध्ये विकसनशील राष्ट्रांमध्ये वैश्विक सहकाराच्या माध्यमाने सार्वजनिक गुंतवणूकीत वाढ करणे आवश्यक आहे. निर्यातीच्या उत्पन्नात, वित्तप्रेषणात (Remittances) आणि भांडवलाच्या आंतर प्रवाहात जागतिक अरिष्टामुळे घट झाल्याने सब-सहारन आफ्रिका आणि मध्य आशियाला अधिकच फटका बसला. हवामानात होत असलेल्या बदलांचा विपरीत परिणाम व राष्ट्रांवर अधिकच होत असल्याचे निदर्शनास येते. श्रीमंत देशांतील जीवनशैलीमुळे हरितगृहे वायूच्या (Greenhouse gas emissions) उत्सर्जनात वाढ झाली आहे. याचा प्रभाव विकसनशील राष्ट्रांवर होत असून सातत्याने ओला किंवा कोरड्या दुष्काळांशी सामना या राष्ट्रांना करावा लागतो आहे. अमेरिका, युरोपियन संघ आणि जपान या राष्ट्रांनी पुढाकार घेऊन निम्न उत्पन्न असणाऱ्या देशांमध्ये आधारभूत संरचनेच्या उभारणीसाठी वित्तीय पुरवठा करण्याचे दृष्टीने नवा कार्यक्रम आखण्याची आवश्यकता आहे. जागतिक पातळीवरील उपभोगाची घसरण थोपवण्यासाठी वैश्विक सहकार हे एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकेल. गरीब राष्ट्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर सामाजिक खर्चात गुंतवणूकीच्या माध्यमाने वाढ झाल्यास जागतिक अर्थव्यवस्थेला चालना मिळून आर्थिक विकास साध्य करण्यास मदत होऊ शकेल.

**समारोप**

वित्तीय क्षेत्रातील सुधार म्हणजे मुख्यत: नियंत्रण आणि विनियमनापासून सुटका करून घेणे, असा अर्थ साधारणपणे लावण्यात येतो. कमीत कमी नियंत्रण असल्यास आपले हित जपणे सहज शक्य होऊ शकेल असा समज या क्षेत्रात वावरणाऱ्या मंडळींचा झाला. आर्थिक सुधार कार्यक्रमांतर्गत मुक्तपणाचे धोरण अवलंबिण्यात येऊन अधिकाधिक उद्योजक या व्यवसायात सामील होण्याचे दृष्टीने प्रयत्न करण्यात आले. याचे फलित म्हणजे वित्तीय क्षेत्राची वाढ जलद गतीने आणि गुंतागुंत स्वरूपाची झाली. विनियमन आणि नियंत्रण करणाऱ्या संस्थांना नव प्रवर्तकाची कार्यपद्धती गाठणे शक्य झाले नाही. नव प्रवर्तकांच्या प्रगतीची गती आणि विनियमन यांतील

अंतर वाढीस लागले. वित्तीय अरिष्टाला हा देखील घटक कारणीभूत ठरला. सध्या अर्थव्यवस्थेत शासन अधिक धैर्याने आणि सर्जनशीलतेने हस्तक्षेप करीत असून अर्थव्यवस्थेवर नियंत्रण मिळविण्याचा पुनश्च प्रयत्न करतांना दिसत आहे. अर्थव्यवस्था स्थिरस्थावर होऊन बाजार यंत्रणा मार्गी लागण्याची प्रक्रिया देखील सुरू झाली आहे. शासनाने या बाबतीत यश संपादन केले असे देखील म्हणता येईल, परंतु अरिष्ट संपुष्टात आले आहे असे मानणे कदाचित योग्य होणार नाही. शासनाचा वाढता खर्च लक्षात घेता हे अरिष्ट शासनाकडे हस्तांतरित होत असल्याचे दिसते. प्रोत्साहनात्मक सहाय्य शासनाची तूट वाढीस लावणार अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. हे सहाय्य निदान ग्रामीण मागणीच्या निर्मितीसोबतच भारतीय कृषी क्षेत्राच्या विकासाच्या मार्गातील अडथळे दूर करण्यास कशारितीने सहायभूत ठरू शकेल या दृष्टिने विचार होणे आवश्यक आहे. बाजाराच्या माध्यमाने शासन जवळपास 4.51 लाख कोटीची उचल या वर्षात करणार असल्याने खाजगी क्षेत्राला यामुळे निधी उपलब्ध होण्यात अडचणी येतील. यामुळे पारंपारिक बँक विनियमनाची यंत्रणा अधिक सक्रिय करावी लागेल, मात्र अती विनियमित संस्थांमध्ये देखील अरिष्टाची स्थिती निर्माण होते, त्यामुळे योग्य विनियमन देखील महत्त्वाचे आहे.

पुनरुत्थानाचे सध्याचे स्वरूप देशादेशांमध्ये भिन्न स्वरूपाचे असल्याने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत देशांमधील दरी कमी होत असतांना समन्वय प्रस्थापित होणे दुरापास्त होईल. चीन आणि भारतासारख्या देशांमध्ये V या आकाराशी मिळते जुळते अशा पद्धतीने पुनरूत्थान होत असल्याचे निदर्शनास येते; तर आर्थिक सहकार आणि विकास संघटनेमधील देशांची प्रगती (W) (O.E.C.D) अक्षराच्या आकाराप्रमाणे होत असल्याचे मानण्यात येते. या राष्ट्रांना कदाचित पुन्हा मंदीच्या समस्येशी सामना करावा लागेल. असे झाल्यास विकसित आणि विकसनशील राष्ट्रांचे मौद्रिक आणि राजकोषीय धोरणांमध्ये सुसंगततेचा अभाव राहील. युरोप आणि अमेरिका या सारख्या राष्ट्रांमध्ये शिथिल मौद्रिक धोरण आणि विकसनशील राष्ट्रांमधील (पुनरूत्थानानंतर) काटकसरीचे धोरण यामुळे जागतिक स्तरावर असममितीची परिस्थिती निर्माण होईल. यामुळे जागतिक पातळीवर गंभीर परिणाम होऊन समन्वय प्रस्थापित करण्यास अडचणी निर्माण होतील. विनियमन आणि नियंत्रणाची सर्व राष्ट्रांना स्वीकृत होईल अशी यंत्रणा उभारणे आवश्यक आहे.

सध्याच्या स्पर्धात्मक जागतिक बाजारात वेळोवेळी घडणाऱ्या बदलांशी सामना करण्यासाठी उद्योगांना अद्ययावत करून बदलत्या परिस्थितीनुसार आर्थिक धोरण, उद्धिष्टे यात वैविध्य आणणे आवश्यक आहे. आघाडीवर असलेल्या उद्योगांना शासनाने योग्य ती मदत दिल्यास त्यांची प्रगती झपाट्याने होऊ शकेल. शासनाने आता अधिक सक्रीय होऊन कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्राच्या प्रगतीला हातभार लावण्याची आवश्यकता या अरिष्टाने अधोरेखित केली आहे. लोभीपणा या वृत्तीपासून परावृत्त करण्यासाठी नीतीमत्ता, प्रामाणिकपणा, समन्याय, खरेपणा आणि विश्वास याकडे ध्यान आकर्षित करून उद्योगांचे

व्यवस्थापक, संचालक आणि इतर विकास अभिकर्त्यांना विविध कार्यक्रमांच्या माध्यमाने आर्थिकेतर घटकांचे महत्त्व पटवून देणे आवश्यक आहे. आय. आय. एम. सारख्या संस्थांनी या बाबतीत पुढाकार घेतला आहे, ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. नावलौकिक / कीर्ती ही आता मौल्यवान अमूर्त संपत्ती म्हणून मानण्यात येते. हिस्सेदारांशी सातत्याने संपर्कात राहिल्यास कंपन्या आपली प्रतिष्ठा टिकून ठेवू शकतील. वार्षिक अहवाल, वेबसाईटच्या माध्यमाने कंपनीच्या कामकाजाबाबत माहिती पुरविणे, वार्षिक सर्वसाधारण सभा या माध्यमाने आणि आवश्यकता वाटल्यास नियंत्रकांना विशिष्ट बाबी संबंधी स्पष्टीकरण दिल्यास कंपन्यांचा नावलौकिक वाढण्यास मदत होऊ शकेल. प्रतिष्ठा प्राप्त करण्यास बराच कालावधी लागतो मात्र प्राप्त झालेली कीर्ती कलंकीत होण्यास वेळ लागत नाही. बँका/संस्था यांच्या प्रतिष्ठेचे व्यवस्थापन हे सद्याच्या जागतिक वित्तीय अरिष्टाच्या संदर्भात जोखिम व्यवस्थापनाचा एक भाग बनले आहे. संस्थाच्या अपयशामुळे किंवा अफवांमुळे देखील प्रतिष्ठेला तडा जाऊ शकतो आणि ग्राहकांचा आधार, प्राप्ती यावर त्याचा विपरीत परिणाम होतो.

सध्या अस्तित्वात असलेल्या भांडवलशाही बाबत मूलभूत प्रश्न या अरिष्टामुळे उपस्थित झाले आहेत. राज्य-बाजार या वादाने भांडवली उत्पादन आणि श्रमिकांची पिळवणूक या संदर्भात प्रक्रियेचा फेर विचार करण्यास भाग पडले आहे. राज्याच्या भूमिकेबाबत पुनर्विचार करताना कामगार, शेतकरी यांनी संघटित होणे आवश्यक आहे. गेल्या काही वर्षात अशा संघटना लुप्त झाल्याने शासन, खाजगी उद्योजक यांच्या कार्यपद्धतीवर अंकुश राहिला नाही. बदलत्या परिस्थितीत सहकार क्षेत्राच्या विकासाला प्राधान्य देण्याची आवश्यकता पुन्हा निर्माण झाली आहे. सहकार क्षेत्राचा विकास एका विशिष्ट प्रदेशापुरता किंवा राज्यापुरता मर्यादित न राहता सहकारी संस्कृती सर्वत्र रूजविणे आवश्यक आहे.

विकासात्मक प्रगतीला पूरक अशी जागतिक वित्तीय रचना पुनर्रचित करण्यासाठी संधी देखील या अरिष्टाने प्राप्त करून दिली आहे यात शंका नाही. पैशाचा पुरवठा निव्वळ वित्तीय क्षेत्र स्थिरस्थावर करण्यास जर झाला आणि अर्थव्यवस्थेच्या वास्तविक क्षेत्रांकडून या पैशाची मागणीच आली नाही तर आर्थिक मंदीची परिस्थिती पुन्हा उद्‌भवू शकेल. वित्तीय व्यवस्थेच्या माध्यमाने वास्तविक क्षेत्राचा पैसा उपलब्ध न करता सार्वजनिक खर्च प्रत्यक्षपणे रोजगार आणि उत्पन्न निर्मितीसाठी वळविल्यास मंदीवर मात करणे अधिक सोयीचे होऊ शकेल. लोकांच्या हितासाठीच वित्तीय बाजार कार्यरत व्हावा हे साध्य करण्यासाठी विनियमन करणाऱ्या संस्थांचे देखील सबलीकरण करणे अत्यावश्यक आहे. शासनाने जमानतदाराची भूमिका वठवून भांडवलशाही अभेद्य ठेवण्यासाठी फक्त वित्तीय भांडवलदारांनाच वाचविण्याचा प्रयत्न केला तर मंदीची समस्या सुटण्यास मदत होणार नाही.

**तक्ता क्र. 1**

**भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाबाबत अद्ययावत माहिती**

आकडेवारी कोटीमध्ये (जुलै–सप्टेंबर 2009)

| | माहितीचे घटक | अद्ययावत माहिती | पूर्वीची माहिती | टक्केवारी बदल |
|---|---|---|---|---|
| | **राष्ट्रीय लेखे**<br>स्थूल आंतर्देशीय उत्पादन (चालू किमतीला) | 1279500 | 1175633 | 8.8 |
| 1 | कृषी, वनसंवर्धन आणि मासेमारी | 179767 | 162433 | 10.7 |
| 2 | खाण व दगड खाणकाम | 29497 | 29895 | -1.3 |
| 3 | वस्तू निर्माण | 216986 | 198382 | 9.4 |
| 4 | वीज, वायू आणि पाणीपुरवठा | 21367 | 19805 | 7.9 |
| 5 | बांधकाम | 118668 | 111579 | 6.4 |
| 6 | व्यापार, परिवहन, हॉटेल्स आणि दळणवळण | 325945 | 309199 | 5.4 |
| 7 | वित्तीय विमा, स्थावर मालमत्ता व्यवसाय सेवा | 184492 | 172523 | 6.9 |
| 8 | सामाजिक आणि वैयक्तिक सेवा | 202778 | 171816 | 18.0 |

**तक्ता क्र. 2**

**भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाबाबत अद्ययावत माहिती**

आकडेवारी कोटीमध्ये (जुलै–सप्टेंबर 2009)

| | माहितीचे घटक | अद्ययावत माहिती | पूर्वीची माहिती | टक्केवारी बदल |
|---|---|---|---|---|
| | **राष्ट्रीय लेखे** स्थूल आंतर्देशीय उत्पादन (स्थिर किमतीला) (1999-2000) | 834780 | 773850 | 7.9 |
| 1 | कृषी, वनसंवर्धन आणि मासेमारी | 106116 | 105214 | 0.9 |
| 2 | खाण व दगड खाणकाम | 15688 | 14321 | 9.5 |
| 3 | वस्तू निर्माण | 132492 | 121361 | 9.2 |
| 4 | वीज, वायू आणि पाणीपुरवठा | 17604 | 16384 | 7.4 |
| 5 | बांधकाम | 63983 | 60101 | 6.5 |
| 6 | व्यापार, परिवहन, हॉटेल्स आणि दळणवळण | 246452 | 227128 | 8.5 |
| 7 | वित्तीय विमा, स्थावर मालमत्ता व्यवसाय सेवा | 127844 | 118739 | 7.7 |
| 8 | सामाजिक आणि वैयक्तिक सेवा | 124602 | 110602 | 12.7 |

तक्ता क्र. 3

क्षेत्र निहाय वास्तविक स्थूल आंतर्देशीय उत्पादनाचा वृद्धी दर

| अ. क्र. | विवरण | 2007-08 | | | 2008-09 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | $Q_1$ | $Q_2$ | $Q_3$ | $Q_1$ | $Q_2$ | $Q_3$ |
| 1 | कृषी, वनसंवर्धन आणि मासेमारी | 4.4 | 4.4 | 6.9 | 3.0 | 2.7 | -2.2 |
| 2 | उद्योग | 8.5 | 7.5 | 7.6 | 5.2 | 4.7 | 0.8 |
| | 2.1 खाण व दगड खाणकाम | 0.2 | 3.9 | 4.3 | 4.8 | 3.9 | 5.3 |
| | 2.2 वस्तूनिर्माण | 10 | 8.2 | 8.6 | 5.6 | 5.0 | -0.2 |
| | 2.3 वीज, वायू आणि पाणीपुरवठा | 6.9 | 5.9 | 3.8 | 2.6 | 3.6 | 3.3 |
| 3 | सेवा | 10.7 | 10.7 | 10.1 | 10.2 | 9.6 | 9.5 |
| | 3.1 परिवहन, साठवण, हॉटेल्स आणि उपहारगृहे | 13.2 | 11.0 | 11.6 | 11.2 | 10.7 | 6.8 |
| | 3.2 वित्तीय विमा, स्थावर मालमत्ता व्यवसाय सेवा | 12.4 | 12.2 | 11.9 | 9.3 | 9.2 | 9.5 |
| | 3.3 व्यापार, सामाजिक आणि वैयक्तिक सेवा | 4.5 | 7.1 | 5.5 | 8.5 | 7.7 | 17.3 |
| | 3.4 बांधकाम | 9.7 | 13.7 | 9.0 | 11.4 | 9.7 | 6.7 |
| | 3.5 घटक किमतीला वास्तविक स्थूल आंतर्देशीय उत्पादन | 9.1 | 9.1 | 8.9 | 7.9 | 7.6 | 5.3 |

**तक्ता क्र. 4**


**निवडक देशांचे/गट अग्रणी निर्देशांक आणि**
**भारताच्या अग्रणी निर्देशकाशी प्रतिपगमनाचे प्राप्त परिणाम**

| अवलंबी चल Y | बाह्यजात चल X | β गुणांक | t - मूल्य p - मूल्य | $R^2$ | DW |
|---|---|---|---|---|---|
| अग्रणी निर्देशक भारत | अग्रणी निर्देशक ओ इ सी डी | 0.5311 | 6.1782 0.0000 | 0.9998 | 1.9883 |
| अग्रणी निर्देशक भारत | अमेरिका | 0.2779 | 3.9639 0.0000 | 0.9999 | 1.965 |
| अग्रणी निर्देशक भारत | चीन | 0.04750 | 1.2817 0.202 | 0.9988 | 1.983 |
| अग्रणी निर्देशक भारत | युरो | 0.5047 | 4.5390 0.0000 | .9999 | 1.9924 |
| अग्रणी निर्देशक भारत | जी – ७ | 0.4454 | 5.2846 0.0000 | 0.9998 | 1.981 |

वरील समीकरणात स्वयं सहसंबंध (Autocorrelation) समस्या
कोक्रन ऑरकुट (Cocharance Orcutt) तंत्राच्या सहाय्याने दूर करण्याचा प्रयत्न केला आहे.

अमेरिकेचा औद्योगिक उत्पादन निर्देशांक A1


युरोपियन युनियनचा औद्योगिक उत्पादन निर्देशांक A2




Impact of a shock of USIIP on the EUIIP

अमेरिकेचा औद्योगिक उत्पादन निर्देशांक A1


भारताचा पैसा पुरवठा A21



Impact of a shock to USIIP on Indian M3

अमेरिकेचा औद्योगिक उत्पादन निर्देशांक A1


भारताचा घाऊक किंमत निर्देशांक A13




Impact of one shock to USIIP on the WPI of India.
Correlation between USIIP and WPI of India = 0.86599


अमेरिकेचा औद्योगिक उत्पादन निर्देशांक A1

भारताचा पैसा पुरवठा A21




Impact of a shock to USIIP on Indian M3

युरोपियन युनियनचा औद्योगिक उत्पादन निर्देशांक A2
भारताचा औद्योगिक उत्पादन निर्देशांक A11





Impact of a shock to EUIIP on Indian IIP

युरोपियन युनियनचा औद्योगिक उत्पादन निर्देशांक A2
भारताचा घाऊक किंमत निर्देशांक A13





Impact of a shock to EUIIP on Indian IIP

युरोपियन युनियनचा औद्योगिक उत्पादन निर्देशांक A2
अमेरिकेचा औद्योगिक उत्पादन निर्देशांक A1




Impact of one shock to EUIIP on Indian IIP

युरोपियन युनियनचा औद्योगिक उत्पादन निर्देशांक A2
भारताचा पैसा पुरवठा A21




Impact of a shock to EUIIP on Indian IIP

# परिशिष्ट – 1

## सदिश स्वयंप्रतीपगमन (Vector Auto Regression - VAR)

बहुचल कालश्रेणी प्रतिमानांचा सदिश स्वयं प्रतीपगमन हा एक विशिष्ट वर्ग आहे. एक सामयिक समीकरणांच्या अनेक मर्यादा असल्याने त्याला पर्याय म्हणून सिम्स (1980) यांनी सदिश स्वयं प्रतीपगमन या तंत्राची सुरूवात केली. व्हारच्या पद्धतीत सर्वच चलांना अंतर्जात चल (Endogenous Variables) मानण्यात येतात. या व्यवस्थेत विश्लेषण कर्त्यांच्या पूर्व ज्ञानाचा उपयोग करून समाविष्ट करण्यात येणाऱ्या चलांची निवड करण्यात येते.

उदाहरणार्थ, आपण समजा अशी व्यवस्था लक्षात घेतली की जेथे दोन काल श्रेणी चलांचा $Y_t$ आणि $Y_t$ समावेश आहे. यामुळे व्हार व्यवस्थेत दोन समीकरणे समाविष्ट होतील. एका समीकरणात अवलंबी चल $Y_t$ राहील, तर दुसऱ्या समीकरणात अवलंबी चल $X_t$ राहील. दोन्ही समीकरणात X आणि Y या चलांचे पश्चायन मूल्य लक्षात घेण्यात येते. सामान्यपणे चलांच्या संख्येच्या आधारे समीकरणे राहतील. व्हारमध्ये 'K' चलांचा समावेश असले तर 'K' समीकरणे होतील. सर्वच चलांचे पश्चायन मूल्य सर्वच समीकरणांमध्ये प्रतीपगमक (Regressors) राहतील.

सदिश स्वयं प्रतीपगमनाचे (VAR) दोन पैलू आहेत.

1) व्हार मधील चलांची संख्या

2) व्हार मधील चलांच्या पश्चायनाचा कालावधी

चलांची संख्या-प्रत्येक समीकरणातील गुणांक व्हार मधील चलांच्या संख्येच्या प्रमाणात राहील. व्हार मध्ये समजा 5 चले असतील आणि 4 पश्याचन (lag) असतील तर प्रत्येक समीकरणात मापन करण्यात येणाऱ्या गुणांकाची संख्या – 5 x 4 = 20 + गत्यवरोध (Intercapt) = 21. व्हार मधील एकूण गुणांकाची संख्या 21 x 5 = 105 इतकी होईल. त्यामुळे व्हार मधील चलांची संख्या शक्यतोवर कमीत कमी असावी.

**व्हार चा पश्चायन काळ**

शक्यता प्रमाण चाचणीचा (likelihood ratio test) उपयोग करून व्हार चा कालावधी किंवा पश्चायन काळ निर्धारित करता येईल. समष्टि-आर्थिक चलांचे स्वयं प्रतीपगामी (auto regressive) हे वैशिष्ट्य असल्याने व्यवस्थेमध्ये पश्चायन काळ अंतर्भूत करण्यात येतो. स्वयं प्रतीपगामी चौकटीत (auto regressive tramenioun) दोन किंवा अधिक चलांचा अंतर्भाव केल्यास सदिश स्वयं प्रतीगमन हे तंत्र उदयास येते (VAR). इष्टतम पश्चायन काळाचा समावेश व्हार मध्ये असावा. पश्चायन काळाची तपासणी करण्याचे दृष्टीने सुरूवातीला पश्चायन काळ दीर्घकालीन घेण्यात येतो. व्हारचे मापन करून अवशिष्ट (Residuals) ची प्रचरण –सहचलत्व सारणी (variance covariance matrix)

तयार करण्यात येते. समजा याला $\Sigma_n$ ने दर्शविले. समजा असे तपासून बघायचें असेल की कमी पश्चायन काळ पुरेसा होईल अथवा नाही, याकरीता $\Sigma_k$ चे मापन करण्यात येते हा काळ दीर्घकालीन पश्चायनापेक्षा कमी असेल म्हणजे $K<n$. शक्यता प्रमाण चांचणीचा उपयोग करून K चे पश्चायन योग्य की n चे याचे निर्धारण करता येऊ शकेल. शक्यता प्रमाण सांख्यिकी खालील समीकरणाने दर्शविता येईल.

$$(T-C)(\log|\Sigma_k| - \log \Sigma_n|)$$

T = वापरण्यायोग्य निरीक्षणांची संख्या

C = निर्बंध नसलेल्या समीकरणातील प्राचलांचे मापन करण्याची संख्या.

$E_k$ = मर्यादित व्हार पद्धतीची प्रचरण-सहचलत्व सारणी.

$E_n$ = अमर्यादित व्हार पद्धतीची प्रचरण-सहचलत्व सारणी.

या सांख्यिकीला $X^2$ चे वितरण असुन स्वातंत्र्याचे प्रमाण (Degrees of freedom) हे व्यवस्थेतील बंधनाच्या संख्येबरोबर राहील. सांख्यिकीचे मापन करण्यात आलेले मूल्य पूर्व निश्चित सूचकतेच्या (prespecified singnificance level) $X^2$ पेक्षा कमी असल्यास K पश्चायनला स्वीकृत करता येईल.

**प्रेरणा प्रतिसाद फल (Impuise Response Function)**

मापन करण्यात आलेल्या व्हार प्रतिमानातील एखाद्या विशिष्ट गुणांकाचे स्पष्टीकरण करणे नेहमीच अवघड होत असल्याने प्रेरणा प्रतिसाद फल या तंत्राचा उपयोग करण्यात येतो. इतर चलांना धक्का दिल्यास व्हार व्यवस्थेतील अवलंबित्व चले कसा प्रतिसाद देतात यांचा मागोवा घेण्यात येतो. व्हार व्यवस्थेतील प्रमाद पदाच्या (Error term) माध्यमाने चलांना धक्का देण्यात येतो. व्हार व्यवस्थेतील प्रमाद पदाला प्रेरणा किंवा नव प्रर्वतन किंवा धक्का म्हणण्याचा प्रघात आहे. भावी काळात विविध काळासाठी अशा धक्क्यांचा काय परिणाम होतो याचा मागोवा घेण्यास प्रेरणा प्रतिसाद फलाचा उपयोग होतो. यामुळे व्हार मधील समाविष्ट चलांना देण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या धक्क्यांचा कालपथ (time path) प्राप्त होतो.

पश्चायनाच्या पार्श्वभूमीवर प्रेरणा प्रतिसाद फलाचा आलेख काढणे म्हणजे विविध धक्क्यांमुळे व्हार पद्धतीतील चलांवर कसा परिणाम होतो याचे चित्र उभे करणे होय. धोरणात्मक बदल म्हणजे धक्के आणि त्याचे होणारे संभाव्य परिणाम प्रेरणा प्रतिसाद फलाच्या सहाय्याने दर्शविता येतात. राजकोष पत्र दरात (treasury bill rate) 1 टक्क्याने बदल झाल्यास वास्तविक उत्पादनावर होणारा परिणाम प्रेरणा प्रतिसाद फलाने दर्शविता येईल. प्रतिमानाची बांधणी करून हा परिणाम तपासल्यास इतर घटक देखील विचारात घ्यावे लागतात. जसे पैशाचा पुरवठा, विनिमय दर, मुद्रास्फिती दर वगैरे. प्रेरणा प्रतिसाद फल विश्लेषणाच्या माध्यमाने एका घटकाच्या दुसऱ्या घटकांवर होणाऱ्या परिणामाचा मागोवा घेता येतो.

मंदीच्या विश्लेषणासाठी प्रस्तुत अभ्यासात अमेरिका आणि युरोपियन संघातील देशांत झालेल्या अस्थिरतेमुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर

झालेला संसर्ग परिणाम तपासण्यासाठी सदिश स्वयं प्रतीपगमन (VAR) चौकटीचा उपयोग करण्यात आला. व्हारच्या प्रक्रियेसाठी पाच चलांची निवड करण्यात आली. यात खालील चलांचा समावेश आहे.

1) अमेरिकेचा औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक (IIP) - A1

2) युरोपियन संघाचा औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक (IIP of EU)- A2

3) भारताचा घाऊक किंमत निर्देशांक (WPI of India)- A13

4) भारताचा औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक (IIP of India) - A11

5) भारताचा पैशाचा पुरवठा (M3)-A21

व्हार मधील प्रेरणा प्रतिसाद फलांचे चल अमेरिकेचा औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक, युरोपियन संघाचा औ.उ.नि. आणि भारतीय औ.उ.नि. एकमेकांशी निगडीत/संबंधित आहेत असे दर्शवितात. अमेरिकेच्या औ.उ.नि. आणि पैशाच्या पुरवठ्यावर तरंग उमटावयास लागतात. तसेच भारतीय औ.उ. निर्देशांकाला धक्का लागल्यास अमेरिकेचा औ. उ.नि. आणि युरोपियन औ.उ. निर्देशांकावर त्याचा परिणाम होतो.

बाह्य घटकांसंबंधीची गट चाचणी (Block Exogenity Test)

प्रस्तुत अभ्यासात मापन करण्यात आलेल्या पाच चल असलेल्या व्हार व्यवस्थेत बाह्य घटकांसंबंधीची गट चांचणी करण्यात आली. अमेरिकेच्या औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक आणि युरोपियन संघाचा औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक, भारताचा घाऊक किंमतीचा निर्देशांक आणि पैशाचा पुरवठा यावर काही परिणाम होतो का हे तपासण्यासाठी मुख्यत्वे करून बाह्य घटकासंबंधीची गट चाचणी लावण्यात आली.

## संदर्भ :


1. Akerlof G.A. & Shiller R. J. (2009) 'Animal Spirits' Princeton University Press.
2. Debate - When should fiscal stimulus be with drawn? Economic Times 31st December 2009.
3. Dutta Bhaskar (2009), 'Bottoming out of the re cession'? The Economic Times Friday 21 August.
4. Frequeson Nail (2009),' Harvard Business Review July-August.
5. Jha Prem Shankar (2009) ' The end of the rescession'? Economic Times Thursday 9 th July.
6. Kaushal Neeraj (2009)' The end of the rescession'? Economics Times 12 th August.
7. Krugman Paul*2008),'The Return of Depression Economics and The Crisis of 2008' Penguin Books.
8. Lin Justin (2009)' Globalization after the recession' The Times of India, December 28, 2009
9. Nai Azadi- Monthly Journal of Azadi Bachao Andolan Vol. 18 Numbers 1-3 Jan., Feb., Mar. 09
10. Patnaik Prabhat (2009), ' The Economic crisis & contemporary capitalism' EPW March 28.
11. Rakshit Mihir (2009)'India amidst the Global crisis' Economic and Political weekly March 28, 3 April.
12. Ram Mohan TT (2009)'Crisis won't upset U S Domi nance'.
13. Reddy Y. V. (2009), India & the Glogal Financial Crisis'. Orient Blackswan.
14. Reddy, Y. V. (2009), 'Global Financial Crisis' : The way ahed. The Economic Times, Wednesday 2 December.
15. Sachs Jeffrey D. (2009), 'Global Macroeconomic co-operation Economic Times-Guest column 25 th March.
16. Sharma Ruchir (2009), ' Will L-U-V' Stand test of Time ? The Economic Times, Monday 14 th Decem ber.
17. Suresh Prabhu on Indian Economy - Interview (Jan; 2009), Commodity Vision. Aquarterly journal vol. 2 Issue 3.

# ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींचा शेतीविषयक अभ्यास

**जयवंत शंकरराव इंगळे**
मो. 9767520482

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनातील चर्चासत्रासाठी सादर केल्या जाणाऱ्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधासाठी कै.ग.प्र.पिंपरकर आणि कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे नोबेल पारितोषिक विजेते डॉ.अमर्त्य सेन पारितोषिक दिले जाते. बारामती(जि.पुणे) येथे दि. 13 ते 15 जानेवारी 2010 या कालावधीत संपन्न झालेल्या परिषदेच्या 33 व्या राष्ट्रीय पातळीवरील अधिवेशनातील पारितोषिक प्राप्त शोधनिबंध.

**'ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींचा शेतीविषयक अभ्यास'** असे या शोधनिबंधाचे शीर्षक असून प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी पाच भागात केली आहे. पहिल्या भागात प्रास्ताविक, अभ्यास विषयाची उद्दिष्टे, अभ्यास विषयाची व्याप्ती, संशोधन पद्धती इ. बाबींचा समावेश आहे. दुसऱ्या भागात स्वतःच्या मालकीची शेती कसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण, खंडाने शेती करणाऱ्या व वनखात्याची जमीन कसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण, प्रतीकुटुंब सरासरी मालकीचे क्षेत्र इत्यादी बाबतची माहिती दिली आहे. तिसऱ्या विभागात शेतीतील एकूण उत्पादन व उत्पन्न, प्रतीकुटुंब शेतीचा वार्षिक सरासरी खर्च आणि शेतीची उत्पादकता या बाबींची माहिती दिली आहे. चौथ्या भागात आदिवासी शेतकऱ्यांनी शेतीसाठी घेतलेल्या कर्जाची माहिती दिली आहे. शोधनिबंधाच्या पाचव्या भागात आदिवासींच्या शेत जमिनीची वैशिष्ट्ये, आदिवासी शेतकऱ्यांच्या समस्या, शोधनिबंधाचे प्रमुख निष्कर्ष आणि समस्या निराकरणासाठी प्रस्तुत अभ्यासकाने सुचविलेले उपाय इत्यादी बाबतची माहिती दिली आहे.

## 1.0 विभाग पहिला

प्रस्तुत अभ्यास विषयाचे प्रास्ताविक, अभ्यास विषयाची उद्दिष्टे, अभ्यास विषयाची व्याप्ती, संशोधनाची पद्धती इ. घटकांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

### 1.1 प्रास्ताविक

टेकड्या, डोंगर आणि जंगलात वास्तव्य करणारा तसेच राष्ट्राच्या समाजातील मुख्य प्रवाहापासून दूर असणारा लोकसमूह म्हणजे आदिवासी समाज होय, अशी आदिवासींची व्याख्या प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ दुबे (1) यांनी केली आहे. आणखी एक प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ टी.बी.नाईक (2) यांनी आदिवासी समुदायाची काही ठळक वैशिष्ट्ये सांगितली आहेत. उदाहरणार्थ (1) आदिवासी समुदाय आर्थिक दृष्ट्या मागासलेला असतो. (2) देशाच्या इतर भागापासून भौगोलिकदृष्ट्या आदिवासी भाग अलग असतो. (3) आदिवासींची बोली भाषा समान असते. (4) आदिवासी समाजातील लोक जमात प्रमुखांच्या नियंत्रणाखाली असतात. (5) आदिवासी जमातीचे स्वतःचे असे नियम किंवा कायदे असतात.

भारताच्या राज्यघटनेत आदिवासी लोकांना 'अनुसूचित जमात' (Scheduled Tribe) असे म्हटले आहे. सन 2001 च्या जनगणनेनुसार भारतातील आदिवासींची लोकसंख्या 8.43 कोटी इतकी असून तिचे एकूण 102.70 कोटी लोकसंख्येशी शेकडा प्रमाण 8.20 इतके आहे. सन 2001 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासींची लोकसंख्या 85.77 लक्ष इतकी असून तिचे राज्याच्या एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण 8.85 इतके आहे. महाराष्ट्रात ठाणे, रायगड, पुणे, नाशिक, धुळे, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, यवतमाळ इत्यादी जिल्ह्यात आदिवासींची वस्ती मोठ्या प्रमाणात आहे. ठाणे जिल्ह्यातील तलासरी, जव्हार, मोखाडा इत्यादी तालुक्यात आदिवासींची लोकसंख्या 85 टक्केपेक्षा जास्त आहे. अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींची लोकसंख्या 93.46 टक्के इतकी आहे. तालुक्यात महादेव कोळी, ढोरकोळी, कातकरी, वारली, कोकणा, म ठाकूर आणि क ठाकूर अशा विविध सात जमातींचे वास्तव्य आहे.

### 1.2 अभ्यास विषयाची उद्दिष्टये

प्रस्तुत अभ्यास विषयाची उद्दिष्टये खालीलप्रमाणे आहेत.

1) आदिवासी शेतकऱ्यांना शेतीपासून मिळणाऱ्या उत्पादनाचा आणि उत्पन्नाचा अभ्यास करणे.

2) कृषी मालाचा उत्पादन खर्च अभ्यासणे.

3) आदिवासींच्या शेतीची उत्पादकता अभ्यासणे.

4) आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतीविषयक समस्यांचा विशेषतः कर्जविषयक समस्यांचा अभ्यास करणे.

5) आदिवासी शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांवर उपाय सुचविणे.

### 1.3 अभ्यास विषयाची व्याप्ती

आपल्या देशातील आदिवासींची वस्ती प्रामुख्याने सर्वसाधारण लोक राहतात त्यापासून दूर म्हणजे डोंगराळ आणि जंगल भागात आहे.

आदिवासी भागातील कित्येक पाडे असे आहेत की जेथे जाण्यासाठी गाडी रस्ता नाही. पायवाटेनेच जावे लागते. पायवाटही डोंगरावरुन, जंगलातून गेली असल्याने मोठी चढण चढून पुष्कळ श्रम आणि वेळ खर्च केल्यानंतर आदिवासीपर्यंत पोहचता येते. अशा ठिकाणी चार ते सहा घरे असलेला आदिवासींचा एक पाडा असतो. एका ग्रामपंचायतीचे दहा ते बारा पाडे असतात. असे पाडे डोंगरात, जंगलात सर्वत्र विखुरलेले असतात. एक पाडा दुसऱ्या पाड्यापासून एक-दोन किलोमीटर अंतरावर असतो. या कारणामुळे ठाणे जिल्ह्यातील केवळ मोखाडा तालुक्याचीच निवड अभ्यासासाठी केली. वेळेच्या मर्यादेबरोबर आणखी एका मर्यादेमुळे प्रस्तुत अभ्यास विषय मोखाडा तालुक्यापुरता सिमित ठेवावा लागला. ती मर्यादा म्हणजे आदिवासींचा अशिक्षितपणा होय. बहुसंख्य आदिवासी निरक्षर,अल्पशिक्षित आणि अज्ञानी आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून पुरेशी आणि खरी माहिती मिळवणे खूपच कठीण असते. अभ्यासकाला आदिवासी ओळखत असतील तरच आदिवासींकडून खरी माहिती प्राप्त होते.

प्रस्तुत अभ्यासकाने नोकरीच्या निमित्ताने आदिवासी बहुल मोखाडा तालुक्यात काही वर्षे वास्तव्य केले असल्याने आदिवासी समाजातील विद्यार्थी, लोकप्रतिनिधी, आदिवासी शिक्षक व कर्मचारी, सामान्य आदिवासी लोक या सर्व घटकांशी घनिष्ट संबंध प्रस्थापित झाले होते. त्यामुळे अभ्यासासाठी अन्य तालुक्यातील आदिवासींची निवड न करता मोखाडा तालुक्यातील आदिवासींचीच निवड केली. अशा प्रकारे मोखाडा तालुका ही या अभ्यास विषयाची व्याप्ती आहे.

### 1.4 संशोधन पद्धती :

मोखाडा तालुका जंगल,डोंगर आणि दऱ्यांनी वेढलेला तालुका आहे. या तालुक्यातील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण 93.00 टक्केपेक्षा जास्त असून हा तालुका महाराष्ट्रातील आदिवासी भागातील अति दुर्गम तालुका म्हणून ओळखला जातो. या तालुक्यात प्रस्तुत अभ्यासकाने काही वर्षे नोकरी केली असल्याने आदिवासींच्या अभ्यासासाठी मोखाडा तालुक्याची निवड केली. प्रस्तुतचा शोध निबंध सर्व्हेक्षणावर म्हणजेच प्राथमिक माहितीवर आधारित आहे. सन 2004 मध्ये पीएच.डी. साठी प्रबंध तयार करण्यासाठी प्रस्तुत अभ्यासकाने ठाणे जिल्ह्यातील विविध सात जमातीतील प्रत्येक जमातीतील 60 याप्रमाणे 420 कुटुंबांचे सर्व्हेक्षण केले होते. त्या सर्व्हेक्षणावर आधारित हा शोधनिबंध आहे. सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांपैकी स्वतःच्या मालकीची शेती असणारी, दुसऱ्याची जमीन खंडाने कसणारी आणि वनखात्याची जमीन (अतिक्रमण करुन) कसणारी मिळून 321 आदिवासी शेतकरी कुटुंबे आढळून आली. या सर्व कुटुंबांच्या शेतीतील उत्पादनाचा आणि उत्पादन खर्चाचा अभ्यास या शोध निबंधात केला आहे. खंडाने शेती करणाऱ्या आणि वनखात्याच्या जागेत शेती करणाऱ्या आदिवासींना भेडसावणाऱ्या समस्यांचा थोडक्यात ऊहापोह या निबंधात केला आहे. या शोध निबंधात स्वतःच्या मालकीची शेती असणाऱ्या 219 शेतकरी कुटुंबांनी शेतीसाठी घेतलेल्या कर्जाची माहिती व त्याचे स्पष्टीकरण दिले आहे. आदिवासींमध्ये वास्तव्य,

सहभागी निरीक्षण, चर्चा पद्धती आणि मुलाखती इत्यादी संशोधन पद्धती या शोधनिबंधासाठी वापरल्या आहेत.

## 2.0 विभाग दुसरा

या भागात स्वतःच्या मालकीची शेती असणाऱ्या,दुसऱ्याची जमीन खंडाने कसणाऱ्या आणि वनखात्याची जमीन कसणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण दर्शविले आहे. तसेच जमीन धारण क्षेत्रानुसार आदिवासी शेतकऱ्यांचे प्रकार आणि त्यांच्याकडे असलेल्या जमिनीच्या क्षेत्राची माहिती दिली आहे

### 2.1 जमातीनुसार आदिवासी शेतकरी कुटुंबांचे प्रमाण

खालील तक्त्यात स्वतःच्या मालकीची शेती असणारी आदिवासी कुटुंबे, वनखात्याची जमीन कसणारी कुटुंबे आणि खंडाने जमीन कसणारी कुटुंबे या सर्व कुटुंबांना शेतकरी कुटुंबे मानून त्याबद्दलची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक 2.1**

**जमातीनुसार आदिवासी शेतकरी कुटुंबाचे प्रमाण**

| अ.क्र. 1 | जमातीचे नाव 2 | शेतकरी कुटुंबे 3 | सर्वेक्षित कुटुंबे 4 | शेकडा प्रमाण 5 |
|---|---|---|---|---|
| 1 | म. कोळी | 56 (17.44) | 60 | 93.33 |
| 2 | ढोरकोळी | 13 (4.04) | 60 | 21.66 |
| 3 | कातकरी | 32 (9.96) | 60 | 53.33 |
| 4 | वारली | 46 (14.33) | 60 | 76.66 |
| 5 | कोकणा | 60 (18.69) | 60 | 100.00 |
| 6 | म . ठाकूर | 57 (17.75) | 60 | 95.00 |
| 7 | क. ठाकूर | 57 (17.75) | 60 | 95.00 |
| | **एकूण** | **321 (100)** | **420** | **76.42** |

(1) संदर्भ : प्राथमिक सर्व्हेक्षण

(2) स्तंभ क्रमांक ३ मधील कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील आदिवासी शेतकरी कुटुंबांचे सर्व सात जमातीतील एकूण ३२१ शेतकरी कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

(3) स्तंभ क्रमांक 5 मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील आदिवासी शेतकरी कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण प्रत्येकी 60 कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, विविध सात आदिवासी जमातीतील आदिवासी शेतकरी कुटुंबांची संख्या 321 इतकी असून सर्व्हेक्षण केलेल्या एकूण 420 कुटुंबांशी शेकडा प्रमाण 76.42 इतके आहे.

विविध सात जमातींचा तुलनात्मक दृष्ट्या विचार करता असे दिसते की, आदिवासी शेतकरी कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कोकणा या जमातीत असून ते 18.69 टक्के आहे. त्या खालोखाल हे प्रमाण म. ठाकूर (17.75 टक्के), क ठाकूर (17.75 टक्के) आणि महादेव कोळी (17.44 टक्के) या जमातीत आहे. शेतकऱ्यांचे म्हणजेच शेतकरी कुटुंबांचे सर्वात कमी प्रमाण ढोरकोळी या जमातीत असून ते 4.04 टक्के आहे. कातकरी या जमातीत हे प्रमाण 9.96 टक्के आहे.

## 2.2 शेतजमिनीचे स्वरुप

तक्त्यात स्वतःच्या मालकीची जमीन कसणारी कुटुंबे, दुसऱ्याची जमीन खंडाने कसणारी कुटुंबे आणि वनखात्याच्या (फॉरेस्टच्या) जागेत अतिक्रमण करुन शेती करणारी कुटुंबे यांची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक 2.2**

**शेतजमिनीचे स्वरूप**

| अ. क्र. | शेतजमिनीचे स्वरुप | जमातीनुसार कुटुंबाची संख्या | | | | | | | एकूण कुटुंबे | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | म.कोळी | ढोरकोळी | कातकरी | वारली | कोकणा | म.ठाकूर | क. ठाकूर | | |
| 1 | स्वतःची शेती | 35 | 06 | 12 | 15 | 30 | 50 | 17 | 165 | 51.40 |
| 2 | वनखात्याची शेती | 0 | 0 | 14 | 08 | 04 | 02 | 24 | 52 | 16.20 |
| 3 | खंडाची शेती | 10 | 07 | 06 | 04 | 02 | 04 | 02 | 35 | 10.91 |
| 4 | स्वतःची शेती व खंडाची शेती | 08 | 0 | 0 | 04 | 08 | 01 | 02 | 23 | 7.16 |
| 5 | खंडाची शेती व वनखात्याची शेती | 02 | 0 | 0 | 05 | 03 | 0 | 05 | 15 | 4.68 |
| 6 | स्वतःची शेती व वनखात्याची शेती | 01 | 0 | 0 | 10 | 08 | 0 | 06 | 25 | 7.78 |
| 7 | स्वतःची, खंडाची, वनखात्याची शेती | 0 | 0 | 0 | 0 | 05 | 0 | 01 | 06 | 1.87 |
| | **एकूण** | **56** | **13** | **32** | **46** | **60** | **57** | **57** | **321** | **100** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, केवळ स्वतःची शेती कसणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे शेकडा प्रमाण 51.40 इतके आहे. ही कुटुंबे वनखात्याची (फॉरेस्टची) जमीन कसत नाहीत. तसेच इतर आदिवासींप्रमाणे ही कुटुंबे दुसऱ्याची जमीन खंडाने किंवा बटईने कसत नाहीत. वरील तक्त्यावरुन असे दिसते की, केवळ वनखात्याची जमीन कसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण 16.20 टक्के आहे आणि केवळ खंडाने किंवा बटईने दुसऱ्याची जमीन कसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण 10.91 टक्के इतके आहे. स्वतःच्या शेतीबरोबर दुसऱ्याची जमीन खंडाने कसणाऱ्या आणि वनखात्याची जमीन कसणाऱ्या कुटुंबांची संख्या 69 इतकी असून त्याचे एकूण 321 शेतकरी कुटुंबांशी शेकडा प्रमाण 21.49 इतके आहे.

### 2.3 भूमिधारी आणि भूमिहीन आदिवासी कुटुंबांपैकी वनखात्याची आणि खंडाने जमीन कसणारी कुटुंबे

तक्त्यात भूमिधारी आणि भूमिहीन आदिवासी कुटुंबांपैकी वनखात्याची आणि खंडाने जमीन कसणाऱ्या कुटुंबांची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक 2.3**

**भूमिधारी आणि भूमिहीन आदिवासी कुटुंबांपैकी वनखात्याची आणि खंडाने जमीन कसणारी कुटुंबे**

| अ.क्र. | घटक | एकूण कुटुंबे | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| अ | **भूमिधारी कुटुंबे** | | |
| 1 | केवळ स्वतःच्या मालकीची जमीन कसणारी कुटुंबे | 165 | 75.35 |
| 2 | स्वतःच्या मालकीची जमीन कसणारी व दुसऱ्याची जमीन | 23 | 10.50 |
| | खंडाने कसणारी | | |
| 3 | स्वतःच्या मालकीची व वनखात्याची जमीन कसणारी कुटुंबे | 25 | 11.41 |
| 4 | स्वतःची, खंडाची व वनखात्याची जमीन कसणारी कुटुंबे | 06 | 2.74 |
| | **एकूण भूमिधारी कुटुंबे (1 + 2 + 3 + 4)** | 219 | 100 |
| ब | **भूमिहीन कुटुंबे** | | |
| 1 | दुसऱ्याची जमीन खंडाने कसणारी कुटुंबे | 35 | 71.41 |
| 2 | निव्वळ वनखात्याची जमीन कसणारी कुटुंबे | 52 | 25.87 |
| 3 | दुसऱ्याच्या जमीन खंडाने कसणारी व वनखात्याची कसणारी कुटुंबे | 15 | 7.46 |
| 4 | निव्वळ भूमिहीन (कोणत्याही प्रकारची जमीन न कसणारी कुटुंबे) | 99 | 49.26 |
| | **एकूण भूमिधारी कुटुंबे (1 + 2 + 3 + 4)** | 201 | 100 |
| | **एकूण भूमिधारी व भूमिहीन कुटुंबे (अ + ब)** | 420 | |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, स्वतःच्या मालकीची जमीन असणाऱ्या 219 कुटुंबांपैकी 54 कुटुंबे (24.65 टक्के) दुसऱ्याची जमीन खंडाने कसतात. तसेच वनखात्याच्या जागेतही शेती करतात. स्वतःची शेती कमी असल्यामुळे म्हणजेच शेतीतील उत्पन्न तुटपुंजे असल्याने स्वतःची जमीन असणाऱ्या कुटुंबांना दुसऱ्याची जमीन खंडाने करावी लागते. तसेच वनखात्याची (फॉरेस्टची) जमीन (अतिक्रमण करुन) कसावी लागते.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, स्वतःच्या मालकीची जमीन नसणाऱ्या 201 कुटुंबांपैकी 102 कुटुंबे (50.74 टक्के) दुसऱ्याची जमीन खंडाने कसतात. तसेच वनखात्याच्या जागेतही अतिक्रमण करुन शेती कसतात.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, भूमिधारी आदिवासी कुटुंबांपेक्षा भूमिहीन आदिवासी कुटुंबांमध्ये खंडाने जमीन कसणाऱ्या व वनखात्याच्या जागेत शेती करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण जास्त आहे. एकूण 219 भूमिधारी कुटुंबांपैकी 54 (24.65 टक्के) दुसऱ्याची जमीन खंडाने कसतात तसेच वनखात्याची जमीनही कसतात. एकूण 201 भूमिहीन कुटुंबांपैकी 102 कुटुंबे (50.74 टक्के) दुसऱ्याची जमीन खंडाने कसतात. तसेच वनखात्याची जमीनही कसतात. स्वतःच्या मालकीची अजिबात शेतजमीन नसल्याने बहुसंख्य भूमिहीन कुटुंबांना उपजीविकेसाठी दुसऱ्याची जमीन खंडाने कसावी लागते. तसेच नाईलाजाने अतिक्रमण करुन वनखात्याची जमीनही कसावी लागते.

### 2.4 स्वतःच्या मालकीची शेती असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण

खालील तक्त्यात किती आदिवासी कुटुंबांकडे स्वतःच्या मालकीची शेती आहे याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक 2.4**

**स्वतःच्या मालकीची शेती असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण**

| अ.क्र. | जमातीचे नाव | स्वतःची शेती असणारी कुटुंबे | सर्वेक्षित कुटुंबे | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | म. कोळी | 44 (20.09) | 60 | 73.33 |
| 2 | ढोरकोळी | 06 (2.73) | 60 | 10.00 |
| 3 | कातकरी | 12 (5.47) | 60 | 20.00 |
| 4 | वारली | 29 (13.24) | 60 | 48.33 |
| 5 | कोकणा | 51 (23.28) | 60 | 85.00 |
| 6 | म . ठाकूर | 51 (23.28) | 60 | 85.00 |
| 7 | क. ठाकूर | 26 (11.87) | 60 | 43.33 |
| | एकूण | **219 (100)** | **420** | **52.14** |

1. संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण

2. स्तंभ क्रमांक 3 मधील कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील स्वतःची शेतजमीन असणाऱ्या कुटुंबांचे सर्व्हेक्षित सर्व सात जमातीतील स्वतःची जमीन असणाऱ्या एकूण 219 आदिवासी कुटुंबांशी असणारे शेकडा प्रमाण दर्शविते.

3. स्तंभ क्रमांक 5 मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील स्वतःची जमीन असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण प्रत्येकी 60 कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, स्वतःच्या मालकीची शेतजमीन असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण 52.14 टक्के एवढे आहे. तर स्वतःच्या मालकीची शेती नसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण 47.86 टक्के एवढे आहे.

विविध सात जमातींचा तुलनात्मक दृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरुन असे दिसते की, स्वतःच्या मालकीची शेतजमीन असणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कोकणा आणि म ठाकूर या जमातीत असून ते प्रत्येकी 23.28 टक्के आहे. तर सर्वात कमी प्रमाण ढोरकोळी या जमातीत असून ते 2.73 टक्के आहे.

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता असे दिसते की, कोकणा आणि म ठाकूर या जमातीत स्वतःच्या मालकीची जमीन असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण प्रत्येकी 85.00 टक्के एवढे आहे. या जमातीतील केवळ प्रत्येकी 15.00 टक्के कुटुंबांकडे स्वतःच्या मालकीची शेतजमीन नाही. ढोरकोळी जमातीतील 10.00 टक्के कुटुंबांकडे स्वतःच्या मालकीची शेतजमीन आहे. तर 90.00 टक्के कुटुंबांकडे स्वतःच्या मालकीची शेतजमीन नाही. अशा प्रकारे स्वतःच्या मालकीची जमीन नसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ढोरकोळी जमातीत मोठे असल्याचे दिसून येते.

## 2.5 सीमांत, लहान, मध्यम आणि मोठ्या शेतकरी कुटुंबांचे प्रमाण

तक्त्यात स्वतःच्या मालकीची शेतजमीन असणाऱ्या 219 आदिवासी शेतकरी कुटुंबांचे सीमांत, लहान, मध्यम आणि मोठे शेतकरी अशा चार गटात वर्गीकरण केले आहे. 1 ते 3 एकर पर्यंत शेतजमीन असणारे सीमांत शेतकरी, 4 ते 5 एकर शेतजमीन असणारे लहान शेतकरी, 6 ते 10 एकर शेती असणारे मध्यम शेतकरी आणि 11 एकर व त्यापेक्षा जास्त शेतजमीन असणारे मोठे शेतकरी असे शेतकऱ्यांचे चार प्रकार केले आहेत. या सर्व आदिवासी शेतकऱ्यांकडे कोरडवाहू जमीन असून एकाही शेतकऱ्याकडे बागाईत जमीन नाही.

## तक्ता क्रमांक 2.5

## सीमांत, लहान, मध्यम आणि मोठ्या आदिवासी कुटुंबाचे प्रमाण

| अ.क्र. | जमातीचे नाव | सीमांत शेतकरी कुटुंबे | लहान शेतकरी कुटुंबे | मध्यम शेतकरी कुटुंबे | मोठे शेतकरी कुटुंबे | एकूण शेतकरी कुटुंबे |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | म. कोळी | 20 (45.15)<br>(16.39) | 16 (36.36)<br>(32.65) | 04 (9.09)<br>(16.00) | 04 (9.09)<br>(17.39) | 44 (100)<br>(20.09) |
| 2 | ढोरकोळी | 01 (16.66)<br>(081) | 01 (16.66)<br>(2.04) | 03 (50.00)<br>(12.00) | 01 )16.66)<br>(4.34) | 06 (100)<br>(2.73) |
| 3 | कातकरी | 08 (62.06)<br>(6.56) | 02 (16.66)<br>(4.08) | 02 (16.66)<br>(8.00) | 0<br>- | 12 (100)<br>(5.47) |
| 4 | वारली | 18 (62.06)<br>(14.76) | 07(24.13)<br>(14.28) | 03 (10.34)<br>(12.00) | 01 (3.44)<br>(4.34) | 29 (100)<br>(13.24) |
| 5 | कोकणा | 28 (54.90)<br>(22.96) | 06 (11.76)<br>(12.24) | 09 (17.64)<br>(36.00) | 08 (15.68)<br>(34.78) | 51 (100)<br>(23.28) |
| 6 | म . ठाकूर | 31 (60.78)<br>(25.40) | 13 (25.49)<br>(26.53) | 04 (7.84)<br>(16.00) | 03 (5.88)<br>(13.04) | 51 (100)<br>(23.28) |
| 7 | क. ठाकूर | 16 (61.53)<br>(13.11) | 04 (15.38)<br>(8.16) | 0<br>- | 06 (23.07)<br>(26.08) | 26 (100)<br>(11.87) |
| | **एकूण** | **122 (55.72)<br>(100)** | **49(22.37)<br>(100)** | **25 (11.41)<br>(100)** | **23 (10.50)<br>(100)** | **219 (100)<br>(100)** |

1. संदर्भ : प्राथमिक सर्व्हेक्षण

2. वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील एका विशिष्ट प्रकारच्या आदिवासी शेतकरी कुटुंबांचे त्याच विशिष्ट जमातीतील सर्व प्रकारच्या एकूण शेतकरी कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

3. खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील एका विशिष्ट प्रकारच्या आदिवासी शेतकरी कुटुंबांचे सर्व सात जमातीतील त्याच विशिष्ट प्रकारच्या एकूण शेतकरी कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, एकूण 219 भूमिधारी आदिवासी कुटुंबांमध्ये सीमांत शेतकरी कुटुंबांचे प्रमाण निम्म्यापेक्षा जास्त असून ते 55.72 टक्के एवढे आहे. त्या खालोखाल हे प्रमाण लहान शेतकरी कुटुंबांचे असून ते 22.37 टक्के एवढे आहे. मध्यम शेतकरी कुटुंबांचे प्रमाण

11.41 टक्के एवढे असून मोठ्या शेतकरी कुटुंबांचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे अवघे 10.50 टक्के एवढे आहे.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सीमांत आणि लहान आदिवासी शेतकरी कुटुंबांचे प्रमाण मिळून 78.09 टक्के एवढे मोठे आहे. या आकडेवारीवरुन आदिवासी कायम गरीब का असतात त्याचे कारण लक्षात येते.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सीमांत शेतकरी कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण म ठाकूर या जमातीत असून ते 25.40 टक्के एवढे आहे. त्या खालोखाल हे प्रमाण कोकणा या जमातीत असून ते 22.96 टक्के इतके आहे. ढोरकोळी जमातीत हे प्रमाण 0.81 टक्के आहे.

लहान शेतकरी कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण महादेव कोळी या जमातीत असून ते 32.65 टक्के एवढे आहे. त्या खालोखाल हे प्रमाण म ठाकूर या जमातीत असून ते 26.56 टक्के इतके आहे. ढोरकोळी जमातीत हे प्रमाण 2.04 टक्के एवढे आहे.

मध्यम शेतकरी कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कोकणा या जमातीत असून ते 36.00 टक्के एवढे आहे. क ठाकूर या जमातीत हे प्रमाण शून्य आहे.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, मोठ्या शेतकरी कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कोकणा या जमातीत असून ते 34.78 टक्के एवढे आहे. त्या खालोखाल हे प्रमाण क ठाकूर या जमातीत असून ते 26.08 टक्के एवढे आहे. कातकरी जमातीत मोठ्या शेतकरी कुटुंबांचे प्रमाण शून्य आहे.

**2.6 प्रति कुटुंब सरासरी मालकीचे जमीन क्षेत्र**

खालील तक्त्यात 219 आदिवासी शेतकरी कुटुंबांकडे असणाऱ्या स्वत:च्या मालकीच्या शेतजमिनीच्या सरासरी जमीन क्षेत्राची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक 2.6**

**प्रतिकुटुंब सरासरी मालकीचे जमीन क्षेत्र**

| अ.क्र. | जमातीचे नाव | स्वत:ची शेती असणारी कुटुंबे | एकूण शेतजमीन (एकर) | प्रतिकुटुंब सरासरी मालकीचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| 1 | म. कोळी | 44 | 313 | 7.11 |
| 2 | ढोरकोळी | 06 | 56 | 9.33 |
| 3 | कातकरी | 12 | 46 | 3.83 |
| 4 | वारली | 29 | 91 | 3.13 |
| 5 | कोकणा | 51 | 273 | 5.36 |
| 6 | म . ठाकूर | 51 | 253 | 4.96 |
| 7 | क. ठाकूर | 26 | 177 | 6.80 |
| | **एकूण** | **219** | **1209** | **5.52** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, स्वतःच्या मालकीची शेतजमीन असणाऱ्या 219 कुटुंबांकडे 1209 एकर एवढी कोरडवाहू किंवा जिराईत शेतजमीन आहे. या जमिनीत वर्षातून फक्त एकदाच पीक घेता येते. प्रति कुटुंब सरासरी मालकीचे क्षेत्र 5.52 एकर एवढे आहे.

विविध सात जमातींचा तुलनात्मक दृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरुन असे दिसते की, प्रति कुटुंब सरासरी मालकीचे क्षेत्र सर्वात जास्त ढोरकोळी या जमातीचे असून ते 9.33 एकर एवढे आहे. तर सर्वात कमी क्षेत्र वारली जमातीचे असून ते 3.13 एकर एवढे आहे.

वरील तक्त्यात प्रति कुटुंब सरासरी मालकीचे क्षेत्र 5.52 एकर एवढे दिसत असले तरी बहुसंख्य आदिवासींकडील एकरी 25 ते 35 टक्के जमीन लागवडीलायक नसल्याने सरासरी मालकीचे क्षेत्र चार एकरापेक्षा कमी भरते. तसेच बहुसंख्य आदिवासींकडील एकूण जमीन एकाच ठिकाणी नसते. तर ती तीन-चार तुकड्यात सर्वत्र विखुरलेली असते. जमिनीचे काही तुकडे भाताची लागवड करण्यालायक असतात. तर काही तुकडे डोंगर उतारावर असल्याने तेथे केवळ नाचणी सारखीच पीके घेता येतात.

## 3.0 विभाग तिसरा

या विभागात शेतीतील एकूण उत्पादन आणि उत्पन्न, प्रतिकुटुंब शेतीचा वार्षिक सरासरी खर्च आणि शेतीची उत्पादकता इत्यादी बाबींवर प्रकाश टाकण्यात आला आहे. या बाबींची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

### 3.1 शेतीतील उत्पादन व उत्पन्न :-

सन 2003 या वर्षातील अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील 321 आदिवासी शेतकरी कुटुंबांना शेतीपासून मिळालेल्या एकूण उत्पादनाची व उत्पन्नाची माहिती दिली आहे. स्वतःच्या मालकीच्या शेतीपासून मिळालेले उत्पादन, वनखात्याच्या जमिनीपासून मिळालेले उत्पादन, दुसऱ्याची जमीन खंडाने कसावयास घेतलेल्या शेतीपासून मिळालेले उत्पादन व उत्पन्न दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक 3.1**

**शेतीपासून मिळालेले उत्पादन व उत्पन्न**

| अ.क्र. | शेतीचा प्रकार | एकूण उत्पादन (क्विं.) | एकूण उत्पन्न (रुपये) | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | स्वतःची शेती | 2569.00 | 1836835.00 | 83.50 |
| 2 | खंडाची शेती | 251.50 | 179822.50 | 8.17 |
| 3 | वनखात्याची शेती | 256.50 | 183397.50 | 8.33 |
| | **एकूण** | **3077.00** | **2200055** | **100** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित 321 आदिवासी शेतकऱ्यांना सन 2003 या वर्षात 3077 क्विंटल एवढे भात, नागली, वरई इत्यादी उत्पादन प्राप्त झाले. बाजारभावानुसार या उत्पादनाचे पैशातील मूल्य 2200055 रुपये एवढे होते. वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सर्व्हेक्षित आदिवासी शेतकऱ्यांना शेतीपासून मिळालेल्या एकूण उत्पादनात आणि उत्पन्नात स्वतःच्या शेतीपासून मिळालेल्या उत्पादनाचा व उत्पन्नाचा वाटा जास्त असून तो 83.50 टक्के एवढा आहे. खंडाच्या शेतीचा व वनखात्याच्या शेतीचा एकूण उत्पादनात व उत्पन्नातील वाटा अत्यंत कमी असून तो अनुक्रमे 8.17 टक्के आणि 8.33 टक्के एवढा आहे.

### 3.2 शेतीपासून प्राप्त झालेले प्रति कुटुंब वार्षिक सरासरी उत्पन्न आणि खर्च

सन 2003 या वर्षात मोखाडा तालुक्यातील सर्व प्रकारची (स्वतःच्या मालकीची, खंडाची आणि वनखात्याची) शेती करणाऱ्या सर्व्हेक्षित 321 शेतकरी कुटुंबांना शेतीपासून प्राप्त झालेले प्रति कुटुंब वार्षिक सरासरी उत्पन्न, प्रति कुटुंब वार्षिक सरासरी खर्च आणि प्रति कुटुंब निव्वळ वार्षिक सरासरी उत्पन्न दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक 3.2**

**शेतीपासून प्राप्त झालेले प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी उत्पन्न आणि खर्च**

| अ. क्र. | जमातीचे नाव | सर्व प्रकारची शेती करणाऱ्या कुटुंबाची संख्या | शेतीपासून मिळालेले एकूण उत्पन्न (रुपये) | शेतीचा एकूण खर्च (रुपये) | शेतीपासून प्राप्त झालेले प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी उत्पन्न (रुपये) | प्रतिकुटुंब शेतीच्या वार्षिक सरासरी खर्च (रुपये) | शेतीपासून प्राप्त झालेले प्रतिकुटुंब निव्वळ वार्षिक सरासरी उत्पन्न (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | म.कोळी | 56 | 499785 | 324860.25 | 8924.73 | 5801.07 | 3123.66 |
| 2 | ढोरकोळी | 13 | 98670 | 64135.50 | 7590.00 | 4933.50 | 2656.50 |
| 3 | कातकरी | 32 | 86515 | 56234.75 | 2703.59 | 1757.33 | 946.26 |
| 4 | वारली | 46 | 256685 | 166845.25 | 5580.10 | 3627.07 | 1953.03 |
| 5 | कोकणा | 60 | 487630 | 316959.50 | 8127.16 | 5282.65 | 2844.51 |
| 6 | म .ठाकूर | 57 | 370370 | 240740.50 | 6497.71 | 4233.51 | 2274.20 |
| 7 | क.ठाकूर | 57 | 400400 | 260260 | 7024.56 | 4565.96 | 2458.60 |
| | **एकूण** | **321** | **2200055** | **1430035.75** | **6853.75** | **4454.94** | **2398.81** |
| | | | | | प्रमाण विचलन (S.D.) | | **663.03** |
| | | | | | विचलन गुणांक (C. V.) | | **33.95** |

सर्व्हेक्षित सर्व सात जमातींचा एकत्रित विचार करता वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सर्व प्रकारची शेती करणाऱ्या सर्व्हेक्षित 321 आदिवासी शेतकरी कुटुंबांना सन 2003 या वर्षात शेतीपासून प्राप्त झालेल्या एकूण उत्पादनाचे मूल्य 2200055 रुपये आहे. आणि एवढ्या रुपयाचे उत्पादन करण्यासाठी आलेला एकूण खर्च 1430035.75 रुपये आहे. शेतीपासूनचे प्रति कुटुंब वार्षिक सरासरी उत्पन्न 6853.75 रुपये आहे, तर प्रति कुटुंब शेतीचा वार्षिक सरासरी खर्च 4454.94 रुपये आहे. शेतीपासून प्राप्त झालेले प्रति कुटुंब निव्वळ वार्षिक सरासरी उत्पन्न 2398.81 रुपये एवढे आहे.

विविध सात जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरुन असे दिसते की, शेतीपासून प्राप्त झालेले प्रति कुटुंब निव्वळ वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वात जास्त महादेव कोळी या जमातीचे असून ते 3123.66 रुपये आहे. तर शेतीपासून प्राप्त झालेले प्रति कुटुंब निव्वळ वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वात कमी कातकरी या जमातीचे असून ते 946.26 रुपये एवढे आहे.

आदिवासींच्या विविध जमातीमध्ये शेतीपासून प्राप्त झालेले प्रति कुटुंब वार्षिक सरासरी उत्पन्नाचे प्रमाण विचलन 663.03 इतके आहे. म्हणजे वेगवेगळ्या आदिवासी जमातींना शेतीपासून मिळालेल्या उत्पन्नात फार मोठी तफावत दिसून येते. म्हणजे शेतीपासून वेगवेगळ्या जमातींना मिळालेले उत्पन्न कमी-जास्त आहे. त्यामध्ये मोठा फरक असल्याचे विचरण गुणांक 33.95 देखील दर्शवितो.

### 3.3 दर एकरी कृषी मालाचा उत्पादन खर्च आणि उत्पन्न

खालील तक्त्यात अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित 321 आदिवासी शेतकरी कुटुंबांच्या दर एकरी कृषी मालाचा उत्पादन खर्च आणि उत्पन्न इत्यादी बाबतची माहिती दिली आहे.

**सूचना**

अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनासाठी शोध निबंध सादर करणारे अभ्यासक, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सभासद असले पाहिजे. मा. अध्यक्षांकडे शोध निबंध पाठविताना आपला सभासद क्रमांक नमूद करावा. क्रमांक दिला नसल्यास शोधनिबंध स्वीकारला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**अनिल सूर्यवंशी**
कार्यवाह - खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

## तक्ता क्रमांक 3.3

## दर एकरी कृषी मालाचा उत्पादन खर्च आणि उत्पन्न

| अ. क्र. | जमातीचे नाव | शेतकरी कुटुंबाची संख्या | क्षेत्रफळ (एकर) | एकूण कृषी उत्पादन (क्विं.) | एकूण उत्पन्न (रुपये) | एकूण खर्च (रुपये) | दर एकरी सरासरी वार्षिक उत्पन्न (रुपये) | दर एकरी सरासरी वार्षिक खर्च (रुपये) | शेतीपासून मिळालेले दर एकरी निव्वळ वार्षिक उत्पन्न (रुपये) | दर एकरी सरासरी वार्षिक उत्पादन खर्चाचे वार्षिक उत्पन्नाशी गुणोत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | म.कोळी | 56 | 354 | 699 | 499785 | 324860.25 | 1411.82 | 917.68 | 494.14 | 1:1:53 |
| 2 | ढोरकोळी | 13 | 66 | 138 | 98670 | 64135.50 | 1495.00 | 917.75 | 523.25 | 1:1:53 |
| 3 | कातकरी | 32 | 63 | 121 | 86515 | 56234.75 | 1373.75 | 892.61 | 480.64 | 1:1:53 |
| 4 | वारली | 46 | 178 | 359 | 256685 | 166845.25 | 1442.05 | 937.33 | 504.72 | 1:1:53 |
| 5 | कोकणा | 60 | 322 | 682 | 487630 | 316959.50 | 1514.37 | 934.34 | 530.03 | 1:1:53 |
| 6 | म.ठाकूर | 57 | 261 | 518 | 370370 | 240740.50 | 1419.04 | 922.37 | 496.67 | 1:1:53 |
| 7 | क.ठाकूर | 57 | 224 | 560 | 400400 | 260260.00 | 1787.50 | 1161.87 | 625.63 | 1:1:53 |
| | एकूण | 321 | 1468 | 3077 | 2200055 | 1430035.75 | 1498.67 | 974.13 | 524.54 | 1:1:53 |
| | | | | | | | प्रमाण विचलन (S.D.) | | **45.09** | |
| | | | | | | | विचलन गुणांक (C. V.) | | **8.93** | |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सन 2003 या वर्षातील आदिवासी शेतकऱ्यांचे दर एकरी सरासरी वार्षिक उत्पन्न 1498.67 रुपये एवढे आहे. तर कृषी उत्पादनाचा दर एकरी सरासरी वार्षिक खर्च 974.13 रुपये एवढा आहे. उत्पन्नातून खर्च वजा जाता शेतीपासून मिळालेले दर एकरी निव्वळ वार्षिक उत्पन्न 524.54 रुपये एवढे आहे.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, आदिवासी शेतकऱ्यांचे दर एकरी निव्वळ वार्षिक उत्पन्न अल्प असून कृषी उत्पादनाचा सरासरी खर्चही खूप जास्त आहे. तसेच सर्व जमातीमध्ये दर एकरी वार्षिक उत्पादन खर्चाशी दर एकरी वार्षिक उत्पन्नाचे गुणोत्तर 1:1.53 आहे. याचा अर्थ आदिवासींनी शेतीत १ रुपयांची गुंतवणूक केल्यास त्यांना 1.53 रुपये उत्पन्न मिळते. म्हणजे 0.53 इतके निव्वळ उत्पन्न मिळते.

आदिवासींमधील विविध जमातींना मिळालेल्या दर एकरी निव्वळ उत्पन्नाचे प्रमाण विचलन 45.09 आहे. तर विचलण गुणांक 8.93 येतो. त्यामुळे वेगवेगळ्या जमातींना मिळालेल्या दर एकरी निव्वळ उत्पन्नामध्ये फार मोठा फरक नाही. एकंदरित उत्पन्न जवळपास सारखेच असल्याचे विचरण गुणांक दर्शवतो.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, दर एकरी सरासरी खर्चापेक्षा (974.13 रुपये) दर एकरी सरासरी उत्पन्न (1498.67 रुपये) जास्त आहे. उत्पादन खर्चामध्ये बी-बियाणे, मजूरीचा खर्च, बैलाचे भाडे, अवजारे दुरुस्ती, औत हाकणाऱ्यांना मोबदला, औताचे भाडे इत्यादी बाबींचा विचार केला आहे. नागली, वरई, भातासारख्या पिकावर आदिवासी शेतकरी जंतुनाशके, कीटकनाशके फवारत नाहीत. शेतीत खतांचाही वापर करत नाहीत. माणसांप्रमाणे जनावरांचीही उपासमार होत असल्याने जनावरे चार ते सहा महिने जंगलातच सोडून दिली जातात. त्यामुळे शेणखतही तयार होत नाही. डोंगर उतारावरच्या जमिनीत नागलीची एकदा लागण केल्यानंतर पुन्हा आदिवासी शेताकडे फिरकत नाहीत. नागलीची लावणी केल्यानंतर नागली काढण्यासाठीच आदिवासी शेतात जातात. वाळलेले शेण, पालापाचोळा, काटक्या-कुटक्या हे सर्व पेटवून देऊन त्याची जी राख तयार होते त्या राखेत पावसाळ्यात नागलीची, भाताची रोपे आदिवासी तयार करतात. नागलीची रोपे उतारावरच्या जमिनीत एका ओळीत एक-एक याप्रमाणे आदिवासी फेकत जातात. एक-दोन दिवसात ही आडवी पडलेली रोपे पावसाने उभी राहतात. अशा प्रकारे काही पिकांची लावणी झाली की पीक तयार झाल्यानंतर आदिवासी काढणीसाठीच शेतात जातात. लावणी झाल्यानंतर भांगलणही करत नाहीत. त्यामुळे नागली, वरई, भातासारख्या पीक उत्पादनाचा खर्च तुलनेने कमी येतो. परंतु जरी दर एकरी सरासरी उत्पन्नापेक्षा दर एकरी सरासरी खर्च कमी असला तरी आदिवासींना शेतीपासून मिळणारे उत्पन्नच एवढे अपुरे आहे की आलेल्या उत्पन्नातून बहुसंख्य आदिवासी शेतकऱ्यांची तीन-चार महिनेसुद्धा गुजराण होत नाही. खर्च वजा जाता आदिवासींना आपल्या कुटुंबाला वर्षभर पुरेल एवढे शेतीपासून उत्पादन किंवा उत्पन्न मिळाले पाहिजे. तरच शेतीचा दर एकरी खर्च कमी असण्याचा आदिवासी शेतकरी कुटुंबांना फायदा होईल. तीन-चार महिने पुरेल एवढेच शेतीतून उत्पादन निघत असल्याने उत्पादनाचा खर्च कमी असूनही आदिवासी शेतकऱ्यांना शेती व्यवसाय फायदेशीर ठरत नाही. वर्षातील चार ते आठ महिने बहुसंख्य आदिवासी शेतकऱ्यांना जगण्यासाठी आपला गाव सोडून दाही दिशा भटकावे लागते.

### 3.4 आदिवासींच्या शेतीची उत्पादकता

खालील तक्त्यात खंडाची, वनखात्याची आणि स्वत:ची अशा सर्व प्रकारची शेती करणाऱ्या कुटुंबांची संख्या, त्यांच्याकडील जमिनीचे क्षेत्र, एकूण कृषी उत्पादन, दर एकरी आणि दर हेक्टरी शेतीची उत्पादकता दर्शविली आहे. एकूण कृषी उत्पादनामध्ये आदिवासी पिकवत असलेल्या भात, नागली आणि वरई या अन्नधान्याचा एकत्रित विचार केला आहे.

**तक्ता क्रमांक 3.4**

**आदिवासींच्या शेतीची उत्पादकता**

| अ. क्र. | जमातीचे नाव | शेतकरी कुटुंबाची संख्या | जमिनीचे एकूण क्षेत्रफळ (एकर) | जमिनीचे एकूण क्षेत्रफळ (हेक्टर) | झालेले एकूण उत्पादन (क्विंटल) | दर एकरी कृषी उत्पादकता (क्विंटल) | प्रति हेक्टरी कृषी उत्पादकता (क्विंटल) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | म.कोळी | 56 | 354 | 141.60 | 699 | 1.97 | 4.93 |
| 2 | ढोरकोळी | 13 | 66 | 26.40 | 138 | 2.09 | 5.22 |
| 3 | कातकरी | 32 | 63 | 25.20 | 121 | 1.92 | 4.80 |
| 4 | वारली | 46 | 178 | 71.20 | 359 | 2.01 | 5.04 |
| 5 | कोकणा | 60 | 322 | 128.80 | 682 | 2.11 | 5.29 |
| 6 | म.ठाकूर | 57 | 261 | 104.40 | 518 | 1.98 | 4.96 |
| 7 | क.ठाकूर | 57 | 224 | 89.60 | 560 | 2.50 | 6.25 |
| | **एकूण** | **321** | **1468** | **587.20** | **3077** | **2.09** | **5.24** |
| | | | | प्रमाण विचलन (S.D.) | | **0.18** | |
| | | | | विचलन गुणांक (C. V.) | | **8.96** | |

तक्ता क्रमांक 3.4 वरुन खालील निष्कर्ष प्राप्त होतात.

1. सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांपैकी शेतकरी कुटुंबांची संख्या 321 इतकी असून या कुटुंबांकडे 587.20 हेक्टर (1468 एकर) शेत जमीन आहे. या जमिनीपासून प्राप्त झालेले एकूण कृषी उत्पादन 3077 क्विंटल इतके असून दर एकरी कृषी उत्पादकता 2.09 क्विंटल तर प्रति हेक्टर कृषी उत्पादकता 5.24 क्विं टल इतकी आहे.

2. विविध सात जमातींच्या कृषी उत्पादकतेचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता प्रति हेक्टर कृषी उत्पादकता सर्वात जास्त क ठाकूर जमातीतील शेतकऱ्यांच्या शेतीची आहे (6.25 क्विंटल), तर सर्वात कमी उत्पादकता कातकरी जमातीतील शेतकऱ्यांच्या शेतीची आहे (4.80 क्विंटल)

3. महादेव कोळी जमातीची प्रति हेक्टरी कृषी उत्पादकता 4.93 क्विंटल इतकी आहे. तर म ठाकूर जमातीची 4.96 क्विंटल आहे. वारली जमातीतील प्रति हेक्टर कृषी उत्पादकता 5.04 क्विंटल, ढोरकोळी जमातीची 5.22 क्विंटल आणि कोकणा जमातीची 5.29 क्विंटल इतकी आहे.

### 3.5 आदिवासींच्या शेतीची उत्पादकता कमी असण्याची कारणे

सन 1998-99 मध्ये भारताची तांदळाची प्रति हेक्टर उत्पादकता 19.28 क्विंटल इतकी होती. तर 2003-2004 च्या सर्व्हेक्षणानुसार अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील तांदूळ, नागली, वरई या अन्नधान्यांची प्रति हेक्टर कृषी उत्पादकता अवघी 5.24 क्विंटल इतकी आहे. अशा प्रकारे मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या शेतीची उत्पादकता आपल्या देशाच्या सरासरी कृषी उत्पादकतेपेक्षा खूपच कमी असल्याचे दिसून येते. यास अनेक घटक कारणीभूत आहेत. उदाहरणार्थ, शेती संपूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून असणे, निकृष्ट जमीन, सतत होणारी जमिनीची धूप, लहान आकाराचे धारण क्षेत्र, पारंपारिक किंवा जुनाट उत्पादन साधने, गरीबी, खते व सुधारित बियाणांच्या वापरास गैरसमजातून व अज्ञानातून विरोध, सर्वत्र विखुरलेले जमिनीचे तुकडे, सल्ला व मार्गदर्शनाचा अभाव, आदिवासी शेतकऱ्यांची निरक्षरता व अल्पशिक्षितपणा, आदानांचा गैरवापर (दारुसाठी व उपजीविकेसाठी सरकारने दिलेली आदाने दुसऱ्यांना विकून टाकणे इ.), आदिवासींच्या शेतीच्या विकासाकडे सरकारचे कमी लक्ष या विविध घटकांमुळे आदिवासींच्या शेतीची उत्पादकता अत्यंत कमी आहे.

## 4.0 विभाग चौथा

शोध निबंधाच्या या चौथ्या विभागात शेतीसाठी कर्ज काढलेल्या कुटुंबांचे प्रमाण, शेती कर्जाची रक्कम, थकबाकीचे प्रमाण, शेती कर्जाचे स्त्रोत इत्यादी बाबतची माहिती दिली आहे.

### 4.1 शेतीचे कर्ज काढलेल्या आणि शेती कर्जाची गरज असूनही शेतीचे कर्ज न काढलेल्या आदिवासी शेतकरी कुटुंबांचे प्रमाण

खालील तक्त्यात अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील शेतीचे कर्ज काढलेल्या आणि शेती कर्जाची गरज असूनही शेतीचे कर्ज न काढलेल्या आदिवासी शेतकरी कुटुंबांचे प्रमाण दर्शविले आहे.

**प्रा. सौ. सुनंदा एन. पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली !**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या आजीव सदस्य व क्रांतीवीर नवलभाऊ कला महाविद्यालय नवलनगर ता. जि. धुळे यांचे दि. 10 जानेवारी 2010 रोजी अकस्मितरित्या निधन झाले. प्रा. सौ. पाटील यांचा मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विविध उपक्रमात व इतर सामाजिक उपक्रमात सक्रीय सहभाग होता. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने, सौ. सुनंदा पाटील यांना विनम्र श्रद्धांजली!

त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, हीच ईश्वर चरणी प्रार्थना !

**अनिल सूर्यवंशी**
कार्यवाह - खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

### तक्ता क्रमांक 4.1

### शेतीचे कर्ज काढलेल्या आणि शेती कर्जाची गरज असूनंही शेतीचे कर्ज न काढलेल्या आदिवासी शेतकरी कुटुंबांचे प्रमाण

| अ. क्र. | जमातीचे नाव | शेतीचे कर्ज काढलेली कुटुंबे | शेतीचे कर्ज न काढलेली कुटुंबे | स्वत:ची शेती असणारी कुटुंबे | शेती कर्जाची गरज असणारी कुटुंबे | शेती कर्जाची गरज नसणरी कुटुंबे | शेती कर्जाची गरज असूनही कर्ज न काढलेली कुटुंबे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | म.कोळी | 16 (36.36) (29.63) | 28 (63.24) (16.97) | 44 (100) | 37 (84.09) (20.90) | 07 (15.91) (16.67) | 21 (56.75) (17.07) |
| 2 | ढोरकोळी | 02 (33.33) (3.70) | 04 (66.67) (2.42) | 06 (100) | 03 (50.00) (1.69) | 03 (50.00) (7.14) | 01 (33.33) (0.81) |
| 3 | कातकरी | 02 (16.66) (3.70) | 10 (83.34) (6.06) | 12 (100) | 11 (91.67) (6.21) | 01 (8.33) (2.38) | 09 (81.81) (7.31) |
| 4 | वारली | 12 (41.37) (22.23) | 17 (58.63) (10.30) | 29 (100) | 26 (89.66) (14.68) | 03 (10.34) (7.14) | 14 (53.84) (11.38) |
| 5 | कोकणा | 02 (3.93) (3.70) | 49 ( 96.07) (29.70) | 51 (100) | 36 (70.58) (20.33) | 15 (29.42) (35.72) | 34 (94.44) (27.65) |
| 6 | म .ठाकूर | 19 (37.25) (35.18) | 32 (62.75) (19.40) | 51 (100) | 44 (86.27) (24.86) | 07 (13.73) (16.67) | 25 (56.81) (20.33) |
| 7 | क.ठाकूर | 01 (3.85) (1.86) | 25 (96.15) (15.15) | 26 (100) | 20 (76.93) (11.30) | 06 (23.07) (14.28) | 19 (95.00) (15.45) |
| | **एकूण** | **54 (24.65) (100)** | **165 (75.35) (100)** | **219 (100)** | **177 (80.82) (100)** | **42 (19.18) (100)** | **123 (69.49) (100)** |

1. संदर्भ: प्राथमिक सर्व्हेक्षण

2. स्तंभ क्रमांक 3 मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील शेतीचे कर्ज काढलेल्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील स्वत:ची शेती असणाऱ्या एकूण आदिवासी कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

3. स्तंभ क्रमांक 4 मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील शेतीचे कर्ज न काढलेल्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील स्वत:ची शेती असणाऱ्या

एकूण आदिवासी कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

4. स्तंभ क्रमांक 3 मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील शेतीचे कर्ज काढलेल्या कुटुंबांचे सर्व्हेक्षित सर्व सात जमातीतील शेतीचे कर्ज काढलेल्या एकूण 54 आदिवासी कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

5. स्तंभ क्रमांक 4 मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील शेतीचे कर्ज न काढलेल्या कुटुंबांचे सर्व्हेक्षित सर्व सात जमातीतील शेतीचे कर्ज न काढलेल्या एकूण 165 आदिवासी कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

6. स्तंभ 6 मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील शेती कर्जाची गरज असणाऱ्या कुटुंबांचे सर्व्हेक्षित सर्व सात जमातीतील शेती कर्जाची गरज असणाऱ्या एकूण 177 आदिवासी कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

7. स्तंभ क्रमांक 7 मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील शेतीच्या कर्जाची गरज नसणाऱ्या कुटुंबांचे सर्व्हेक्षित सर्व सात जमातीतील शेती कर्जाची गरज नसणाऱ्या एकूण 42 आदिवासी कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

8. स्तंभ क्रमांक 8 मधील वरच्या कंसातील आकडेवारी टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील शेती कर्जाची गरज असणाऱ्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील स्वतःच्या मालकीची शेती असणाऱ्या एकूण आदिवासी कुटुंबांशी असणारे शेकडा प्रमाण दर्शविते.

9. स्तंभ क्रमांक 7 मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील शेती कर्जाची गरज नसणाऱ्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील स्वतःच्या मालकीची शेती असणाऱ्या एकूण आदिवासी कुटुंबांशी असणारे शेकडा प्रमाण दर्शविते.

10. स्तंभ क्रमांक 8 मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील शेती कर्जाची गरज असूनही शेतीचे कर्ज न काढलेल्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील शेती कर्जाची गरज असणाऱ्या एकूण आदिवासी कुटुंबांशी असणारे शेकडा प्रमाण दर्शविते.

11. स्तंभ क्रमांक 8 मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील शेती कर्जाची गरज असूनही शेतीचे कर्ज न काढलेल्या कुटुंबांचे सर्व्हेक्षित सर्व सात जमातीतील शेती कर्जाची गरज असूनही शेतीचे कर्ज न काढलेल्या एकूण 123 आदिवासी कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

12. टीपः स्वतःच्या मालकीची शेती असणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांनीच शेतीसाठी कर्ज घेतले असल्याने वरील तक्त्यात त्याची माहीती आली आहे. वनखात्याची जमीन कसणारी आणि दुसऱ्याची जमीन खंडाने कसणारी शेतकरी कुटुंबे यांनी शेतीचे कर्ज काढले नसल्याने त्यांची माहिती वरील तक्त्यात नाही.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की,

शेतीसाठी कर्ज काढलेल्या कुटुंबांचे प्रमाण 24.65 टक्के एवढे अल्प आहे. तर शेतीचे कर्ज न काढलेल्या कुटुंबांचे प्रमाण 75.35 टक्के एवढे मोठे आहे. विविध सात जमातींचा तुलनात्मक दृष्ट्या विचार करता असे दिसते की, शेतीसाठी कर्ज काढलेल्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण म ठाकूर या जमातीत असून ते 35.18 टक्के इतके आहे. त्या खालोखाल हे प्रमाण महादेव कोळी या जमातीत असून ते 29.63 टक्के आहे. तर शेतीसाठी कर्ज काढलेल्या कुटुंबांचे सर्वात कमी प्रमाण क ठाकूर या जमातीत असून ते 1.86 टक्के इतके आहे. ढोरकोळी, कातकरी आणि कोकणा या जमातीत हे प्रमाण प्रत्येकी 3.70 टक्के इतके अल्प आहे. विविध सात जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता शेतीसाठी कर्ज न काढलेल्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कोकणा या जमातीत असून ते 29.70 टक्के इतके आहे. तर सर्वात कमी प्रमाण ढोरकोळी या जमातीत असून ते 2.42 टक्के आहे.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, स्वतःच्या मालकीची शेती असणाऱ्या 219 कुटुंबांमध्ये शेती कर्जाची गरज असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते 80.82 टक्के एवढे आहे. तर शेती कर्जाची गरज नसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण 19.18 टक्के इतके अल्प आहे. विविध सात जमातींचा तुलनात्मक दृष्ट्या विचार करता असे दिसते की, शेती कर्जाची गरज असणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण म ठाकूर या जमातीत असून ते 24.86 टक्के एवढे आहे. तर सर्वात कमी प्रमाण ढोरकोळी या जमातीत असून ते 1.69 टक्के इतके आहे. विविध सात जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता शेती कर्जाची गरज नसणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कोकणा या जमातीत असून ते 35.72 टक्के इतके आहे. तर सर्वात कमी प्रमाण कातकरी जमातीत असून ते 2.38 टक्के आहे.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, शेती कर्जाची गरज असूनही शेतीचे कर्ज न काढलेल्या कुटुंबांचे प्रमाण 69.49 टक्के इतके मोठे आहे. विविध सात जमातींचा तुलनात्मक दृष्ट्या विचार करता शेती कर्जाची गरज असूनही शेतीचे कर्ज न काढलेल्या कुटुंबांचे प्रमाण सर्वात जास्त कोकणा या जमातीत असून ते 27.65 टक्के एवढे आहे. तर सर्वात कमी प्रमाण ढोरकोळी या जमातीत असून ते 0.81 टक्के इतके आहे.

शेतीचे कर्ज काढल्यानंतर ते परत करता येईल की नाही याविषयी साशंकता असणे, जमीनची आणि त्यामुळे होणाऱ्या अपमानाची भीती वाटणे, कर्जासंबंधी माहिती व मार्गदर्शनाचा अभाव या विविध कारणांमुळे 69.49 टक्के आदिवासी कुटुंबांनी शेती कर्जाची गरज असूनही शेतीसाठी कर्ज काढले नसल्याचे आदिवासी शेतकऱ्यांशी झालेल्या चर्चेत आढळून आले.

### 4.2 आदिवासी शेतकऱ्यांनी शेतीसाठी घेतलेले कर्ज व थकबाकी

खालील तक्त्यात अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षण केलेल्या आदिवासी शेतकऱ्यांनी शेतीसाठी घेतलेल्या कर्जाची व थकबाकीची माहिती दिली आहे.

## तक्ता क्रमांक 4.2

### आदिवासी शेतकऱ्यांनी शेतीसाठी घेतलेले कर्ज व थकबांकी

| अ. क्र. | जमातीचे नाव | स्वत:ची शेती असणाऱ्या कुटुंबांची संख्या | शेतीसाठी कर्ज काढलेल्या कुटुंबांची संख्या | थकबाकीदार कुटुंबांची संख्या | थकबाकीदार कुटुंबांचे शेकडा प्रमाण | शेतीसाठी घेतलेले कर्ज (रुपये) | थकबाकीची रक्कम कर्ज (रुपये) | थकबाकीचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | म.कोळी | 44 | 16 | 07 (2333) | 43.75 | 87000 | 44900 | 51.60 |
| 2 | ढोरकोळी | 06 | 02 | 0 | 0 | 7000 | 0 | 0 |
| 3 | कातकरी | 12 | 02 | 02 (06.67) | 100 | 15000 | 13000 | 86.66 |
| 4 | वारली | 29 | 12 | 02 (06.67) | 16.66 | 6900 | 2000 | 29.98 |
| 5 | कोकणा | 51 | 02 | 01 (3.33) | 50.00 | 4500 | 2000 | 44.44 |
| 6 | म .ठाकूर | 51 | 19 | 18 (60.00) | 94.73 | 101300 | 86000 | 84.89 |
| 7 | क.ठाकूर | 26 | 01 | 0 | 0 | 400 | 0 | 0 |
| | **एकूण** | **219** | **54** | **30 (100)** | **55.55** | **222100** | **147900** | **66.59** |

1. संदर्भ: प्राथमिक सर्व्हेक्षण

2. स्तंभ क्रमांक 5 मधील कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील थकबाकीदार कुटुंबांचे सर्व्हेक्षित सर्व जमातीतील एकूण 30 थकबाकीदार कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

3. स्तंभ क्रमांक 6 मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील शेतीचे कर्ज थकलेल्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील शेतीचे कर्ज काढलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, शेतीचे कर्ज काढलेल्या 54 कुटुंबांपैकी 30 कुटुंबे (55.55 टक्के) थकबाकीदार आहेत. एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता असे दिसते की, थकबाकीदार आदिवासी शेतकरी कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कातकरी या जमातीत असून ते 100 टक्के आहे. ढोरकोळी आणि क ठाकूर जमातीत थकबाकीदार शेतकऱ्यांचे प्रमाण शून्य आहे.

विविध सात जमातींचा तुलनात्मक दृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरुन असे दिसते की, थकबाकीदार आदिवासी शेतकरी कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण म ठाकूर या जमातीत असून ते 60.00 टक्के आहे. तर ढोरकोळी आणि क ठाकूर या जमातीत हे प्रमाण शून्य आहे.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, विविध सात जमातीतील 54 आदिवासी शेतकरी कुटुंबांनी

शेतीसाठी घेतलेल्या कर्जाची रक्कम 222100 रुपये इतकी आहे. यामध्ये म ठाकूर जमातीतील 19 आदिवासी शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाची रक्कम जास्त असून ती 101300 रुपये आहे. तर महादेव कोळी जमातीतील 16 शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाची रक्कम 87000 रुपये आहे.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, विविध सात जमातीतील 54 शेतकरी कुटुंबांनी घेतलेल्या 222100 रुपये शेती कर्जापैकी थकबाकीची रक्कम 147900 रुपये आहे. थकबाकीचे शेकडा प्रमाण 66.59 टक्के एवढे मोठे आहे. वरील तक्त्यावरुन असे दिसते की, कातकरी जमातीतील शेतकरी कुटुंबांनी 15000 रुपये कर्ज घेतले आहे. तर थकबाकी 13000 रुपये आहे (86.66 टक्के). म ठाकूर जमातीतील शेतकऱ्यांनी शेतीसाठी 101300 रुपये कर्ज घेतले आहे. तर थकबाकीची रक्कम 86000 रुपये आहे (84.89 टक्के). ढोरकोळी आणि क ठाकूर जमातीतील आदिवासी शेतकऱ्यांची शेती कर्जाची थकबाकी शून्य आहे.

### 4.3 आदिवासींच्या शेती कर्जाचे स्रोत

खालील तक्त्यात अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांनी शेतीसाठी कोणाकडून कर्ज घेतले याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक 4.3**

**आदिवासींच्या शेती कर्जाचे स्रोत**

| अ.क्र. | शेती कर्जाचे स्रोत | शेती कर्जाचे स्वरुप आणि त्यानुसार घेतलेली आदिवासी कुटुंबे | | | एकूण कुटुंबे | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बैलगाडी | बैलजोडी व लागवडीसाठी | लागवडीसाठी | | |
| 1 | बँक | 01 | 0 | 01 | 02 | 3.70 |
| 2 | बँक व दुकान | 0 | 01 | 00 | 01 | 1.85 |
| 3 | सहकारी संस्था | 0 | 0 | 33 | 33 | 61.12 |
| 4 | स्था.बि.आ.क. | 0 | 0 | 01 | 01 | 1.85 |
| 5 | स्था.बि.आ.दु. | 0 | 0 | 17 | 17 | 31.48 |
| | **एकूण** | **01 (1.85)** | **01 (1.85)** | **52 (96.30)** | **54 (100)** | **100** |

1. संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण

2. कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शवितात.

3. संक्षिप्त शब्दांचे अर्थ असे आहेत (1) स्था.बि.आ.क= स्थानिक बिगर आदिवासी कर्मचारी (शिक्षक) (2) स्था. बि.आ.दु = स्थानिक बिगर आदिवासी दुकानदार.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, बैलगाडी, बैलजोडी खरेदी करणे आणि लागवडीसाठी 54 आदिवासी शेतकऱ्यांनी बँक, दुकानदार, सहकारी संस्था, कर्मचारी इत्यादी स्त्रोताकडून कर्ज काढले आहे. या सर्व स्त्रोतामध्ये सहकारी संस्थांकडून कर्ज काढलेल्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते 61.12 टक्के इतके आहे. त्या खालोखाल हे प्रमाण स्थानिक बिगर आदिवासी दुकानदारांकडून कर्ज काढलेल्या आदिवासी कुटुंबांचे असून ते 31.48 टक्के इतके आहे. तर बँकेकडून आणि आदिवासी भागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून शेतीसाठी कर्ज घेतलेल्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण अत्यंत अल्प आहे.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, 54 आदिवासी शेतकरी कुटुंबांनी बैलगाडी, बैलजोडी आणि लागवडीसाठी कर्ज घेतले आहे. यामध्ये लागवडीसाठी कर्ज काढलेल्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते 96.30 टक्के इतके आहे. बैलगाडीसाठी कर्ज घेतलेल्या कुटुंबांचे प्रमाण 1.85 टक्के आहे. तर बैलजोडी व लागवडीसाठी कर्ज काढलेल्या कुटुंबांचे प्रमाण 1.85 टक्के आहे. मजुरांची मजुरी देण्यासाठी आदिवासी शेतकऱ्यांकडे पैसा नसतो. त्यासाठी ते दुकानदार, सहकारी संस्था इत्यादीकडून कर्ज काढतात. त्याला आदिवासी लागवडीचे कर्ज असे म्हणतात.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, आदिवासी शेतकऱ्यांना बँका, सहकारी संस्था इत्यादी संस्थात्मक घटकांकडून शेतीसाठी कर्जाची सुविधा उपलब्ध असूनही काही आदिवासी बिगर संस्थात्मक घटकांकडून म्हणजे दुकानदार आणि कर्मचारी यांच्याकडून कर्ज घेतात. याची काही कारणे सर्व्हेक्षणात आढळून आली. पहिले कारण म्हणजे बँका व सहकारी संस्था यांच्याप्रमाणे दुकानदार व कर्मचारी या व्यक्ती कर्ज थकल्यास आदिवासींची शेतजमीन जप्त करत नाहीत. दुसरे कारण म्हणजे ज्यांना 300 ते 600 रुपये एवढेच कर्ज हवे असते त्यांना दुकानदारांकडून व कर्मचाऱ्यांकडून ते चटकन मिळते.

### 4.4 कर्जाच्या स्त्रोतानुसार शेतीचे कर्ज थकलेल्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण

खालील तक्त्यात कर्जाच्या स्त्रोतानुसार शेतीचे कर्ज थकलेल्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक 4.4**

**कर्जाच्या स्त्रोतानुसार शेतीचे कर्ज थकलेल्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण**

| अ.क्र. | शेती कर्जाचे स्रोत | शेतीचे कर्ज घेतलेली कुटुंबे | शेतीचे कर्ज थकलेली कुटुंबे | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | बँक | 02 | 02 | 100 |
| 2 | स्था.बि.आ.दु. | 18 | 00 | 000 |
| 3 | स्था.बि.आ.क. | 01 | 00 | 000 |
| 4 | सहकारी संस्था | 33 | 28 | 84.84 |
| | **एकूण** | **54** | **30** | **55.55** |

1) संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण

2) संक्षिप्त शब्दांचे अर्थः- स्था.बि.आ.दु =स्थानिक बिगर आदिवासी दुकानदार, स्था.बि.आ.क = स्थानिक बिगर आदिवासी कर्मचारी (शिक्षक)

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, स्थानिक बिगर आदिवासी दुकानदार आणि स्थानिक बिगर आदिवासी कर्मचारी (शिक्षक) यांच्याकडून शेतीचे कर्ज घेतलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या 19 इतकी असून त्यापैकी थकबाकीदार कुटुंबांचे प्रमाण शून्य आहे. तर बँकेकडून कर्ज घेतलेली सर्व दोन आदिवासी कुटुंबे थकबाकीदार आहेत. सहकारी संस्थांकडून 33 आदिवासी कुटुंबांनी कर्ज काढले असून त्यापैकी 28 कुटुंबे (84.84 टक्के) थकबाकीदार आहेत. दुकानदारांकडून आणि कर्मचाऱ्यांकडून आदिवासी 300 ते 500 रुपये एवढे कमी रकमेचे कर्ज घेतात. त्यामुळे त्याची परतफेड पीक तयार झाल्यानंतर त्वरित करता येते. कारण परतफेड करता येईल एवढेच कर्ज आदिवासी शेतकरी दुकानदारांकडून व कर्मचाऱ्यांकडून घेतात. त्यामुळे थकबाकी राहत नाही. सहकारी संस्था आणि बँका बद्दल आदिवासींच्या मनात आस्था नाही. तसेच दुकानदार व कर्मचाऱ्यांचा आदिवासींना जसा धाक असतो तसा बँका व सहकारी संस्थांचा नसतो. त्यामुळे बँका व सहकारी संस्थांचे कर्ज परत करण्यास आदिवासींकडून चालढकल केली जाते.

### 4.5 शेती कर्जाच्या परतफेडीची पद्धत

बँकेकडून आणि सहकारी संस्थेकडून शेतीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड पैशात करावी लागते. परंतु दुकानदार, कर्मचारी, इतर व्यक्ती यांच्याकडून पैशाच्या स्वरुपात घेतलेल्या कर्जाची परतफेड धान्याच्या स्वरुपात करावी लागते. याला 'पोत्यावरचे कर्ज' किंवा 'वरीवरचे कर्ज' असे म्हणतात. म्हणजे पीक तयार झाल्यानंतर (चार ते सहा महिन्यात) आदिवासींना आपल्या कर्जाची परतफेड १ पोते भात किंवा वरई देऊन करावी लागते. अर्थात किती पोते भात किंवा वरई धनकोला द्यावयाची ते धनकोकडून घेतलेल्या कर्जाऊ रकमेवर अवलंबून असते.

### 4.5.1 'पोत्यावर' पद्धतीतील कर्जावरील व्याजाचा दरः-

शेतीसाठी वरीवर किंवा पोत्यावर पद्धतीने कर्ज घेतल्यास आदिवासी शेतकऱ्यांना किती व्याज द्यावे लागते आणि या व्यवहारात म्हणजे खुल्या बाजारात माल विकता न आल्यामुळे त्यांचे किती आर्थिक नुकसान होते ते खालील तक्त्यात दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक 4.5.1**

**'पोत्यावर' पद्धतीतील कर्जावरील व्याजाचा दर**

| अ. क्र. | कर्ज काढलेले वर्ष | कर्ज परत करण्यास लागलेला कालावधी (कर्जाची मुदत) | पोत्यावर पद्धतीने आदिवासींना मिळालेले कर्ज (रुपये) | खुल्या बाजारातील धान्याचा सरासरी प्रति क्विंटल दर (रुपये) | रोख कर्जाच्या बदल्यात परत केलेल्या धान्याची एकूण किंमत (रुपये) (कर्जाची एकूण परतफेड) | सहा महिन्याचे व्याज (रुपये) | एक वर्षाचे व्याज (रुपये) | दर साल दर शेकडा व्याज दर (%) | खुल्या बाजारात माल विकता न आल्याने झालेले नुकसान (प्रति क्विंटल रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2003 | 6 महिने | 400 | 900 | 1 क्विं.= 900 रु. | 500 | 1000 | 250% | 500 |
| 2 | 2003 | 6 महिने | 300 | 900 | 1 क्विं.= 900 रु. | 500 | 1200 | 400% | 600 |
| 3 | 2003 | 6 महिने | 500 | 900 | 1 क्विं.= 900 रु. | 400 | 800 | 160% | 400 |

वरील तक्त्यात आदिवासी शेतकऱ्यांनी पोत्यावर पद्धतीने दुकानदार व इतर व्यक्तींकडून घेतलेल्या कर्जावरील व्याजाचा दर काढला असून या पद्धतीने घेतलेल्या कर्जावर दर साल दर शेकडा 160 टक्केपासून 400 टक्केपर्यंत व्याज द्यावे लागते हे स्पष्ट होते. पोत्यावर पद्धतीने कर्ज काढल्यास कर्जाची परतफेड धान्यातच करावी लागते. रोख पैशात करता येत नाही. त्यामुळे या पद्धतीमुळे आदिवासींना धान्य खुल्या बाजारात विकता येत नाही. त्यामुळे त्यांचे प्रति क्विंटल 400 ते 600 रुपये नुकसान होते. हेही वरील तक्त्यावरुन दिसून येते. अशा प्रकारे पोत्यावर पद्धतीने दुकानदार व इतर व्यक्ती आदिवासींचे मोठे आर्थिक शोषण करतात हे स्पष्ट होते. तसेच यावरुन आदिवासी भागातील छुप्या सावकारीवर आणि सावकारशाहीकडून आदिवासींच्या होणाऱ्या आर्थिक लुटमारीवरही प्रकाश पडतो. ही लूटमार किती भयंकर आहे ते वरील तक्ता क्रमांक 4.5.1 बरोबरच खालील तक्ता क्रमांक 4.5.2 वरुनही स्पष्ट होते.

### 4.5.2 मालावर प्रक्रिया केल्याने दुकानदारांना मिळणारी किंमत, आदिवासींचे होणारे नुकसान व दर साल दर शेकडा व्याज दर

आदिवासी शेतकऱ्यांनी कर्जाच्या स्वरुपात परत केलेल्या वरईवर किंवा इतर धान्यावर दुकानदार प्रक्रिया करतात आणि हे धान्य बाहेरच्या जिल्ह्यात किंवा स्थानिक बाजारात तिपटीपेक्षा जास्त किंमतीला विकतात. त्यामुळे या पद्धतीत दुकानदारांचा खूपच फायदा होतो. अशा प्रकारे मालावर प्रक्रिया केल्याने दुकानदारांचा तिप्पट फायदा होत असल्याने आदिवासी शेतकऱ्यांचे खूपच नुकसान होते. खालील तक्त्यात पोत्यावर पद्धतीने कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचे कसे व किती नुकसान होते, ते स्पष्ट केले आहे.

### तक्ता क्रमांक 4.5.2

### मालावर प्रक्रिया केल्याने दुकानदारांना मिळणारी किंमत, आदिवासींचे होणारे नुकसान व दर साल दर शेकडा व्याज दर

| अ. क्र. | कर्जाऊ रक्कम | परत केलेले धान्य (क्विं.) | परत कराव्या लागलेल्या धान्याची बाजारातील किंमत (रुपये) | मालावर प्रक्रिया केल्याने मिळणारा दर (प्रति क्विंटल) | सहा महिन्याचे व्याज (रुपये) | एक वर्षाचे व्याज (रुपये) | प्रक्रिया करुन माल विकता न आल्याने आदिवासींचे झालेले नुकसान प्रति क्विंटल (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 400 | 1 | 900 | 2700 | 2300 | 4600 (1150) | 2300 |
| 2 | 300 | 1 | 900 | 2700 | 240 | 4800 (1600) | 2400 |
| 3 | 500 | 1 | 900 | 2700 | 2200 | 4400 (880) | 2200 |

1. संदर्भ : प्राथमिक सर्व्हेक्षण

2. कंसातील आकडे दर साल दर शेकडा व्याज दर दर्शवितात.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, दुकानदार मालावर प्रक्रिया करुन तिपटीपेक्षा अधिक भावाने माल विकतात. आदिवासी शेतकऱ्यांनी आपला माल प्रक्रिया करुन न विकल्याने किंवा पोत्यावर पद्धतीने कर्ज घेतल्याने तसे करता न आल्याने त्यांना प्रति क्विंटलमागे 2200 ते 2400 रुपये नुकसान होते हे स्पष्ट होते. तसेच 300 ते 300 रुपये कर्जाच्या बदल्यात आदिवासींना 900 रुपयांचे धान्य द्यावे लागते. या मालावर प्रक्रिया केल्याने दुकानदारांना 2700 रुपये प्रति क्विंटल भाव मिळत असल्याने 300 ते 500 रुपयांच्या कर्जावर आदिवासींना दर साल दर शेकडा 880 ते 1600 टक्के एवढे प्रचंड व्याज द्यावे लागते हे स्पष्ट होते.

## 5.0 विभाग पाचवा

शोध निबंधाच्या या पाचव्या भागात आदिवासींच्या शेतजमिनीची वैशिष्ट्ये, आदिवासी शेतकऱ्यांच्या समस्या आणि प्रस्तुत अभ्यासकाने सुचविलेल्या शिफारशींचा समावेश आहे. या बाबींची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

### 5.1 आदिवासींच्या शेतजमिनीची ठळक वैशिष्ट्ये

अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या शेतजमिनीची आदिवासी समाजातील वास्तव्यात आणि सर्व्हेक्षणात आढळून आलेली काही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे दिली आहेत.

**1. निकृष्ट व दगडाळ जमीन:**

आदिवासी भागातील बहुसंख्य जमिनींचे तुकडे निकृष्ट दर्जाचे आहेत. खडकाळ जमिनीचे प्रमाण खूप जास्त आहे. त्यामुळे जमिनीची

उत्पादकता अत्यंत कमी आहे.

**2. पिके**

आदिवासी भागात प्रामुख्याने नागली, भात, वरई इ. पिके घेतली जातात. त्याचबरोबर उडीद, खुरासणी, तूर, कुळीथ इ. पिकेही घेतली जातात.

**3. पारंपारिक बी-बियाणांचा वापर**

सरकार किंवा कृषी खात्याकडून आदिवासींना सुधारीत बियाणे मिळण्याची सुविधा आहे. परंतु आदिवासी गावठी किंवा घरचे बियाणे वापरतात. 'सरकारी बियाणे नीट उगवत नाही म्हणून आम्ही ते वापरणे बंद केले' असे अनेक आदिवासींनी सर्व्हेक्षणादरम्यान सांगितले. तसेच सरकारी बियाणांचा दर जास्त असतो आणि हे बियाणे वापरले तर खते घालावी लागतात आणि खतामुळे भात खराब होतो असेही ठिकठिकाणच्या आदिवासींनी सांगितले.

**4. बदलती शेती**

आदिवासींच्या शेतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आदिवासी एकाच तुकड्यात दर वर्षी शेती करत नाहीत. 2 ते 3 वर्षे एक तुकडा पाडून ठेवतात. दुसरीकडे शेती करतात. त्याशिवाय पीक येत नाही. पाडून ठेवलेल्या तुकड्यात गवत असते. त्याचा उपयोग गुराढोरासाठी आणि राब भाजण्यासाठी केला जातो.

**5. शेती भुजणे**

नागलीची रोपे तयार करण्यासाठी आदिवासी जमिनीचे तुकडे भुजतात. जमीन भुजणे म्हणजे जमिनीवर सर्वत्र गवत, पाला-पाचोळा, झाडाच्या फांद्या आणि वाळलेले शेण आदिवासी पसरतात आणि ते सर्व पेटवून देतात. ही आग विझली की त्याची राख तयार होते. त्या राखेत नागलीचे बियाणे टाकतात. साधारणपणे फेब्रुवारी-मार्च महिन्यापासून जमिनी भुजण्याचे काम आदिवासी सुरु करतात.

**6. अवजारे**

आदिवासी वापरत असलेली शेतीची अवजारे परंपरागत, जुनाट व लाकडी आहेत. लोखंडी अवजारांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. गरीब शेतकऱ्यांकडे तर लाकडी नांगर सुद्धा नसतात. कुदळीने जमीन उकरुन ते शेती करतात. काही अवजारे आदिवासी स्वतः घरी तयार करतात.

**7. उदरनिर्वाहाची शेती**

आदिवासींची शेती ही उपजीविकेची किंवा उदरनिर्वाहाची शेती असून बहुसंख्य आदिवासी शेतकऱ्यांना उपजीविकेपुरतेही उत्पादन शेतीपासून मिळत नाही. बहुसंख्य आदिवासींना 3 ते 4 महिने पुरेल एवढेच उत्पादन मिळते.

**8. शेतीचा खर्च**

शेती पिकविण्यासाठी विविध प्रकारचा खर्च आदिवासींना करावा लागतो. मजुरांना रोख मजुरी किंवा धान्य द्यावे लागते. तसेच दुपारचे जेवण, तंबाखू, बिडी इत्यादी द्यावी लागते. काही आदिवासींना बियाणे विकत घ्यावे लागते किंवा कर्जाऊ घ्यावे लागते. ज्या शेतकऱ्यांकडे बैल नसतात त्यांना बैल भाड्याने आणावे लागतात. एका बैलाचे भाडे म्हणून 2 क्विंटल नागली किंवा भात द्यावे लागते. त्याला बैलाची वाफ असे म्हणतात. आवणी किंवा शेतीची कामे पंधरा दिवसात आटोपतात. तरीसुद्धा बैल तीन महिने ठेऊन घ्यावे लागतात. बैलांचा चारा-पाण्याचा खर्च

करावा लागतो. बैलाची पूजा करुन बैल मालकाच्या ताब्यात दिला जातो. औताचाही खर्च आदिवासींना करावा लागतो. नांगराला बैल जुंपले की त्याला औत असे म्हणतात. नांगर लाकडीच असतात. औताला दिवसाला 100 रुपये भाडे द्यावे लागते. औत हाकणाऱ्याला दिवसातून दोन वेळा जेवण द्यावे लागते. एका वेळी चार ते पाच औत लागतात.

### 5.2 आदिवासी शेतकऱ्यांच्या समस्या

स्वत:च्या मालकीची शेती असणाऱ्या, दुसऱ्याची जमीन खंडाने कसणाऱ्या आणि वन खात्याच्या जागेत शेती कसणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांना विविध समस्यांना तोंड लागते असे अभ्यास क्षेत्रातील आदिवासी शेतकऱ्यांच्या मुलाखतीतून आढळले. आदिवासी शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या प्रमुख समस्यांची माहिती थोडक्यात खालीलप्रमाणे दिली आहे.

### 5.2.1 स्वत:च्या मालकीची शेती असणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांच्या समस्या

स्वत:च्या मालकीची शेती असणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांना ज्या समस्यांना तोंड द्यावे लागते त्याचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**1. शेतमजूरांची टंचाई**

सीमांत शेतकऱ्यांचा शेतजमिनीचा आकार लहान असल्याने त्यांना शेतमजूरांचा प्रश्न भेडसावत नाही. ते आपल्या कुटुंबियांच्या मदतीने शेती करतात. परंतु लावणीची, भातासाठी चिखल तयार करण्याची आणि पावसाळ्यातील शेतीची अन्य कामे सुरु झाली की मध्यम आणि मोठ्या शेतकऱ्यांना मजुरांची मोठी टंचाई भासते. त्यामुळे शेतीची कामे वेळेवर सुरु होत नाहीत. सर्वच शेतकऱ्यांच्या शेतीची कामे एकाच वेळी सुरु होतात. तसेच परिसरातील काही भूमिहीन शेतमजूर परगावी पावसाळ्यात सुद्धा स्थलांतर करतात. कारण तेथे त्यांना तुलनेने जास्त मजुरी मिळते. तसेच ज्यांची शेतीची कामे लवकर आटोपतात असे सीमांत व लहान शेतकरी सुद्धा परगावी कामास जातात. त्यामुळे मध्यम आणि मोठ्या आदिवासी शेतकऱ्यांना कामास पुरेसे मजूर मिळत नाहीत.

**2. मजुरीचे दर न परवडणारे**

बाहेरचे मजूर लावून शेती करणाऱ्या मोठ्या शेतकऱ्यांनी सांगितले की, शेतमजुरांना जास्त मजुरी द्यावी लागते. बिडी, तंबाखू द्यावी लागते. त्यामुळे शेतीचा खर्च जास्त येतो. शेती करणे परवडत नाही. आदिवासी भागातील बरीचशी शेतजमीन कमी सुपीक, डोंगर उतारावरील आणि कमी उत्पादकता असलेली असल्याने शेती परवडत नाही. त्यामुळे शेतमालकांना ते देत असलेली मजुरी जास्त आहे असे वाटते. तर जीवनाश्यक वस्तू पुरेशा प्रमाणात खरेदी करता येत नसल्याने शेतमजुरांना शेतमालकाकडून मिळणारी मजुरी कमी आहे असे वाटते.

**3. व्यवस्थापनाची समस्या**

सर्व्हेक्षणात असे आढळले की, एका आदिवासी शेतकऱ्याची जमीन एकाच ठिकाणी असण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. बहुसंख्य शेतकऱ्यांच्या जमिनीचे तुकडे त्यांच्या गावापासून काही अंतरावर जंगलांच्या बाजूला, डोंगरावर, डोंगराच्या खाली अशा प्रकारे सर्वत्र विखुरलेले

आहेत. त्यामुळे सर्व जमिनीच्या तुकड्यांची वेळेत मशागत (पेरणी, लावणी इत्यादी) करणे शक्य होत नाही. नागली किंवा भाताची लावणी करण्यास उशीर होतो. कुळ कायदा लावून अन्य आदिवासी आपल्या जमिनी काढून घेतील या भीतीपोटी काही शेतकरी स्वतः जमेल तशी शेती करतात. पण कोणाला शेती कसण्यास देत नाहीत. त्यामुळे शेतीचाही विकास होत नाही आणि शेतकऱ्यांचेही उत्पन्न वाढत नाही.

4. पिकावरील कीडीची समस्या

आदिवासी शेतकऱ्यांना भेडसावणारी आणखी एक महत्वाची समस्या म्हणजे अधून-मधून पिकांवर पडणारा विविध प्रकारचा रोग किंवा पिकावर पडणारी कीड होय. बहुसंख्य आदिवासी शेतकऱ्यांना कीटकनाशके फवारणे आवडत नाही. ज्यांना कीटकनाशकांचे महत्त्व पटलेले आहे असे आदिवासी पैशाच्या चणचणीमुळे कीटकनाशके वापरु शकत नाहीत. अशा प्रकारे दर वर्षी पिकावर पडणाऱ्या कीडीमुळे शेतीतील उत्पादनात घट होते. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते.

5. माल साठवणूकीची समस्या

ज्या मोठ्या शेतकऱ्यांना शेतीपासून अधिक उत्पादन मिळते; अशा शेतकऱ्यांजवळ माल साठवणूकीची चांगली सुविधा नसल्याचे सर्व्हेक्षणात आढळून आले. जास्त किंमत मिळेल याची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांचा माल अवेळी पावसाने खराब झाल्याच्या आणि त्या मालास मातीमोल भाव मिळाल्याच्या काही घटना सर्व्हेक्षणात आदिवासींनी ऐकवल्या. अशा प्रकारे मोठ्या शेतकऱ्यांकडे माल साठवणूकीची पुरेशी सुविधा नसल्याने शेतमाल तयार झाला की ते बाजारात ताबडतोब माल विक्रीस आणतात. त्यामुळे कमी भाव मिळून नुकसान होते.

6. भांडवलाची टंचाई

सीमांत आणि अल्प भूधारक शेतकरी इतके गरीब आहेत की ते स्वतःचा उदरनिर्वाहही करु शकत नाहीत. त्यामुळे शेतीत भांडवल गुंतवण्याचा प्रश्नच येत नाही. उत्पन्नाचा बराचसा भाग उपभोगावरच खर्च होत असल्याने ते शेतीत भांडवल गुंतवू शकत नाहीत. मोठ्या शेतकऱ्यांपाशी थोडे फार भांडवल असले तरी ते शेतीत गुंतवावे असे त्यांना वाटत नाही. फारच थोडे सधन शेतकरी शेतीत गुंतवणूक करतात. अशा प्रकारे गरीबीमुळे, शेतीत गुंतवणूक करण्याची इच्छा नसल्याने आणि गुंतवलेले भांडवल वाया जाईल या भीतीने आदिवासी शेतकऱ्यांची शेतीतील भांडवलाची गुंतवणूक कमी आहे.

7. योग्य भाव न मिळणे

आदिवासींना त्यांच्या कृषी मालास जो भाव मिळतो त्याबद्दल आदिवासींशी चर्चा केली असता त्यांनी भाव किंवा दर अतिशय कमी मिळतो अशी तक्रार केली. सरकारने आदिवासी भागात एकाधिकार खरेदी योजना सुरु केली आहे. या योजने अंतर्गत सरकार आदिवासींच्या कृषी मालाची खरेदी करते. परंतु सरकारकडून दिला जाणारा भाव परवडत नाही असे अनेक आदिवासी शेतकऱ्यांनी मुलाखतीत सांगितले.

8. एकाधिकार योजनेमुळे निर्माण झालेल्या समस्या

आदिवासींना आपला कृषीमाल एकाधिकार

खरेदी योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाला विकावा लागतो. व्यापाऱ्यांना, दुकानदारांना माल विकता येत नाही. महामंडळापेक्षा व्यापारी, दुकानदार जास्त भाव देण्यास तयार असूनही त्यांना माल विकता येत नाही. त्यामुळे आर्थिक नुकसान होते अशी तक्रार सर्वच आदिवासी शेतकऱ्यांनी केली. एकाधिकार योजना फायद्याची नाही असे बहुसंख्य आदिवासींनी सर्व्हेक्षणात सांगितले. अशाप्रकारे व्यापाऱ्यांना माल विकण्याची परवानगी नसल्याने आदिवासींना योग्य भाव मिळत नाही.

**9. बियाणांची समस्या**

शेतकरी घरचेच बियाणे शेतीत वापरतात. परंतु सीमांत शेतकऱ्यांना शेतीतून उपजीविकेपुरतेही उत्पादन मिळत नाही. त्यामुळे त्यांना बियाणे कर्जाऊ घ्यावे लागते. या बियाणांची परतफेड पिकांची मळणी झाल्यानंतर जवळजवळ दुपटीने करावी लागते. त्यामुळे गरीब शेतकऱ्यांना शेती परवडत नाही.

**10. उपभोग कर्जामुळे निर्माण झालेल्या समस्या**

सीमांत शेतकऱ्यांना वर्षातील तीन ते चार महिने भुकेच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागते. अशा काळात हे गरीब शेतकरी मोठ्या शेतकऱ्यांकडून उपजीविकेसाठी धान्य व पैसे कर्जाऊ घेतात. या कर्जाची परतफेड व्याजासहित करुन सुद्धा त्यांना कर्ज दिल्याबद्दल मोठ्या शेतकऱ्यांच्या शेतीतील कामे करावी लागतात. त्यांच्या शेतातील कामे संपल्याशिवाय कर्ज घेतलेल्या गरीब शेतकऱ्यांना स्वतःच्या शेतीतील कामे करता येत नाहीत. त्यामुळे शेतीची कामे वेळेत सुरु करता न येऊन त्यांचे नुकसान होते.

**11. सिंचनाची समस्या**

अभ्यास क्षेत्रातील सर्व्हेक्षित सर्व आदिवासी शेतकऱ्यांची शेती संपूर्णपणे कोरडवाहू किंवा जिराईत असून ती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे आदिवासींना शेतीपासून फारसे उत्पन्न मिळत नाही.

### 5.2.2 खंडाने शेती करणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांच्या समस्या

भूमिहीन आदिवासी ज्याप्रमाणे उदरनिर्वाहासाठी दुसऱ्याची जमीन खंडाने कसण्यासाठी घेतात त्याप्रमाणे सीमांत आणि अल्प भूधारक शेतकरी सुद्धा दुसऱ्याची जमीन खंडाने कसण्यासाठी घेतात. कारण शेतीतील उत्पन्न तुटपुंजे असल्याने वर्षातील दोन-तीन महिने सुद्धा त्यांची उपजीविका होत नाही. खंडाने किंवा बटईने शेती करणाऱ्या आदिवासींना खंडाच्या शेतीपासून फारसे उत्पन्न मिळत नाही. त्याची काही कारणे अभ्यासात आढळून आली. पहिले कारण म्हणजे जमीन मालकाकडून खंडाने शेती करणाऱ्यांना बियाणे, अवजारे, उचल म्हणून रोख रक्कम अशी काहीही मदत मिळत नाही. दुसरे कारण म्हणजे गरीब किंवा नाडलेल्या आदिवासींकडून जमीन मालक जास्त खंड वसूल करतात. तिसरे कारण म्हणजे उत्पादन होण्यापूर्वीच खंड निश्चित होत असल्याने उत्पादन होवो अथवा न होवो ठरलेला खंड हा द्यावाच लागतो. खंडाची रक्कम फिटेपर्यंत जमीन मालकांकडे चाकरीस राहवे लागते किंवा दुसरीकडे

कामाला जाऊन मिळालेल्या मजुरीच्या उत्पन्नातून खंडाची रक्कम द्यावी लागते. तसेच मोठे शेतकरी खंडाने शेती करणाऱ्यांना निकृष्ट किंवा कमी प्रतीचे, अत्यंत लहान-लहान आकाराचे व दूरवर विखुरलेले जमिनीचे तुकडे देतात. त्यामुळे खंडाने शेती करणाऱ्या आदिवासींना खंडाच्या शेतीपासून फारसे उत्पादन मिळत नाही.

### 5.2.3 वन खात्याच्या जागेत शेती करणाऱ्या आदिवासींच्या समस्या

आदिवासी वन खात्याच्या (फॉरेस्ट विभागाच्या) जंगलातील मोकळ्या जागेत घुसून शेती करतात. यास आदिवासींचे सरकारी जागेवरील अतिक्रमण असेही म्हणतात. दारिद्र्य आणि उपासमार हे प्रमुख घटक अतिक्रमणास जबाबदार आहेत. आदिवासी कसत असलेले वन खात्याच्या मालकीच्या जागेतील जमिनीचे तुकडे जंगलात, डोंगरात किंवा डोंगराच्या चढ-उतारावर सर्वत्र विखुरलेले असून ते तुकडे आकाराने अत्यंत लहान आहेत. अर्धा गुंठा किंवा त्यापेक्षा ते लहान आकाराचे आहेत. या तुकड्यात वरई, नागली, भात अशी पिके आदिवासी घेतात. वन खात्याच्या जागेत शेती करणाऱ्या आदिवासींना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. उदाहरणार्थ, हे जमिनीचे तुकडे अडचणीच्या व असुरक्षित ठिकाणी असतात. जीव धोक्यात घालून शेती करावी लागते. वन खात्याच्या कर्मचाऱ्यांना लाच दिली नाही तर ते आदिवासींकडील कोयते, कुऱ्हाडी व शेतीची इतर साधने जप्त करतात. तसेच वन शेतीतून वर्षातील जेमतेम एक ते दोन महिनेच उपजीविका होईल एवढेच धान्य आदिवासींना मिळते. कारण जंगलातील जमिनीचे तुकडे आकाराने अत्यंत लहान म्हणजे मृगजे एक गुंठ्यापेक्षाही लहान असतात. तसेच निकृष्ट व खडकाळ असतात. त्यामुळे भुकेचा प्रश्न आदिवासींची पाठ सोडत नाही.

## 5.3 शोधनिबंधाचे प्रमुख निष्कर्ष

या शोधनिबंधाचे प्रमुख निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

1. गरीबी, कायद्याचे अज्ञान, अन्य आदिवासींचे अनुकरण इत्यादी कारणारमुळे आदिवासी वन खात्याच्या किंवा सरकारच्या जागेत अतिक्रमण करुन शेती करतात. भूमिहीन आदिवासींबरोबरच सीमांत शेतकरी सुद्धा जंगलातील जमीन साफ सूफ करुन शेती करतात.
2. दुसऱ्याची शेती जमीन खंडाने कसणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाणही मोठे असून गरिबी हे त्यामागचे प्रमुख कारण आहे. भूमिहीन आदिवासींबरोबरच सीमांत व लहान शेतकरीही खंडाने जमीन कसतात.
3. सीमांत आणि लहान आदिवासी शेतकरी कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते 78.09 टक्के एवढे आहे. 6 ते 10 एकर शेती असणाऱ्या मध्यम शेतकरी कुटुंबांचे प्रमाण 11.41 टक्के आहे. तर 11 एकर व त्यापेक्षा जास्त शेतजमीन असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण 10.5 टक्के एवढे अल्प आहे.
4. प्रति कुटुंब सरासरी मालकीचे भू क्षेत्र 5.52 एकर इतके असून एकरी 25 ते 35 टक्के

जमीन नापीक असल्याने लागवडी खाली नाही.

5. शेतीपासूनचे प्रति कुटुंब वार्षिक सरासरी उत्पन्न 6853.75 रुपये असून प्रति कुटुंब शेतीचा वार्षिक सरासरी खर्च 4454.94 रुपये आहे. शेतीपासूनचे प्रति कुटुंब निव्वळ वार्षिक सरासरी उत्पन्न 2398.81 रुपये एवढे आहे. शेतीपासून वेगवेगळ्या आदिवासी जमातींना मिळालेले उत्पन्न कमी-जास्त आहे.

6. आदिवासी शेतकऱ्यांचे दर एकरी सरासरी वार्षिक उत्पन्न 1498.67 रुपये एवढे आहे. कृषी उत्पादनाचा दर एकरी सरासरी वार्षिक खर्च 974.13 रुपये इतका आहे. दर एकरी निव्वळ वार्षिक उत्पन्न 524.54 रुपये एवढे आहे.

7. दर एकरी सरासरी उत्पन्नापेक्षा दर एकरी सरासरी खर्च कमी असला तरी आदिवासींची शेती फायद्याची ठरत नाही. कारण आदिवासींना शेतीपासून मिळणारे एकूण उत्पादन किंवा उत्पन्नच एवढे अपुरे आहे की त्यातून बहुसंख्य आदिवासी शेतकरी कुटुंबांची 3-4 महिनेसुद्धा उपजीविका होत नाही.

8. अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील तांदूळ,नागली,वरई या अन्नधान्यांची प्रति हेक्टर कृषी उत्पादकता 5.24 क्विंटल एवढी अल्प आहे. भारताची तांदळाची प्रति हेक्टर उत्पादकता 1998-99 मध्ये 19.28 क्विंटल इतकी होती. निकृष्ट व खडकाळ जमीन, खते व सुधारित बियाणांच्या वापराचा अभाव इत्यादी विविध कारणांमुळे आदिवासींच्या शेतीची उत्पादकता कमी आहे.

9. शेती कर्जाची गरज असूनही शेतीचे कर्ज न काढलेल्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते 69.49 टक्के इतके आहे. थकबाकीची किंवा जप्तीची भीती वाटणे म्हणजेच कर्ज परत फेडीची क्षमता नसणे, दुकानदार व कर्मचारी इ. बिगर संस्थात्मक घटकांकडून पुरवण्यात येणाऱ्या कर्जावरील व्याजाचे मोठे दर इत्यादी कारणांमुळे शेती कर्जाची गरज असूनही बहुसंख्य आदिवासी शेतकरी शेतीसाठी कर्ज काढत नाहीत.

10. शेतीचे कर्ज काढलेल्या 54 कुटुंबांपैकी 30 कुटुंबे (55.55 टक्के) थकबाकीदार आहेत. शेती कर्जाच्या स्त्रोतानुसार विचार करता बँकेचे कर्ज थकलेल्या कुटुंबांचे प्रमाण 100 टक्के आहे. तर सहकारी संस्थांचे कर्ज थकलेल्या कुटुंबांचे प्रमाण 84.84 टक्के आहे. दुकानदार, बिगर आदिवासी कर्मचारी यांच्याकडून शेतीचे कर्ज काढलेल्या सर्व कुटुंबांनी मुदतीत सर्व कर्ज भागविले असून थकबाकीदार कुटुंबांचे प्रमाण शून्य आहे. सावकारांचा जेवढा दबदबा असतो तेवढा बँकांचा व सहकारी संस्थांचा नसतो. त्यामुळे बँका व सहकारी संस्थांचे कर्ज वेळेत परत करण्याला आदिवासी महत्व देत नाहीत.

11. दुकानदार व इतर व्यक्तींकडून शेतीसाठी पैशाच्या स्वरुपात घेतलेल्या कर्जाची

परतफेड आदिवासींना धान्यांच्या स्वरुपात करावी लागते. या पद्धतीस पोत्यावर किंवा वरीवर कर्ज असे म्हणतात. या पद्धतीने कर्ज काढणाऱ्या आदिवासी कुटुंबांना आपले धान्य खुल्या बाजारात विकता येत नाही. त्यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते.

12. आदिवासींची शेती ही उपजीविकेची किंवा उदरनिर्वाहाची शेती असून शेतीवर बहुसंख्य आदिवासी शेतकऱ्यांची 3 ते 4 महिनेच कशीबशी उपजीविका होते.

13. सीमांत शेतकरी स्वतःच्या शेतात स्वतः राबतात. त्यांना मजुरांची टंचाई भासत नाही. परंतु शेतकऱ्यांना मात्र मजुरांची मोठी टंचाई भासते. कारण काही भूमिहीन आदिवासी मजूर परगावी अधिक मजुरी मिळते म्हणून शेती हंगामाच्या किंवा लावणीच्या काळात सुद्धा परगावी स्थलांतर करतात.

14. खाजगी क्षेत्राकडून किंवा व्यापाऱ्यांकडून आदिवासी शेतकऱ्यांची होणारी फसवणूक आणि आर्थिक शोषण थांबविण्यासाठी शासन आदिवासी विकास महामंडळामार्फत आदिवासी भागात एकाधिकार योजना राबविते. परंतु महामंडळाचे खरेदीचे दर आदिवासी शेतकऱ्यांना खूपच कमी वाटतात. व्यापारी त्यापेक्षा अधिक दर द्यावयास तयार असतात. परंतु आदिवासींना व्यापाऱ्यांना आपला माल विकता येत नाही.

### 5.4 आदिवासी शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांच्या निराकरणासाठी काही शिफारशी

आदिवासी शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांच्या निराकरणासाठी प्रस्तुत अभ्यासकाने काही शिफारशी खालीलप्रमाणे सुचवल्या आहेत.

**1. पिकांवरील किडीबाबत प्रबोधन करणे**

पिकावर पडणाऱ्या किडीमुळे उत्पादनात मोठी घट होते. किडीमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी ज्या आदिवासी शेतकऱ्यांना कीटकनाशके फवारणे आवडत नाही किंवा ज्यांना कीटकनाशकांचे महत्त्व पटलेले नाही त्यांचे या संदर्भात प्रबोधन केले पाहिजे. तसेच वाजवी किंमतीत किंवा शेतकऱ्यांना खरेदी करणे परवडेल एवढे अनुदान कीटकनाशक औषधावर सरकारने द्यावे.

**2. शेतीतील गुंतवणूक वाढावी यासाठी प्रयत्न करणे**

आदिवासीमध्ये जे काही सधन किंवा मोठे शेतकरी आहेत त्यांना शेतीपासून वाढावा मिळतो. परंतु बहुसंख्य सधन शेतकरी शेतीतील वाढाव्याची शेतीच्या विकासासाठी गुंतवणूक करत नाहीत. जे काही शेतकरी अशी गुंतवणूक करतात त्यांच्या गुंतवणूकीचे प्रमाण खूपच कमी आहे. म्हणून शेतीपासून अधिकाधिक उत्पन्न मिळावयाचे असेल तर शेतीपासून मिळालेल्या वाढाव्यापैकी जास्तीत जास्त रक्कम शेतीत गुंतवली पाहिजे. यासाठी आदिवासींचे प्रबोधन करणे किंवा त्यासाठी त्यांना प्रवृत्त करणे आवश्यक आहे.

**3. सीमांत, अल्प भूधारक शेतकऱ्यांना बिनव्याजी बियाणे पुरवावे: –**

सीमांत आणि अल्प भूधारक शेतकऱ्यांना मोठ्या शेतकऱ्यांकडून भरमसाठ व्याजाने कर्ज द्यावे लागते. त्यामुळे सुद्धा शेती परवडत नाही. म्हणून शासनाने अशा शेतकऱ्यांना बिनव्याजी बियाणे पुरवण्याची व्यवस्था करावी.

**4. बंधारे, तलाव, विहीरी यांच्या सुविधेत वाढ**

सरकारने आदिवासी भागात शक्य तेथे जास्तीत जास्त बंधारे, धरणे, तलाव आणि शेतकऱ्यांच्या शेतीत विहीरी बांधून देण्याचा कार्यक्रम कायम किंवा सतत राबवावा. त्यामुळे ओलिताखालील जमिनीचे प्रमाण वाढेल आणि पिकांना पुरेसे पाणी मिळून उत्पादन वाढेल. आदिवासी शेतकऱ्यांची आर्थिक स्थितीही त्यामुळे सुधारेल.

**5. कर्ज देणाऱ्या संस्थांची जबाबदारी**

बँकाकडून कर्ज घेतले आणि पीक व्यवस्थित आले नाही तर बँक किंवा सहकारी संस्था शेतजमीन किंवा घर जप्त करतील अशी भीती आदिवासींना वाटते. यासाठी आदिवासीमध्ये शेतीतील धोक्यांना तोंड देण्याची क्षमता निर्माण केली पाहिजे. आदिवासींना कर्ज पुरवणाऱ्या सहकारी संस्था आणि बँका यांनी या कामी पुढाकार घेतला पाहिजे. केवळ कर्ज देणे आणि वसूली करणे यापुरतेच वित्तीय संस्थांनी आदिवासींशी संबंध ठेऊ नयेत. तर त्यांनी आदिवासींचे मित्र व मार्गदर्शक अशी भूमिका बजावली पाहिजे. त्याशिवाय कृषी उत्पादकताही वाढणार नाही आणि आदिवासी शेतकऱ्यांची स्थितीही सुधारणार नाही.

**6. आदिवासींना लागवडीसाठी बिनव्याजी कर्ज द्यावे**

सीमांत, अल्प भूधारक, मध्यम शेतकऱ्यांना सरासरी 600 रुपयांपासून 3000 रुपयांपर्यंत लागवडीसाठी किंवा मजुरांची मजुरी भागविण्यासाठी कर्ज काढावे लागते. एवढ्या अल्पशा कर्जासाठी त्यांना सावकाराच्या पाशात अडकून पडावे लागते. तसेच मोठ्या शेतकऱ्यांकडील काही महिने वेठबिगाराचे जिणे जगावे लागते. म्हणून अशा गरीब आदिवासी शेतकऱ्यांना लावणीच्या काळात लागवडीसाठी शासनाने बिनव्याजी कर्ज पुरवावे. त्यामुळे सर्वसामान्य आदिवासी शेतकऱ्यांना सावकारांच्या दारात उभे रहावे लागणार नाही व कर्जाऊ रकमेच्या तिप्पट, चौपट किंमतीचा शेतमालही त्यांना द्यावा लागणार नाही.

**7. इतर शिफारशी**

आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतीचा विकास व्हावा आणि आदिवासी शेतकऱ्यांची स्थिती सुधारावी यासाठी काही शिफारशी खालीलप्रमाणे सुचवल्या आहेत.

1. आदिवासी शेतकऱ्यांना अल्प किंमतीत सुधारित अवजारे उपलब्ध करून देणे.
2. संकरित बियाणांच्या वापराचे महत्त्व पटवून देणे.
3. आदिवासींच्या खडकाळ जमिनीचे रुपांतर सुपीक जमिनीत करण्यासाठी शासकीय पातळीवरुन प्रयत्न करणे.
4. आदिवासी भागात खास हरित क्रांती घडवून

आणणे. त्यासाठी कृषी, सहकार, बँकींग, कृषी विद्यापीठातील शास्त्रज्ञ, आदिवासी समाजाचे अभ्यासक यांची कायम स्वरुपी समिती शासनाने तयार करणे व तिला कार्यरत ठेवणे आवश्यक आहे.

5. शेतीच्या विकासाच्या सर्व योजना आदिवासी शेतकऱ्यांपर्यंत पोहचवणे.

6. आदिवासी शेतकऱ्यांना शेतीसाठी दिल्या जाणाऱ्या अनुदानात वाढ करणे.

7. शेती पूरक व्यवसाय किंवा जोड धंद्यास प्रोत्साहन देणे, त्यासाठी आर्थिक मदत देणे व त्या व्यवसायातील मालाच्या खरेदीची हमी देणे.

8. आदिवासी भागात रस्ते, रेल्वे, वीज इत्यादी पायाभूत सुविधांची संख्यात्मक व गुणात्मक वाढ घडवून आणणे.

9. आदिवासींनी त्यांच्यासाठी असलेल्या योजनांना सकारात्मक प्रतिसाद द्यावा, योजनांचा लाभ घ्यावा यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांच्या लाचखोर वृत्तीला पायबंद घालणे.

10. कातकरी, ढोरकोळी इत्यादी सारख्या अति मागासलेल्या आदिवासी जमातीमध्ये शेतीची आवड निर्माण व्हावी यासाठी पोषक वातावरण तयार करणे.

11. विवाहासारख्या अनुत्पादक बाबींवरील खर्च कमी करुन तो पैसा आदिवासींनी शेतीत गुंतवावा यासाठी विविध प्रकारे प्रयत्न करणे.

12. बिगर आदिवासी भागातील सीमांत शेतकऱ्याला जेवढे उत्पादन प्राप्त होते जवळपास तेवढेच उत्पादन आदिवासी भागातील मध्यम आणि मोठ्या आदिवासी शेतकऱ्याला मिळते. कारण आदिवासी भागातील जमीन निकृष्ट आणि खडकाळ आहे. म्हणून आदिवासी भागातील कोरडवाहू मध्यम आणि मोठ्या शेतकऱ्यांनासुद्धा सीमांत शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सवलती सरकारने द्याव्यात.

**समारोप**

आदिवासी भागातील शेतजमीन खडकाळ किंवा दगडाळ आहे म्हणून अशा जमिनीची उत्पादकता वाढणारच नाही हे चुकीचे आहे. जगाचा आर्थिक इतिहास चाळला असता अनेक देशांनी खडकाळ जमिनी प्रयत्न करुन सुपीक बनवल्याचे दिसून येते. भारतासारख्या देशात तर खडकाळ किंवा मुरमाड जमिनी कसदार बनविण्याचा चमत्कार दाखवणाऱ्यांची संख्या कमी नाही. आदिवासी भागातही असे चमत्कार घडू शकतात. त्यासाठी आदिवासींना तयार केले पाहिजे. जेथे जेथे असे प्रयोग यशस्वी झाले आहे तेथील शेतकऱ्यांचे, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आदिवासींना मिळवून देणे आवश्यक आहे. आपला आदिवासी अत्यंत कष्टाळू, प्रामाणिक आणि मेहनती आहे. अत्यंत प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीतही तो टिकून आहे. नापीकीला, कर्जबाजारीपणाला कंटाळून बिगर आदिवासींप्रमाणे महाराष्ट्रातील आदिवासींनी आत्महत्या केल्याचे ऐकिवात नाही. अशा

प्रामाणिक आणि गरीब आदिवासी शेतकऱ्यांसाठी सरकारला बरेच काही करता येईल. आदिवासी शेतकऱ्यांना थोडी आर्थिक मदत आणि त्याच्या जोडीला थोडे मार्गदर्शन मिळाले तर त्याची परिस्थिती खूपच सुधारु शकेल.

**संदर्भ**


1. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (प्रमुख संपादक), मराठी विश्वकोष, खंड-2, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथम प्रकाशन, 1976, पृ.क्र. 29
2. नायर पी.टी.के., अॅन इंट्रॉडक्शन टू रुरल अॅन्ड ट्रायबल सोशिओलॉजी, शेठ पब्लिशर्स, बॉम्बे, 1982


**इतर संदर्भ**


1. इंगळे जयवंत शंकरराव, आदिवासींची आर्थिक आणि सामाजिक स्थिती, लीला-शंकर प्रकाशन, इस्लामपूर (सांगली), जुलै 2009
2. इंगळे जयवंत शंकरराव, महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना ऑगस्ट 2008 मध्ये पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला प्रबंध (Thesis)


---

मराठी अर्थशास्त्र परिषद

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रसिद्ध झालेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथास रु. 1000/- चे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. 1 जानेवारी 2009 ते 31 डिसेंबर 2009 या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथांच्या लेखकांना यंदाच्या स्पर्धेत सहभागी होता येईल. स्पर्धेचे नियम व अटी इत्यादींसाठी डॉ. अनिल सूर्यवंशी, कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, 'गोदाई' शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजी नगर, बार्शी, जि. सोलापूर 413 411 (मो.) 9011339906 यांच्याशी संपर्क साधावा. विहित नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या 4 प्रतिसह, कार्यवाहांकडे 31 ऑगस्ट 2010 पर्यंत पाठवाव्यात.

**अनिल सूर्यवंशी**
कार्यवाह – खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

# पॉल क्रुगमनचे नव आर्थिक भूगोल

**प्रशांत हरमकर**
**मीरा आळशी**
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.
भ्रमणध्वनी : 9420633128

**मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशातील चर्चासत्रासाठी सादर केल्या जाणाऱ्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधासाठी कै. ग. प्र. पिंपरकर आणि कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे 'डॉ. अमर्त्य सेन पारितोषिक' दिले जाते. माळेगाव, ता. बारामती, जि. पुणे येथे संपन्न झालेल्या तेहतिसाव्या राष्ट्रीय पातळीवरील अधिवेशनातील पारितोषिकप्राप्त शोधनिबंध.**

**प्रस्तावना :**

व्यापाराची संरचना आणि आर्थिक व्यवहाराची स्थाननिश्चिती यांच्या विश्लेषणाबद्दल पॉल क्रुगमन यांना 2008 चे अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक देण्यात आले. अर्थव्यवस्था ज्या प्रकारे विकसित होत आहे त्यानुसार आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्वरूप सुध्दा बदलत आहे. व्यापार दोन वस्तूमधील दोन देशांमध्ये होण्याऐवजी एकाच उद्योगातील विविध उद्योगसंस्था अथवा कंपन्यांमध्ये होतो. जसे स्वीडन जर्मनीला व्होल्वो मोटार निर्यात करतो तर जर्मनी स्वीडनला बी.एम.डब्यु. मोटारकार निर्यात करते. या प्रकारच्या व्यापारास उद्योगांतर्गत व्यापार म्हणतात. त्यामुळे जर्मनीला किंवा स्विडनमधील उपभोगत्यांना दोन्हीपैकी पसंतीची मोटार विकत घेता येते या प्रकारच्या व्यापाराचे स्पष्टीकरण पारंपरिक व्यापार सिद्धांत करू शकत नाही. पॉल क्रुगमन यांनी 1979 मध्ये जर्नल ऑफ इंटरनॅशनल एकॉनॉमिक्स या संशोधन पत्रिकेत समान देशातील व्यापाराचे स्पष्टीकरण करणारा लेख प्रसिद्ध केला. त्यांनी असे गृहीत मानले की, उपभोक्ते विविध ब्रॅण्डची पसंती

दर्शवितात. उत्पादन हे उत्पादनापासून मिळणाऱ्या लाभाशी जोडलेले असते. या दृष्टिकोनातून व्होल्वो आणि बी.एम.डब्ल्यू. मोटारीचे उदाहरण घेतले. विशिष्ट ब्रँडचे उत्पादन करतात तो वेगवेगळ्या वस्तूचे उत्पादन करीत नाही. आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांतामध्ये उपयोगातील विविधता आणि उत्पादनातील उत्पादनमान या बाबी क्रुगमन यांनी मांडल्या याचा अंतर्भाव वेगवेगळ्या सिद्धांतात करण्यास सुरुवात झाली अशा व्यापार सिद्धांतांना न्यू ट्रेड थिअरी किंवा नव व्यापार सिद्धांत असे म्हणतात.

**आर्थिक भूगोल- पॉल क्रुगमन याचे विवेचन :**

आंतरराष्ट्रीय व्यापार उत्पादनावरून निश्चित होतो. त्याकरिता ज्या भागात उत्पादन चालू आहे. ते उत्पादन फायदेशीर ठरून तेथे आणखी उत्पादनांसाठी प्रयत्न केले जातील. म्हणजेच जगभर वस्तूच्या उत्पादनाचा प्रसार न होता एखाद्या विशिष्ट ठिकाणी, विशिष्ट देशात, प्रदेशात अथवा शहरामध्ये केंद्रित होते. अशा केंद्रित झालेल्या ठिकाणी लोकसंख्या एकवटली जाते. त्या भागात लोकसंख्येचे घनत्व जास्त राहते. लोकांची उत्पन्नपातळी वाढते. याबाबतचे विश्लेषण 1911 मध्ये पॉल क्रुगमन यांनी जर्मन ऑफ पोलटिकल एकॉनॉमीमध्ये Increasing return and Economic Geography या लेखामध्ये केले.

जागतिक व्यापारामध्ये केवळ अन्न, धान्य व खाद्यपदार्थ यांचीच आयात- निर्यात होत नाही तर जेट विमानासारख्या वस्तूंचाही आयात निर्यातीमध्ये समावेश असतो. जगात फार कमी ठिकाणी जेट विमानाचे उत्पादन होते. कारण त्यासाठी उत्पादनाशी निगडीत असंख्य घटक मोठ्या प्रमाणावर एकत्र येणे गरजेचे असते. जेट विमानाचे उत्पादन विशिष्ट भौगोलिक ठिकाणी होते. ज्या देशांमध्ये उत्पादन होते त्या देशातून विमानांची निर्यात होते व इतर देश विमानाची आयात करतात.

विमाने, मशीन टूल्स, मोटारी यांचे उत्पादन कोठे होते याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न पॉल क्रुगमन यांनी केला ज्या उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक साधनांची गुंतवणूक लागते. अशी अनेक उत्पादने असतात त्यामुळे कोणत्याही देशात असे मोठे कारखाने असू शकतात. बरेचदा ते योगायोगामुळे निघतात. तेव्हा तेथे का व कोणामुळे निघाले ते फार महत्त्वाचे नसते. मात्र व्यापाराचे स्वरूप (Pattern) कसे आहे याला महत्त्व असते. सामान्यपणे कोणत्या देशात काय उत्पादन होते हे उपलब्ध नैसर्गिक साधने, हवामान यावरून ठरते. त्याबरोबरच आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणात होते. विशेषीकरण होते त्यानुसार समानता असलेल्या देशात व्यापार वाढतो. नैसर्गिक संसाधने जास्त प्रमाणात असणाऱ्या देशापेक्षा मानवी कौशल्ये हस्तगत केलेल्या देशामध्ये व्यापाराचे प्रमाण मोठे असते. याचा उल्लेख पॉल सॅम्युलसन यांनी सुध्दा केलेला आहे.

आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये घटकाची चलता (factor mobality) महत्त्वाची आहे. निर्माणी उद्योग आणि श्रमिक मुक्तपणे हालचाल करायला लागतात. तेव्हा ते केंद्रापासून दूर जातात शेतकऱ्यांच्या जवळपास सरकायला लागतात. समजा तसे झाले तर श्रमिकांसाठी करावा लागणारा

अन्नधान्याच्या वाहतूक व्यय कमी होतो. क्रेते जवळ असल्यामुळे उत्पादित झालेल्या वस्तू दूरच्या प्रदेशात जात नाही किंवा निर्यात होण्याची गरज कमी होते. त्यावेळी उत्पादन पेढ्या लहान असतात. पण उत्पादन पेढ्याचे आकारमान वाढते तेव्हा साधनाचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. उत्पादनाचा प्रसार होण्याऐवजी उत्पादन केंद्रित होते. हेन्री फोर्ड यांच्या मॉडेल टि या मोटार उत्पादनाचे उदाहरण घेतले तर शंभर वर्षापूर्वी फोर्ड यांना भौगोलिक दृष्ट्या उपभोगत्यांच्या जवळ म्हणजेच अनेक ठिकाणी मोटार उद्योगाची स्थापना करणे सहज शक्य होते पण त्या ऐवजी वाहतुकीवर मोठा खर्च करून मिशिगन येथे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणे सोईचे वाटले. काही विशिष्ट ठिकाणी उत्पादनाचे केंद्रीकरण होते तेव्हा उत्पादक कोणते स्थान निवडतात तर जेथे सर्वात मोठी बाजारपेठ आहे, जेथे अनेक प्रकारचे उत्पादन घेतल्या जाते असेच ठिकाणी उत्पादनासाठी निवडले जाते. अशा ठिकाणी केंद्राकडे येऊ पाहणारे व केंद्रापासून दूर जाणारे घटक प्रबळ असतात. येथे होणारी आर्थिक क्रिया संमिश्र असते. काही प्रदेशांना ऐतिहासिक कारणामुळे निर्माणी उद्योगाचा वारसा लाभलेला असतो. त्यामुळे उत्पादक तेथे आकर्षित होतात. तेथे दाट असा आर्थिक गाभा तयार होतो. तर त्याभोवतीचे प्रदेश परिघावरील म्हणून कार्यप्रवण होतात. अमेरिकेच्या दक्षिणेकडील राज्यात उद्योगाचा स्थलांतरण होण्याच्या काळापर्यंत म्हणजे जवळपास शंभर वर्ष न्यूइंग्लंड ते मध्य अमेरिकेपर्यंत अतिशय अरुंद पट्ट्यामध्ये दाटीवाटीने निर्माणी उद्योगाची वाढ झाली बोस्टन, डेट्राइट शिकोगो येथे जवळपास सहा कोटी लोक पूर्व किनाऱ्याजवळील अरुंद पट्ट्यात राहतात.

याच तत्त्वाच्या आधारे विशिष्ट उत्पादनाचे विशिष्ट प्रदेशात केंद्रीकरण का होते याची कारण मीमांसा करता येते. तसेच विशेष कौशल्ये असणारे श्रमिक व विशिष्ट वस्तूंचे बाजार कसे तयार होतात हे समजवून घेता येते. सिलिकॉन व्हॅली येथील माहिती तंत्रज्ञान व संगणक उद्योग सुरू होण्यास दोन व्यक्ती कारणीभूत ठरल्या. ह्युलेट आणि पॅकार्ड (एच.पी. संगणक कंपनीचे संस्थापक) या दोघांनी स्वत:च्या मोटारीच्या गॅरेजमध्ये हा उद्योग सुरू केला. न्युयॉर्क हे शहर अठराव्या शतकात व्यापारासाठी खणलेल्या कालव्यामुळे उदयाला आले.

**नव आर्थिक भूगोल :**

नवीन व्यापार सिद्धांतामध्ये (New Trade Theory) नैसर्गिक बाह्य वृद्धीचा संबंध आर्थिक भूगोलाशी आहे. नव व्यापार सिद्धांतामध्ये जुन्या व्यापार सिद्धांताप्रमाणे श्रमाची नैसर्गिक देणगी मानलेली आहे. श्रम या घटकाला उच्च वेतन दर स्थलांतरण करण्यास आकर्षित करतात. विकसित देश श्रमिकांना उच्च वेतन दर आणि परिवहन व्यय करून उत्पादनाचे केंद्रीकरण करतात. याचा परिणाम देशीय बाजारावर (Domestic market) होतो. या प्रक्रियेच्या परिणामाचे विवेचन नव आर्थिक भूगोलामध्ये क्रुगमनने केलेले आहे.

क्रुगमनचे नव आर्थिक भूगोलाचे प्रारूप द्विक्षेत्रिय (Two regions) आहे. तंत्रज्ञानाची माहिती, श्रमाची देणगी, कृषी क्षेत्राचे सह अस्तित्व, वाढता परतावा दर (Increasing to return to scale) आणि

उद्योगामध्ये अपूर्ण स्पर्धा असते. आंतरउद्योग व्यापार कारखानदारी वस्तूमध्ये होत असल्यामुळे परिवहन व्यय गृहीत मानलेला आहे. त्याचबरोबर उद्योगातील श्रमिक एका प्रदेशाकडून दुसऱ्या प्रदेशाकडे स्थलांतरण करतात असे सुध्दा गृहीत मानले आहे. उदा. दक्षिणेकडून उत्तरेकडे श्रमिकांचे स्थलांतरण होते.

पुन:र्स्थानिकीकरणाचा व्यय उत्तरेकडील बाजारामध्ये होतो आणि करार दक्षिणेकडील बाजारात होतात. त्यामुळे पेढ्या उत्तरेकडे वळतात. हा देशीय बाजाराचा परिणाम आहे. तसेच पश्चगामी श्रृंखला परिणाम आहे. प्रत्येक पेढीचे उत्पादन भिन्न प्रकारचे असते. उत्तरेकडील आकर्षक वेतन दर प्राप्त झाल्यामुळे दक्षिणेकडील स्थलांतरित श्रमिक बचत करू शकतात. परिवहन व्यय वस्तूच्या मात्रावर अवलंबून आहे. तो उत्तरेकडे झालेल्या स्थालांतरणांचा परिणाम आहे. यालाच अधोगामी श्रृंखला परिणाम असे म्हणतात. हे दोन्ही परिणाम स्पष्ट आणि सबळपणे जाणवतात. उत्तरेकडे पेढ्यामध्ये श्रमिक आधिक्याने आकर्षित होतात. पेढ्याची गर्दी उत्तरेकडे झाल्यामुळे स्थानिक स्पर्धा वाढते. दक्षिणेमध्ये शेतकरी सामूहिक निर्माणी वस्तूची मागणी करतात. या मागणीचा फैलाव होऊन प्रादेशिक पातळीवरून औद्योगिकिकरण विस्कळीत होते. उत्तरेकडे औद्योगिकिकरण तर दक्षिणेकडे औद्योगिकिकरणाचा अभाव यामुळे असमानता निर्माण होते. हा पश्चगामी परिणाम दक्षिणेकडे घडून येतो.

दोन्ही प्रदेशात स्थानिक पातळीवर स्थिर संतुलन मानले आहे. याकरिता श्रमिकाचे स्थालांतरण आधिक्याने होणार नाही याचा परिणाम उत्तर व दक्षिणेकडील स्थिर संतुलन प्रस्थापित होण्यावर होतो. न्यून परिवहन व्यय असेल तर प्रभाव नियंत्रित करता येतो. श्रमिकांच्या स्थलांतरणामुळे निर्माणी उद्योगाचे केंद्रीकरण उत्तरेकडे होते. उत्तरेकडे अंतिम: वास्तविक मजुरी दर उच्च होतात. कारण निर्माणी उद्योगातील वस्तूवर होणारा परिवहन व्यय श्रमिक न करता उपभोक्ते करीत असतात गतिविहीन असणारे शेतकरी निऔद्योगिकीकरणामुळे दक्षिणेमध्ये वाईट स्थितीत येतात. कारण त्यांना श्रमिकांच्या मागणीचा लाभ उचलता येत नाही तर निर्माणी वस्तूना उच्च किंमत द्यावी लागते अशा वस्तूंची आयात दक्षिणेकडे होते.

या प्रारूपामध्ये कृषिक्षेत्र व औद्योगिक क्षेत्राचे सहअस्तित्व असण्याचे कारण औद्योगिक क्षेत्र कृषी क्षेत्रावर अवलंबून असल्याचे मानले आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रातील श्रमिकांचे स्थानांतरण औद्योगिक क्षेत्रात होते त्यामुळे उत्तरेकडे केंद्रीकरण होते.

पॉल क्रुगमन यांनी मांडलेले प्रारूप केंद्र परिघ स्वरूपाचे आहे. श्रमिकांच्या आंतर प्रादेशिक स्थलांतरणांमुळे प्रादेशिक ध्रुवीकरणच्या (Regional Polarization) प्रक्रियेचे वर्णन करता येते. आंतरराष्ट्रीय ध्रुवीकरणाच्या विश्लेषणाचा विस्तार क्रुगमन आणि व्हेनेबल यांनी केलेला आहे. श्रमिक गतिहीन असले तरी सुद्धा श्रमिकांचे निर्माणी उद्योग आणि कृषी क्षेत्रामध्ये स्थलांतरण होईल. याकरिता असे मानले आहे की, त्यांच्या स्वत:च्या उत्पादनामधील आदानाच्या आंतर मिश्रित्तचा उपयोग निर्माणी उद्योगातील वस्तूच्या विविधतेत

होतो त्यामुळे उत्पादकता वाढून विविध प्रकारच्या उत्पादनाची निर्मिती करता येते. पेढ्यांना मोठ्या प्रदेशामध्ये प्रस्थापित होण्यास उत्तेजन मिळते कारण आंतरमिश्रित वस्तू (Intermediate goods) विस्तृत मर्यादेपर्यंत उत्पादन करायला सहाय्य करू शकतात. शिवाय आंतरमिश्रित वस्तूच्या मागणी व पुरवठ्यात वाढ होते. उत्तरेमध्ये आधिक्याने पेढ्या आकर्षित होतात. उद्योगाचे स्थानिकीकरण उत्तरेकडे होते तर निऔद्योगिकरण दक्षिणेकडे होते याचे कारण मजुरी दरातील तफावत सुद्धा आहे.

**वाढीव परतावा व आर्थिक भूगोल :**

औद्योगिकरण गाभा आहे तर कृषी क्षेत्र परिघ आहे. निर्माणी उद्योगाची निर्मिती व स्थाननिश्चिती मोठ्या मागणीमुळे होते तसेच निर्माणी उद्योगाचे स्थान, गाभा परिघाचे स्वरूप, परिवहन व्यय, आर्थिक मापके व राष्ट्रीय उत्पन्नामध्ये निर्माणी वस्तूचा वाटा यावर अवलंबून असते.

व्हॉन थुनेनचे आर्थिक भूगोलाचे प्रारूप नागरी अध्ययन व भूमी उपयोगातील बदलाशी संबंधित आहे तर हॉटेलींगने स्थानिक स्पर्धेला महत्त्व दिलेले आहे. आर्थिक भूगोलाचा विचार करतांना आर्थिक सिद्धातांना महत्त्व देणे आवश्यक आहे कारण आर्थिक भूगोलाच्या घटकांनी वास्तविक जगातील अर्थव्यवस्थेच्या वैशिष्ट्यांना तडाखा दिलेला आहे. आर्थिक प्रारूपामध्ये हे घटक महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात. आर्थिक भूगोलाचे अध्ययन आर्थिक व्यवसायाशी संबंधित आहे. यापूर्वी आर्थिक भूगोलाच्या अध्ययनाबाबत बरीच निष्क्रियता होती असे क्रुगमन यांचे मत आहे.

या प्रारूपामध्ये स्थानिकीकरणाच्या प्रश्नावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. काही प्रदेशामध्येच निर्माणी उद्योग का आणि कोठे विकसित होतात. इतर त्यासोबत राहणारे अविकसित का राहतात याकरिता निर्माणी उद्योगाचा आधार असलेले भौगोलिक केंद्रीकरणाचे प्रारूप फार सोपेपणाने विकसित केलेले आहे या दृष्टिकोनातून पहावे लागेल. यामध्ये महत्त्वाचा घटक म्हणजे निर्माणी उद्योगाचे केंद्रीकरण एक विशिष्ट स्थानामध्ये होण्याची गरज होय. पण ही गरज नेहमीच पडते असे नाही त्याहीपेक्षा हे अवलंबित्व काही मुख्य परिमापकावर (parameters) अवलंबून असते.

विशिष्ट उद्योग विशिष्ट ठिकाणी विकसित होण्यास पुढाकार घेतात याकरिता त्याच्या बाह्य स्वरूपावर विस्तारीत चर्चा व्हायला पाहिजे. याकरिता आल्फ्रेड मार्शल यांनी मांडलेली बाह्य अर्थव्यवस्थेची मूळ संकल्पना पाहावी लागते. याकरिता मार्शलने तीन कारके मांडलेली आहे. पहिले एखाद्या स्थानांमध्ये अनेक पेढ्यांचे केंद्रीकरण झालेले असते. उद्योगामध्ये श्रमिकांना विशिष्ट कौशल्ये लागतात म्हणून किमान संभाव्यता बेरोजगारीची तर किमान संभाव्यता श्रम तुटवड्याची असते. दुसरे, स्थायिक झालेल्या उद्योग व्यापारेत्तर (Non Tradable) विशेष आदाने उत्पादनाला सहाय्य करू शकतात. तिसरे समूहातील पेढ्यांचे उत्पादन फलन सुयोग्य असते.

बाह्यतेचे गृहीत क्रुगमनने स्वीकारले आहे जो गाभा परिघ संबंधामध्ये पुढाकार घेतो. पैशासंबंधीच्या बाह्य व्यवहारांना सहाय्य करतो.

अपूर्ण स्पर्धा आणि वाढता परतावा पैशाशी संबंधित आहे. पैशाच्या बाह्यतेचे (Pecuniary externality) गृहीत समजावून घेणे आवश्यक आहे. समजा एखाद्या देश दोन प्रकारच्या वस्तूचे उत्पादन करतो. ज्यामध्ये कृषी वस्तू आणि निर्माणी उद्योग आहेत. दोन्ही वस्तूमध्ये भूमी या घटकाचा वापर होतांना स्थिर परताव्याद्वारे उत्पादन होते. पण या प्रारूपामध्ये आधुनिक पद्धतीने भूमीचा वापर होत असल्यामुळे निर्माण उद्योग क्षेत्रामध्ये वाढीव परतावा दर (Increasing return to scale) द्वारे उत्पादन होईल.

निर्माणी उद्योग वस्तूचे उत्पादन कोठे होईल तर ते आर्थिक मापनाद्वारे ठरते. जेथे मोठ्या प्रमाणात मागणी राहील, बाजाराचा परिवहन व्यय किमान राहील आणि इतर स्थानाच्या मानाने ते स्थान मध्यवर्ती राहील. कारण मध्यवर्ती ठिकाणाहून वस्तूची विक्री करणे स्वस्त जाईल. निर्माणी वस्तूंची मागणी कोण करेल, तर ही मागणी कृषी क्षेत्रातून होईल. याबाबतचे विवेचन क्रिस्टल आणि लॉश यांनी केलेले आहे. पण ही मागणी केवळ कृषी क्षेत्रातून न होता निर्माणी उद्योग क्षेत्रातून देखील होईल.

हर्षमनने पश्चगामी श्रृंखला आणि अधोगामी श्रृंखलेस चक्रियतेची निर्मिती (Circularity crated) हे म्हटले आहे. एकोणिसाव्या शतकामध्ये अमेरिकेत निर्माणी उद्योगाचा पट्टा (Belt) निर्माण झाला. तो चक्रीयतेचा परिणाम होता यावर फ्रेड आणि मायरने भर दिलेला आहे. या संदर्भात दोन प्रश्न निर्माण होतात की भौगोलिक केंद्रीकरणाची प्रक्रिया कशा प्रकारची राहील आणि अंतिमत: कारखानदारी वस्तूचे उत्पादन कोठे होईल.

अर्थव्यवस्थेच्या परिमापकावर (Parameters of economy) भौगोलिक केंद्रीकरण अवलंबून राहील. कारखानदारीचे केंद्रीकरण चक्रियतेमुळे निर्माण होऊ शकते. निर्माणी उद्योगामधला रोजगार लोकसंख्येचा परिणाम आहे. त्यामधून मागणी निर्माण होते. वस्तूचा पुरवठा करणारा उच्च परिवहन व्यय, कृषी क्षेत्रामधील सेवाची बाजाराशी असलेली घनिष्ठता यावर अंतिमत: वस्तूचे उत्पादन कोठे होईल ते ठरेल.

निर्माणी उद्योगाच्या निर्मितीमुळे अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर उत्पादन होईल. त्यामुळे समाज कृषीऐत्तर वस्तू व सेवावर मोठ्या प्रमाणात खर्च करेल. कालवे, रेल्वेमार्ग, स्वयंचलित यंत्रामुळे परिवहन व्यय कमी होईल. जो उत्पादनाला एकत्रितपणे जुळवून घेतो. अशा प्रदेशामध्ये नागरी लोकसंख्या असते. उत्पादक या ठिकाणी आकर्षित होतात. त्याचबरोबर वस्तू आणि सेवाची उपलब्धता असते. परिणामत: नागरी लोकसंख्येचे केंद्रीकरण याच प्रदेशामध्ये होते.

**गणितीय द्वि–क्षेत्रीय प्रारूप :**

क्रुगमनने मांडलेले प्रारूप द्वि–क्षेत्रीय आहे. प्रारूपानुसार कृषी क्षेत्र आणि निर्माणी उद्योगाचे क्षेत्र असे दोन आहे. कृषी क्षेत्र स्थिर परताव्याचे क्षेत्र असून निर्माणी उद्योगाचे क्षेत्र वाढत्या परताव्याचे आहे. प्रारूपामध्ये अपूर्ण स्पर्धा मांडलेली आहे. अर्थव्यवस्थेमधील सर्व चलांचा वाटा उपयोगिता फलनामध्ये दिसतो. समीकरण (1) हे उपयोगिता फलन आहे.

$$U = C_M^{\mu} C_A^{1-\mu} \qquad (1)$$

$C_M$ निर्माणी वस्तूचा सरासरी उपभोग आहे तर $C_A$ कृषी वस्तूचा सरासरी उपभोग आहे, निर्माणी उद्योगामध्ये निर्माणी उद्योगामधील खर्चाचा वाटा $\mu$ राहील. हा वाटा म्हणजे मुख्य परिमापक आहे. ज्यावरून प्रदेशाकडे होणारे केंद्रीकरण किंवा विकेंद्रीकरण ठरविल्या जाईल. $C_M$ चे विश्लेषण पुढील समीकरणाद्वारे केलेले आहे.

$$C_M = \left[ \sum_{t=1}^{N} C_1^{(\sigma-1)/\sigma} \right]^{\sigma/(\sigma-1)} \qquad (2)$$

N उत्पादनाची अंतर्गत क्षमता दर्शवितो तर $\sigma > 1$ उत्पादनाची प्रतिस्थापन लवचिकता दर्शवितो. लवचिकता दर्शविणार $\sigma$ परिमापक आहे.

प्रत्येक प्रदेशामध्ये श्रमिकाचा पुरवठा $(1-\mu)/2$ मानलेला आहे. म्हणून प्रदेश १ मधील श्रमिकांचा पुरवठा $L_1$ तर प्रदेश २ मधील श्रमिकांचा पुरवठा $L_2$ राहील म्हणून एकूण श्रमिक $\mu$ राहील.

$$L_1 + L_2 = \mu \qquad (3)$$

निर्माणी वस्तूचे उत्पादन i आहे. ज्यामध्ये स्थिर व्यय व बदलता सीमांत व्यय समाविष्ट आहे. त्यामुळे आर्थिक मापनात वाढ होते.

$$L_{Mi} = \alpha + \beta x_i = \mu \qquad (4)$$

$L_{Mi}$ म्हणजे i उत्पादनामध्ये श्रमिकांचा वापर होय तर $\mu$ म्हणजे वस्तूचे उत्पादन होय.

आपण परिवहन व्ययाकरिता दोन गृहीतके मानलेली आहेत. कृषी उत्पादनाला परिवहन व्यय नसतो. त्यामुळे दोन्ही प्रदेशात कृषी उत्पादनाची किंमत व शेतकऱ्याचे मजुरी दर समान असतात. निर्माणी उद्योग वस्तूसाठी परिवहन व्यय असतो. ज्याला T द्वारे दर्शविले आहे. हा व्यस्त निर्देशांक मानलेला आहे. या परिमापकावर केंद्रीकरण अवलंबून असते.

मोठ्या संख्येने पेढ्या निर्माणी उद्योगामध्ये आहे. परिवहन व्यय हा जास्त आहे. नफा जास्त प्राप्त होण्याच्या दृष्टिकोनातून किंमत ठरविली जाते याकरिता समीकरण

$$p_1 = \left[ \frac{\sigma}{\sigma - 1} \right] \beta \omega_1 \qquad (5)$$

$\omega_1$ हा प्रदेश 1 मधील श्रमिकांची मजुरी दर दर्शवितो तर $\omega_2$ प्रदेश 2 मध्ये मजुरीचा दर दर्शवितो. दोन्ही प्रदेशामधील मजुरीचे दर व उत्पादनाच्या किंमतीची तुलना पुढील समीकरणाद्वारे केलेली आहे.

$$\frac{p_1}{p_2} = \frac{\omega_1}{\omega_2} \qquad (6)$$

निर्माणी उद्योगामध्ये पेढ्याना मुक्त प्रवेश असेल तर नफा शून्य राहील. ते पुढील समीकरणाने दर्शविले आहे.

$$(p_1 - \beta\omega_1)x_1 = \alpha\, \omega_1 \qquad (7)$$

वरील समीकरणाच्या प्रत्यक्षात वापर

$$x_1 = x_2 = \frac{\alpha(\sigma - 1)}{\beta} \qquad (8)$$

पेढ्याच्या उत्पादनाची संख्या व श्रमिकाच्या संख्येचे सापेक्ष प्रमाण पुढील समीकरणाने दर्शविले आहे जो $\sum$ चे विश्लेषण आहे.

$$\frac{n_1}{n_2} = \frac{L_1}{L_2} \qquad (9)$$

**अल्पमुदती व दीर्घमुदती संतुलन :**

अल्प मुदती (short run) संतुलनाचे विश्लेषण करतांना दोन प्रदेशामधील उत्पादनासाठी मागणी कशी आहे याकडे पाहावे लागते. $C_{11}$, म्हणजे प्रदेश 1 मधील उपभोग होय. जो प्रदेश १ मधील उत्पादनाला दर्शवितो. $C_{12}$ प्रदेश 1 मधील उपभोग पण प्रदेश 2 मधील उत्पादनाला दर्शवितो. स्थानिक उत्पादनाची किंमत $P_1$ आहे. तर इतर प्रदेशामधून येणाऱ्या उत्पादनाच्या किंमतीमध्ये परिवहन व्यय समाविष्ट असल्यामुळे $P_{2/T}$ असा दर्शविला जातो. उत्पादनासाठी असलेली मागणी पुढील समीकरणाद्वारे दर्शविल्या जाते.

$$\frac{c_{11}}{c_{12}} = \left(\frac{p_1\tau}{p_2}\right)^{-\sigma} = \left(\frac{\omega_1\tau}{\omega_2}\right)^{-\sigma} \qquad (10)$$

$Z_{11}$ म्हणजे स्थानिक निर्माणी उद्योगाच्या व्ययाचे इतर प्रदेशामधील निर्माण उद्योगाच्या व्ययाशी असलेले प्रमाण होय.

$$z_{11} = \left(\frac{n_1}{n_2}\right)\left(\frac{p_1\tau}{p_2}\right)\left(\frac{c_{11}}{c_{12}}\right) = \left(\frac{L_1}{L_2}\right)\left(\frac{\omega_1\tau}{\omega_2}\right)^{-(\sigma-1)} \qquad (11)$$

वरील समीकरण म्हणजे तुलनात्मक अध्ययन आहे. ज्याचा अर्थ प्रदेश 2 मधील उत्पादन व्यय प्रदेश 1 मधील उत्पादन व्ययाशी समान आहे.

$$z_{12} = \left(\frac{L_1}{L_2}\right)\left(\frac{\omega_1}{\omega_2\tau}\right)^{-(\sigma-1)} \qquad (12)$$

प्रदेश 1 मधील श्रमिकांचे संपूर्ण उत्पन्न दोन्ही प्रदेशामधील उत्पादनाच्या एकूण व्ययाशी समान असून यामध्ये परिवहन व्यय समाविष्ट आहे.

$Y_1$ आणि $Y_2$ प्रादेशिक उत्पन्न आहे. ज्यामध्ये शेतकऱ्याचे मजुरी दर समाविष्ट आहे. प्रदेश 1 मधील श्रमिकांचे वेतन दर पुढील प्रमाणे राहील.

$$\omega_1 L_1 = \mu\left[\left(\frac{Z_{11}}{1+Z_{11}}\right)Y_1 + \left(\frac{Z_{12}}{1+Z_{12}}\right)Y_2\right] \qquad (13)$$

तर प्रदेश 2 मधील श्रमिकांचे उत्पन्न खालील समीकरणाप्रमाणे राहील.

$$\omega_1 L_2 = \mu\left[\left(\frac{1}{1+Z_{11}}\right)Y_1 + \left(\frac{1}{1+Z_{12}}\right)Y_2\right] \qquad (14)$$

दोन प्रदेशाचे उत्पन्न आणि श्रमिकांचे मजुरी दर श्रमिकाच्या वितरणावर अवलंबून राहील म्हणून

$$Y_1 = \frac{1-\mu}{2} + \omega_1 L_1 \qquad (15)$$

आणि

$$Y_2 = \frac{1-\mu}{2} + \omega_2 L_2 \qquad (16)$$

समीकरण 11 ते 16 वरून लक्षात येते की $\omega_1$ आणि $\omega_2$ हे प्रदेश 1 आणि 1 मधील श्रमिकांचे वितरण दर्शवितात म्हणून $L_1 = L_2$ तर $\omega_1 = \omega_2$ आहेत. समजा श्रमिकांचे स्थलांतरण प्रदेश 1 मध्ये झाले तर मजुरीचे दर $\omega_1/\omega_2$ राहील. बाजारामध्ये मजुरीचे दर उच्च राहतील त्याचबरोबर श्रमिकामध्ये स्पर्धा सुध्दा राहील.

निर्माणी उद्योगाच्या वस्तूंचा किंमत निर्देशांक पुढील समीकरणाद्वारे व्यक्त केलेला आहे.

$$P_1 = \left[ f\omega_1^{-(\sigma-1)} + (1-f)\left(\frac{\omega_2}{\tau}\right)^{-(\sigma-1)} \right]^{-1(\sigma-1)}$$

(17)

$F=L^{1/}\mu$ हा प्रदेश 1 मधील श्रमिकाच्या दबावाच्या (force) वाटा आहे तर प्रदेश 2 मधील उपभोक्ताचा किंमत निर्देशांक पुढील प्रमाणे आहे.

$$P_2 = \left[ f\left(\frac{\omega_1}{\tau}\right)^{-(\sigma-1)} + (1-f)\omega_2^{-(\sigma-1)} \right]^{-1(\sigma-1)}$$

(18)

प्रदेश 1 व 2 मधील श्रमिकाचे वास्तविक मजुरी दर 19 व 20 समीकरणाद्वारे दर्शविलेले आहे.

$$\omega_1 = \omega_1 P_1^{-\mu} \quad (19)$$

$$\omega_2 = \omega_2 P_2^{-\mu} \quad (20)$$

समीकरण 17 व 18 नुसार जर दोन प्रदेशामध्ये मजुरीचे दर समान आहेत. पण कारखानदारी मुळे प्रदेश, 1 कडे श्रमिकाचे स्थलांतरण वाढले. परिणामत: प्रदेश 1 मधील श्रमिकाचे मजुरी दर वाढतील त्यामुळे प्रादेशिक विकेंद्रीकरण (divergence) घडून येईल.

$\omega_1/\omega_2$ श्रमिकाचे मजुरी दर आहे. तर f श्रमिकाचा दबाव (force) आहे समजा एका प्रदेशातील मजुरीचे दर घटले तरी दुसऱ्या प्रदेशाकडे श्रमिकांचे स्थालांतरण होईल. परिणामत: दुसऱ्या प्रदेशावर श्रमिकांचा दबाव वाढेल. अशा प्रकारची स्थिती प्रादेशिक केंद्रीकरणाची असते. उरलेल्या प्रदेशात विकेंद्रीकरण होईल. ज्यामध्ये देशीय बाजार परिणाम व किंमत निर्देशांक परिणाम महत्त्वाचा आहे.

प्रारूपामध्ये निर्माणी उद्योग वस्तूचा व्ययाचा वाटा $\mu$, वस्तूची प्रतिस्थापन लवचिकता $\sigma$ तर परिवहन व्यय T आहे या परिमापकावर केंद्रीकरण किंवा विकेंद्रीकरण अवलंबून आहे.

सर्व श्रमिकाचे केंद्रीकरण प्रदेश 1 मध्ये होते. प्रदेश 1 मधील बाजाराचा संबंध प्रदेश 2 शी आहे. एकूण उत्पन्न $\mu$ निर्माणी उद्योगाच्या वस्तूवर खर्च होते म्हणून संपूर्ण उत्पन्न प्रदेश 1 कडे येते म्हणून

$$\frac{Y_2}{Y_1} = \frac{1-\mu}{1+\mu} \quad (21)$$

n म्हणजे निर्मिती उद्योगातील पेढ्यांची संख्या होय. प्रत्येक पेढीचे मूल्य विक्री बरोबर राहील.

$$V_1 = \left(\frac{\mu}{n}\right)(Y_1 + Y_2) \quad (22)$$

येथे प्रत्येक पेढीला शून्य नफा प्राप्त होतो.

प्रदेश 1 मध्ये उत्पादनाचे केंद्रीकरण होऊन संतुलन प्रस्थापित होईल. प्रदेश 2 मध्ये उत्पादन असेल तर प्रदेश 1 मधील सर्व कारखानदारांना प्रत्यक्षात नुकसान भरपाई द्यावी लागते.

$$\left(\frac{\omega_2}{\omega_1}\right) = \left(\frac{1}{\tau}\right)^{\mu} \quad (23)$$

समजा एखाद्या पेढीला उच्च वेतन दिले तर पेढीला नफा महत्तमीकरण किंमत प्राप्त होईल. ती इतर पेढ्यापेक्षा जास्त राहील. प्रदेश 1 मध्ये अभावात्मक पेढीचे(Defect frim) विक्रीमूल्य प्रतिनिधी पेढीच्या विक्री मूल्यांच्या काळात (Time) $(\omega_2/\omega_1\tau)^{-(\sigma-1)}$ राहील. याच प्रकारची प्रदेश 2 मध्ये प्रतिनिधी अभावात्मक पेढीचे मूल्य $(\omega_2\tau/\omega_1)^{-(\sigma-1)}$ पुढीलप्रमाणे राहील.

$$V_2 = \left(\frac{\mu}{n}\right)\left[\left(\frac{\omega_2}{\omega_1\tau}\right)^{-(\sigma-1)} Y_1 + \left(\frac{\omega_2\tau}{\omega_1}\right)^{-(\sigma-1)} Y_2\right]$$

(24)

परिवहन व्ययाच्या कार्याला प्रोत्साहन प्रदेश 1 मधील उपभोक्ते विक्री करिता देत नाही पण प्रदेश 2 मधील उपभोक्ते विक्री कार्याला प्रोत्साहन देतात. 22, 23 आणि 24 वरून विक्रीच्या मूल्यांचे गुणोत्तर (Ratio) मिळू शकते. अभावात्मक पेढ्या प्रदेश 1 मधील पेढ्यांना विक्री करतात. या दोहोंमधील सहसंबंध पुढील समीकरणाने दर्शविला आहे.

$$\frac{V_2}{V_1} = \frac{1}{2}\tau^{\mu(\sigma-1)}\left[(1+\mu)\tau^{\sigma-1} + (1-\mu)\tau^{-(\sigma-1)}\right]$$

(25)

पेढ्यामधील उणीव $V_2 / V_1 > 1$ आहे. पेढ्याच्या विक्रीवर होणारा परिणाम स्थिर राहील आणि विक्री सीमांत व्ययापेक्षा जास्त राहील. पण हे अगदी बरोबर नाही. कारण प्रदेश मधील स्थिर व्यय उच्च आहे. कारण मजुरी दर उच्च आहे. म्हणून $V_2/V_1 > \omega_2/\omega_1 = \tau^{-\mu}$ नवीन चलाचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे राहील.

$$\nu = \frac{1}{2}\tau^{\mu\sigma}\left[(1+\mu)\tau^{\sigma-1} + (1-\mu)\tau^{-(\sigma-1)}\right]$$

(26)

जेव्हा $V < 1$ राहील तेव्हा प्रदेश 2 मध्ये सुरू झालेल्या उत्पादनाला नफा होणार नाही. जर उत्पादनाचे केंद्रीकरण 1 मध्ये झालेले असेल तर त्या एका प्रदेशामध्ये उत्पादनाचे संतुलन होईल. याउलट $V > 1$ अशी स्थिती असेल तर होणार नाही.

स्पष्टीकरण 26 मध्ये सीमेचे विश्लेषण केलेले आहे. केंद्रीकरण न होणे यामध्ये निर्णायक परिमापकाच्या मूल्याने विभागणी केलेली आहे. म्हणून $V = 1$ आहे.

प्रारूपामध्ये तीन परिमापके आहेत ज्याचे कार्य आवश्यक ते बदल करून भरपाई करते व इतरांमध्ये बदल करणे आहे. अतिशय प्रामाणिक परिमापक $\mu$ आहे. ज्याचे विश्लेषण पुढील समीकरणाने केलेले आहे.

$$\frac{\partial\nu}{\partial\mu} = \nu\sigma(\ln\tau) + \frac{1}{2}\tau^{\mu\sigma}\left[\tau^{\sigma-1} - \tau^{-(\sigma-1)}\right] < 0$$

(27)

उत्पन्नाचा मोठा हिस्सा निर्माणी वस्तूवर खर्च होतो. कमी विक्रीचा संबंध अभावात्मक पेढीशी आहे. याची दोन कारणे आहेत. श्रमिक जास्त मजुरी दराची मागणी करतात म्हणून दुसऱ्या प्रदेशाकडे वळतात. हा अधोगामी श्रृंखला परिणाम आहे. निर्माणी वस्तूवर मोठ्या प्रमाणात झालेला खर्च प्रदेश 1 च्या बाजाराचा आकार वाढवितो. ज्याचा सबळ परिणाम देशीय बाजारावर होणे हा पश्चगामी श्रृंखला परिणाम आहे. अधोगामी श्रृंखला परिणाम पहिल्या कालावधीत होतो तर पश्चगामी परिणाम दुसऱ्या कालावधीत होतो.

यानंतर आपण परिवहन व्ययाकडे वळतो. समीकरण 26 वरून स्पष्ट होते की $\tau = 1$, $\nu = 1$; असतो. तेव्हा परिवहन व्यय शून्य असतो जेव्हा $\tau$ लहान असतो तेव्हा $\nu$ चा दृष्टिकोन $(1-\mu)^{\tau 1-\mu(1-\mu)}$ असतो. तरी देखील $\sigma$ हा फारच लहान असतो

किंवा $\mu$ फारच मोठा असतो. अतिमत्ता $\frac{\partial \nu}{\partial \tau}$ चे मूल्यांकन पुढील प्रमाणे केले जाते.

$$\frac{\partial \nu}{\partial \tau} = \frac{\mu \sigma \nu}{\tau} + \frac{\tau^{\mu\sigma}(\sigma-1)[(1+\mu)\tau^{\sigma-1} - (1-\mu)\tau^{-(\sigma-1)}]}{2\tau} \quad (28)$$

$\tau$ चा जवळचा संबंध 1 शी आहे. समीकरण 28 मधला दुसरा कालावधीचा दृष्टिकोन $\mu(\sigma\text{-}1)>0$ तरीदेखील पहिला कालावधी नेहमीच धनात्मक आहे. $\frac{\partial \nu}{\partial \tau} > 0$ म्हणून $\tau$ हा 1 च्या जवळ आहे.

जेव्हा $\sigma(1 - \mu)1$ म्हणून $V < 1$ येथील मध्यक्ष $\tau$ न्यून असतो या संदर्भात आर्थिक मापन उच्च असते. म्हणून $\sigma$ लहान असतो. तर निर्माणी वस्तूवरील खर्चाचा वाटा मोठा असतो. म्हणून $\mu$ मोठा असतो. प्रदेश 2 मध्ये सुरू झालेल्या पेढीला लाभ होणार नाही आणि परिवहन व्यय जास्त राहील. $\frac{\partial \nu}{\partial \sigma}$ चे मापन पुढील समीकरणाने केल्या जाईल.

$$\frac{\partial \nu}{\partial \sigma} = \ln(\tau)\left\{\mu\nu + \frac{1}{2}\tau^{\mu\sigma}\left[(1+\mu)\tau^{\sigma-1} - (1-\mu)\tau^{-(\sigma-1)}\right]\right\}$$

$$= \ln(\tau)\left(\frac{\tau}{\sigma}\right)\left(\frac{\partial \nu}{\partial \tau}\right) \quad (29)$$

संबंधित बिंदूशी $\frac{\partial \nu}{\partial \tau}$ हा ऋणात्मक आहे. म्हणून याला लागू करताच $\left(\frac{\partial \nu}{\partial \tau}\right)$ धनात्मक केलेले आहे. प्रतिस्थापन लवचिकता उच्च आहे. हे कार्य प्रादेशिक विकेंद्रीकरणाच्या $\frac{\partial \nu}{\partial \tau}$ विरुद्ध आहे.

**समारोप :**

न्यून परिवहन व्ययासोबत उच्च निर्माणी वस्तूचा वाटा आहे. त्याचबरोबर सबळ आर्थिक मापनामध्ये चक्रीय कारकतेची मांडणी केलेली आहे. जेथे उत्पादनाला चालना मिळते तेथेच निर्माणी उद्योगाचे केंद्रीकरण होते.

या प्रारूपामध्ये गाभा, परिघ संबंधाचे विश्लेषण केलेले आहे. पण निश्चितपणे उद्योगाने निवडलेले स्थान कोणते याचे स्पष्टीकरण मिळत नाही. क्रुगमनच्या विवेचनामुळे आर्थिक भूगोलाचे अंतरंग समजून द्यायला मदत होते. क्रुगमनचे नव आर्थिक भूगोल म्हणजे प्रादेशिक अर्थशास्त्र व आर्थिक भूगोलामधील संबंधाचे निर्वचन आहे.

**संदर्भ :**


1) जहागिरदार दि. व्यं. (2009) : 2008 चे नोबेल पारितोषिक विजेते : प्रो. पॉल क्रुगमन, दैनिक हिंदुस्थान, 27 एप्रिल.
2) पॉल क्रुगमन (2008) : जागतिक व्यापार आणि आर्थिक भूगोल
अनुवाद : सुलक्षणा महाजन शुक्रवार २१ नोव्हेंबर, दैनिक लोकसत्ता
3) Bhattacharjea Aditya (2008) : Krugman's Economics : A Introduction, EPW, Vol. XLII, No. 49, Des. 6-12.
4) Jomo K.S. Radiger, Von Amin : Trade Theory Status Quo Despite Krugman, EPW, Vol. XLII, No. 49 Des. 6-12.
5) Krugman Paul (1991) : Increasing Return and Economics Geography, Journal of Political Economy, Vol. 99, No. 3.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३३ वे वार्षिक अधिवेशन

सुत्रसंचालकांचे अहवाल – चर्चासत्र पहिले

# आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धान्तातील पॉल क्रुगमन यांचे योगदान

**दि. व्यं. जहागिरदार**

माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

मानद संचालक, सेंटर फॉर एकॉ. ॲन्ड सोशल स्टडीज, अमरावती

**प्रस्तावना –**

आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची महत्त्वाची शाखा असून ती सतत विकसित होत आहे. अर्थशास्त्रीय तत्त्वे, नवनवीन संकल्प आणि प्रगत अध्ययनाची परिष्कृत साधने इ. बाबींचा आंतरराष्ट्रीय व्यापार आणि वित्त, धोरण यांच्या अध्ययन व संशोधनात प्रभावीपणे वापर केला जात आहे. गेल्या 50-60 वर्षांत आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राचा वाढत जाणारा व्याप स्तिमीत करणारा आहे. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या सर्व पैलूंशी परिचित असणे अनेकदा शक्य होत नाही.

इ. स. 2008 मध्ये अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक प्रो. पॉल क्रुगमन यांना प्राप्त झाले. ते व्यापार सिद्धांत, आंतरराष्ट्रीय वित्त आणि आर्थिक भूगोल या विषयांचे तज्ञ असून व्यापार रचना आणि आर्थिक व्यवहारांच्या स्थानाच्या मूलगामी विश्लेषणामुळे त्यांना हा पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यांनी आतापावेतो 20 पुस्तके आणि 200 संशोधनपर लेख लिहिले असून ते प्रिस्टन विद्यापीठात आंतरराष्ट्रीय घडामोडी या विषयाचे प्राध्यापक असून आर्थिक व राजकीय विषयांवर ते फॉर्च्युन, दि एकॉनोमिस्ट, वॉशिंग्टन मंथली अशा ख्यातीप्राप्त नियतकालीकांमधून लिखाण करीत असतात.

**प्रो. क्रुगमन यांचे योगदान –**

अर्थशास्त्रात ॲडम स्मिथ यांनी जरी सर्वप्रथम निरपेक्ष उत्पादन व्यय सिद्धांत स्पष्ट करून आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रातील व्यापाराचे कारण सांगणारा सिद्धांत मांडला असला तरी परंपरागत किंवा सनातनी सिद्धांत म्हणून रिकार्डोच्या सिद्धांताचा उल्लेख करावा लागतो. रिकार्डोनंतर जवळपास शंभर वर्षे त्याचा सिद्धांत सर्वमान्य होता. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे कारण स्पष्ट

करणारा दुसरा महत्त्वाचा सिद्धांत म्हणून ओहलीनच्या घटक अभिदान सिद्धांताचा उल्लेख करावा लागतो. ओहलीनचा सिद्धांत दोन देश, दोन वस्तू आणि दोन उत्पादनाचे घटक विचारात घेतो त्यामुळे त्याला 2 x 2 x 2 प्रारूप असे म्हटले जाते. पण महत्त्वाचा मुद्दा असा की तो मूल्याच्या आधुनिक सिद्धांतवर आधारला आहे. आधुनिक मूल्य सिद्धांताचा आधार स्पर्धा, एक किंमतीचा नियम आणि दीर्घकाल आहे. आपल्या सिद्धांतातील विवेचन श्रमसिद्धांतापासून अलग राखणे महत्त्वाचे आहेच पण ओहलीन मानतो की आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांत हा सर्वसामान्य अशा स्थानीयीकरणाच्या सिद्धांताचा एक भाग आहे. स्थानीयीकरण सिद्धांतातील स्थल (Spatial) या घटकाचा त्यांनी विचार केला होता. साधारणपणे दुसऱ्या महायुद्धापर्यंत आंतरराष्ट्रीय व्यापाराचे जे सिद्धांत मांडले गेलेत त्यांना जुने व्यापार सिद्धांत म्हटले जाते. ओहलीनच्या सिद्धांताच्या गृहितांमध्ये परिस्थितीनुरूप बदल करून अर्थशास्त्रज्ञांनी उदा. केसिंग (1966), वेर्नॉन व ग्रुबेल (1967), हर्श (1967) नवीन प्रमेये मांडण्याचा प्रयत्न केला.

उपरोक्त अर्थशास्त्रज्ञांनी जे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत मांडलेत ते आंतर उद्योगातील (Inter industry) व्यापार स्पष्ट करणारे होते. म्हणजे दोन उद्योगांपैकी कोणत्या उद्योगातील वस्तू देश निर्यात / आयात करेल याचे या सिद्धांतात विवेचन केले जाई. पण 1960 च्या दशकात तत्कालीन युरोपियन आर्थिक समुदायाच्या स्थापनेनंतर सभासद देशांमध्ये समान किंवा सारख्या वस्तूगटांमध्ये व्यापार होत आहे. बलासा यांनी दाखवून दिले की, 1963-70 या कालखंडात या सभासद राष्ट्रांमधील व्यापार सारख्या वस्तुंचा होता. अर्थात हा व्यापार उद्योगांतर्गत (Intra Industry) होता. उद्योगांतर्गत व्यापाराचे स्पष्टीकरण जुन्या व्यापार सिद्धांताच्या द्वारा करणे अशक्यप्रायच होते. प्रो. क्रुगमन यांनी केलेले व्यापाराचे स्पष्टीकरण हे उद्योगांतर्गत व्यापाराचे स्पष्टीकरण आहे. या स्पष्टीकरणात त्यांनी अपूर्ण स्पर्धा, उत्पादनमान, वस्तू विभेदीकरण, बहुराष्ट्रीय कंपन्यांची कार्यपद्धती इ. विविध वास्तविक बाणींचा अंतर्भाव केला आहे. उद्योगांतर्गत व्यापार हा एकाच उद्योगातील विविध उद्योगसंस्थांमध्ये किंवा पेढ्यांमध्ये (Firms) होत असतो. याचे स्पष्टीकरण नव हेक्चर-ओहलीन प्रारूप, नव-चेंबरलीन प्रारूपे, नव हॉटलिंग प्रारूपे या तीन गटांमध्ये केले जाते.

प्रो. क्रुगमन यांचे आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांतातील योगदान समजून घेण्यासाठी त्यांच्या तीन संशोधनलेखांचा विचार करावा लागतो.

1) Increasing returns, monopolistic competition and International trade, (Journal of International Economics, 1979).

2) Scale economics, product differentiation and the pattern of trade, (American Economic Review, 1980) आणि

3) Increasing returns and Economic Geography (Journal of political economy, 1981)

त्यांच्या 1979 च्या लेखात जो व्यापार विषयक सिद्धांत आहे तो नव-चेंबरलीन प्रारूपाच्या अंतर्गत येतो. एकाधिकारी स्पर्धेच्या विश्लेषणात

अविनाश दिक्षित आणि स्टिगलिटझ् यांनी जी सुधारणा केली आहे तिचा योग्य तो वापर क्रुगमन यांनी केला आहे. जेव्हा एखाद्या उद्योगात उत्पादनसंस्था संख्येने कमी असतात तेव्हा अल्पाधिकारी प्रारूपांची मांडणी केली जाते. उद्योगांतर्गत व्यापारात समान वस्तूंचे संदर्भात इ.स. 1983 मध्ये बँडर आणि क्रुगमन यांनी विवेचन केले होते. मात्र, इ.स. 1991 मध्ये त्यांचा प्रसिद्ध संशोधनपर लेख आपला विशेष ठसा उमटून गेला. आर्थिक भूगोल या भूगोलाच्या उपशाखेकडे प्रो. क्रुगमन यांनी विशेष देऊन व्यापार तत्त्वांचे विवेचन केले. जेफरी सांच हे देखील या विषयाचे एक तज्ञ आहेत. प्रो. क्रुगमन यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्वरूप स्पष्ट करताना जे विवेचन आपल्या 3-4 लेखांमधून केले. ते परस्परपूरक असून व्यापार रचना समजण्याचे दृष्टीने उपयोगी ठरते. त्यांनी केलेल्या सैद्धांतिक विवेचनाच्या आधारावर पुढील काळात अन्य नवीन प्रारूपे अभ्यासकांनी मांडलीत. धोरणाच्या दृष्टीनेही हे सर्व विवेचन आज महत्त्वाचे मानले जाते.

**शोधनिबंधाचा ऊहापोह –**

आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांतातील पॉल क्रुगमन यांचे योगदान या तांत्रिक चर्चासत्रासाठी एकूण दहा शोधनिबंध प्राप्त झालेत ही अत्यंत समाधानाची बाब आहे. सर्व लेखक / लेखिकांचे मन:पूर्वक अभिनंदन. सदर विषय हा सैद्धांतिक असल्याने बहुतांश लेख हे क्रुगमनच्या योगदानावर त्यांच्या सिद्धांताच्या स्पष्टीकरणाशी संबंधित आहेत. या दहा निबंधाचे सोयीसाठी 2 गट करता येतील. पहिल्या गटात आठ निबंध असून ते क्रुगमनाच्या सिद्धांताच्या विवेचनाशी संबंधित असून एका निबंधात त्याच्या योगदानाबाबतचा अन्वयार्थ लावण्याचा वेगळा प्रयत्न केला आहे. तर दुसऱ्या गटात दोन निबंध असून त्यात क्रुगमनाच्या विचारांची तुलना म. गांधींच्या विचारांशी करण्याचा प्रयत्न केला आहे.

किशोर कदम यांचा 'प्रमाणाच्या बचती, उत्पादन विभेदीकरण आणि व्यापाराचे स्वरूप या संबंधीचे पॉल क्रुगमनचे विचार' हा निबंध गणितीय समीकरणे देऊन व त्यांचे योग्य ते स्पष्टीकरण करून लिहिलेला महत्त्वाचा निबंध आहे. त्यांनी मूलभूत प्रारूप स्पष्ट करताना त्यांनी बंद अर्थव्यवस्थेचे संतुलन सांगून व्यापाराचा परिणाम विषद केला आहे. तसेच वाहतूक खर्चाचा परिणाम आणि दोन्ही बाजारांचा परिणाम स्पष्ट केला आहे. मंजूषा मुसमाडे यांचा 'पॉल क्रुगमन : विचारांचे वेगळेपण' हा शोध निबंध क्रुगमनचे विचार थोडक्यात स्पष्ट करतो. त्याच्या विचारांचे वेगळेपण दाखविण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे विवेचन करणाऱ्या तत्कालीन अर्थतज्ञांच्या विचारांशी क्रुगमनच्या विचारांची तुलना करून क्रुगमनचे वेगळेपण दाखविले तर या निबंधाचे पोल वाढू शकले असते. डॉ. हरमकर आणि प्रा. आळशी यांचा संयुक्तपणे लिहिलेला लेख. 'पॉल क्रुगमनचे नव आर्थिक भूगोल' हा लेख क्रुगमनच्या 1991 मध्ये लिहिलेल्या संशोधनपर लेखावर बेतला असून त्यात प्रादेशिक अर्थशास्त्र आणि आर्थिक भूगोल या संबंधातील विवेचन केले आहे. लेखकद्वयांनी मूळ लेखातील जवळपास 29 समीकरणांच्याद्वारा स्पष्टीकरण केले आहे. अनेक

वेळा संबंधित लेखकाचे व्यापार विषयक विचार, तत्त्वे आपणास माहीत असतात पण ही तत्त्वे कशा पद्धतीने विशेषत: गणितीय समीकरणांच्याद्वारा स्पष्ट केलीत हे समजण्यासाठी लेखकद्वयांनी केलेला हा प्रयत्न उपयुक्त ठरतो. 'क्रुगमनची आंतरराष्ट्रीय व्यापार प्रतिमाने अन्वयार्थ आणि ध्वनितार्थ' या लेखात मुक्ता जहागिरदार यांनी क्रुगमनाच्या व्यापार सिद्धांताची विविध प्रतिमाने स्पष्ट केलीत. मात्र, त्यांच्या सिद्धांतातून व्यापार नीतीसंबंधी दिसणारा ध्वनितार्थ शास्त्रीय पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न मुक्ता जहागिरदारांनी केला आहे. क्रुगमनचे द्विक्षेत्रीय प्रतिमानातील विवेचन हे संरक्षण धोरणाचे स्पष्टीकरण करते, तसेच या प्रतिमानाच्या सिद्धांताची फलश्रुती उत्पन्न विषमता निर्माण करणारी आहे. अशा प्रकारच्या ध्वनितार्थ पॉल क्रुगमनाच्या विचारांची वेगळ्या दृष्टीने विश्लेषण करणारा आहे. (हे चारही निबंध संपूर्णपणे स्वीकृत केले आहेत. उर्वरित सहा निबंध हे गोषवाऱ्याच्या स्वरूपात स्वीकृत केले आहेत.)

पहिल्या गटातील पाचवा निबंध प्रा. शशीकांत शिंदे याचा 'आंतरराष्ट्रीय व्यापार आणि भौगोलिक अर्थशास्त्र' हा आहे. ग्राहकाला उपभोगात विविधता रुचते या गृहितावर सिद्धांत आधारला असून प्रमाणातील फायदे व वाहतूक खर्च यांच्या संबंधाचेही त्यांनी विवेचन करून क्रुगमनच्या अन्य क्षेत्रातील विविध योगदानाचाही त्यांनी उल्लेख केला आहे. 'क्रुगमनच्या विवेचनाचे दोन तत्त्वांच्या अनुषंगाने स्पष्टीकरण केले आहे.' 'पॉल क्रुगमन यांचे निवडक संशोधन' या जयश्री पवारांच्या लेखात त्यांनी क्रुगमनच्या विचारांची तुलना पारंपारिक लेखांशी केली आहे आणि परस्पर मूल्यपतन प्रारूप आणि आर्थिक भूगोल अशा दोन सिद्धांताचा सांगितलेला सारांश महत्त्वाचा आहे. अपर्णा कुलकर्णी यांच्या पॉल क्रुगमन यांचे आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांतातील योगदान लेखात त्यांनी क्रुगमनाच्या सिद्धांतातील प्रमाण बचती, उत्पादन वैविध्य, वाहतूक खर्च इ. घटकांचा विचार करून पारंपारिक सिद्धांताच्या तुलनेत या सिद्धांतात वास्तववादी संकल्पनांचा आधार घेतल्याचे नमूद केले आहे.

दुसऱ्या भागातील उमेश राजदेरकर यांनी 'आंतरराष्ट्रीय व्यापार प्रतिमान – क्रुगमन आणि म. गांधी' या लेखात दोघांच्याही प्रतिमानांमधील साम्य आणि भिन्नत्व स्पष्ट केले आहे. त्यांनी म. गांधीच्या सर्वसाधारण आर्थिक विचारांशी क्रुगमनच्या व्यापार सिद्धांताशी तुलना केल्याचे जाणवते. रा. द. जोग यांनी 'आंतरराष्ट्रीय दृष्टीकोनात क्रांती क्रुगमन ते गांधी' या लेखात व्यापारविषयक विवेचनात झालेल्या बदलांचा क्रुगमन व म. गांधींच्या विवेचनावरून विचार केला आहे. (जोगांचा पूर्ण निबंध प्राप्त झाला नाही.)

**चर्चेसाठी मुद्दे –**

आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांतात पॉल क्रुगमन यांचे योगदान यावरील उपरोक्त दहा निबंध विचारात घेता त्यावर व त्याअनुषांगाने अन्य वादप्रश्नांवर (issues) चर्चा करता येईल.

अ) उद्योगांतर्गत व्यापाराची जी नव-चेंबरलीन प्रारूपे सांगितली जातात त्यांच्याशी क्रुगमनाच्या विवेचनाशी तुलना करणे गरजेचे आहे.

ब) नव-हॉटलिंग प्रारूपांचे (विशेषत: लँकस्टर प्रारूप) क्रुगमनच्या सिद्धांताशी तुलना व साम्य सांगता येईल.

क) प्रो. क्रुगमन यांच्या सिद्धांतातून जे धोरण प्रतीत होते त्याची चर्चा करता येईल. विकसनशील देशांच्या संदर्भात व्युत्पन्न होणारी धोरणे उपयुक्त आहेत का?

ड) पॉल क्रुगमन यांच्या विविध प्रारूपांचे विश्लेषण करून त्याचे परिक्षण करता येईल.

इ) पॉल क्रुगमन यांनी Hand book of International Economics, vo1 III या ग्रॉसमन आणि रोगोफ यांनी संपादीत केलेल्या ग्रंथात (इ.स. 1995) Increazing Returns, imperfect competition and positive theory of International trade हा चाळीस पानी सविस्तर लेख लिहिला आहे. त्यात त्यांनी Unresolved issues त्यावर विवेचन करताना जे मुद्दे मांडलेत ते आजही विचारणीय असून त्यावर चर्चा केली जाऊ शकते. उदा. एकाधिकारी स्पर्धेतील उद्योगसंस्था एकच वस्तू (वैविध्यपूर्ण) निर्माण करते असे आपण मानतो. ती उद्योगसंस्था वेगवेगळ्या प्रकारच्या वैविध्यपूर्ण वस्तू निर्माण करतील का? ज्यावेळी बाह्यता निर्माण होतात त्यावेळी उद्योगसंस्था बाह्य तोटे निर्माण होत असताना तसे व्यवहार टाळण्याचा वा कमी करण्याचाही प्रयत्न करतील तसेच बाह्य लाभ वाढविण्याचे व्यवहार अधिक करण्याची जी कृती (internalizing externalities) पेढ्या करू शकतात असेही गृहित धरले पाहिजे. अशा काही मुद्यांचीही चर्चा खोलात शिरून केली पाहिजे असे क्रुगमन यांनी म्हटले आहे.

**प्र. चर्चा –**

या चर्चासत्रात प्रत्यक्षामध्ये आठ शोधनिबंध सादर झालेत आणि केवळ चार तज्ञांनी चर्चेत सहभाग घेतला. सूत्रसंचालकांनी आंतरराष्ट्रीय व्यापार या महत्त्वपूर्ण पण कठीण विषयावर तरुण प्राध्यापकांनी चांगले निबंध सादर केल्याबद्दल संबंधितांचे अभिनंदन केले. पॉल क्रुगमनच्या सिद्धांतावर गणितीय बाजूने विषयाचे स्पष्टीकरण झाले ही बाब मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या दृष्टीने आश्वासक बाब आहे. प्रो. क्रुगमन यांच्या सिद्धांताच्या संदर्भात विविध बाजूंची अधिक चर्चा होणे अपेक्षित होते. मात्र त्यांच्या सिद्धांतातून जी धोरणे प्रतीत होतात त्यावर चर्चा झाली. विकसनशील देशांच्या संदर्भात ही धोरणे संमिश्र प्रभाव टाकणारी आहेत. तसेच ती काही बाबतीत अनुकूल व प्रतिकूलही ठरू शकतात. सूत्र संचालकांनी चर्चासत्रात सादर झालेल्या निबंधांचा आढावा घेऊन या विषयाचे महत्त्व आणि त्या अनुषंगाने व्यपुन्न झालेल्या धोरणांचा उहापोह केला. सदर चर्चासत्रातील कार्यवाहीची नोंद घेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य श्री. हिरालाल चव्हाण यांनी केले.

चर्चासत्र दुसरे

# 21 व्या शतकातील भारतीय शेती क्षेत्रासमोरील आव्हाने

**मधुकर शिंदे**
सूत्रसंचालक
माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

शेतीवरील आर्थिक अरिष्ट अस्मानी आणि सुलतानी आहे. शेतीची दुरावस्था होणे हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने योग्य नाही शेतीच्या विकासाबरोबर आर्थिक विकास झाला आहे. म्हणून शेतीचा विकास आणि भारताचा आर्थिक विकास यांच्यात सहसंबंध आहे. भारतात शेती व्यवसाय सोडून देणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. सरकारी धोरणामुळे सुध्दा शेती धोक्यात आली आहे. भारतात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे. गरीब राज्यात आत्महत्यांचे प्रमाण कमी आहे, तर विकसित राज्यात आत्महत्यांचे प्रमाण जास्त आहे. कारण कर्ज घेऊन त्यांनी गुंतवणूक केली आहे. ज्या राज्यात कर्जबाजारी शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त त्याच राज्यात आत्महत्यांचे प्रमाण जास्त आहे. विदर्भात कीटकनाशकांच्या किंमतीत 140 टक्क्यांनी वाढ झाली. इतर आदानांच्या किंमतीतही वाढ झाली. परंतु कापसाचे दर घटले. त्यामुळे कापूसधारक शेतकऱ्यांच्या आत्महत्यात वाढ झाली.

**शोध निबंध वाचन**

**1. डॉ. हिरालाल चव्हाण –**

शेतमजुरांच्या मागणी पुरवठ्यातील असमतोल, शिक्षणाचा वाढता प्रसार, सामाजिक प्रतिष्ठेमुळे काम करण्याचा वाटणारा कमीपणा, नागरी भागातील स्थलांतर यामुळे शेतमजूर मिळत नाहीत. त्यामुळे शेती कामे वेळेवर होत नाहीत. खतांचा उपयोग पिकाऐवजी तणालाच होतो. कामे उशिरा केल्याने उत्पादनाचा एकूण खर्च वाढतो. त्याला योग्य मजूरी देऊनही वेळेवर काम करत नाहीत. तयार झालेले पीकही हाती येत नाही. मजूर

नसल्याने पिके शेतातच सडतात. मजुरीचा खर्च वाढला असल्याने शेती परवडत नाही.

**2. मंजुषा राजेंद्र ठाकरे, नागपूर –**

कृषी क्षेत्र आर्थिक दृष्टया सक्षम नाही. योजनांच्या अंमलबजावणीत चुका आहेत. शेती व शेतकऱ्यांची स्थिती दयनीय आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे. शेतकरी आर्थिक दृष्ट्या सक्षम केला पाहिजेत.

**3. अनघा पाठक / तेजस्विनी मुढेकर –**

अन्नधान्य विपुल प्रमाणावर उपलब्ध पाहिजे. अन्नधान्य सकस असले पाहिजे अन्नधान्याची उपलब्धी घटलेली आहे. त्यातील चढ उतार अधिक तीव्र आहेत. कुपोषणाची समस्या आढळते. सार्वजनिक वितरण प्रणालीत दोष आहेत.

**4. प्रा. डॉ. इंगळे जे. एस. –**

आदिवासी शेतकऱ्यांना विविध समस्यांना तोंड दयावे लागते. उदाहरणार्थ, लावणीच्या काळात मजुरांची टंचाई असते. पिकावरील कीडीची समस्या, दर कमी मिळणे या प्रमुख समस्या आहेत.

**5. अरूणा सोनेगावकर –**

मेहनत करणाऱ्या शेतकऱ्याला मालाची योग्य किंमत मिळत नाही. शेतकऱ्याला शेत मालाचा साठा करता येत नाही. शेतमालाला कमी भाव मिळतो. व्यापारी मालाची साठेबाजी करून अतिरिक्त नफा मिळवतात. शेतकऱ्यांना फारसा मोबदला मिळत नाही. शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या दुप्पट भाव द्यावा.

**6. प्रा. आनंद लोखंडे/इंगवले –**

आंब्याखालील क्षेत्रात घट झाली आहे. काजू लागवडीखालील क्षेत्रात घट झाली. आंबा, काजू, नारळ लागवडीखालील क्षेत्रात घट झाली आहे. 7/12 चा उतारा एकत्रित असतो. स्वतःच्या नावावर नसतो. त्यामुळे योजनांचा लाभ घेता येत नाही. खते, कीटकनाशके यावरील अनुदानात वाढ झाली नाही.

**7. डॉ. संभाजीराव काळे –**

शेती क्षेत्रातील महत्त्वाचे आव्हान पाणी हे आहे. पाणी प्रश्नाकडे पुरेसे लक्ष दिले नाही. पाणी अडविण्यासाठी शेतकऱ्यांना अनुदान देणे. पाणी अडविण्यासाठी शिबिरांचे आयोजन करणे, पाणी अडविण्यासाठी सक्ती करणे. वनौषधी लागवडीस प्रोत्साहन देणे.

**8. डॉ. चौधरी –**

कृषी क्षेत्रापुढे दोन आव्हाने आहेत 1. मानव निर्मित, आणि 2. निसर्गनिर्मित, नैसर्गिक परिस्थितीमुळे शेतीचे उत्पादन कमी झाले आहे. पावसाची गरज नसते तेव्हा मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. भारताला अनेक वेळा दुष्काळाशी सामना करावा लागला आहे.

**9. प्रा. बी. के. माने –**

सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यात उसाला पर्यायी पीक म्हणून सोयाबीनचे पीक घेतले जात आहे. उत्पादन तयार झाले की ते लगेच विकणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. सोयाबीनला दर अपेक्षेप्रमाणे मिळत नाही.

**10. प्रा. बी. पी. पाटील –**

ऊसाची दर हेक्टरी उत्पादकता कमी आहे. पाणीपट्टी जास्त आहे. अभ्यासासाठी निवडलेले सर्व शेतकरी कर्ज बाजारी आहेत. शेत मजुरापेक्षा ऊस पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांना कमी मोबदला मिळतो.

**11. प्रा. कु. होनश्री पाटील –**

भारतात महाराष्ट्रातील चार प्रांतात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढतच आहेत. नापिकी, कर्जबाजारीपणा यामुळे शेतकरी आत्महत्या करत आहेत. किमान 50 टक्के जमीन लागवडीखाली येणे आवश्यक आहे.

**12. डॉ. संजय तुपे –**

शेतीचा वार्षिक दर वाढत नाही. गहू, तांदूळ, डाळी यांच्या वाढीचा दर आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात घटला. सर्वच पिकांची उत्पादकता घटत आहे.

**13. प्रा. अनिल सत्रे –**

शेतीची अल्प उत्पादकता, कर्जमाफीची अपेक्षा या कारणांमुळे शेतकऱ्यांनी कर्जे थकवली आहेत.

**14. प्रा. तृप्ती कवळे –**

सिंचनाची अपुरी सुविधा यामुळे शेतीची उत्पादकता कमी आहे. सिंचन क्षमतेचा पुरेपूर वापर होत नाही. शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा उपलब्ध होत नाही. नवीन तंत्रज्ञान, चांगली खते इ. शेतकऱ्यांना अल्प दरात उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**15. प्रा. नितीन मुटकुळे –**

दुष्काळ, शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे मोठे जटिल प्रश्न आहेत. महाराष्ट्रात विदर्भात सर्वाधिक आत्महत्या झाल्या आहेत. महागडा कर्ज पुरवठा अपुरा पाणी पुरवठा, विजेचे भारनियमन या कारणांमुळे शेतकरी आत्महत्या करतात. पीक विमा योजना परिणामकारक करावी. प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीस नोकरीची हमी दयावी.

**16. डॉ. ज्ञानदेव तळुले –**

83 टक्के शेतकऱ्यांचे कर्ज उत्पादक कर्ज आहे. त्यापैकी 89 टक्के शेतकरी थकबाकीदार आहेत. गुजरातमध्ये 6500 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. सर्वच राज्यात शेतकरी आत्महत्या करत आहेत.

**17. प्रा. पी. जे. जाधव –**

सातारा जिल्ह्यात कोरडवाहू शेतीचे प्रमाण जास्त आहे. पाण्याची टंचाई मोठी आहे. पाण्याबरोबरच वीज विक्रीची समस्या शेतीसमोर आहे. उत्पादन खर्च एकरी 8 ते 10,000 रू. आहे, तर उत्पन्न 11,000 रूपये आहे. शेतीत शेत मजुरांचा प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आहे. हा शेतीपुढील सर्वात मोठा प्रश्न आहे. पाण्याचे कार्यक्षम नियोजन केले पाहिजे.

**18. प्रा. महाजन बी. एल. –**

बी. टी. कॉटन बियाणामुळे कापसाची उत्पादकता कमी झाली. सरकारचे शेतमाल किंमतीचे धोरण चांगले नाही. योग्य तो हमी भाव सरकार देत नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

**19. साधू कोकरे –**

भारतात बहुसंख्य शेतकरी देशी बियाणे वापरतात. भारतीय शेतीचा विकास करण्यास मोठी संधी उपलब्ध आहे.

**20. रमजान मुजावर –**

पावसाचे 30 टक्के पाणी आपण वापरतो. 70 टक्के पाणी समुद्राला वाहून जाते. राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राचा वाटा कमी होत आहे. सिंचन व्यवस्थेतील खर्च जास्त असतो. त्यामुळे सिंचन क्षमतेचा पूर्ण वापर झाला नाही तर शेतीचे नुकसान होते.

**21. डॉ. दत्तात्रय बागडे –**

लोकसंख्येत वेगाने वाढ होत आहे. तर अन्नधान्याच्या उत्पादनात वेगाने घट होत आहे. भविष्यात आपणास 600 दशलक्ष टन अन्नधान्य लागवड करावी लागेल. परंतु नैसर्गिक व मानवी कारणांमुळे आपण 500 दशलक्ष टनाच्या पुढे जाऊ शकणार नाही.

**22. डॉ. आर. के. शेख –**

जागतिकीकरणाचा कृषी आयात व्यापारावर अनुकूल परिणाम झाला आहे. कृषी मालाच्या आयातीत वाढ झाली. भारताचा कृषी मालाचा उत्पादन खर्च वाढत आहे. भारतीय शेती उत्पादने विदेशी स्पर्धेत टिकू शकणार नाहीत. रासायनिक खतांचा अतिरिक्त वापर टाळणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. भारताने W.T.O. सोडून दयावे.

**23. प्रा. डी. जी. धट –**

भारतीय शेतीची उत्पादकता अत्यंत कमी आहे. कर्ज पुरवठा वेळेवर होत नाही. पाणी टंचाई असणाऱ्या ठिकाणी मायक्रो स्प्रिंकलने पाणी द्यावे. ही पध्दत ठिबक सिंचन पेक्षा अधिक चांगली आहे.

**24. पी. जे. कदम –**

शेतकऱ्याला बियाणे निकृष्ट दिले जाते. कर्जबाजारीपणा यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहे. शेतीचे राष्ट्रीय पातळीवर सर्वेक्षण होणे गरजेचे आहे.

**25. प्रा. मुरलीधर गायकवाड –**

शेतीतील गुंतवणूकीत घट झाली आहे. शेतमालाची भाववाढ ही प्रमुख समस्या आहे. अन्नधान्याचा दर्जा वाढवला पाहिजे. विदेशी माल देशात येऊ नये यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

**26. डॉ. एस. पी. मिसाळ –**

शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी शेती संशोधनावरील खर्चात वाढ होणे आवश्यक आहे. संशोधनाचे लाभ शेतकऱ्यापर्यंत जात नाहीत. जागतिकीकरणानंतर भारतीय शेतीची सुधारणा होईल हे भाकित खरे ठरले नाही. सिंचन पध्दतीत सुधारणा होणे आवश्यक आहे. शेतकऱ्याला शिक्षित, प्रशिक्षित केले पाहिजे. वन क्षेत्रात वेगाने घट होत आहे. प्रदूषणात वाढ होत आहे.

**27. निखिल तळेकर –**

दिवसेंदिवस भारतीय शेतीची उत्पादकता घटत आहे. भारतात जल सिंचनाखालील क्षेत्र कमी आहे. रासायनिक खतांचा वापर न करता सेंद्रिय खतांचा वापर केला पाहिजे.

**28. डॉ. मारूती तेगमपुरे –**

निसर्गाच्या अनियमितपणामुळे शेतीतील उत्पादन पुरेसे हाती येत नाही. परकीय कृषी मालाच्या आयातीत मूळ परवानगी देणे इत्यादीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. आदानांच्या किंमतीत वाढ होत आहे. त्यामुळे शेती परवडत नाही.

**29. प्रा. चंद्रकांत माळी –**

हरित क्रांतीमुळे दुष्काळ पडूनही

अन्नधान्याची भारताला आयात करावी लागली नाही. जैविक शेतीला प्रोत्साहन दिले पाहिजे. जल संधारण उपाययोजना आवश्यक आहे.

**30. डॉ. सुरेश ढाके –**

स्त्री शेतमजूर, पुरूष शेतमजूरांचे कामावर जाण्याचे प्रमाण वाढले आहे. मजूरीत वाढ झाल्यामुळे काम करण्याचे दिवस कमी झाले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांची कामावर जाण्याची प्रवृत्ती कमी झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मजूरांचा तुटवडा भासतो. स्वस्त दरात धान्य मिळते. स्थलांतरामुळेही शेतात मजूर मिळत नाहीत.

**31. डॉ. एस. व्ही. ढमढेरे –**

भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे. उसाच्या बाबतीत जगात 35 वा क्रमांक आहे. सर्वच पिकांची उत्पादकता कमी आहे. पाणलोट क्षेत्रावर अधिक भर दिला पाहिजे. पिक रचनेत बदल केला पाहिजे.

**32. चंद्रकांत चौधरी –**

शेतीविषयक अधिक संशोधन झाले पाहिजे.

**33. सुवर्णा सुर्यवंशी –**

आदर्श गाव हिवरे बाजारात शेतीची उत्पादकता वाढली आहे. या गावात एकही शेतकऱ्याची आत्महत्या झाली नाही. पाणलोट नियोजनामुळे हिवरे बाजार गावात कोरडवाहू शेतीचे रूपांतर बागायत शेतीत झाले आहे.

**34. डॉ. अविनाश निकम –**

ऊर्जा समस्या कायम आहे. भारनियमन वाढले आहे. स्पर्धा करू शकेल अशा दर्जाचा व किंमतीचा शेतमाल बनवला पाहिजे.

**35. प्रा. मोरमारे –**

बी बियाणे, रासायनिक खते इत्यादीबाबत स्वयंपूर्ण मिळवण्याच्या दृष्टीने आर्थिक धोरण आखणे आवश्यक आहे.

**36. प्रा. जी. डी. तलवारे –**

पाणी पुरवण्याची समस्या ही भारतीय शेतीसमोरील प्रमुख समस्या आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊ नये. तो पैसा पाण्याच्या सुविधेसाठी खर्च करावा. भांडवलाचा अभाव हे सुध्दा भारतीय शेतीसमोरील आव्हान आहे.

**37. प्रा. अनिल वाडकर –**

राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा घटलेला आहे. भारतात लागवडीलायक क्षेत्रात वाढ होत नाही शेती जमिनीची उत्पादकता कमी होत आहे. विपणन व्यवस्था चुकीची आहे. स्वतःच्या शेतमालाची किंमत शेतकऱ्याला ठरवता आली पाहिजे.

**38. प्रा. पल्लवी पाटील –**

वाढती लोकसंख्या, घटती शेतीची उत्पादकता यामुळे अर्थव्यवस्था धोक्यात आली आहे. शेतीतील जमिनीची धूप कमी केली पाहिजे. शेतीची बांधबंदिस्ती केली पाहिजे. शेततळी बांधावीत. त्यामुळे कमी पाण्यात जास्त उत्पादन काढता येईल.

**39. प्रा. आरती जांभळे –**

सेंद्रिय किंवा नैसर्गिक शेती केली पाहिजे. एकत्रित अन्नद्रव्य व्यवस्थापनाचे नियोजन केले पाहिजे. जैविक खतांचा वापर केला पाहिजे.

**40. प्रा. डॉ. मुलाणी –**

पिकांचे आयुष्य वाढवले तर शेतीतील

उत्पादन वाढेल. बचत गटाप्रमाणेच शेतकरी मंडळ स्थापन केले पाहिजेत. त्यांच्यामार्फत शेती विकास केला पाहिजे.

**42. प्रा. संतोष माळी –**

नैसर्गिक समतोल राखून शेती केली पाहिजे. रासायनिक खताची योग्य मात्रा शेतकऱ्यांनी वापरली पाहिजे. सेंद्रिय खते वापरली पाहिजेत.

**चर्चासत्रातील सहभाग –**

**1. डॉ. प्रा. श्री. आ. देशपांडे –**

अत्यंत गरीबी असताना पूर्वीच्या काळात शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या नाहीत. आज सरकार जेवढ्या सवलती शेतकऱ्यांना देत आहे तेवढ्या सवलती पूर्वी देत नव्हते. तरी आज शेतकरी आत्महत्या करीत आहेत. सहकारी संस्था ज्या प्रमाणात वाढायला पाहिजेत, त्या प्रमाणात वाढल्या नाहीत. शेतकऱ्यांच्या आत्महत्यामागे केवळ आर्थिक कारण नाही. संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था बदलत आहे. ग्रामीण व्यवस्थेची पुनर्रचना केली पाहिजे.

**2. मा. एच. एम. देसरडा सर –**

भारतात 60 कोटी लोक शेतीवर अवलंबून आहेत. शेतीविषयक धोरणे आपणास बदलावी लागतील. शेतीची दर एकरी आणि दर माणसी उत्पादकता कमी आहे. शेतीच्या दोन मुख्य समस्या आहेत. 1) पाणी आणि 2) ऊर्जा. पाणी आणि ऊर्जेची पर्यायी मॉडेल्स तयार केली पाहिजेत. पॅकेजिसमुळे शेतकऱ्यांचा विकास होत नाही.

**3. सर्वोत्तम कुलकर्णी –**

भूगर्भजलाचा स्तर सुधारण्याचे आव्हान आहे.

**4. प्रा. रमेश कटके –**

शेतकरी व उत्पादक यांच्यामधील अनावश्यक मध्यस्थांची संख्या कमी करावी. मध्यस्थ भांडवलदार आहेत आणि एकसंघ आहे. ते शेतकऱ्यांचे शोषण करतात.

**5. प्रा. अजय दरेकर –**

वाढते शहरीकरण हे शेतीसमोरील मोठे आव्हान आहे. वाढणाऱ्या शहरांमुळे शेतीच्या वाट्याचे प्रमाण कमी होत आहे. शहरात होणाऱ्या औद्योगिकरणामुळे पाण्याचा तुटवडा होत आहे. विजेचा तुटवडा आहे. शेतकऱ्यांना अनुदान देऊन अपंग बनविले जात आहे.

**6. डॉ. बाबासाहेब कल्याणकर –**

शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी जी मदत दिली जाते, ती अपुरी आहे. शेतकऱ्यांच्या अनुदानाच्या योजना शेतकऱ्यापर्यंत पोहचवल्या पाहिजेत.

**7. डॉ. डी. के. पाटील –**

विजेचा प्रश्न महत्त्वाचा आणि गंभीर प्रश्न आहे. शेतकऱ्यांची साठवणूक क्षमता वाढविली पाहिजे. पत पुरवठ्याचे महत्त्वाचे आव्हान आहे. नाबार्डने सोसोयटयांना थेट कर्ज पुरवठा करावा.

**8. मा. डॉ. विनायकराव देशपांडे –**

सध्या शेतमालाच्या भावात वाढ होत आहे ही चांगली बाब आहे शेतकऱ्यांनी संघटित झाले पाहिजे तरच शेतकऱ्यांना दरवाढीचा फायदा होईल. आयात शुल्कात (कृषी मालाच्या) वाढ झाली पाहिजे शेतजमीनीचा आकार झपाट्याने कमी होत आहे. शेती संशोधनाचा खर्च कमी आहे.

# चर्चासत्र तिसरे
# महाराष्ट्र औद्योगिक विकासाचे मूल्यमापन

**के. जी. पठाण**
सुत्र संचालक
माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

बारामती येथील चर्चा सत्राचा तिसरा विषय ''महाराष्ट्रातील आद्योगिक विकासाचे मूल्यमापन'' हा होता. विहीत मुदतीत एकूण 16 शोधनिबंध प्राप्त झाल्याने सारांश रूपात सादरीकरणाची सर्वांनाच संधी देण्यात आली. ऐनवेळी आणखी चार शोध निबंध सादर करण्यात आले.

डॉ. रामेश्वर भिसे व अनुप्रिता गढीकर, डॉ. भांडवलकर व गव्हाळे आणि ज्योती किरवे - असे तीन शोधनिबंधाचे स्वरूप औद्योगिक विकास धोरणाबाबत टीकात्मक स्वरूपाचे होते. ज्योती किरवे यांच्या शोधनिबंधात सखोल विश्लेषण आढळले. सिंधुदुर्ग, जळगाव, सातारा - या जिल्ह्यातील जिल्हा उद्योग केंद्राचे औषोगिक विकासातील योगदानावरील शोधनिबंधाचे सादरीकरण माहितीपूर्ण होते.

या सत्रात सादरीकरण झालेल्या शोधनिबंधातील विशेष बाब म्हणून प्रा. डॉ. अंजली कुलकर्णी यांचा उल्लेख करावा लागेल. हा लेख पूर्ण मुद्रित होणे आवश्यक होते. प्रदूषणाचा औद्योगिक विकासावर होणारा परिणाम विशद करून याबाबत शासन, धोरणकर्ते आणि अभ्यासक या सर्वात जाणीव जागृतीची नितांत गरज असल्याचे संशोधकाने आवर्जून सांगितले.

'माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे औद्योगिकरण प्रक्रियेतील योगदान' - अशा नव्या विषयावर प्रा. स्वाती आदक यांचे सादरकीकरण माहितीपूर्ण होते पण टीकात्मक विश्लेषणाचा अभाव जाणवला. सूत्र संचालक आणि एकूण सादरीकरण या बाबतीत पुढील काही मुद्दे अभ्यासकांना मार्गदर्शक ठरावेत.

1. इतर विषयांच्या तुलनेने शोधनिबंधाचा महाराष्ट्र संदर्भातला विषय सोपा असूनही शोधनिबंधकांनी याकडे गांभीर्याने पाहिले नाही.
2. गेल्या 50 वर्षात महाराष्ट्राच्या औद्योगिक विकास धोरणाने कोणते योगदान दिले यातील उणीवा काय याचे समग्रपणे (फुटकळ, तुटक नव्हे) विवेचन होणे आवश्यक होते. अलीकडे एकूण भारताच्या संदर्भात महाराष्ट्राचा औद्योगिक प्रगतीतील घसरण याचे कुणीही विवेचन केले नाही हे अपेक्षित होते.
3. सर्वच निबंधकारांनी अभ्यासलेले संदर्भ मामूली स्वरूपाचे होते. CIME, EPW, Seminar आणि ASI अशा प्रथितयश संशोधकीय प्रकाशनांचा त्यातील लेखांचा उल्लेख ओढळला नाही.
4. अनेक तरुण व नवोदित अभ्यासकांना या निमित्ताने लिहिते व बोलते केले ही समाधानाची बाब आहे.

महाराष्ट्र राज्याने या वर्षी सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. या निमित्त अर्थशास्त्र परिषदेच्या अभ्यासू सभासदांनी एकत्र येऊन – ''महाराष्ट्राचा आर्थिक विकास – प्रश्न – धोरणे आणि आव्हाने''– या विषयावर विविधांगी संशोधनपूर्ण लेखन करून त्याचा एक स्वतंत्र ग्रंथ प्रकाशित व्हावा ही अपेक्षा.

---


**MARATHI ARTHSHATRA PARISHAD (Estd. 1977) ANNOUNCEMENT**

The Parishad has constituted an Endowment Fund for the award, on an annual basis, of Dr. R. S. Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand only for outstanding contribution in the form of an article published during calender years 2008 and 2009 in standard accrediated journals on themes belonging to the areas : Central Banking, Industrial Finance and General Industrial Economics. Last date for the submission of entries (Two Copies) for this year's contest is 10th September 2010. For further details contact the undersigned at his address : Dr. D. K. Patil , Address Sadanand Banglow, Opp. Venketesh Plaza, Mahadevnagar, Urun-Islampur. Tal. Walwa, Dist. Sangli. 415 409

**Dr. D. K. Patil**
Executive President

# कार्यवाहांचा अहवाल :
# तेहतिसावे वार्षिक अधिवेशन 2008-09

**अनिल बाबूराव सूर्यवंशी**
कार्यवाह – खजिनदार
मराठी अर्थशास्त्र परिषद

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे 33 वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन बुधवार दिनांक 13 जानेवारी ते शुक्रवार दिनांक 15 जानेवारी 2010 या तीन दिवसांच्या कालावधीत शेती विकास न्यास संचलित शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, शारदानगर, बारामती, जिल्हा पुणे येथे यशस्वीरित्या संपन्न झाले. डॉ. विनायक देशपांडे, विभागप्रमुख, व्यवसाय व्यवस्थापन विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर हे अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी होते.

## अधिवेशन उद्घाटन समारंभ

प्रारंभी उद्घाटन सोहळयास उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार शेती विकास न्यासच्या विश्वस्त सुनंदा पवार व प्राचार्य डॉ. एम. एस. शेजूळ यांनी केले. अधिवेशनाचे प्रमुख पाहुणे मा. प्रतापराव पवार, सकाळ माध्यम समूहाचे अध्यक्ष आणि वॅन इफ्राचे उपाध्यक्ष यांनी उपलब्ध साधनसामुग्री वाया घालवणे ही आपल्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीमधील उणीव आहे. साधनसामुग्रीचा योग्य वापर केल्यास आपली अर्थव्यवस्था निश्चित सुदृढ होऊ शकते असे प्रतिपादन केले. पुणे विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. अरूण अडसूळ यांनी दीपप्रज्वलन करून अधिवेशनाचे उद्घाटन केले. या प्रसंगी भारतात भुकेचा प्रश्न मुलभूत असल्याचे डॉ. अडसूळ यांनी सांगितले. माहिती तंत्रज्ञानातील प्रगतीचा वापर शेतीच्या संवर्धनासाठी केला पाहिजे असे ते म्हणाले.

अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. विनायक देशपांडे यांनी जागतिक वित्तीय अरिष्टांचे सैध्दांतिक व व्यावहारिक दृष्टिकोन सांगून मंदीचा फटका शेतीला

बसला आहे, असे प्रतिपादन केले. जोखीम व्यवस्थापन हा सध्या महत्त्वाचा मुद्दा आहे असे स्पष्ट केले. प्रतापराव पवार यांच्या हस्ते मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या संकेत स्थळाचे (website) उद्घाटन करण्यात आले. व्यासपीठावर परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनायक देशपांडे, कार्याध्यक्ष डॉ. दिलीप पाटील, कार्यवाह खजिनदार डॉ. अनिल सूर्यवंशी, अर्थसंवादचे प्रमुख संपादक डॉ. जगन्नाथ पाटील, परिषदेचे गतवर्षाचे अध्यक्ष डॉ. विनायक भिसे, पुणे विद्यापीठाचे अधिष्ठाता प्राचार्य नंदकुमार निकम, प्राचार्य डॉ. एम. एस. शेजूल, स्थानिक कार्यवाह डॉ. एम. यू. मुलाणी आदि उपस्थित होते. कार्यवाह डॉ. अनिल सूर्यवंशी यांनी परिषदेच्या वाटचालीबाबतचा संक्षिप्त आढावा घेतला. कार्याध्यक्ष डॉ. दिलीप पाटील यांनी या वर्षी नवीनच सुरू केलेल्या 'मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम' या पारितोषिकाबाबतची माहिती दिली. अर्थशास्त्रातील सर्वोत्कृष्ट महिला लिखित ग्रंथास हे पारितोषिक दिले जाणार आहे. डॉ. अडसूळ यांच्या हस्ते 'अर्थशलाका' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. भूतपूर्व अध्यक्ष डॉ. विनायक भिसे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. स्थानिक कार्यवाह डॉ. मुलाणी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि प्रा. गौतम धनवे यांनी आभार मानले.

**चर्चासत्रे**

अधिवेशन कालावधीत एकूण 4 चर्चासत्रे संपन्न झाली. बुधवार दिनांक 13 जानेवारी रोजी दुपारी 'पॉल क्रुगमन यांचे आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दांतामधील योगदान' या प्रथम चर्चासत्राचे सूत्रसंचालन डॉ. दि. व्य. जाहगिरदार यांनी केले. गुरूवार दिनांक 14 जानेवारी सकाळी 'भारतीय शेती समोरील आव्हाने' या दुसऱ्या चर्चासत्रात 77 शोधनिबंध सादर झाले. या सर्वात जास्त शोधनिबंध सादरीकरणाचे आव्हान डॉ. मधुकर शिंदे यांनी सूत्रसंचालक या नात्याने यशस्वीरित्या पार पाडले. 'महाराष्ट्रातील औद्योगिक विकासाचे मूल्यमापन' या तिसऱ्या चर्चासत्राचे सूत्रसंचालक डॉ. के. जी. पठाण होते. या तिनही चर्चासत्रात एकूण 160 शोध निबंधाचे सादरीकरण करण्यात आले.

शुक्रवार दिनांक 15 जानेवारी रोजी 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सुवर्ण महोत्सवाच्या उंबरठ्यावर' या आयत्या वेळच्या विषयावर चर्चासत्र संपन्न झाले. डॉ. चंद्रहार देशपांडे, डॉ. ज. फा. पाटील, श्रीमती कुलकर्णी, आदींनी महाराष्ट्राची अर्थव्यवस्था या विषयाच्या विविध पैलूंवर आपले विचार व्यक्त केले. मा. डॉ. भालचंद्र मुणगेकर, सदस्य नियोजन मंडळ, नवी दिल्ली यांची विशेष उपस्थिती होती. 'महाराष्ट्रातील स्वयं सहाय्यता बचत गटाची सद्यस्थिती व भवितव्य' या विषयावर विशेष सत्र घेण्यात आले. डॉ. मुलाणी एम. यु. आणि प्रा. दिगंबर दुर्गाडे यांनी या विषयावर मार्गदर्शन केले.

**वार्षिक सर्वसाधारण सभा**

गुरूवार दिनांक 14 जानेवारी रोजी सायंकाळी 5.30 वा. डॉ. विनायक देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. प्रारंभी माजी अध्यक्ष नलिनी पंडीत, प्राचार्य भा. रा. ढेकणे व दिवंगत आजीव सदस्य व

मान्यवरांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. वार्षिक सर्वसाधारण सभेतील काही महत्त्वाचे निर्णय पुढीलप्रमाणे -

**34 वे वार्षिक अधिवेशन**

ऑक्टोबर / नोव्हेंबर 2010 मध्ये होणाऱ्या परिषदेच्या 34 व्या वार्षिक अधिवेशनाचे यजमानपद स्वीकारण्यासाठी दोन निमंत्रणे प्राप्त झाली होती.

1. आदर्श कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, बदलापूर, जिल्हा ठाणे.
2. अग्निहोत्री कॉलेज, वर्धा

कार्यकारी मंडळाच्या शिफारशीनुसार सर्वसाधारण सभेने आदर्श कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, बदलापूर यांचे निमंत्रण एकमताने स्वीकारले.

34 व्या वार्षिक अधिवेशनासाठी पुढील तीन विषय निश्चित करण्यात आले.

1. पॉल सॅम्युअलसन यांचे अर्थशास्त्रातील योगदान
2. असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचा अभ्यास
3. महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचे वास्तव आणि भवितव्य

**निवडणूक :**

34 व्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी डॉ. मुक्ता दिगंबर जाहगिरदार, अमरावती यांची बहुमताने निवड झाली. 2010 ते 2013 या तीन वर्षासाठी माजी कार्याध्यक्ष डॉ. ज. फा. पाटील, कोल्हापूर यांची विश्वस्त म्हणून एकमताने निवड झाली. या संदर्भात प्रा. चारूदत्त गोखले यांनी ठराव मांडला व डॉ. जगन्नाथ पाटील यांनी अनुमोदन दिले. 2010 ते 2013 या तीन वर्षासाठी कार्यकारी मंडळावर

1) प्रा. डॉ. मंडले श्रीरंग बापूराव, मालवण, जि. सिंधुदुर्ग
2) प्रा. डॉ. मुलाणी एम. यू. बारामती, पुणे
3) प्रा. डॉ. भोसले तानाजी मारूती, कवठेमहंकाळ, जि. सांगली या तिघांची बहुमताने निवड करण्यात आली.

**समारोप सोहळा :**

शुक्रवार दिनांक 15 जानेवारी 2010 रोजी सकाळी 11.30 वा. समारोप सोहळ्यास प्रारंभ झाला. या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून मा. प्रभाकर देशमुख, कृषी आयुक्त, महाराष्ट्र राज्य व मा.डॉ. पंडित विद्यासागर, संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, पुणे विद्यापीठ, पुणे होते. प्रमुख उपस्थिती मा. डॉ. बाबासाहेब सांगळे, अधिष्ठाता, वाणिज्य विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे यांची लाभली. समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. राजेंद्र पवार, चेअरमन, शेती विकास न्यास, बारामती हे होते. व्यासपीठावर परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनायक देशपांडे, कार्याध्यक्ष डॉ. दिलीप पाटील, कार्यवाह-खजिनदार डॉ. अनिल सूर्यवंशी, अर्थसंवादचे संपादक, डॉ. जगन्नाथ पाटील, नवनिर्वाचित अध्यक्षा डॉ. मुक्ता जाहगिरदार, स्थानिक कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. एम. एस. शेजूळ व स्थानिक कार्यवाह डॉ. महमदरफिक मुलाणी आदि उपस्थित होते. प्रमुख पाहुणे मा. देशमुख यांनी 'महाराष्ट्रातील कृषी विकास व विकासातील समस्या' याबाबत मार्गदर्शन केले. 'भारतीय शेतीसमोरील आव्हाने' या विषयावर चर्चासत्र

आयोजित केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. यजमान संस्थेचे चेअरमन व समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. राजेंद्र पवार यांनी या प्रसंगी अर्थशास्त्रातील कृषीविषयक संशोधन वाढणे गरजेचे आहे. तसेच या अधिवेशनातील विविध विषयांवर जे विचारमंथन होते, ते समाजातील संबंधित लोकांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले.

याप्रसंगी परिषदेचे कार्यवाह डॉ. अनिल सूर्यवंशी, अध्यक्ष डॉ. विनायक देशपांडे व कार्याध्यक्ष डॉ. दिलीप पाटील यांनी परिषदेच्या वतीने आपली मनोगते व्यक्त केली व यजमानांचे आभार मानले. नवनिर्वाचित अध्यक्षा डॉ. मुक्ता जाहगिरदार यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले.

**परिषदेतर्फे विविध पारितोषिकांचे वितरण:**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या विविध पारितोषिकांचे वितरण या समारोप समारंभात पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

**1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक रू. 201/- (2008-09) :**

'अल्पबचत नियोजन (बचत गट)' या डॉ. मुलाणी एम. यू. बारामती यांच्या ग्रंथास देण्यात आले.

**2) प्रा. मो. स. भावे पारितोषिक : (अर्थसंवादमधील सर्वोत्कृष्ट लेख रू. 251/-)**

'किनवट तालुक्यातील आदिवासी उप-योजना' प्रा. मारोती वीरभद्र, तेगमपुरे, औरंगाबाद यांच्या लेखास देण्यात आले. हा लेख अर्थसंवाद खंड 32. अंक 2, जुलै-सप्टेंबर 2009 पृष्ठ क्र. 160-170 प्रसिद्ध झालेला आहे.

**3) म.अ. परिषदेचे पाचवे वार्षिक अधिवेशन, पारितोषिक :**

शिवाजी विद्यापीठात एम.ए. अर्थशास्त्र या विषयात सर्वाधिक गुण मिळालेल्या श्री. वाघाळे गुरूनाथ श्रीशैल (एप्रिल 2009) यास प्रमाणपत्र देण्यात आले.

**4) भाऊसाहेब गेणूजी दरेकर-पाटील स्मृती पारितोषिक :**

पुणे विद्यापीठात एम. ए. अर्थशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास देण्यात आले.

**5) मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम स्मृती पारितोषिक :**

अर्थशास्त्र विषयातील मराठी भाषेत महिला लेखिकेने लिहलेल्या सर्वोत्कृष्ट ग्रंथास रोख रूपये 11,100/-, स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ व साडी असे पारितोषिक या वर्षीपासून सुरू करण्यात आलेले आहे. मा. नामदार पतंगराव कदम यांनी आपल्या मातोश्रींच्या स्मृतीनिमित्त रूपये दोन लाख मराठी अर्थशास्त्र परिषदेस देणगी दिलेली आहे. मराठी अर्थशास्त्र परिषेदेचे कार्याध्यक्ष डॉ. दिलीप पाटील यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले आहेत. याबद्दल परिषदेच्या वतीने मी त्यांचा आभारी आहे.

या पारितोषिकासाठी 'आर्थिक चिकित्सा' या डॉ. मुक्ता दिगंबर जहागिरदार यांच्या ग्रंथाची निवड झाली. डॉ. मुक्ता जाहगिरदार या पारितोषिकाच्या प्रथम मानकरी ठरल्या. त्यांनी पारितोषिकाची रक्कम 11,000/- परिषदेस देणगी देऊन एक नवा पायंडा पाडला आहे. मराठी

अर्थशास्त्र परिषदेच्यावतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन !!!

**अधिवेशन काळातील पारितोषिके :**

अधिवेशन काळात सर्वोत्कृष्ट शोधनिबंधांना खालीलप्रमाणे पारितोषिके दिली जातात.

**1) कै. ग. प्र. पिंपरकर व कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ. अमर्त्य सेन पारितोषिक रू. 501/-**

प्रा. जयवंत इंगळे, अ. आ. कॉलेज, मंचर यांच्या 'आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतीविषयक समस्या' आणि प्रा. डॉ. प्रशांत हरमकर, प्रा. मीरा आळशी, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती यांच्या 'पॉल क्रुगमनचे नवआर्थिक भूगोल' या दोन शोध निबंधांना विभागून देण्यात आले. प्रा. जयवंत इंगळे यांनी पारितोषिकाची रक्कम परिषदेस देणगी दिली, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन

**2) डॉ. ज. फा. पाटील पारितोषिक रू. 1111/-**

वार्षिक अधिवेशनात विद्यार्थी सभासदाने सादर केलेल्या उत्कृष्ट शोध निबंधाचे पारितोषिक श्री. रमजान मुजावर, कोल्हापूर यांच्या 'भारतीय शेती आणि पाणी व्यवस्थापन' या निबंधास देण्यात आले.

**3) पद्मजा गंधे पारितोषिक रू. 1001/- :**

वार्षिक अधिवेशनात महिला सभासदाने सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोध निबंधास दिले जाते. सदर पारितोषिक कु. होनश्री यशवंत पाटील, नाशिक यांच्या 'का जगावे भारतीय शेतकऱ्यांनी ?' आणि प्रा. ज्योती किरवे, महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी, पुणे यांच्या 'महाराष्ट्रातील औद्योगिक विकास' या दोघींना विभागून देण्यात आले.

शारदाबाई पवार ट्रस्ट, बारामती यांच्या वतिने ३३ व्या वार्षिक अधिवेशनात डॉ. लालासाहेब घाटगे व डॉ. अनिल वावरे (सातारा) डॉ. मंजुषा मुसमाडे (पुणे) डॉ. हिरालाल चव्हाण (जळगांव) यांनी सादर केलेल्या शोधनिबंधाला उत्कृष्ट शोधनिबंधाचे सुवर्णपदक व प्रशस्तिपत्र देण्यात आले. महाविद्यालयाने सदर उपक्रमाद्वारे शोधनिबंध लेखकांना प्रोत्साहन दिल्याबद्दल परिषदेच्या वतिने शारदाबाई पवार ट्रस्ट, बारामती या संस्थेचे हार्दिक आभार.!

समारोप सोहळ्याचे प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य डॉ. एम. एम. शेजूळ यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. मुलाणी एम. यू. यांनी केले. अशाप्रकारे मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 33 व्या अधिवेशनाची यशस्वीरित्या सांगता झाली.

या अधिवेशनासाठी डॉ. विनायक गोविलकर, नाशिक, डॉ. विनायक भिसे, औरंगाबाद, डॉ. श्रीनिवास खांदेवाले, नागपूर, डॉ. अनिल पडोशी, गोवा यांनी तज्ञ परिक्षक म्हणून मानद सेवा दिली. तसेच डॉ. दि. व्यं. जाहगिदार, अमरावती, डॉ. मधुकर शिंदे, सांगली, आणि डॉ. के. जी. पठाण, पुणे यांनी अधिवेशन काळातील चर्चासत्रांचे सूत्रसंचालन यशस्वीरित्या पार पाडले आणि प्रा. ए. पी. देसाई, सातारा, यांनी निवडणूक म्हणून अधिकारी त्यांच्या सहकाऱ्यांसह उत्कृष्ट व शांततेत निवडणूक पार पाडली. या सर्वांचा मी परिषदेच्यावतीने ऋणी आहे.

# अर्थसंवाद वार्षिक अहवाल
## 2008-2009 (खंड 32, अंक 1 ते 4)

**जगन्नाथ शामराव पाटील**
संपादक,
अर्थसंवाद
मोबाईल : 9423261796

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या अर्थसंवाद या मासिकाचा 2008-2009 या वर्षाचा 32 व्या खंडाचा वार्षिक अहवाल परिषदेच्या सर्व सदस्यासमोर सादर करताना मला अतीव आनंद होत आहे. आपण सर्वांनी माझ्यावर अर्थसंवादच्या प्रमुख संपादकाची जबाबदारी सोपवली, त्याबद्दल मी आपल्या सर्वांचा अत्यंत कृतज्ञ आहे. माझ्या संपादकीय कारकिर्दीतला हा पहिला अहवाल. अर्थसंवादचे आजपर्यंत 32 खंड अखंडपणे प्रकाशित झाले . मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सदस्य, अर्थसंवादचे लेखक, वर्गणीदार, जाहिरातदार यांच्या सहकार्यामुळे परिषदेस हे त्रैमासिक चालू ठेवणे शक्य झाले आहे. इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च, दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई या संस्थांनी नियमितपणे अर्थसंवादच्या प्रकाशनासाठी अनुदान मंजूर करून यात वेळोवेळी वाढ देखील केली आहे. त्याबद्दल मी या संस्थांचा अत्यंत कृतज्ञ आहे.

सन 2008-2009 या वर्षामध्ये अर्थसंवादचे चारही अंक परिषदेच्या प्रथेप्रमाणे प्रकाशित झाले. मागील वर्षात अर्थसंवादला ISSN क्रमांक प्राप्त झाल्याने अर्थसंवाद जागतिक पातळीवरील नियतकालिकांच्या यादीमध्ये समाविष्ट झाला. अर्थसंवादच्या लेखकांना यामुळे अधिक प्रतिष्ठा प्राप्त होईल यात शंका नाही.

सन 2008-09 या वर्षाच्या बत्तिसाव्या खंडात परिषदेच्या वार्षिक अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण, पां.वा.गाडगीळ स्मृती व्याख्यान, 19 स्वतंत्र लेख, 2 पारितोषिक प्राप्त लेख, 3 पीएच.डी. प्रबंधांचे सारांश, 5 ग्रंथ परीक्षणे, अर्थ शब्दांची वाट पाहे, 2 संवादरूपी प्रतिक्रिया (चर्चा) 1 संपादकीय, 3 अधिवेशन वृत्तांत, तेहत्तिसाव्या अधिवेशनासाठीच्या विषयांची

रूपरेषा, बत्तिसावे वार्षिक अधिवेशन अहवाल व अर्थसंवाद 2007-08 अहवाल असा विविधांगी मजकूर प्रकाशित करण्यात आला. या व्यतिरिक्त नोबले विजेत्यासंबंधीचा लेख या खंडात देऊन पॉल क्रुगमन या नोबले विजेत्या अर्थशास्त्रज्ञाचा गौरव करण्यात आला.

सन 2008-09 या वर्षात 45 लेखकांचे योगदान अर्थसंवादला लागले. या सर्व लेखकांचा मी परिषदेच्या वतीने अत्यंत आभारी आहे. चारही अंकाची मिळून एकूण 420 पाने झाली. पानाची मर्यादा पाळण्याचा प्रयत्न करून गुणवत्ता वाढविण्यासाठी कार्यरत आहे. मराठी अर्थशास्त्रीय विषयावरील उपयुक्त साहित्य उपलब्ध करून देणारे अर्थसंवाद हे अत्यंत महत्त्वपूर्ण नियतकालिक सर्वसंपन्न बनविण्याच्या उपक्रमात सर्व सदस्यांनी व वाचकांनी आपआपला वाटा उचलला आहे हे विसरून चालणार नाही.

अर्थसंवादची तूट भरून काढण्यासाठी वार्षिक वर्गणीदार म्हणून महाविद्यालयांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. परिषदेच्या सदस्यांनी आपआपल्या महाविद्यालयात अर्थसंवाद घेतला जाईल याकडे आवर्जून लक्ष दिल्यास वर्गणीदार महाविद्यालयांच्या संख्येत वाढ होऊन अर्थसंवादचे उत्पन्न वाढण्यास मदत होऊ शकेल. तसेच वार्षिक वर्गणी नवीन आर्थिक वर्ष (1 एप्रिल ते 31 मार्च) सुरू होताच लवकरात लवकर पाठवली जाईल याची दक्षता घेतल्यास अर्थसंवाद नियमितपणे ग्रंथालयात वाचकांना उपलब्ध होऊ शकेल. दुसरे अत्यंत महत्त्वाचे म्हणजे जाहिरात प्राप्त करणे. सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व सभासद बंधूंनी आपआपल्या परिसरातील एखादी पूर्ण पानाची जाहिरात उपलब्ध करून दिल्यास अंक वेळेत निघणे शक्य होईल व अर्थसंवादची तूट कमी होण्यास मदत होईल. आता अर्थसंवादच्या आर्थिक व्यवहारांची थोडक्यात माहिती करून घेऊ.

**तक्ता : अर्थसंवादची महत्त्वपूर्ण तौलनिक महिती**

| क्र. | तपशील | 2006-07 | 2007-08 | 2008-09 |
|---|---|---|---|---|
| 1. | चार अंकाच्या एकूण प्रती | 5,945 | 6,295 | 6,400 |
| 2. | चार अंकाची एकूण पृष्ठे | 425 | 442 | 420 |
| 3. | चार अंकाचा एकूण खर्च (रु.) | 187003 | 2,04,347 | 2,16,233 |
| 4. | दर नगाचा सरासरी खर्च (रु.) | 31.45 | 33.65 | 33.78 |
| 5. | दर पानाचा सरासरी खर्च (रु.) | 0.29 | 0.30 | 0.32 |
| 6. | जाहिरातीपासून उत्पन्न (रु.) | 52,500 | 81,170 | 39,000 |

अहवाल वर्षात जाहिरातीविना एकही पान कोरे नाही. चारही अंकात 12 जाहिराती आपण प्रकाशित केल्या. अर्थसंवादची वित्तीय बाजू सावरण्यास यामुळे निश्चितच हातभार लागला आहे. वरील तक्त्याच्या आधारे पुढील बाबी ध्यानात घेता येतील.

आता अर्थसंवादच्या प्रत्येक अंकाच्या 1600 प्रती छापल्या जात आहेत. आजीव सदस्य व वार्षिक वर्गणीदार यांची संख्या सातत्याने वाढत आहे ही अर्थसंवादची जमेची बाजू होय.

चारही अंकाच्या एकूण पृष्ठसंख्या 420 इतकी ठेवण्यात आली असून प्रत्येक अंक साधारणत: 100 पानांच्या जवळपास राखण्याचे धोरण शक्यतोवर अवलंबिण्याचा प्रयत्न केला आहे.

चारही अंकाच्या एकंदर खर्चाने अहवाल वर्षात दोन लाख पंधरा हजाराची मर्यादा ओलांडली आहे. छपाईचा वाढता खर्च व कागदाच्या किंमतीत वाढ याला मुख्यत: कारणीभूत आहे.

2008-09 मध्ये दर अंकाचा छपाई खर्च गतवर्षीच्या तुलनेत 0.04 टक्क्यांनी वाढला आहे. विशेष म्हणजे ही वाढ अत्यंत नगण्य आहे.

जाहिरातीपासून एकूण उत्पन्न रू. 39000/- मिळाले. ही अत्यंत समाधानकारक बाब आहे. हे उत्पन्न मिळविण्यासाठी कार्याध्यक्ष ज. फा. पाटील, के. जी. पठाण, चारूदत्त गोखले, लालासाहेब घाटगे, संतोष दास्ताने, दिलीप पाटील, अशोक साबळे, अनिल सूर्यवंशी, संतोष यादव, सुधीर परचुरे, सुमंत कुलकर्णी यांनी विशेष प्रयत्न केले. या सर्वांचा मी परिषदेच्या वतीने अत्यंत आभारी आहे.

अर्थसंवादची तूट भरून काढण्यासाठी भारतीय विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांचे योगदान देखील मोलाचे आहे. भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषदेने 2008-09 मध्ये अर्थसंवादच्या प्रकाशनासाठी रू. 50,000/- अनुदान दिले आहे. या दोन्ही संस्थांचा परिषदेच्या वतीने मी अत्यंत आभारी आहे.

अर्थसंवादने सातत्याने अर्थशास्त्रीय परिभाषा समृद्ध करणेसाठी 'अर्थ शब्दांची वाट पाहे' हे सदर सुरू केले. परिषदेचे माजी अध्यक्ष शि. ना. माने यांनी सातत्याने या संदर्भात योगदान दिले. ज. फा. पाटील, प्रभाकर जोशी यांनी या सदरात (चर्चा) संवाद स्वरुपात आपले योगदान दिले. अर्थशास्त्र परिभाषा कोश प्रसिद्ध होऊन बरीच वर्षे झाली. त्यामुळे नव्याने येणारे शब्द/संकल्पना त्यात उपलब्ध नाहीत. त्या दृष्टीने अर्थ शब्दांची वाट पाहे हे सदर अत्यंत उपयुक्त होत आहे. परिषदेच्या इतर सदस्यांनी देखील यासाठी लेखणी कामाला लावली तर पर्यायी शब्द उपलब्ध होऊ शकतील.

देशात व जागतिक पातळीवर घडणाऱ्या विशेष महत्त्वाच्या घटनांविषयी खास लेख देण्याचा प्रयत्न या वर्षातही आम्ही चालू ठेवला. नोबेल पारितोषिक विजेते पॉल क्रूगमन यांच्या कार्याची माहिती करून देणारा स्वतंत्र लेख, सैद्धांतिक लेख, भारतीय राजस्व, केंद्र सरकारचा कर महसूल यावरही लेख या वर्षी आपल्या अर्थसंवाद मध्ये प्रकाशित करण्यात आले.

अर्थसंवादचा प्रत्येक तिमाहीचा अंक उशिरात उशिरा त्या तिमाहीच्या अखेरीस तरी सदस्य व वर्गणीदारांना देण्याचा मनोदय शक्य झाला नाही हे खेदाने नमूद करावे लागते. छापण्यायोग्य मजकूराचा आता दुष्काळ जरी नसला तरी सर्वच लेख नियतकालिकात प्रकाशित करण्याच्या दृष्टीने आवश्यक निकष पूर्ण करतात असे नाही. उदाहरणार्थ संदर्भ सूची एका विशिष्ट स्वरूपात नमूद केलेली

असावी असा साधारणपणे दंडक आपण पाळण्याचा प्रयत्न करतो. परंतु लेखामध्ये तसे न आढळल्यास त्यासाठी बराच वेळ जातो. मराठीच्या प्रमाणित संकल्पना देखील बऱ्याच लेखांमध्ये आढळत नाहीत. लेखकांसाठी सूचना आपण अर्थसंवादमध्ये वेळोवेळी प्रकाशित केल्या आहेत. त्या सूचनांचे तंतोतंत पालन होतेच असे नाही. यात स्वाभाविकच संपादनाच्या प्रक्रियेत वेळ जातो. तसेच आपण अर्थसंवादच्या प्रत्येक अंकात फक्त तीनच जाहिराती देतो, त्या वेळेवर उपलब्ध होत नाही. त्याकरिता पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, सल्लागार मंडळ, आजीव सदस्य यांनी आपआपला वाटा उचलून अर्थसंवादला मदत करण्याची गरज आहे.

अर्थसंवाद खंड 32 अंक 4 मध्ये मराठी अर्थशास्त्र परिषदेचे भूतपूर्व अध्यक्ष व कार्याध्यक्ष ज. फा. पाटील यांनी दिलेले एक आवाहन छापलेले आहे. त्यामध्ये अर्थसंवादशी संबंधित तूट भरपाई निधीची जी संकल्पना त्यांनी मांडलेली आहे तिचा सर्व आजीव सदस्यांनी गंभीरपणाने विचार करावा. आवश्यक असल्यास योग्य त्या सुधारणा सुचवाव्यात व सर्वात महत्त्वाचे अशा निधीसाठी उदारहस्ते शक्य ती आर्थिक मदत करावी ही संपादक म्हणून माझी तसेच सल्लागार समितीची कळकळीची विनंती.

मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगांव, जि. सांगली येथे संपन्न झालेल्या बत्तिसाव्या अधिवेशनात 6 नोव्हेंबर, 2008 रोजी सल्लागार मंडळाची बैठक झाली. विचारांचे आदान प्रदान होऊन सदस्यांनी अर्थसंवादचा दर्जा वाढविण्यासाठी उपयुक्त मार्गदर्शनपर सूचना केल्या. सल्लागार मंडळाचे सदस्य अवधूत नाडकर्णी, अ. ब. देवगिरीकर, किशोर वाघमारे आणि जयश्री खांबेटे यांचा परिषदेच्या वतीने मी अत्यंत अभारी आहे.

अर्थसंवादच्या 32 व्या खंडाची जडण-घडण करण्यासाठी अनेकांनी मोलाची मदत केली. गुरूवर्य ज. फा. पाटील यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभल्यामुळे हा खंड पूर्ण होऊ शकला. लेखक, जाहिरातदार, सहायक संपादक संतोष यादव, सल्लागार मंडळाचे सदस्य, कार्यकारिणी सदस्य, कार्यवाह अनिल सूर्यवंशी, अध्यक्ष विनायक भिसे, माजी संपादक विनायक देशपांडे, माजी कार्यवाह खजिनदार चारूदत्त गोखले, माजी अध्यक्ष शि. ना. माने, सुधीर परचुरे, लालासाहेब घाटगे, के. जी. पठाण व माझे मित्र यांचे मार्गदर्शन व योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरले. या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

अर्थसंवादचा हा खंड छापणाऱ्या प्रतिमा ऑफसेट, इस्लामपूरचे सुमंत कुलकर्णी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचा मी परिषदेच्या वतीने अत्यंत आभारी आहे.

अर्थसंवादाची वर्षभरातील जबाबदारी पार पाडताना मला मात्र परिषदेने अध्यक्ष विनायक भिसे, कार्याध्यक्ष ज. फा. पाटील, कार्यवाहक-खजिनदार अनिल सूर्यवंशी या सर्वांचे सहाकार्य लाभले. या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे. कार्यकारी मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य, परिषदेचे सर्व सदस्य यांच्या सदिच्छ व सततच्या प्रोत्साहनामुळेच हा खंड पुर्ण करू शकलो. सर्वांचा मन:पूर्वक धन्यवाद. अर्थसंवाद हे नियतकालिक अधिक दर्जेदार व उपयुक्त बनविण्यासाठी आपआपल्या परीने आपण सर्वजणच यथाशक्ती प्रयत्न करू या!

निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयांचे रुपरेषा

# १) पॉल सॅम्युअल्सन यांचे अर्थशास्त्रातील योगदान

**ज्ञानोबा भिमराव मोरे,**
तेरणा महाविद्यालय, उस्मानाबाद.
drdbmore@rediffmail.com.
मोबा. 9423340092

**प्रस्तावना –**

अर्थशास्त्राच्या विविध शाखांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण भर घालणारा, नवीन संकल्पनांचा विविध शैलीने अभ्यास करणारा, नोबेल पुरस्काराच्या माध्यमाने आपल्या संशोधनावर शिक्कामोर्तब करणारा, एक प्रभावी अर्थशास्त्रज्ञ म्हणून पॉल अँन्थोनिय सॅम्युअलसन यांना ओळखले जाते. अध्यापन आणि संशोधन यामध्ये विशेष आवड असणाऱ्या सॅम्युल्सन यांनी नवीन कल्याणकारी अर्थशास्त्रामध्ये तसेच लिनिअर प्रोग्राम, केल्शियन अर्थशास्त्रामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांतामध्ये Logic Choice And Maximization इत्यादी क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी केलेली आहे. प्रोफेसर सॅम्युअलसन हे स्वत:ला मॉडर्न इकॉनॉमिस्ट समजत असत. एक उत्तम गणिततज्ञ सॅम्युअलसनच्या बौद्धिक क्षमतेबद्दल कोणाच्याही मनात शंका नाही. एम.आय.टी. संस्थेच्या अध्यक्षा सुसान हॉक फिल्ड यांच्या मते, ''पॉल सॅम्युअल्सन हे ज्या ज्या गोष्टीला स्पर्श करायचे त्याचे सोने करायचे. अर्थशास्त्राचे सैद्धांतिक आधार, गणित विश्लेषणाचे महत्त्व, अर्थशास्त्रीय अध्यापन पद्धती ते ज्या ठिकाणी काम करत होते त्यांच्या विभागातील वातावरण व विभागाची प्रतिष्ठा एम.आय.टी. संस्थेतील त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.''

**जीवनपरिचय –**

प्रा. पॉल अँन्थोनिय सॅम्युअलसन यांचा जन्म 15 मे, 1915 रोजी अमेरिकेतील इंडियन राज्याच्या गॅरी येथे झाला. 1935 मध्ये शिकागो विद्यापीठातून कला शाखेची पदवी त्यांनी घेतली. 1936 मध्ये एम.ए. आणि 1941 मध्ये पीएच.डी. पदवी हारवर्ड विद्यापीठातून त्यांनी मिळवली.

1941 मध्ये डेव्हीड ए. वेल्स. हे हारवर्ड विद्यापीठकडून दिले जाणारे मानाचे पारितोषिक मिळाले तर 1947 मध्ये अमेरिकेन अर्थशास्त्र असोसिएशनकडून जॉन बॅटेस कर्ल्स या नावाने दिले जाणारे मेडल त्यांना मिळाले. जॉन एफ. केनेडी तसेच लिंडन जॉन्स अमेरिकेच्या दोन राष्ट्रध्यक्षांचे आर्थिक सल्लागार म्हणून काम पाहिले. 1940 मध्ये एम.आय.टी.मध्ये रुजू झालो व बहुतांश कालावधीमध्ये त्यांनी या जगप्रसिद्ध संस्थेत आपले योगदान दिले. Economic : An Introductory Analyasis हे पुस्तक त्यांनी 1948 मध्ये प्रकाशित केले या पुस्तकाच्या जवळपास 40 भाषेतून विविध आवृत्या निघून लाखो प्रतिने खपणारे हे पुस्तक बेस्ट सेलमध्ये आहे. 1951 मध्ये इकॉनॉमेट्रीक्स सोसायटीचे अध्यक्ष, 1961 मध्ये अमेरिकन इकॉनॉमिक्स असोसिएशनचे अध्यक्ष तर 1965 मध्ये आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष या पदावर काम करण्याचा बहुमान त्यांना मिळाला. 1970 मध्ये प्रा. पॉल सॅम्युअलसन या अमेरिकन अर्थशास्त्रज्ञास अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाले. अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळवणारा पाहिला अमेरिकेन अर्थशास्त्रज्ञ हा बहुमान त्यामुळे त्यामुळे त्यांना मिळाला.

बेलमोन्ट, मास येथे आपल्या पत्नी व सहा मुलांसोबत राहणाऱ्या सॅम्युअल्स यांचा मृत्यू अल्पशा आजाराने वयाच्या 94 व्या वर्षी दिनांक 13 डिसेंबर 2009 रोजी झाला.

**सॅम्युअल्सन यांचे योगदान –**

अर्थशास्त्र विषयातील आपल्या कारकिर्दीला प्रा. पॉल सॅम्युअलसन यांनी एम.आय.टी. या संस्थेमधून सुरुवात केली. 1940 पर्यंत या संस्थेत अर्थशास्त्र विषयाचे पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जात नव्हते. आज एम.आय.टी. हे अर्थशास्त्राच्या अध्यापनाचे व संशोधनाचे जगातील एक प्रमुख केंद्र म्हणून ओळखले जाते हे नाव लौकिक निर्माण करण्यामध्ये पॉल सॅम्युअलसन हे हे अग्रभागी आहेत.

केन्स, शुम्पिटर विल्सन, लिडांल, हॅन्सेन, विकिसेल इत्यादी विचारवंतांच्या विचारांना पुष्ठी देऊन अर्थशास्त्रामध्ये योगदान देणारा पॉल सॅम्युअलसन यांनी फ्रिडमनच्या सैधांतिक विश्लेषणाला विरोध केलेला दिसून येतो.

अमेरिकन प्रेसिडेन्ट जॉन केनडी जगप्रसिद्ध राज्यकर्त्यांना आर्थिक सल्ला देण्याचे काम सॅम्युअलसन यांना करता आले. फेडरल रिझर्व्ह बोर्ड, युनायटेड स्टेट ट्रेझरी यांना सल्ला देणे, बिरो ऑफ बजेट इ. माध्यमाने यु.एस.ए.मधील एक प्रभावी अर्थ तज्ञ म्हणून तो पुढे आला. जगभरातील अर्थ तज्ञांच्या यादीमध्ये ज्याप्रमाणे सोलो, रॉबर्ट एजंल, पॉल, क्रुगमन, फ्रॅन्को, रॉबर्ट सीमेरटॉन, झोजेफ पिगलीज यांचा समावेश होतो. या यादीमध्ये पॉल सॅम्युअलसन यांचे नाव क्रमप्राप्त आहे. अमेरिकेच्या शैक्षणिक क्षेत्रात इतिहास निर्माण करणारे अर्थशास्त्रातील क्रमीक पुस्तक पॉल सॅम्युअलसन यांना 1948 मध्ये प्रसिद्ध केले. जवळपास ३० वर्ष उत्कृष्ट विक्रीचे पुस्तक ठरले. जगभरातील

40 भाषांमध्ये रुपांतरित झालेल्या या पुस्तकांच्या 40 लाखांपेक्षा अधिक प्रती विकल्या गेल्या.

**प्रकाशने –**

1) 1947 फाऊंडेशन ऑफ इकॉनॉमिक ॲनालेसेस, हाईड युनिव्हर्सिटी प्रेस,
2) 1948 इकॉनॉमिक्स : ॲन इट्रॉडॉक्टरी ॲनलेसेस, मॅग्रोहील.
3) 1958 लिनियन प्रोगामीन ॲन्ड इकॉनॉमिक ॲनालेसे सह लेखक रॉबर्ट डोरफमन आणि रॉबर्ट सोललो मॅग्रोहील.
4) 1966-86- 4 कलेक्टेड सॅन्टीफीक पेपरस् ऑफ पॉल सॅम्युलसन एम.आय.टी. प्रेस
5) 2007 - इनसाईड द इकॉनॉमिक माईडस् ब्लॅकवेल पब्लिकेशन.

**पॉल सॅम्युल्सन यांचे कार्यक्षेत्र –**

**कल्याणकारी अर्थशास्त्र –** लिडांल बॉवेल, सॅम्युअलसन यांचे कल्याणकारी अर्थशास्त्रातील सामाजिक कल्याणाचा स्तर उंचावण्यासाठी त्यांनी दिलेल्या अटी महत्त्व पूर्ण ठरलेल्या आहेत.

**सार्वजनिक वित्त सिद्धांत –** पॉल सॅम्युअलसन यांनी सार्वजनिक वित्त सिद्धांतामध्ये सार्वजनिक वस्तु आणि खाजगी वस्तु मधील संसाधनाचे पर्याप्त वितरण कसे करावयाचे हे सांगितले आहे.

**आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र –** आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांतामध्ये दोन महत्त्व पूर्ण मॉडेलची भर त्यांनी घातली.

बालसा–सॅम्युल्सन परिणाम आणि हेक्चर ओव्हलीन मॉडेल यामध्ये सुधारणा करण्याचे काम त्यांनी केले.

**स्थूल अर्थशास्त्र –** ओहरलॅपिंग जनरेशन मॉडेल हे महत्त्वपूर्ण मॉडेल मांडून स्थूल अर्थशास्त्रातील आपले योगदान त्यांनी सिद्ध केले आहे.

**उपभोक्त्याचे सिद्धांत –** उपभोक्त्याचे वर्तन ठरवत असताना उपयोगिता फलन यावर त्यांनी प्रकाश टाकला आहे. तसेच अभिव्यक्त पसंती सिद्धांतामध्ये मुलगामी भर टाकण्याचे काम त्यांनी केले आहे.

**संदर्भ –**


1) Frost, Greg (Dec. 13, 2009), "Nobel winning economist Paul A Samuelson dies at age an" MIT News.
2) Parker, Randall E (2002) Reflections on the Great Depression, Cheltenham Edward Elgar, ISBN 1843763354.
3) Samuelson, Economist Dies at 94 New York times.
4) Samuelson, Paul (1969) "The way of any Economist" London Macmillan.
5) Samuelson Paul - "Science and Stocks" News week.
6) Fischer, Stanley (1987) :Samuelson Pal Anthony "The New Palgrave A Dictionary of Economics Macmillan, London.
7) Silk, Leonard (1976) The Economists Basic Books, New york

8) Sobel, Rohert (1980), The worldly Economists, Free Press, New York.
9) Fusfeld, Daniel R. (2002), "The Neoclassical Sunthesis", "The Age of the Economist (amed)", Addison Wesley, Boston.
10) http://web.mit.edu/newoffice/2009/obitsamuelsonhtml.
11) http://www.hytimes:com/2009/12/14/business/economy/14
12) Brown, E.C. and Solow, R.M. (eds) (1983) Paul Samuelson and modern Economic theory, Bew Youk : McGraw till.
13) Feiwel G. R. (1982) Samuelson and Neo-classical Economics, Boston Kluwer.
14) Samuelson P. A. (1965) Foundations of Economic Analysis New York Atheneum.
15) The collected scientific papers of Paul A Samuelson Vol I-IV Cambridge, M.A. and London. Harvard University press.

## 'मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम'
## महिला ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने महिला लेखिकेने लिहलेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथास रुपये 11,000/- व शाल, श्रीफळ, साडी, सन्मानपत्र, मानचिन्ह देण्यात येते. 1 जानेवारी 2009 ते 31 डिसेंबर 2009 या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या महिला लेखिका यांना स्पर्धेत सहभागी होता येईल. स्पर्धेचे नियम, अटी इत्यादींसाठी डॉ. अनिल सूर्यवंशी, कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, 'गोदाई' शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी 413 411 जिल्हा सोलापूर यांचेशी संपर्क साधावा. संबंधित ग्रंथाच्या 4 प्रति कार्यवाहांकडे 31 ऑगस्ट 2010 पर्यंत पाठवाव्यात.

**डॉ. अनिल सूर्यवंशी**
कार्यवाह - खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

# २) असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचा अभ्यास

**बबनराव खामकर**
प्रपाठक अर्थशास्त्र विभाग
कणकवली कॉलेज,
कणकवली, जि. सिंधुदुर्ग

आदर्श महाविद्यालय बदलापूर येथे होणाऱ्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 34 व्या वार्षिक अधिवेशनाच्या एका चर्चासत्रासाठी "असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचा अभ्यास" हा एक विषय योजलेला आहे. या विषयावर शोधनिबंध सादर करताना पुढील बाबींचा विचार करावा लागेल.

**1. असंघटित क्षेत्र आणि भारताची औपचारिक अर्थव्यवस्था –**

केंद्रीय सांख्यिकी संघटनांच्या मते (cso) बाजारासाठी उत्पादन करणाऱ्या ज्या उपक्रमांमध्ये विजेचा वापर होतो, त्याठिकाणी 10 पेक्षा कमी व ज्या उपक्रमांमध्ये विजेचा वापर होत नाही, त्याठिकाणी 20 पेक्षा कमी कामगार काम करतात ते असंघटित क्षेत्र होय.

रोजगार आणि प्रशिक्षण महासंचालकांच्या मते एकूण कामगारांमधून संघटित क्षेत्रातील कामगार वजा केले की, शिल्लक राहणारे सर्व कामगार असंघटित क्षेत्रामध्ये मोडतात.

असंघटित क्षेत्रातील उपक्रमांसाठीच्या राष्ट्रीय आयोगाच्या मते (2004) असंघटित क्षेत्रामध्ये जे अनिगमित उपक्रम खाजगी वैयक्तिक किंवा कुटुंबाच्या मालकीचे आहेत, तसेच जे उपक्रम मालाचे आणि सेवांचे उत्पादन व विक्री करतात तसेच जे उपक्रम वैयक्तिक मालकीतत्त्व आणि भागीदारीमध्ये चालविले जातात, तसेच ज्या उपक्रमांमध्ये 10 पेक्षा कमी कामगार काम करतात, त्यांचा असंघटित क्षेत्रामध्ये समावेश होतो. निबंधलेखक असंघटित क्षेत्रातील कामगार आणि भारताची अनौपचारिक अर्थव्यवस्था यांचा सहसंबंध तसेच एकूण अर्थव्यवस्थेतील सहभाग यावर निबंध सादर करू शकतात.

**2. असंघटित क्षेत्राचा आकार –**

जानेवारी 2005 मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेतील एकूण रोजगार 458 द.ल. होता, त्यापैकी 395 द.ल. लोक असंघटित क्षेत्रामध्ये काम करीत होते. हे प्रमाण 86% होते. यानुसार सद्यस्थितीतील असंघटित क्षेत्राचे आकारमान किती आहे, यावर शोधनिबंध सादर करता येतील.

यामध्ये मजुरीवरील कामगार, असंघटित क्षेत्रातील स्वरोजगारी, विविध श्रेणीतील घरगुती कामगार यांचा समावेश होतो. या प्रत्येक श्रेणीचा स्वतंत्रपणे अभ्यास करता येईल.

**3. गरिबी आणि असंघटित कामगार यांच्यातील उच्च सहसंबंध –**

2004-05 च्या आकडेवारीनुसार भारतातील एकूण लोकसंख्येपैकी 41% लोकसंख्या की जी असंघटित क्षेत्रामध्ये काम करते, ती गरीबीच्या रेषेखाली जीवन जगत आहे. याचा अर्थ गरिबी आणि असंघटित क्षेत्रातील कामगार यांच्यामध्ये उच्च सहसंबंध आहे, या सहसंबंधाचा अद्ययावत माहितीच्या आधारे अभ्यास करता येईल. यानुसार संघटित क्षेत्रातील कामगारांचे गरीबीचे प्रमाण, असंघटित क्षेत्रातील कामगारांचे गरिबीचे प्रमाण, त्याचे ग्रामीण आणि शहरी वर्गीकरण या अनुषंगाने निबंध सादर करता येतील.

**4. शेती क्षेत्रातील असंघटित कामगार आणि बिगरशेती क्षेत्रातील –**

असंघटित कामगार यांचे प्रमाण अभ्यासता येईल.

**5. शेतीक्षेत्रातील स्वरोजगारी आणि बिगरशेती क्षेत्रातील स्वरोजगारी –**

असंघटित कामगार, त्यांची ग्रामीण–शहरी आणि स्त्री–पुरुष अशी वर्गवारी सांख्यिकी माहितीच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**6.** असंघटित कामगारांच्या बाबतीत असणाऱ्या वेठबिगारीच्या समस्येचा सांख्यिकी माहितीच्या आधारे आढावा घेता येईल.

**7. असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचा मानवी विकास निर्देशांक (HOI) -**

मानवी दारिद्र्य निर्देशांक (HPI) लिंगभेद विकास निर्देशांक (GDI) या संदर्भातील सांख्यिकी माहितीच्या आधारे सखोल अभ्यास करून निबंध सादर करता येतील.

**8. शेतीक्षेत्रातील आणि बिगरशेतीक्षेत्रातील असंघटित श्रमिकांच्या** समस्यांचा स्वतंत्रपणे अभ्यास करता येईल.

**9. शहरीकरण, औद्योगिकरण, सेवाक्षेत्राचा वेगाने होणारा विकास –**

यामुळे शेतीक्षेत्रामध्ये निर्माण झालेल्या कामगारांच्या तुटवड्याच्या समस्येचा प्राथमिक माहितीच्या आधारे स्वतंत्रपणे अभ्यास करता येईल.

**10.** 2009-10 या आर्थिक वर्षातील भाववाढीची सर्वात अधिक झळ असंघटित क्षेत्रातील कामगारांना बसली आहे. त्या अनुषंगाने प्राथमिक माहितीवर आधारित शोधनिबंध सादर करता येईल.

**11.** असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी गेल्या **10** वर्षातील सरकारी उपाययोजनांचे मूल्यमापन करून धोरणात्मक उपाययोजना सुचविता येतील.

असंघटित क्षेत्रातील कामगारांचा वरील विविध विषयांच्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी अद्ययावत माहिती देणारे काही संदर्भ खाली नमूद केले आहेत.

संदर्भ –


1. **National commission for Enterprises in Unorganized sector (2007)** "Report on conditions of work and promotion of Livelihood in the unrecognized sector."
2. **Planning commission (2002)** "Report of special Group on Targeting Ten million - Employment opportunities.
3. **Govt. of India, Ministry of Finance.** Economic survey 2008-09.
4. **UNDP** Human Development Report 2002, Oxford University Press.
5. **Govt. Of Maharashtra.** मानव विकास अहवाल – महाराष्ट्र 2002
6. **Planning commission - Govt. of India -** Maharashtra Development Report 2007.
7. **Datt Ruddar and K.P.M. Sundaram.** Indian Economy. S. Chand and company Ltd. Ramnagar, New Delhi. 58thed - 2009.
8. **Kannan K.P., Shrivastav Ravi, sengupta Arjun** Social security for unorganized workers NCEUS Report. Economic and Political Weekly August 2006 Mumbai.
9. **Bhagoliwal T. N.** Economics of Labour and Social Welfare Sahitya Bhavan 2008.
10. पाटील ज. फा. आबंर्डेकर
11. **Memoria C.B.** Labour problems and social welfare in India. Kitab Mahal Allahabad 2005
12. **Govt. Of India,** Report of National Commission on Labour 2002.

# ३) महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचेवास्तव आणि भवितव्य

**मुलाणी एम. यू.**
प्रपाठक, अर्थशास्त्र विभाग,
शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, शारदानगर, बारामती
मोबाईल : 9881161893

महाराष्ट्र राज्याच्या हीरक महोत्सवी वर्षात महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासाचा लेखाजोखा केलेला आहे. महाराष्ट्र राज्याची निर्मिती 1 मे 1960 रोजी झाली असली तरी 1 नोव्हेंबर 1956 पर्यंत द्विभाषिक राज्य होते. प्रांतवार भाषिक राज्याच्या निर्मितीने संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली आहे. संयुक्त महाराष्ट्र केवळ साध्य नसून आर्थिक विकासाबरोबर सामाजिक एकता व समानता गाठण्याचे साधन आहे. महाराष्ट्र राज्याच्या शीर्षकाबाबत भिन्न भिन्न मतप्रवाह असले तरी महानराष्ट्र म्हणून महाराष्ट्राची निर्मिती झाली आहे. भारताच्या स्वातंत्र्यानंतर अनेक धगधगत्या प्रवाहांना सामोरे जावून महाराष्ट्राची निर्मिती झाली आहे. महाराष्ट्र राज्य हे भारताचे उत्तर व दक्षिण भूमी जोडणारे राज्य आहे. महाराष्ट्राचा हीरकमहोत्सवी वर्षात महाराष्ट्राच्या 1960-61 ते 2009-2010 पर्यंतच्या आर्थिक विकासाचा ऊहापोह घेतला आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा महारथ अविकसितकडून विकसनशील अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करीत आहे. भारताच्या महासत्ता बनण्याच्या इष्टांकामध्ये राज्याचा महत्त्वपूर्ण योगदान आहे, गेल्या 50 वर्षात आर्थिक विकासाचा टप्पा पार केला आहे. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत कितपत मजबूती आली आहे, त्या सकल बाबींचा ऊहापोह खालील मुद्यांनी केलेला आहे.

1. महाराष्ट्र राज्य लोकसंख्येच्या बाबत भारतात दुसऱ्या क्रमांकावर असला तरी या विकासाबरोबर जन्मदर व मृत्युदराचे प्रमाण कमी कमी होत आहे. म्हणजे वैद्यकीय सेवा सुविधा आणि जनजागृतीत वृध्दी झाली आहे. त्याचप्रमाणे स्त्री-पुरूष साक्षरतेत वृध्दी झाली आहे. 1961-41 दशकात 27.5 टक्के, तर 2001 च्या दशकात 22.75 टक्के पर्यंत लोकसंख्या

घटत आहे. स्त्री साक्षरता 1961-71 दशकात 23.1 वरून 67.51 टक्क्यापर्यंत वृध्दी झाली असून नागरीकरण 31.17 वरून 42.4 टक्क्यापर्यंत वृध्दी झाली. महाराष्ट्रात आर्थिक विकासाचे द्योतक म्हणजे वाहतूक व रोजगारामुळे स्थलांतरित लोकसंख्या जास्त आहे.भविष्यकाळात लोकसंख्येबाबत जन्मदर 15 आणि मृत्युदर 5 पर्यंतच आणण्याचे 2010 पर्यंत इष्टांक आहे.

2. महाराष्ट्र राज्याचे उत्पन्न 1960-61 - 1889 कोटी रूपयांवरून 2002-03 पर्यंत 02,63,225 कोटी रूपयांपर्यंत वाढलेले आहे. त्याचप्रमाणे राज्याचे दरडोई उत्पन्न 1993-94 च्या किंमतीप्रमाणे 1960-61 मध्ये 484 रूपयावरून 26,386 रूपयांपर्यंत वाढला आहे. राज्याचा वार्षिक वृध्दी दर 4.8 टक्के दरडोई वृध्दी दर 2.8 टक्के इतका असून भारतात महाराष्ट्र राज्य उत्पादनासंदर्भात तृतीय क्रमांक आहे. राज्याच्या प्राथमिक क्षेत्राचे उत्पन्न 1960-61 मध्ये 34 वरून 16 टक्के तसेच द्वितीय क्षेत्राचे 26 वरून 25 टक्के आणि तृतीय क्षेत्राचे 40 टक्के वरून 59 टक्क्यापर्यंत वाढले आहे हे आर्थिक विकासाचे द्योतक आहे.

3. शेती क्षेत्राच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य पिछेहाटीवर आहे. कोरडवाहू शेती, अन्नधान्याबाबत तूट, शेतीची कमी उत्पादकता पिकांची दर हेक्टरी उत्पादकता कमी, ऊस पिकाबाबत प्रगती, दुध उत्पादनात लक्षणीय वाढ, फळे, फुले, पिकांबाबत समाधानकारक वृध्दी असे संमिश्र चित्र दिसत असले तरी शेतीच्या विकासाला संधी आहे. महाराष्ट्रात 1960-61 ते 2008-09 या काळात शेती उत्पादकतेत फारसा फरक पडलेला नाही. महाराष्ट्रात गेल्या 50 वर्षात सिंचन क्षमता 6 टक्के वाढली. या तुटपुंज्या सिंचनापैकी 60 टक्के पाणी ऊस पिकाला दिले जाते. महाराष्ट्रात पिकांची दर हेक्टरी उत्पादकता इतर राज्यांच्या तुलनेने कमी असून नदीकडे पिके घेण्याचा कल वाढत आहे. महाराष्ट्रात शेतीत सार्वजनिक गुंतवणूक वाढवून प्रकर्षित शेती करीत असल्यामुळे उत्पादनात वाढ होत आहे. ओलिताखालील क्षेत्रात वाढ होत आहे, फळबागा कार्यक्रमामुळे फळ पिकांचे क्षेत्र व उत्पादनात वाढ झाली आहे. प्रकर्षित शेती पध्दतीमुळे गेल्या तीन दशकात अन्नधान्याचे उत्पादन 61 लाख मे. टनावरून 152 लाख मे. टनापर्यंत वाढले आहे हे आर्थिक विकासाचे द्योतक आहे.

शेती व शेती संलग्न व्यवसायामध्ये वृध्दी झाली आहे. त्यामध्ये दुग्ध व्यवसाय, शेळी मेंढी पालन व्यवसाय, मासेमारी, शेती अभिमुख व्यवसाय, त्यामध्ये साखर कारखाने यात वाढ झालेली आहे. महाराष्ट्रात पारंपारिक शेतीपेक्षा आधुनिक शेती करण्याकडे कल असून त्यात तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. आधुनिक काळात सेंद्रिय शेतीचा प्रकार वाढत आहे. सहकारी क्षेत्रांबाबत महाराष्ट्र राज्य प्रगतीपथावर आहे. महाराष्ट्रात सर्वच क्षेत्रामध्ये सहकार पोहचलेला आहे. भारतातील एकूण सहकारी संस्थापैकी राज्यात 27.3 टक्के संस्था, 14.68 टक्के सभासद संख्या, 26.3 टक्के भाग भांडवल आहे. राज्यात एकूण रोजगारापैकी 12.5 टक्के रोजगार सहकारी क्षेत्रात आहे. सहकाराने महाराष्ट्राची प्रगती केली आहे. सहकारी साखर उद्योगाबाबत महाराष्ट्रात उल्लेखनीय प्रगती झाली

आहे. दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, मासेमारी, वाहतूक सहकारी तत्त्वांवर आहे.

4. औद्योगिक क्षेत्राबाबत महाराष्ट्र आघाडीवर आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून महाराष्ट्रात कापड उद्योगाबाबत मुंबई शहर विकसित झाले आहे. गेल्या 50 वर्षात 8233 वरून 30684 पर्यंत चालू कारखान्यांची संख्या वाढली असून दैनिक रोजगार 787 वरून 1182 हजार पर्यंत पोहोचला आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षापर्यंत ग्राहक वस्तू उद्योगातील रोजगार 64.8 टक्के वरून 37.4 टक्के पर्यंत तर पूर्ण निर्माण वस्तू उद्योगात 16.5 टक्के वरून 29.8 टक्के पर्यंत भांडवली वस्तू उद्योगात 15.5 टक्के वरून 25.3 टक्के पर्यंत वाढलेला आहे. महाराष्ट्रात जैव तंत्रज्ञान धोरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळे, सिकॉम, महावित्त मंडळे, लघु वित्त महामंडळ, विभागीय महामंडळे, जिल्हा उद्योग केंद्रे, उद्योग मित्र अशा विविध योजनांमुळे औद्योगिक क्षेत्र प्रगती पथावर आहे. त्याचप्रमाणे हीरक महोत्सवी वर्षापर्यंत औद्योगिक कलहाचे प्रमाण कमी होत आहे हे औद्योगिक विकासाचे द्योतक मान्य करावे लागेल.

5. पायाभूत सुविधा हे अर्थव्यवस्थेतील आर्थिक विकासाचा कणा असून प्रत्येक क्षेत्राशी निगडित आहे. पायाभूत सुविधांमध्ये ऊर्जा, रस्ते, दळणवळण, बंदरे, वाहतूक, संपर्क यांचा समावेश होतो. महाराष्ट्राच्या गेल्या 50 वर्षात विजेच्याबाबत खाजगी, सार्वजनिक, सहकार क्षेत्र प्रगती करीत असले तरी मागणीच्या मानाने वीज पुरवठा होत नसल्यामुळे वीज भारनियमन सतत वाढत आहे हे आर्थिक विकासाला मारक ठरते. विजेचे सकल उत्पादन 3268 वरून 64740 दश लक्ष किलोवॅट तास होत असून उत्पादनाच्या मानाने वीज वापर वाढत आहे. भारताच्या मानाने वीज उत्पादन दर 12.4 टक्के महाराष्ट्रात होत आहे. महाराष्ट्रातील विजेबाबत महत्त्वपूर्ण समस्या म्हणजे विजेचा चोरून वापर हे होय.

6. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात वाहतूकीच्या सुविधांनी भर घातली आहे. महाराष्ट्रात 5910 कि. मी. लोहमार्ग असून भारताच्या 9.31 टक्के आहे. लोकसंख्या व औद्योगिक उत्पादनाच्या मानाने लोहमार्गाचे प्रमाण कमी असले तरी मुंबई शहराच्या वृध्दीमध्ये फार मोठे योगदान आहे. शिवाय मेट्रो रेल्वे प्रकल्प कार्यान्वित होत आहे. त्याचप्रमाणे राज्याच्या विकासात रस्ते विकासाचे योगदान आहे. भारताशी राज्याच्या रस्त्यांचे अनुपातन 6.56 टक्के एवढेच असले तरी राज्यातील 96 टक्के गावे बारमाही, 4.2 टक्के गावे हंगामी रस्त्यांनी जोडलेली आहेत. जल वाहतूक विकासाने महाराष्ट्राच्या विकासात मौलिक भर टाकली आहे. परकीय व अंतर्गत जल वाहतूकीने व्यापारात वृध्दी झाली आहे, त्याचप्रमाणे राज्यात हवाई मार्ग मोठया प्रमाणात विकसित होत आहे.

7. वाहतूक साधनांच्या विकासाबरोबर पोस्ट, बँका, भ्रमणध्वनी, दूरदर्शन, वृत्तपत्रे, यांच्यामुळे विकासात वृध्दी झाली आहे. त्याचप्रमाणे दळणवळण व संपर्क व्यवस्थेमुळे राज्याचा आर्थिक वृध्दी दर वाढण्यास प्रोत्साहन मिळाले आहे.

8. कोणत्याही राज्याच्या आर्थिक विकासाकरीता वित्त संस्था महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. यामध्ये सहकारी वित्त संस्था राष्ट्रीयकृत बँका, नागरी सहकारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका

यांचा समावेश आहे. सहकारी संस्था गेल्या ५० वर्षात 175 कोटी रूपयांवरून 31113 कोटी रूपये शिखर संस्थेकडून कर्ज वितरण केले आहे. तसेच प्राथमिक सहकारी संस्थांकडून 43 कोटी रूपयांवरून ५४९८ कोटी रूपये पर्यंत कर्ज वितरण झालेले आहे, त्याचप्रमाणे अनुसुचित बँकांच्या शाखांचे प्रमाण 1118 वरून 6912 झाले आहे, नागरी सहकारी बँका 630 असून त्यांच्या 4000 शाखा असून 39,000 कोटी रूपये कर्ज वितरण केले आहे तसेच प्रादेशिक ग्रामीण बँका 133 आहेत या सर्व वित्त संस्थांनी वित्त सहाय्याच्या स्रोताने आर्थिक प्रगतीस योगदान दिले आहे.

9. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासास पर्यटन क्षेत्राने हातभार लावला आहे. पर्यटन विकासातून नवी गुंतवणूक, रोजगार, स्वयं रोजगार या बाबींची संपन्नता प्राप्त होते, त्याद्वारे कोकण पर्यटन विकास साधला जात आहे. त्यामुळे प्रादेशिक समतोल विकास हे इष्टांक पूर्ण होण्यास मदत होते.

10. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात रोजगार हमी योजना, एकाधिकार कापूस योजना, अवर्षण प्रवण विकास कार्यक्रम, एकात्मिक, ग्रामीण विकास कार्यक्रम, रोजगार माहिती व संवर्धन कार्यक्रम, पडीक जमीन विकास कार्यक्रम, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम, कृष्णा खोरे विकास महामंडळ, विविध आर्थिक महामंडळाद्वारे राज्याच्या विकासात भर घातली जात आहे

11. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात महिलांचे योगदान आहे. त्याकरीता स्वयं सहाय्यता बचत गटांद्वारे विविध रोजगार योजना तसेच कृषि क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढावा अशा कार्यक्रमांमुळे राज्याच्या आर्थिक विकासात हातभार लागलेला आहे.

12. राज्याच्या बदलत्या अंदाजपत्रकामुळे आर्थिक विकासाला साहय झालेले आहे. राज्याच्या उत्पन्न, खर्च व कर्ज या साधनामुळे विकासास मदत झालेली आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात मुख्य अडसर दारिद्र्य व बेकारी या असून त्यांच्या निर्मूलनासाठी विविध साधनांचा उहापोह करता येईल. त्यांच्या निर्मूलनाने आर्थिक विकासास हातभार लावता येतो. वर उल्लेख केल्याप्रमाणे महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात विविध घटकांनी योगदान दिले असले तरी भविष्यात हे योगदान चिरकाल टिकण्यासाठी विविध आव्हाने स्वीकारावी लागतील. त्याचे मूल्यमापन शोधनिबंधाच्या संशोधकांना करता येईल.

संशोधकांना खालील मुद्यांवर शोधनिबंधाचे लेखन करता येईल.

1. लोकसंख्या गुणवत्ता व आर्थिक विकास.
2. आर्थिक विकास व सकल उत्पन्न, दरडोई उत्पन्न.
3. आर्थिक विकास व शेती क्षेत्र
4. आर्थिक विकास व शेतीभिमुख व्यवसाय व जोड व्यवसाय
5. आर्थिक विकासात पाणी व्यवस्थापनाचे योगदान.
6. आर्थिक विकासात सहकारी चळवळींचे योगदान.
7. आर्थिक विकास व औद्योगिक क्षेत्र.
8. आर्थिक विकासात वाहतूक, दळणवळण, संपर्क साधने यांचे योगदान.

9. आर्थिक विकास व ऊर्जा.
10. आर्थिक विकासात वित्तीय संस्थांची भूमिका.
11. पर्यटन क्षेत्राचे योगदान.
12. आर्थिक विकासात राज्याचे आयात निर्यात क्षेत्रांचे योगदान.
13. आर्थिक विकास व राज्याचे अंदाजपत्रकीय धोरण
14. आर्थिक विकासात स्वयं सहाय्यता बचत गटाच्या चळवळीचे योगदान
15. राज्याच्या आर्थिक विकासात विविध विकास योजनांचे योगदान
16. राज्याच्या आर्थिक विकासाबाबत भविष्यकालीन योजना किंवा उपाय वगैरे

संशोधकांना उपरोक्त विषयासंबंधी शोध निबंधासाठी योग्य संशोधन पध्दतीचा काटेकोरपणे वापर करून वरील उल्लेख केलेल्या मुद्यांवर सादर झालेल्या शोध निबंधाच्या चर्चेतून विकास साध्य करण्याची आवश्यकता असणाऱ्या साधनाचे मूल्यमापन होऊन भविष्यकालीन वाटचालींवर प्रकाशझोत टाकता येतो व त्यांचे प्रतिबिंब राज्याच्या अंदाजपत्रकांत टाकता येणे हे या चर्चासत्राच्या यशस्वीतेचे गमक असेल. शोध निबंधासाठी माहिती शक्यतो अद्यावत असावी, त्याकरीता संदर्भग्रंथ, पुस्तके, अहवाल, मासिके, अग्रलेख वगैरे स्रोत पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**संदर्भ सूची :**

1. भोळे, बेडकिहाळ (संपा) – बदलता महाराष्ट्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा – 2003.
2. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी – विविध अंक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई.
3. सवदी ए. बी. – द मेगा स्टेट महाराष्ट्र 2008, निराली प्रकाशन, पुणे
4. डॉ. संतोष दास्ताने, महाराष्ट्र 2009, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे.
5. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एक दृष्टीक्षेपात 2008, सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य.
6. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ – माहिती पत्रके.
7. कृषि विषयक पुस्तिका – कृषी संचलनालय महाराष्ट्र राज्य, पुणे.
8. मुलाणी एम. यू. स्वयंसहाय्यता महिला बचत गट 2005, डायमंड प्रकाशन, पुणे.
9. मुलाणी एम. यू. अल्प वित्त नियोजन बचत गट 2008, डायमंड प्रकाशन, पुणे.
10. Bhalchandra Mungekar - The Economy of Maharashtra Dr. Ambedkar Institute of Social and Economic Change, Mumbai 2003.
11. Arun Sadhu - Maharashtra National Book Trust - India, New Delhi 2007
12. Human Development Report Maharashtra 2005, Government of Maharashtra Mumbai.
13. Maharashtra Development Report, Planning Commission, Government of India - New Delhi - 2007 Agricultural at Last Maharashtra State.
14. Vasantdada Sugar Institute, Co-operative Sugar Factories in Maharashtra 2006-07.
15. Satish P. Agricultural Credit In Post Reform- Epw- June 2007.

# मराठी अर्थशास्त्र परिषद
## चौतिसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे चौतिसावे वार्षिक अधिवेशन आदर्श कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स, बदलापूर, जि. ठाणे येथे ऑक्टोबर-नोव्हेंबर 2010 मध्ये आयोजित होणार आहे. अमरावती येथील सौ. मुक्ता जहागिरदार या अध्यक्षस्थान भूषवितील. परिषदेच्या अधिवेशनातील चर्चा सत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

1) पॉल सॅम्युअलसन यांचे अर्थशास्त्रातील योगदान.

2) महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचे वास्तव आणि भवितव्य

3) असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचा अभ्यास

या विषयांची रूपरेषा याच अंकात देण्यात आली आहे. चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष यथावकाश जाहीर करतील. त्या विषयावर निबंध मागविले जात नाहीत.

निबंध लेखकांनी जास्तीत जास्त 2000 शब्दांत विषय मांडावयाचा असून निबंधासोबत 300 शब्दांत त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. निबंध श्री लिपी देवरत्न 6.0 मध्ये तयार करून त्याची सॉफ्ट कॉपी (सी.डी.) व दोन हार्ड कॉपीज अध्यक्षांच्याकडे पाठवाव्यात. निबंध लेखक मराठी अर्थशास्त्र परिषदेचा सभासद असलाच पाहिजे.

निबंध मराठीत असावेत. ते पूर्वी कोठेही सादर केलेले किंवा प्रसिद्ध केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, महाविद्यालयाचे/विद्यापीठाचे/शैक्षणिक वा अन्य संस्थेचे नाव व पत्ता हा सर्व तपशील मराठीत देणे आवश्यक आहे.

प्रत्येक निबंध लेखकाचा केवळ एकच निबंध (स्वतंत्र वा संयुक्तपणे लिहिलेला) अधिवेशनासाठी स्वीकारला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या चौतिसाव्या वार्षिक अधिवेशनात निबंधाच्या उत्तम सादरीकरणास संयोजकांकडून तीन सुवर्णपदके प्रदान करण्यात येणार आहेत. 31 ऑगस्ट 2010 ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख असून त्यानंतर पाठविलेले निबंध स्वीकारले जाणार नाहीत. निबंध लेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत.

**सौ. मुक्ता जहागिरदार,** "व्यंकटेश", 12, गुलमोहर सोसायटी, अमरावती - 444 602.

**अनिल सुर्यवंशी**
कार्यवाह - खजिनदार
दुरध्वनी (0721) 2661851

# सन 2009-2010 या वर्षात झालेले आजीव सभासद

| अ.क्र. | नांव | सभासद क्रमांक |
|---|---|---|
| 1. | श्री. आंडगे शशिकांत चंद्रकांत | 1344 |
| 2. | कु. गोरे मेघना मधुकर | 1345 |
| 3. | कु. चव्हाण पौर्णिमा दिपक | 1346 |
| 4. | प्रा. इंगळे रावसाहेब पिराजी | 1347 |
| 5. | कु. देवकर वंदना भगवान | 1348 |
| 6. | प्रा. डॉ. विभुते पंढरी इरन्ना | 1349 |
| 7. | श्री. तलवारे जितेंद्र दगडू | 1350 |
| 8. | प्रा. गणापुरे आर. डी. | 1351 |
| 9. | कु. पाटील होनश्री यशवंत | 1352 |
| 10. | पाटील परशुराम रुस्तमराव | 1353 |
| 11. | कारंडे रमेश हणमंत | 1354 |
| 12. | धनवे गौतम हरिबा | 1355 |
| 13. | श्री. लाड प्रताप बापुसो | 1356 |
| 14. | मा. थोरात वाय. एस. पी. | 1357 |
| 15. | श्री. अभंग संदीप बाबुराव | 1358 |
| 16. | कवळे तृप्ती बाळासाहेब | 1359 |
| 17. | प्रा. मदननुरे व्यंकटेश काळुराम | 1360 |
| 18. | यादव नीता संतोष | 1361 |
| 19. | पावरा मोहन टी | 1362 |
| 20. | पाटील नारायण चिंतामणी | 1363 |
| 21. | पाटील योगेश अशोकराव | 1364 |
| 22. | लोखंडे उदय मारुती | 1365 |
| 23. | वाघमारे उत्तम अप्पासो | 1366 |
| 24. | प्रा. शितोळे अनिल विजय | 1367 |
| 25. | भापकर बबन बाजीराव | 1368 |
| 26. | प्रा. भगत बाळासाहेब अण्णासाहेब | 1369 |
| 27. | प्रा. शिंदे आबासो हरिबा | 1370 |
| 28. | प्रा. कामथे दशरथ निवृत्ती | 1371 |
| 29. | कोकरे कुंडलिक विठोबा | 1372 |
| 30. | प्रा. कुलकर्णी शरद रघुनाथ | 1373 |
| 31. | प्रा. रणशुर सुभाष रामजी | 1374 |
| 32. | प्रा. वैशाली प्रभाकर मारकड | 1375 |
| 33. | प्रा. शिंदे नवनाथ आदिनाथ | 1376 |
| 34. | मुटकुळे नितीन अशोक | 1377 |
| 35. | डॉ. एस. व्ही. ढमढेरे | 1378 |
| 36. | प्रशांत ज्ञानेश्वर हरमकर | 1379 |
| 37. | प्रा. मुळे महादेव भगवान | 1380 |
| 38. | प्रा. घाडगे राजेंद्र महादेव | 1381 |
| 39. | प्रा. डॉ. कांबळे बालाजी ग्यानोबा | 1382 |
| 40. | श्री. मोरमारे अनंत जयवंत | 1383 |
| 41. | प्रा. गजानन गंगा भारती | 1384 |
| 42. | सूर्यवंशी मारुती सुभाष | 1385 |
| 43. | श्री. सोनटक्के गंगाधन नागोराव | 1386 |
| 44. | श्री. बाभूळगावकर किशन संताजी | 1387 |
| 45. | प्रा. यादव अशोक राजाराम | 1388 |
| 46. | श्री. तनपुरे मधुकर देवराव | 1389 |
| 47. | प्रा. सांगळे सुधाकर अच्युतराव | 1390 |
| 48. | प्रा. भुजबळ सुदाम मल्हारी | 1391 |
| 49. | प्रा. घडकिंग ज्ञानदेव कचरूबा | 1392 |
| 50. | श्री. थोपटे महादेव गुलाबराव | 1393 |
| 51. | बोटे अनुराधा रघुनाथ | 1394 |
| 52. | प्रा. डॉ. कटमुसरे सिरास भेय्यालाल | 1395 |
| 53. | कसबे तानाजी शिवाजी | 1396 |
| 54. | कदम गजानन गणेशराव | 1397 |
| 55. | प्रा. मुंढे एकनाथ शंकरराव | 1398 |
| 56. | पवार श्रीकांत हरिबा | 1399 |
| 57. | निकम सुहासिनी राहुल | 1400 |
| 58. | डॉ. बुरंगे राजेश उल्हासराव | 1401 |

## सन 2009-2010 या वर्षात झालेले आजीव सभासद

| अ.क्र. | नांव | सभासद क्रमांक |
|---|---|---|
| 59. | सत्रे अनिल धोंडीराम | 1402 |
| 60. | खेडकर भगवान देवराव | 1403 |
| 61. | कुटे संतोष तुकाराम | 1404 |
| 62. | जाधव अशोक शिवाजीराव | 1405 |
| 63. | गजानन अनंत भाकरे | 1406 |
| 64. | महानवर तुळशीराम दादा | 1407 |
| 65. | श्रीमती अरुणा विजयकुमार नेरे | 1408 |
| 66. | डॉ. उमेश राजदेरकर | 1409 |
| 67. | डॉ. विजया एस. नवले उपप्राचार्या | 1410 |
| 68. | प्रा. डॉ. अविनाश म. जुमळे | 1411 |
| 69. | प्रा. डॉ. महेश चंद्रभान डाबरे | 1412 |
| 70. | प्रा. डॉ. कल्याणकर आबासाहेब विठ्ठलराव | 1413 |
| 71. | सौ. वर्षा दिलीप पाटील | 1414 |
| 72. | प्रा. किर्तनगार राजेश्वर विश्वनाथ | 1415 |
| 73. | प्रा. रामपुरे रामराव बालाराव | 1416 |
| 74. | प्रा. संजय चैनराव गिरीपुंजे | 1417 |
| 75. | डॉ. श्रीकृष्ण राऊत | 1418 |
| 76. | प्रा. विरेंद्र बाळकृष्ण राऊत | 1419 |
| 77. | प्रा. डॉ. मेहत्रे सुरेश चंद्रकांत | 1420 |

### सूचना

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य वर्गणी दर 1 एप्रिल 2010 पासून खालीलप्रमाणे सुधारित करण्यात आलेले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | आजीव सदस्यत्व वर्गणी | रुपये | 2000/- |
| 2. | इमारत निधी | रुपये | 1000/- |
| | एकूण | रुपये | 3000/- |

आजीव सदस्य वर्गणी व इमारत निधी असे एकत्रित रुपये 3000/- चा डिमांड ड्राफ्ट 'कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने काढून कार्यवाह यांच्याकडे पाठवावा, याची कृपया नोंद घ्यावी.

**अनिल सूर्यवंशी**
कार्यवाह – खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

# निबंध लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

1) चर्चासत्रासाठी विषयाचे जे शीर्षक जाहीर केलेले असते तेच आपल्याही निबंधाला देणे आवश्यक नाही. त्याच्या अंतर्गत एखादा उप-विषय निवडून त्या अनुषंगाने योग्य असे शीर्षक आपणास देता येईल.
2) सामान्यपणे विषयाचा ऐतिहासिक आढावा घेण्यासाठी पूर्ण निबंधाचा उपयोग करू नये. त्यात अनेक वादग्रस्त मुद्यांचे विश्लेषण असल्यास आणि त्यातून नवीन अर्थ लावण्याचा प्रयत्न करणार असल्यासच विस्तृत आढावा घ्यावा.
3) जी माहिती एम्.ए.पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उपलब्ध असते तिचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. परंतु त्या पातळीचे विश्लेषण असू नये; कारण ते सर्वांना माहीत असते. त्या माहितीतील सांख्यिकी संबंध शोधून त्यापलीकडे जाऊन विश्लेषणाचा प्रयत्न करणे योग्य राहील.
4) समाजाच्या आर्थिक जीवनाचा (राष्ट्रीय / प्रादेशिक आणि आवश्यकतेनुसार स्थानिक) सामाजिक-सांस्कृतिक जीवनाशी येणारा संबंध, त्यात होणारे बदल आणि शासनाचे आर्थिक धोरण यावर निबंधात त्या त्या विषयाच्या अनुषंगाने भर असावा.
5) निबंधात वेगवेगळ्या भागांमध्ये जे संबंध आपण दर्शवितो आणि निष्कर्ष प्रस्थापित करतो त्यांच्यात अंतर्गत सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला जावा.
6) निबंधात शक्यतो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या 'अर्थशास्त्र परिभाषा कोश' आणि ' शासन व्यवहार कोश' यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत.
7) निबंधातील आकडेवारीचे संदर्भ अचूक, सुस्पष्ट, परिपूर्ण आणि मान्य पध्दतीनुसार असणे आवश्यक आहे.
8) निबंधाची मांडणी केवळ सांख्यिकी माहितीचे संकलन करून वर्णन करणारी न ठेवता संशोधनात्मक पध्दतीची असावी. त्यामुळे निबंधाची पातळी उंचावेल. निबंध इतर भाषांतून केवळ भाषांतरित नसावेत.
9) निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा/ संदर्भ सूची प्रमाणित पध्दतीने असावी.
10) निबंधाच्या अखेरीस गोषवारा द्यावा.(300 शब्द)

# अर्थसंवादच्या लेखकांना आवाहन

अर्थसंवादसाठी लेखन करणाऱ्या लेखकांनी आपले लेखन पूर्वमुद्रित नाही, त्यामध्ये कॉपीराईटचा भंग झालेला नाही व संदर्भाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख झाला आहे; या अर्थाच्या विधानाचा आपल्या पत्रामध्ये उल्लेख करावा. लेखकांनी आपल्या शोध निबंधात शक्यतो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या 'अर्थशास्त्र परिभाषा कोश' आणि 'शासन व्यवहार कोश' यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत. निबंधामध्ये वापरल्या जाणाऱ्या तक्त्यांचे शीर्षक मराठीतूनच असावे. निबंधातील आकडेवारी, संदर्भ सूचक, सुस्पष्ट,परिपूर्ण व मान्य पध्दतीनुसार असणे आवश्यक आहे. निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा/ संदर्भ सूची प्रमाणित पध्दतीने असावी.

लेखकांनी आपला शोध निबंध श्री लिपी - देवरत्न ६.० मध्ये तयार करून निबंधाच्या दोन हार्ड कॉपीज व एक सॉफ्ट कॉपी (सी.डी) पाठवावी. अशा स्वरूपात निबंध न पाठविल्यास तो स्वीकारणे अडचणीचे ठरेल. विषयाचा तात्कालिक संदर्भ, आवश्यक ती सैध्दांतिक मांडणी, अद्ययावत सांख्यिकी विश्लेषणातील शास्त्रशुध्दता, भाषाशैली व नेमके संदर्भ या गोष्टींची दखल घेऊन अर्थसंवादमध्ये लेखन छापण्यासंबंधी निर्णय घेतला जाईल. लेखक मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य असणे आवश्यक आहे. लेखकांनी आपला आजीव सदस्य क्रमांक कळवावा. अर्थसंवादच्या संबंधात आपल्या मदतीची अपेक्षा आहे. आपल्या सूचनांचा योग्य तो विचार केला जाईल.

**जगन्नाथ शामराव पाटील**
प्रमुख संपादक

# निवेदन

खालील आजीव सभासदांचे ऑक्टों–डिसें. 2009 पर्यंतचे पाठविलेले अंक प्रमुख संपादकांकडे परत आलेले आहेत. तरी संबंधित आजीव सभासदांनी आपले नवीन पत्ते संपादकांकडे पाठविण्यासंबंधी सहकार्य करावे.त्यानंतर त्या सभासदांना बदललेल्या पत्त्यावर अर्थसंवादचे पुढील अंक पाठविण्यात येतील.

| अ. क्र. | सभासद क्रमांक | आजीव सभासद नांव |
|---|---|---|
| 1 | 6 | श्री.तळवळकर गोविंद |
| 2 | 22 | श्री.गाडगीळ गंगाधर गोपाळ |
| 3 | 25 | श्री.देशपांडे विश्वनाथ विनायक |
| 4 | 35 | श्री.वाकणकर बिंदू माधव |
| 5 | 45 | श्री.दांडेकर अशोक शंकर |
| 6 | 55 | जोगळेकर सुहास रामचंद्र |
| 7 | 56 | प्राचार्य कौण्डिण्य एम्. व्ही. |
| 8 | 73 | सौ.कुलकर्णी विद्या रत्नाकर |
| 9 | 92 | श्री.खुदानपूर गोविंद शिवाजी |
| 10 | 93 | राजर्षी जी.एम. |
| 11 | 129 | राऊत राघवेंद्र भास्कर |
| 12 | 132 | प्रा.मानकर विजयकुमार गजानन |
| 13 | 143 | प्रा.जोशी श्रीकांत कालीदास |
| 14 | 147 | मीठाणी दाऊद मोहंमद अली |
| 15 | 149 | सौ. जोशी मेघा यशवंत |
| 16 | 153 | प्रा.मोकाशी पु.के. |
| 17 | 176 | प्रा.गिरासे गजेंद्रसिंग ठाणसिंग |
| 18 | 178 | प्रा.उपदेव विनायक वासुदेव |
| 19 | 181 | प्रा.परांजपे रमेश वासुदेव |
| 20 | 185 | प्रा.अष्टेकर शांताराम |
| 21 | 197 | कु. शिंगटी रजनी सिताराम |
| 22 | 203 | प्रा.शहा रमेश बाबुलाल |
| 23 | 212 | श्री. देशपांडे आ. रा. |
| 24 | 222 | श्रीमती अलका डी. |
| 25 | 223 | डॉ. बावकर आर. पी. |
| 26 | 249 | श्रीमती जोशी कालिका दिनानाथ |
| 27 | 260 | कधाळीकर वृंदा महादेव |
| 28 | 279 | प्रा.तराले प्रल्हाद गोविंदराव |
| 29 | 284 | श्रीमती शिरोडकर ज्योत्स्ना ए. |
| 30 | 318 | सौ. सबनिस नीला रविंद्र |
| 31 | 321 | प्रा.फरील नरेंद्र विश्वनाथ |
| 32 | 335 | श्रीमती कोहजकर मृणाल अक्षय |
| 33 | 339 | सौ.एकबोटे नंदिनी व्हि. |
| 34 | 377 | पाटील आर.बी. |
| 35 | 378 | प्रा.कान्हेरे रंगनाथ भी. |
| 36 | 396 | सौ.दिक्षीत एम. आर. |
| 37 | 408 | डॉ. वाघमारे वनश्री |
| 38 | 414 | प्रा.निजसुरे पदयावती सखाराम |
| 39 | 420 | सौ.प्रयाग माधवी |
| 40 | 492 | चिट्टे गुरूशांत निलकंठ |
| 41 | 498 | प्रा.कस्तूरे आशा |
| 42 | 519 | प्रा.सौ.श्रीवास्तव नलीनी |
| 43 | 593 | श्री.छापरवाल शांतीलाल बिरदीचंद |
| 44 | 606 | डॉ.सौ.सावंत मिनाक्षी दि. |
| 45 | 613 | नातू नारायण पुरूषोत्तम |
| 46 | 619 | गौड उर्मिला ए. |
| 47 | 624 | उशीर देवीदास गंगाधर |
| 48 | 627 | जाधव जी. एम. |
| 49 | 639 | सौ.एकबोटे विद्या |
| 50 | 652 | प्रा.देवरे नानाजी वामन |

| अ. क्र. | सभासद क्रमांक | आजीव सभासद नांव |
|---|---|---|
| 51 | 656 | सौ.दामले वर्षा आनंद |
| 52 | 666 | श्री.ओक जयंत काशिनाथ |
| 53 | 667 | डॉ.सौ.केळकर किर्ती |
| 54 | 679 | भोईटे दिलीप मारूती |
| 55 | 687 | डॉ. आतेकरे प्रकाश शंकरराव |
| 56 | 713 | प्रा.तोडमल आय.ए. |
| 57 | 727 | श्री. कुलकर्णी एम. डी. |
| 58 | 753 | भटकर सुरेश नामदेव |
| 59 | 778 | डोईजड मेघा सदाशिव |
| 60 | 829 | बनसोडे विजय सुखदेव |
| 61 | 837 | श्री.मालतुमकर वि.वा. |

| अ. क्र. | सभासद क्रमांक | आजीव सभासद नांव |
|---|---|---|
| 62 | 840 | अंबुलकर डी. पी. |
| 63 | 843 | श्री.नाखले वा.गो. |
| 64 | 846 | श्री.गोवंडे प्रकाश का. |
| 65 | 860 | प्रा.कोंडेकर उमाकांत भास्करराव |
| 66 | 875 | श्री. शिखरे गोरख |
| 67 | 934 | श्री.बेलसरे संजय |
| 68 | 1021 | पाटील गिरीष गोविंद |
| 69 | 1026 | प्रा.महातळे आशिष कृ. |
| 70 | 1155 | तळतकर संजय भागवतराव |
| 71 | 1184 | नाईक वैशाली कल्याणराव |
| 72 | 1259 | प्रा.झोटिंग शरद वामन |

**प्रमुख संपादक –जगन्नाथ पाटील**

# अर्थसंवाद
## ( खंड 33, 2009-10 )

## अ) लेख सूची


| अ.क्र. | स्वतंत्र लेख | पान नंबर |
|---|---|---|
| 1. | विकासनितीचा प्रणेता : शाहू छत्रपती | 01-09 |
| 2. | कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा तालुक्यातील नैसर्गिक साधनसंपत्ती व भू जैव विविधता आणि प्रादेशिक विकास एक अभ्यास | 10-17 |
| 3. | महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राचा विकास | 18-27 |
| 4. | स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची प्रगती आणि प्रभाव | 28-40 |
| 5. | वाळवा तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील महिला स्वयं सहाय्यता बचत गटांची बलस्थाने व दुर्बलस्थाने | 41-49 |
| 6. | हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या दारिद्र्याचे विश्लेषण | 50-60 |
| 7. | दक्षिण कोकणातील आंबा प्रक्रिया उद्योगाचे अर्थशास्त्र आणि समस्या | 61-72 |
| 8. | नांदणी भाजीपाला व फळफळावळ उत्पादक सहकारी संघ मर्यादित, नांदणी – एक अभ्यास | 73-79 |
| 9. | सत्य भाववाढी संदर्भात | 80-87 |
| 10. | भारतातील सेवा क्षेत्राची वाढ | 103-112 |
| 11. | कृषी–विकासाचे शाश्वत (चिरंतन) विकृतीकरण : महाराष्ट्राच्या ऊस पीक पट्ट्यातील संसाधनाचे विद्रुपीकरण (पूर्वार्ध व उत्तरार्ध) | 113-133, 246-266 |
| 12. | नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकासात बाएफ मित्र या स्वयंसेवी संस्थेचे योगदान | 149-163 |
| 13. | सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटकांचा पर्यटन वस्तू व सेवाविषयीचा समाधान निर्देशांक | 163-170 |
| 14. | नंदुरबार जिल्ह्यातील पीक रचनेतील बदल : एक व्यष्टी अध्ययन (1998-99 ते 2005-06) | 171-180 |
| 15. | कोल्हापूर जिल्ह्यातील प्राथमिक क्षेत्रापासून मिळणारे उत्पन्न | 181-192 |
| 16. | घनकचरा व्यवस्थापन : सांगली – मिरज – कुपवाड महानगरपालिकेचा चिकित्सक अभ्यास | 193-198 |

| | | |
|---|---|---|
| 17. | भारतातील ग्रामीण वित्तीय संस्था व हस्तक : ऐतिहासिक व तत्कालीन तुलनात्मक विश्लेषण | 200-212 |
| 18. | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे व उपाय | 213-221 |
| 19. | पश्चिम महाराष्ट्रातील बँकिंगचे भवितव्य | 222-227 |
| 20. | खानदेशातील कृषीपुढील आव्हाने (विशेषत: धुळे जिल्ह्यातील) | 228-238 |
| 21. | नोबेल पारितोषिक 2009 | 239-242 |
| 22. | एक आरफाट अर्थशास्त्रज्ञ उद्योग : पॉल सॅम्युअल्सन | 243-245 |
| 23. | सोलापूरातील खाद्यतेल उद्योग : एक दृष्टिक्षेप | 267-275 |
| 24. | सांगली जिल्ह्यातील ऊस पीकाचे उत्पादन व उत्पादकता | 277-282 |
| 25. | मऱ्हाठीयेंची नगरी... | 283-286 |
| | **भाषणे** | |
| 1. | जागतिक वित्तीय अरिष्ट : सैद्धांतिक आणि व्यावहारिक दृष्टिकोन | 304-337 |
| | **पारितोषिक प्राप्त लेख** | |
| 1. | ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींचा शेतीविषयक अभ्यास | 338-373 |
| 2. | पॉल क्रुगमनचे नव आर्थिक भूगोल | 374-384 |
| | **पीएच.डी. प्रबंधाचा सारांश** | |
| 1. | महाराष्ट्र राज्यातील बेदाणे उद्योग – सद्य:स्थिती, समस्या आणि उपाय | 134-148 |
| 2. | कासारी जलसिंचन क्षेत्रातील कृषी विविधीकरणाचा अभ्यास | 287-296 |
| | **ग्रंथ परीक्षण** | |
| 1. | India and China comparable the incomparable | 88-94 |
| 2. | भारतातील सेवा कर : एक टीकात्मक मूल्यमापन | 297-299 |
| 3. | भारतीय अर्थशास्त्रज्ञांचे योगदान | 300-301 |

| | श्रद्धांजली | |
|---|---|---|
| 1. | भा. टा. ढेकणे | 95-96 |
| 2. | नलिनी पंडित | 97-98 |
| | **33 व्या अधिवेशनाचा वृत्तांत** | |
| 1. | २१ व्या शतकातील आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांतातील पॉल क्रुगमन यांचे योगदान | 385-389 |
| 2. | भारतीय शेती समोरील आव्हाने | 390-395 |
| 3. | महाराष्ट्रातील औद्योगिक विकासाचे मूल्यमापन | 396-397 |
| 4. | तेहत्तिसावे वार्षिक अधिवेशन | 398-402 |
| 5. | अर्थसंवाद – वार्षिक अहवाल | 403-406 |
| | **विषयांची रूपरेषा** | |
| 1. | पॉल सॅम्युअल्सन यांचे अर्थशास्त्रातील योगदान | 407-410 |
| 2. | असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचा अभ्यास | 411-413 |
| 3. | महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचे वास्तव आणि भवितव्य | 414-418 |

# अर्थसंवाद
( खंड 33, 2009-10 )

## आ) लेखक सूची


| अ.क्र. | स्वतंत्र लेख | पान नंबर |
|---|---|---|
| 1. | गायकवाड माधव | 01-09 |
| 2. | धेडे धर्मा रानबा | 10-17 |
| 3. | पाटील दिलीप | 18-27 |
| 4. | खुरूद भा. शं. | 28-40 |
| 5. | चव्हाण (उडुपी), पौर्णिमा दीपक | 41-49 |
| 6. | कोकाटे चंद्रकांत, रामकृष्ण सोळुंके | 50-60 |
| 7. | खामकर बबन | 61-72 |
| 8. | मोराळे मन्मथ भगवानराव | 73-79 |
| 9. | वादगडे राजकुमार आण्णासो | 80-87 |
| 10. | पाटील जगन्नाथ शामराव | 103-112 |
| 11. | जुगळे वसंतराव | 113-133, 246-266 |
| 12. | उगले सुनिल प., डी. आर. बच्छाव | 149-163 |
| 13. | सावंत वासुदेव नारायण | 163-170 |
| 14. | जोशी श्रीराम देवीदास, महेश मोहनीराज बडवे | 171-180 |
| 15. | देवकर वंदना | 181-192 |
| 16. | अवघडे बी. डी., पी. एस. कांबळे | 193-198 |
| 17. | थोरात, वाय. एस. पी व जे. एफ. पाटील | 200-212 |
| 18. | दामजी बी. एच. | 213-221 |
| 19. | जोशी पी. एन. | 222-227 |
| 20. | गोलाहित सुरेश बळीराम | 228-238 |
| 21. | ककडे विजय | 239-242 |
| 22. | पाटील जे. एफ | 243-245 |
| 23. | हळ्ळी अशोक संगाप्पा | 267-275 |

| | | |
|---|---|---|
| 24. | लाड प्रताप बापूसो | 277-282 |
| 25. | माने, शि. ना. | 283-286 |
| | **भाषणे** | |
| 1. | देशपांडे विनायक श्रीधर | 304-337 |
| | **पारितोषिक प्राप्त लेख** | |
| 1. | इंगळे जयवंत | 338-373 |
| 2. | हरमकर प्रशांत, मीरा आळशी | 374-384 |
| | **पीएच.डी. प्रबंधाचा सारांश** | |
| 1. | मोरे, आदिनाथ जे. | 134-148 |
| 2. | पाटील ए. के. | 287-296 |
| | **ग्रंथ परीक्षण** | |
| 1. | सराफ विष्णू | 88-94 |
| 2. | म्होपरे राहुल शं. | 297-299 |
| 3. | यादव संतोष | 300-301 |
| | **श्रद्धांजली** | |
| 1. | दाणी अनिल | 95-96 |
| 2. | पाटणकर व्यं. सु. | 97-98 |

**33 व्या अधिवेशनाचा वृत्तांत**

| | | |
|---|---|---|
| 1. | दि.व्यं.जहागिरदार | 385-389 |
| 2. | मधुकर शिंदे | 390-395 |
| 3. | के.जी.पठाण | 396-397 |
| 4. | सुर्यवंशी अनिल बाबुराव | 398-402 |
| 5. | पाटील जगन्नाथ शामराव | 403-406 |

**विषयांची रूपरेषा**

| | | |
|---|---|---|
| 1. | पॉल सॅम्युअल्सन यांचे अर्थशास्त्रातील योगदान | 407-410 |
| 2. | असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचा अभ्यास | 411-413 |
| 3. | महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचे वास्तव आणि भवितव्य | 414-418 |

**अंकांचा तपशील**

| | | |
|---|---|---|
| 1. | एप्रिल – जून, 2009 | 102 |
| 2. | जुलै – सप्टेंबर, 2009 | 97 |
| 3. | ऑक्टोबर – डिसेंबर, 2009 | 103 |
| 4. | जानेवारी – मार्च, 2010 | 127 |



हे त्रैमासिक अनिल सूर्यवंशी यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता प्रतिमा ऑफसेट, ब्राह्मणपूरी, इस्लामपूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गोदाई शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी, 413 411 जिल्हा सोलापूर येथे प्रसिद्ध केले.

# अर्थसंवाद या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

## (फॉर्म 4,नियम 8 नुसार)

| | | |
|---|---|---|
| 1. प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/डॉ.अनिल सूर्यवंशी<br>गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ,<br>शिवाजीनगर, बार्शी- 413411 जि. सोलापूर |
| 2. नियतकाल | : | त्रैमासिक |
| 3. मुद्राकाचे नांव | : | अनिल सूर्यवंशी |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ,<br>शिवाजीनगर, बार्शी 413411<br>जि. सोलापूर |
| 4. मुद्रणस्थळ | : | प्रतिमा ऑफसेट, ब्राह्मणपुरी, इस्लामपूर. |
| 5. प्रकाशनाचे नांव | : | बाब क्र.3 प्रमाणे |
| 6. संपादकाचे नांव | : | जगन्नाथ शामराव पाटील |
| 7. राष्ट्रीयत्व | : | भारतीय. |
| पत्ता | : | शांती प्लाझा, बी-9, 880/881,<br>शनिवार पेठ, सातारा 415 002 |
| 8. मालकाचे नांव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/सेंटर फॉर<br>दि स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन. रॉय<br>ह्यूमन डेव्हलपमेंट कँपस, फ्लॅट 6, ब्लॉक एफ,<br>कार्डिनल ग्रेशियस शाळेजवळ, सरकारी वसाहत<br>इमारत क्र.323 समोर, बांद्रे (पूर्व) मुंबई-400051 |

मी अनिल सूर्यवंशी असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

**अनिल सूर्यवंशी**
मुद्रक व प्रकाशक